Raj Guru R. H. P...

काव्यरत्नावली.

Madhav Villa, Sel... Ro...
... Sea Road,

वर्ष २३ वें. BAY. B.

साल अखेर.

ईशकृपेनें काव्यरत्नावलीचें २३ वें वर्ष संपलें. सन १
ारी पासून रत्नावलीस २४ वें वर्ष लागणार. ह्मणजे
दोन तपें रत्नावलीचें अस्तित्व राहून तिजकडून
बहुत सेवा झाली. हें सगळें ईश्वराच्या कृपेचें फळ
तपें काव्यरत्नावलीनें जें काम केलें तें वाचकांपुढे
लीच्या सांपत्तिक स्थितीचा विचार करणें ह्मणजे तिच्या शोच
च्या इतिहास सांगणें होय. तो इतिहास सांगणें आतां
होईल. अशा स्थितींत समाधान मानण्यास जर कांहीं
तर आमच्या कविमित्रांचें रत्नावलीवरील अकृत्रिम प्रेम
आज जवळ जवळ रत्नावलींतून पाऊण लाख कविता
, हें सर्व श्रेय आमच्या कविमित्रांना आहे. आगच्या जुन्या
ी रत्नावलीवर अवकृपा झालेली दिसते. तरी असें न कारं
ाणें रत्नावलीचें लालन पालन करतील अशी आशा आहे.

ह्या वर्षांत दोन हजारावर कविता छापून निघाली. त्यांत मो
विवाह, वायुलता, दोरा, अलंकारार्पण, दंडदंडना वगैरे प्रकरणें
बाकीचीं कविता लहान मोठी प्रसिद्ध झाली आहे. ह्यां
ासुत, प्रो. बेहरे बी. एस्. सी. मधुकर, वि. बा. जो
ण, पांडुकुमार, गो. मो. बोकील, सतीशकुमारदत्त, उमार
. सदाशिवात्मज, राधानंदन, ही मंडळी रत्नावलीस नवीन
आहे. रत्नावलीवर ते यापुढेंही प्रेम करतील अशी आशा

वर्षी रत्नावलीचे दोन कवि कृष्णाजी लक्ष्मण देसा
म प्रधान. हे परलोकवासी झाले हें कळविण्यास आम्हांस
रा. रा. देसाई यांनीं योगवासिष्ठाचें भाषांतर
रंतु वाचकांच्या दुर्दैवानें त्यांचा तो सर्व प्रचंड उद्योग तस
चरित्र मिळविण्याचा प्रयत्न आम्हीं बराच केला, प
या तारखेशिवाय दुसरें कांहीं एक आमचे हातीं
तारीख ११ मार्च १९१२ रोजीं परलोकवासी झाले.
मुनिसिपालिटीचे प्रेसिडेंट होते. ह्यांनीं लोकहिताचीं
आहेत. ह्यांचें चरित्र कोणी आम्हांस मिळवून दिलें
१३२७. त्र्यं. ज. प्रधान यांचें चरित्र म्हणजे त्यांची मृत्युवार्ता
च होय ह्यापलिकडे कांहीं नाहीं. ह्यांचें स्वल्पचरित्र आम्हांस
चाळेकर हे पाठविणार होते परंतु अद्यून तें हातीं आलें नाहीं.

अनुक्रमणिका.

---

* ह्या काव्याचा पृष्ठांक निराळा आहे.

काव्यरत्नावली.

अंक १ ला.

वार्षिक तिळगूळ.

श्लोक.

तिळगुळीं कवितारससेचन
मम पिता करुनी रिझवी जन
विधिवशांत तया त्यजिलें तन
सुकवि तें कवितेसह मन्मन १

जरि नसे मजला प्रतिभालव
जरि असें पुरतें मतिलाघव
कुठुनि होइल हो कृति ही मम
मधुर साधुरसा जनकासम २

" करुनिया प्रतिवार्षिक हालवा
मम कुलोद्भव ! हें व्रत चालवा "
वचन हें जरि पाळितसें मला
समजतें मज तेवि न ये कला ३

सुजन हा मम सेवुनि हालवा
स्वमनिचें दुरि किल्मिष घालवा
जरि नरा हृदयीं ममता वसे
करुनि गोड निगोड हि घेतसे ४

किति तरी जन हा ऋतु तोषवी
रजनि शीत दिनीं सुखवी रवी
सकल ताप क्षणीं करितो दुरी
सुकविता कवितापजसा हरी ५

गरमशी वसनें तनुला तसें
रुचिर अन्न मुखा सुखवीतसें
तरु तसे मृग ही सुख सेविती
खगतती गत तीच विलंबिती ६

न नव पल्लव हें रजई असे
तरुस शीतनुदा ऋतु देतसे
करुनि हा ऋतु सृष्टि जुनी नवी
सुजनसें जनसेवन चालवी ७

उचित आगमना ऋतु भासला
ह्मणुनि उत्सव हा आजि पातला
परिचया नव नूतन जोडितो
सकल हा कलहां भुवि सांडितो ८

बहुत दूर असे जंव उत्सव
पडतसे श्रवणीं हेलवा–रव
हलविती तिलकां दिनयामिनीं
अविरता विरता प्रियकामिनी ९

कुणि तिळांस गुळासह आदरी
कुणि सफेत सुरञ्जित केशरी
करिति ते हलवा अपुल्यापरी
सधन ही धनहीन घरोघरीं १०

हळुच ती प्रमदा हलवी जया
हलविलें जनकाळिज ही तया
नवल हें अबलां बळ दे विधी
प्रबळ ही बळहीन करी कधीं ११

सतत अग्निवरी जरि ठेविती
कढत पाक तयावरि घालिती
सहन जो करि ताप सदा, प्रजा
वितिळ कां तिळकासम आर्यजा १२

तनुवरी फिरतां ललनाकर
धरितसे तिळ कंटक सत्वर
नवल होय तिळांस हि दे मती
सुमति ही मतिहीन करी रती १३

तिळ कसा पडला जणु बंधनीं
सतत राहत साखरवेष्टनीं
तिळ कसा सुखवी भुवनीं जसा
दिविगता विगतासु जनां तसा १४

स्वपरजातिविनिर्मितयादवी
त्यजुनि वैर पुरातन ही भुवीं
तिळ कसा शिकवी स्वजनीं धरा
जशि शुची शिशुची मधुरा गिरा १५

किति वदूं तिळका महिमा तव
करिति लोक तुझा जगिं उत्सव
भुवनिं या न दुजा तिळकापरी
सुमनसें जनसेवन जो करी १६

तिल कसा गमतो अबला जनां
सुभगदायक दैवत सेवना
तिल कपाळिं जिच्या विलसे सदा
अशिव तें शिवतें न तिला कदा १७

सुवसना मधुरस्मितभाविता
प्रियकरा बघतां प्रणयान्विता
तिलमिषें हृदया जणु अर्पिती
मकरसंक्रमणीं रमणी किती १८

हलवितो तरुणींतिल हा मन
ह्मणुनि या ह्मणती हलवा जन
वदति " याविण " ते प्रणयी जन
" विजनिं वा जनिं वा सम जीवन १९

" यदि मिळे हलवा प्रणयान्वित
" न च दुजें जगतीं मनवाञ्छित
" क्षिति नसे जरि तो मज लाभला
" जन वदो न वदो मजला भला २०

मधुर कां इतुका तरुणींतिल
वदति ते बुध इंगित यांतिल
मनुज भाव धरी हृदयीं जसा
निरस वा रसवान गमे तसा २१

सहजची अबला करि जी कृती
प्रबल शूर नरास हि ये न ती
ठरविली प्रभुनें स्थिति ती खरी
तिज गती जगतीं न च दूसरी २२

नवल तें न तरी युवती-सम
रुचिर ना गमला हलवा मम
फिरविना रचना विधि जोंवरी
न रमणीं रमणीकरमाधुरी २३

करि तिळांस यथामति अर्पण
करुनि गोड तयां सगळे जण
वचन गोड वदा जन! संप्रती
विनति ही नति हीच तुह्मांप्रती २४

तिळभरी न विषाद रिघे मनीं
निरस मत्कृति ही जनकाढुनी
विधि न दे सकलां मति सारखी
न जगतीं जगती बहु पारखी २५

मुंबई, मुगभाट.
रविवार १४।१।१२ } —पांडुकुमार—

सुभद्राविवाहकाव्य.

सर्ग पहिला.

गीति.

शोभे रैवतकाचळ विविधतरुलतापरंपरासंगें;
पाहुनि अभिनव शोभा, उत्कंठित हृदय फारसें रंगे! १
नयनमनोहर सुखकर चोंहिंकडे तरुलतावली फुलली;
नेसुनि शाल रुचिर ही, सृष्टिस्त्री कुसुमभूषणीं खुलली. २
उद्यानाची माला लागुनि गेली विशाल, दूरवर!
विलसति गंधोद्गारी ज्यांमध्यें दिव्य तरुलताप्रकर. ३

दुर्लभ असे खरोखर जो नंदनकाननस्थ बिबुधांही;
आमोदयुक्त मारुत सुटुनि असा, व्यापि सर्व वसुधा ही. ४
सहजमनोहर, गंधोत्कट, कुसुमव्यास जनमनोहारी,
मधुमालती--कदंबक--नवचंपक--कुंद--जातिच्या हारी— ५
दिसती नगशिखरावरि त्यामध्यें पक्षिसंघ वास करी;
सुस्वर गान जयाचें दुःखार्ताचा समस्त ताप हरी. ६
फुलुनी नलिनी जेथें, त्यांचा परिमल सदा सुटे फार;
जागोजागीं असती ऐसे जलपूर्ण रम्य कासार. ७
मकरंदकमलनाला सेवुनियां सर्वकाल आनंदें,
विहरे तेथें सारसहंसभ्रमरावली निजच्छंदें ! ८
षट्पदातिलका विकसितकमलमुखी मृदुलनालहस्ता ही--
दिसते सुंदर तरुणी उदकीं नलिनी खरीच ही नाहीं ! ९
नर्तन शिक्षापटु हा शिकवी तिज गंधवाह नृत्यकला;
तो गतिविलास तीचा अभ्यासानें मरालही शिकला. १०
कामुकवनिता जेंवी आलिंगी प्रियकरास सहजा ती;
शाखाकर पसरुनियां सहकारा तेंवि कुसुमिता जाति. ११
हासे कुसुममिषानें मधुकरगुंजितमिषें प्रियासंगें--
विश्रंभकथालापा करुनीयां, प्रेमसुखरसीं रंगे ! १२
ज्याचा रम्य पिसारा विलासिनीकेशपाशगर्व हरी;
केकारव करुनीयां नीपशिरीं वनमयूर नृत्य करी. १३
स्मरदूतिका खरी जी परपुष्टा, करुनि पंचमालाप,
कामुकहृदयीं मदनोद्दीपन करुनी नितान्त दे ताप ! १४
चाखुनि नीरस होतां एक लता, बघुनि अन्य नव साची,
मधुकर तिकडे धावे; कृति करितो सत्य सत्य मधुपाची ! १५
रम्योद्यानीं एका अर्जुन यतिवेषधारि वीरमती

बिचरे सचिन्त तेथें, यशःकथनिं ज्यांचिया कधी रमती. १६
अक्षय्य कवच टाकुनि, पांघुरला रक्तवर्ण तो छाटी !
जपमाळा एक करीं, अन्य करीं घेतली असे काठी ! ! १७
वीरशिरस्त्राण खरें टाकुनियां, बांधिली शिरीं शाल !
शुभ्र टिळा भाळावरि, चरणीं दिसतात पादुका लाल १८
पाहुनि उपवनशोभा, इतस्ततां फिरुनि फार तो दमला
अवलोकुनि चोहिकडे क्षुब्धमना स्वगत शब्द मग वदला १९
" एक धनुर्धर जगीं मी; परि माझी काय ही अहा ! नियति ! !
सोडुनि लज्जा सारी, झालों करण्या स्वकीर्तिहानि यति ! ! २०
सुंदरवनितालोभें झालों निःशंक आज संन्यासी !
मजही मूढ करी स्मर ! निंदावें मग कशास अन्यासी ? २१
सुरवरवृंदालाही घाली मोहामधें कुसुमबाण ! !
गाधिज वशिष्ट मुनिही फसले ! मी काय मानव अजाण ! ! २२
तुजसाठीं हें केलें कृत्य सुभद्रे ! स्वमानहानिकर;
जरि हृन्मर्मा छेदी खर करवालासमान हा निकर २३
मन्नयनचंद्रिका तूं; व्हावें दर्शन तुझें सुखें मजला;
ह्मणुनी सुहास्य-वदने ! योजियली युक्ति जाण ही सकळा २४
हा ! हन्त ! मंदमति हा हलधर मज गमतसे खरा जगतीं ! !
तुजला सुयोधनाला अर्पाया इच्छि जो विलासवति ! २५
लावण्यसरोवरिंची मराळिका, त्यजुनि राजहंसातें;
इच्छी अर्पायाला काकातें हा ! गमे नवल मातें ! ! २६
नृपकंठस्थितियोग्या क्षीरोदधि-सारभूत जी विमला
दिव्या मणिमाळा ती, मर्कट-करिं द्यावयास हा सजला ! २७
वृंदारकवृंदानें सेवन करण्यास होय जी उचित;
क्षीरोदधि-संभूता विमल सुधा देइ दानवां खचित ! २८

हा तारतम्यविरहित हलधर लोकीं खराच मंदमति !
यदुकुलललामकृष्णा ! केंवि दिली त्यास तूं निजानुमति ? २९
असती प्राणप्रिय तूं माझा सन्मित्र एक भूवरती;
अंधसुताविषयीं ही धरिली मग तूंहि केंवि हाय ! रति ! ३०
यदुपांडुकुलाचा जो कुलक्रमागत खराच संबंध,
विसरुनि देशी भगिनी अंधसुता नच जयास गुणगंध ! ! ३१
हाय ! सुभद्रा—देवी ! अंधसुता अर्पिसी कसा काय ?
अवगणुनी सहकारा जातिलता वरिल बब्बुला काय ? ३२
चातुर्यनभस्तलिंची होशी तूं खचित तारका विमला !
हा शशि विलसत असतां अंधतनय काजवा कसा रुचला ? ३३
मंदाकिनीनिवासी मृदुल कमलनाल जो सदा सेवी;
तो राजहंस टाकुनि हंसी काकास सेवि कां देवी ? ३४
जितललितकामदेवा अनुगुण पुरुषोत्तमा त्यजुनि, कां गे !
हा ! हन्त ! कमलजेनें सेवावा असुरनाथ अनुरागें ! ! ३५
प्राणसखे ! बाळपणीं प्रेमानें रुचिर खेळलों खेळ !
इतरेतरसहवासीं आनंदें बहुत लोटिला वेळ ३६
तो काळ सुखाचा तूं, हाय ! कसा विसरलीस गे ! रमणी !
जेव्हां परस्परातें सुखवितसों करुनि अभिमता करणी; ३७
जेव्हां धवलकरांहीं हिमकर ही सारवी धरा सकल;
सर्वत्र सुधाधारोपम विलसे दिव्य चंद्रिका विमल ! ३८
कासारीं स्फुटितलतावृंद करी गंधवाहसह नृत्य !
आमोदानें वासित होउनिया वात वाहतो सत्य ३९
कारंज्याच्या खालीं जेथें अलिवृंद घालितो रुंजी;
प्रेमालापें क्रमिला काळ किती रम्य तरुलताकुंजीं ! ! ४०
प्रेमरसाची सरिता नर्मालापें उचंबळुनि जातां,

भान न राहे तनुवरि हा ! हा ! तो काल आठवे आतां ४१
तेव्हां पंचशरानें ह्रदय सखे ! एक आपलें केलें;
तव नयन सर्वदांही असती मद्दर्शनास्तव भुकेले ! ४२
विनयवती त्या कालीं असकृत् केलें तुवां ह्रदय उघडें;
“ तुजवांचुनि इतराला वरीन ऐसें कदापिही न घडे ४३
मन्नयनपूर्णचंद्रा ! मी हा तुजलाच अर्पिला काय ”
यापरि वचनामृत तूं वेळोवेळीं न वर्षिलें काय. ४४
त्या प्रियकर दयिताचा आतां हा ! हा ! कसा विसर पडला ?
सुप्रेमाला अनुचित कैसा हा ! हा ! प्रकार हा घडला ! ! ४५
झाला त्या निःसीम प्रेमाचा गे ! क्षणांत अन्त कसा ?
आला मज गिळण्याला आतां हा समय दुष्ट अन्तकसा ! ! ४६
दुष्कर्मा, रणभीरु, भ्रष्ट खरा कीर्तिमंदिरांतून ?
तो दुर्योधन तुजला आवडला गे ! कसा मनांतून ? ४७
हा ! हा ! सौदामिनिपरि चमकत ही कोण पातली बाला
माला दिव्यमण्याची घालुनियां, दिपवि फार नयनांला ! ! ४८
ह्रदयाधिदेवता जी, साक्षात् संजीवनीच जीवाची;
आली सखिसह येथें तीच सुभद्रा रमावया साची ! ४९
कुंजांतर्हिततनु मी, यांचें विश्रंभवाक्य ऐकून,
सुखवीन तृषित नेत्रां नयनसुभग मूर्ति ही विलोकून ५०

प्रथमसर्ग समाप्त.

———कै० श्री० ना० मुजूमदार बी. ए.

अलंकारांर्पण.*

विहित.

श्लोक.

राधागृहीं वसुनि रात्रि निशांति[1] येतां--
सत्यां[2] स्वकोप लपवून तुला पहातां--
शय्या करूनि हरि ! नीज ह्मणे मुकाली
रात्रीं असे तुजसि जागृति फार झाली १०१

व्याजोक्ति

श्लोक.

मार्गी हरीस अवलोकुनि सत्यभामा
स्वाप्तस्त्रियांत लपवी विकृती[3] सकामा
जाऊनि ती हरिपदीं अतिलीन होय
दावी स्वभक्ति चतुरा सकलांस धन्य १०२

प्रतीप

श्लोक.

भक्तांचे परिपूर्ण कामे[4] करिशी तूं ईश दाता हरी !
आह्मा कल्पतरू निरर्थक असा तो वाटतो अंतरीं !
भक्तांचे बहु ताप दूर करण्या तूं दक्ष होशी जरी
नैक्षत्राधिपसेवनीं[5] रति[6] कधीं ती युक्त[7] नोहे तरी १०३

प्रतिवस्तूपमा.

श्लोक.

* गल्या वर्षाच्या ८ व्या अंकांत ह्या काव्याचे १०० श्लोक आलेले आहेत

१ पहाटेस, २ सत्यभामा. ३ कामविकार. ४ मनोरथ. ५ चंद्र. ६ प्रीति. ७ योग्य.

वैकुंठिं दूर वसशी जरि तूं परेशा
आह्मास पूज्य असशी सुगुणी सुरेशा
आकाशवास करितो जरिही मृगांक[1]
तो चंद्रिकायुत सुमान्य असे विशंक १०४

निदर्शना.

श्लोक.

सर्वाभीष्टद[2] तूं परेश असतां दाता खरा ईश्वरा
भूपालादिक दातृयाचन[3] अह्मा हें युक्त नोहे परों
होतां धेनु सुदुग्धपूर्ण अमुच्यापाशीं त्यजूनी तिला
लाता खात खरीपयों मिळविण्या हो यत्न कीं चांगला ? १०५

अप्रस्तुत प्रशंसा व अर्थांतर.

श्लोक.

कपाळिं भसिताप्रती बहुत फासिती दांभिक
गळाभरहि घालिती विविध रम्य माळा ठक
न ये भजकसाम्य त्यां तव हरी ! न ते संमत
मृगेंद्र कधिं होति कां शुनककृत्तिनें वेष्टित ? १०६

आर्या.

दितिजात कशिपुं तेव्हां करुनी निंदा तुझी किती गर्जे
हरिच्यां पुढें परि हरी ! जंबुकदर्पोक्ति ती कुठुनि साजे ? १०७

---

१ चंद्र. २ सर्वांचें इच्छित देणारा. ३ राजादिक दात्याजवळ याचना करणें. ४ परमेश्वर. ५ गर्दभी. ६ भस्म. ७ कातडे (सिंहाचें). ८ दैत्य. ९ हिरण्यकशिपु. १० पक्षीं–सिंह.

प्रस्तुतांकुर.

आर्या.

होशी देव गुणाश्रित भक्तीनें गम्य ही जरी असशी
युक्तच होय तुला हें मजसमदीनीं जरी कृपा करिशी १०८

उपमा प्रस्तुतांकुर व व्यतिरेक.

श्लोक.

होती[1] रम्य तुला चतुर्भुज जरी तूं शंखचक्रादिक-
घेऊनी स्वकरीं सदैव फिरशी कृष्णापरी पौंड्रक !
मेघश्याम सुवर्ण ही लसतसे अंगीं तुझ्या शोभन
भक्तानुग्रहता कशी तुजमधें येईल ती पावन ? १०९

पर्यायोक्त.

श्लोक.

धर्मादिदाननिरतां भजकांस काळीं-
उच्चस्थळीं सुगति देइ समर्थ वाली
सद्दानधर्मनिरताहि पहा बलीला-
घाली रसातळिं करूं नति त्या प्रभूला ११०

व्याजस्तुति.

श्लोक.

पापी प्रसिद्ध मधु कैटभ, शंख कंस
तैसा हिरण्यकशिपू, अघ, दैत्य यांस-
उद्धारिसी प्रभुवरा मलिनासुरांस
हें युक्त केविं तुज हें न कळे मनास १११

1 पौंड्रकराजानें श्रीकृष्णाचें अनुकरण केल्याचें वर्णन भागवतांत आहे.

आक्षेप.

श्लोक

आह्मापाशीं परीस आजवरि तो होता सुवर्णप्रद
नाहीं न्यून कधीं गृहांत पडलें तद्योग हो सौख्यद
झाला नष्ट जरी नसे क्षति अह्मा त्याची गमे सांप्रत
सर्वाभीष्टद तूं प्रसन्न असतां दाता हरी संमत ११२

विशेषोक्ति व विभावना.

श्लोक

ईशा ! प्रताप रिपुदीनजनां त्वदीय —
लोकीं न छत्र रहितां करितो अपाय
सच्छत्रें[1] शत्रुनृपतीस सुताप लोकीं
आश्चर्य तो करितसे बहुता विलोकीं ११३

विशेषोक्ति

श्लोक

ती सर्पिणीपरि जरा शरिरा धरीते
व्याधी रिपूवरि तनुप्रति घेरिती ते
आयूहि आमघटवारिपरी[2] झरें तें
दुष्कर्म लोक करिती तरि हे हरी! ते ११४

परिणाम

श्लोक

प्रभो ! तूं प्रसन्नें दृगब्जें[3] स्वभक्तां
कृपासागर श्रीहरी रे ! पहातां

---

१ छत्रसहित. २ कच्चया घड्यांतील उदकापरी. ३ दृष्टिरूप कमळानें.

तैदभ्यंतरीं होइ आनंद जाण
सदानंदरूपी तया काय वाण ! १९५

असंभव

श्लोक

सुरेंद्र क्रोधानें व्रजभुवि सुवृष्टीस करितां
जलौघें गोपांचे निलय विलया जात असतां
न कोणाच्या ध्यानीं मनिं उपटुनी थोर गिरिला
सुरक्षाया होशी शिशुहि हरि तूं सिद्ध महिला ११६
किती होती वृंदावनिं शिशु हरी यांतच तुळा
पहा अज्ञानी ते गणिति परि तूंतें नच तुला
न कोणाच्या ध्यानीं प्रभुवर कराग्रीं उचलुनी
सुखें तूं शैलातें धरिशि सहजीं सातहि दिनीं ! ११७

अधिक

श्लोक

असे परिमिती जया न कधिं होय वाग्ब्रह्म तें
बहु प्रथित ईश्वरा त्रिभुवनामधें श्रेष्ठ तें
तयामधिं अनंत ते गुण तुझे न ते राहती
कळे न मनुजाप्रती हरि ! विचित्र बा त्वत्कृती ! ११८

विशेष.

श्लोक.

नाना बंधांतुनिहि सुटण्या यज्ञयागा करीती
शांतीसाठीं बहुमतिं तसे नित्य संविग्न होती

---

१ त्यांच्या अंतःकरणांत. २ साम्य. ३ गोवर्धन पर्वत.

तीर्थीं जाती मनशुचि हरी ! तें नसोनी विचित्र
आहे सारें अविहित तसें बाह्य हें ढोंग मात्र ११९

श्लोक.

अदर्शनपथा[1] तुझी गतसुमूर्ति मा-वल्लभा !
तरी प्रतिकृती तिची विलसते मनीं पूर्ण भा
तमा करितसे दुरी भजकमानसांतील ती
प्रसन्न मम अंतरीं प्रकट नित्य राहोच ती ! १२०

आर्या.

बाहेर आंत मागें, पुढतीं सकलां दिशांकडे मजला
असुनी एक अनेका-परि हरि सर्वत्र दिसाशि तूं विमला ! १२१

श्लोक.

तें कोणतें कृत न पुण्य हरी ! तयानें
दासीपरी न कृतें[3] संपद हो तयानें
ते कोणते न सुरदुर्लभ भुक्त भोग
त्वत्पूजनें सकल होति तया सुयोग १२२

व्याघात.

श्लोक.

नानाऽसद्विषयोपभोग[4] भोगी— । आनंदा-प्रति पावतो सुरागी
त्वन्माया भुलवी जनास ऐसें । मिथ्या सौख्य तयांस यांत भासे १२३
आहे मी तव बाल हे परेशा ! । त्यागानेंहे[5] ह्मणून होय ईशा
दीनत्याग नसेच युक्त कोणा । त्यांतूनी पितरां[6] तुला सुजाणा ! १२४
वित्ताच्या करिता सदा व्ययानें— । दारिद्र्यांत बुडेन मी अज्ञानें—

---

१ अदृश्य. २ अज्ञाना ३ केलें. ४ अनेक मिथ्या विषयोपभोग. ५ अव्हेर करण्याला अयोग्य. ६ मातापित्या (तुला).

मानी लुंब्धे असें, विरुद्धे दाता-- । दानीं निर्धनता वैरी अनंता ! १२५

विकल्प.

श्लोक.

संसारसौख्या जरि इच्छितां जन । शरीर राखा निज सर्व साधन
किंवा स्वमुक्तीप्रति इच्छिता जरी-- । सदा परेशास भजाच अंतरीं १२६

अप्रस्तुतप्रशंसा.

श्लोक.

देवा तूझा न्याय आह्मां कळे ना
पापी होती स्वर्गीं नेशी तयांनां
जे का होती पुण्यवान् त्यांस कोठें--
नेणारा तूं गूढ आह्मास वाटे ? १२७

प्रौढोक्ति.

श्लोक.

त्वदीय कांताकचरम्य जाल-- । कलिंदजातीरतमालनील
तदंग गंगाजलवास शुभ्र-- । हंसी सितांगापरि होय गौर ! १२८

संभावना व अतिशयोक्ति.

श्लोक.

सहस्रमुखशेष तो तव गुणां जरी जाणता--
अनंत तव सद्गुण प्रभु नसे हरी ! वर्णिता
त्वदीयगुणलेखनीं करसहस्र लावी जरी--
न अर्जुन तथापि तो सुपटु लेखनीं हो तरी १२९

---

१ लोभी. २ लोभ्याच्या उलट. ३ स्वीकारी. ४ केशकलाप. ५ यमुना. ६ वसती.

आकाश.

पद.

(सुवर्ण केतकीपरि जो– या चालीवर.)

खचित नसे हें अम्बरं[1] साचें, मेघरसाचें सर, सुदती
जलकेलिस्तवें[2] विरंचिनें[3] का सृजिलें रेखुनि निजहस्तीं
साच नसुन हीं नीरेंदशकलें, शैवालचि हीं साखि! असती
उडुगण, चंद्रहि भासमात्र तो, मुकुलित, विकसित कमलें तीं
चंद्रावरि तो कलंक नोहे, केवल मधुपांची पंक्ति
नसुनि सुरधनी, याच सराची स्वर्गाची ही जलवीथी! १
सृष्टिसतीचें अथवा नभ हें क्रीडामंदिर मज गमते!
नयनमनोहर श्यामलरंगी स्वयंसिद्ध हें छत दिसतें
नव्हे सुधाकर, दीप उजळतो गाढ तिमिर ने विलयातें
त्याचवरुन ही मषी निघतसे, वदाति मुग्धजन लांछन तें!
नसुन तारका स्पष्टचि रत्नें बैसविलीं हीं शोभेतें
नव्हे सुरनदी,--प्रासादाची निश्रेणी ही मज दिसते २
अथवा सुंदर पात्रिं मौक्तिकें इंद्रनीलही ते भरुनी
सृष्टि भगवती, अर्पायातें शोधी रसिकांलागोनी!
नीलधवल सुमगुच्छचि किंवा विकसित झाला हा विपिनीं
कृष्णदलीं वा धवलचंदनें काढिलिं चित्रें रेखोनी
गंगायमुनाप्रवाह वाहे, किंवा सुविरल मिसळोनी
असे विविध, मनिं तरंग उसळति, देखुनि गगना करिगमनि! ३

नागेश.

---

१ आकाश. २ क्रीडा. ३ ब्रह्मदेवानें. ४ ढग.

आम्ही !

श्लोक.

विश्वेशानें प्रथम रचिली सृष्टि ही कौतुकानें
केलें तेव्हां प्रगट अपुलें सर्व चातुर्य त्यानें !
आनन्दाची फुटत उकळी दृष्टि जेथें पडावी
आश्चर्यानें स्तिमितचि मनोवृत्ति होऊन जावी ! १

ठायीं ठायीं खचुनि भरलीं बोधतत्त्वें कितीक
येई भारी अमृतमधुर प्रीतिचें येथ पीक
वाहे तापा हरवित जिथें मन्द वायू सुखाचा
झाला ऐशी स्वकृति बघुनी त्यासही तोष साचा २

हर्षे लोकांपुढति मग तो ठेवि ती रम्य सृष्टी
हा ! हा ! अन्य क्षणिंच हृदयीं जाहला फार कष्टी !
एकानेंही मुळिं तिजवरी फेकिली नाहिं दृष्टी !
नैराश्यानें हृदयिं भरला— राहिली दूर तुष्टी ! ३

" अज्ञानानें अहह ! गणिती मत्कृती तुच्छ मूढ
यांना सृष्टि–स्थित न कळती बोधतत्त्वें निगूढ ! "
ऐशा दुःखें क्षणभरि बसे स्वस्थ विश्वेशराय
कांहीं कालें उचित सुचला एक त्याला उपाय— ४

स्वीयांशानें बनवुनि कवी शीघ्र निर्माण केले
द्याया बोधामृत जडजनां भूवरी धाडियेले
ते हे आम्ही भुवि विचरतों स्वर्गिंचें देवदूत
वाङ्माधुर्यें सतत करितों पापचित्तास पूत ! ५

———— एकनाथपंत रेंदाळकर.

निद्रा.

श्लोक.

पहा सकल सृष्टि ही बहुत शोभताहे भली
नभासहि अहा ! किती विमलता असे लाभली
कशीं चमकतीं पहा उडुगणें नभोमंडलीं
असे मधुरता परी मजसि नष्ट ती जाहली ! १

अहा ! पवन मंजुल ध्वनि करी जधीं वाहतो
तसाच घन वाहुनी मनिं भरीत मोदास तो
पहां सकळही कशा खळखळा नद्या वाहती
तसे भ्रमर हे मधू मधुर वेचितां गुंगती ! २

अती किलकिलाट हा गमत, कष्टवी अंतरीं
न सुचि परि ये कशी अहह ! कांहिं केलें तरी
पडुन शयनावरी सकल आठवी मानसीं
अये त्यजुनि कां मला निघुनि जासि निद्रे असी ! ३

दिनद्वितय जाहलें, विगतनिद्र आहेंच मी
नको कुपित होउं तूं मजवरी, तुला मी नमीं
नको निघुनि आजिही मजसि जाउं सोडोनिया
अतां धरिं तवांतरीं किमपि पामरीं या दया ! ४

उषःसमयसंपदा तुजविणें न कांहींच ती
परी अहह ! मानसीं उलट कष्टवीते अती !
अये ! स्वजननीपरी तुजसि फार मी मानितों
खरोखरि तुझ्यामुळें मजसि येइं उत्साह तो ! ५

वामन जनार्दन कुंटे.

कांचनास.

पद– (त्रिताल.)

खोटा तव सहवास !
कांचना ! खोटा तव सहवास ! ! ॥ धृ० ॥
निद्रा हरिसी, भय निपजविसी;
करिसी कृश देहास ! १
अमृत लावुनी तोंडीं दंभें,
भरिसी उदरिं विषास ! २
स्वातंत्र्यातें हरुनी मोहें,
नित्य बनविसी दास ! ३
बंधुभाव तो विसरवुनी तूं,
वेचविसी जीवास ! ! ४
सरस्वतीचें तेज झांकुनी,
पाडिसि निज तेजास ! ५
प्राणाहुनि जगिं लुब्ध होउनी,
रक्षविसी अपुल्यास ! ६
दीनावरचा मित्राचाही–
लोपविसी विश्वास ! ७
अल्पशाच तव सहवासें हे–
कळले गुण वेड्यास ! ! ८

सुमंत.

काव्यरत्नावली.

अंक २ रा.

सुभद्राविवाहकाव्य.

सर्ग दुसरा.

गीति.

झाला कुंज मनोहर लागुनियां तरुलतावली दाट;
त्यांतुनि आंत शिराया रविकिरणांही किमपि नसे वाट ! १
कारंज्यांतुनि वरती उडुनीयां जलतुषार अति गार,
बसतां तेथें, करिती तप्तांचा सकल-ताप परिहार २
शीतल पवनासंगें स्फुटितलतातरु जनांस पालविती;
तेथें कामुक शुभ्र ज्योत्स्नाशाली प्रदोष घालविती ! ३
सुटतांच मंद वारा, कुसुमांचा बहर खालती गळतो;
विरहाकुलितजनांचा तत्संगें ताप सर्वही पळतो ४
जे अभिनव कुसुमांचा परिमल निःशेष चोरुनी नेती;
ते जलतुषारशीतल पवन समस्तां अपार सुख देती ५
विलसे रम्य शिलातल त्यावरि लावण्यराशि ती बसली
उठुनी विचारमाला हृदयीं, अत्यन्त आकुला दिसली ६
विरहाकुल वनितेसम कृशतम झाली सुगात्रयष्टि खरी !
झालें सुभगवदनही विगतच्छवि दिवसधूसरेंदुपरी ७
बोले सखी विनोदें मग वेगें वचन तीस लक्षुनियां;
" बघ हंसयुगें चरती, कासारीं कमलनाल भक्षुनियां ८

खगमृगवृंद सुखानें उपवनिं या विहरतात, बघ सर्व
एथें प्रवेश करितां, होय जनांतें नितान्त सुखपर्व ९
ह्मणुनी या आरामा आनंदोद्यान नाम हें साजे;
संततसंतापहरणीं नंदनही यास सर्वथा लाजे १०
या सुंदर आरामीं दिससी मज तूंच एकली खिन्न
हिमजलतुषार चरती, परि तव हा काय जाहला खिन्न ! ११
ही उदधिमेखला भू; ईचा अधिपति सुयोधन खरा गे !
तातानुमतानें तो सत्वर तुजला वरील अनुरागें १२
आनंदाच्या शिखरीं तेव्हां चढशील सत्य तूं फार !
या आनंदोद्यानीं त्यासह करशील गे जलविहार १३
केव्हां त्या नरपतिच्या कंठीं घालीन शीघ्र मी माल !
उत्कंठा उपजुनि ही झालिस तू काय खिन्न बहुसाल ? १४
ऐकुनि वचन सखीचें यापरि, ती खिन्न मानसीं दिसली;
वळवुनि वदन तिजकडे अलीककोपाकुला तिला वदली. १५
" विदित मनोगत माझें तुजला, मग कां असें वचन वदसी ?
यापेक्षां या हृदयीं निशित तुवां कां न खुपशिला सदसि ! ! १६
आधींच मी निराशादुःखानें विकल जाहलें फार;
त्यामध्यें कां मजवरि वर्षसि खर वचनबाणसंभार ? १७
हृदयीं माझ्या खरतर दुःखाच्या दीप्त जाहल्या ज्वाला !
सांग मला काय सखे ! उचित असे काल हा विनोदाला ? १८
विरहज्वालांनीं हें आधीं मम जीवकुसुम सुकलें गे !
त्यामध्यें कां करिसी त्यावरती अग्निवृष्टि तूं वेगे ! १९
जी मदनमूर्ति हृदयीं ठसली; तेथुनि निघेल ती काय ?
त्या काकाला कैसा हंसीचा प्राप्त होय हा काय ? २०
वदती गुरुजन मजला,— कुरुनाथालाच माळ तूं घालीं !

पाहुनि लक्ष्मी त्याची, बापडि सर्वहि तयास वश झाली ! २१
परि सांग सखे ! कां गे ! उलटें निम्नाभिमुख कधीं वारी ?
ही प्रेमनदी माझी विजयानुगता तिला कवण वारी ? २२
साधुजनांनीं निंदित दुर्मद गुणगणविहीन कुरुराणा !
दयिताचे गुण, नच धन, ललनाचें चित्त ओढिती जाणा. २३
दादांना अभिमत तो गमतो कुरुनाथ अन्तरीं फार;
पाहुनि त्याला उपजे सखये ! मम मनिं महा तिरस्कार ! २४
कोठें वीरशिरोमणि पति माझा पुण्यधाम अभिराम !
कोठें हा रणभीरू कामुक नीचाग्रणी अशिव काम ! २५
बघ गे ! जातिलता ही अनुगुण सहकार पाहुनी रमली;
मी काय अज्ञ तिजहुनि मति माझी सांग काय गे ! भ्रमली ? २६
रमलास मला टाकुनि कोठें तूं ? पांडुकुलकलानाथ !
सहकार जसा ईतें करि वेगें तेंवि तूं मज सनाथ. २७
गाढविरहतिमिरीं मी वाट बघें कुमुदिनी तुझी विकल !
आनंदनिकेतन तूं चंद्र कधीं उगवशील बा ! सकल ? २८
दुर्योधन जंबुक हा भाग तुझा हरुनि न्यावयास जपे !
धांवुनि ये हरिनाथा ! तुज हा अपमान सांग केंवि खपे ? २९
मुक्ता रुचिरतरा ही चोराया काक हा टपुनि बसला !
तूं धांव राजहंसा ! सेवाया योग्य एक तूं तिजला. ३०
तव मूर्ति नयनसुभगा हृदयीं या एकवार जी शिरली;—
ती आधिदैवतेसम भरुनीयां त्यांत सर्वथा उरली ! ३१
बालपणीं या हृदयीं पडलेसें प्रेमबीज जें पाहीं;—
उगवुनि तेथें लतिका परिमल विखरी नितान्त आतां ही ! ३२
तो प्रेमलतासौरभ आतां निःशेष या मनां भुलवी !
हरिणीला मधु गायन त्यापरि अतिमात्र त्यास तो खुलवी ! ३३

ती प्रेमलता आतां होइल हृदयामधून नष्ट कशी ?
जीच्याखालीं माझा प्राणप्रिय सर्वकाल तूं वसशी. ३४
तेंधुनि केंवि हले तो ? जोंवरि हें हृदय भिन्न नच झालें !
किंवा या देहांतुनि जोंवरि हरिली न चेतना कालें ! ३५
झालें दासी खचितचि मी सखये ! त्याच पार्थरायाची;
त्यावांचुनि इतराला सखये ! कधिंहीं न मी वरायाची. ३६
धांवे रणधीरा ! तूं जर्जर करि काय हा कुसुमचाप;
वर्षुनि शरसंभारा संतत खल मज करी महाताप. ३७
फुलुनी विविधलतातरु उपवन हें फार सर्वदा खुलतें;
परि पाहुनि ही शोभा सखये ! मम हृदय सर्वथा उलतें ! ! ३८
मलयानिल आलिंगुनि जाति लतांना वहात मंदगति;
हा ! हा ! मम तनु जाळी ! आतां मत्प्राण हे कसे तगती ? ३९
बघ हा अशोक येथें नटला अत्यन्त रक्त सुमनांहीं;
नेत्रा पीडा करि तो ! उरला मज धीर अल्प नच बाई ! ४०
सहकारतरूवरि हा कोकिळ करि मधुरपंचमालाप;
हा ! हा ! हालाहलही सखये ! यासम कधीं न दे ताप. ४१
करि बर्ही नीपशिरीं कामाकुळ सखिसमोर तांडव हा;
सखि ! धांव; त्यास वेगें हांकुनि दे; खल खराच दुष्ट महा ४२
मृदुल पवन लतिकांना हालवुनी अमितपुष्पवृष्टि करी;
ती पुष्पवृष्टि नोहे दीप्तदवाग्नि स्फुलिंगवृष्टि खरी ! ! ४३
मधुकर गुंजारव करि; गुंजारव नच खराच हा, जाण—
विषरस कर्णी खल हा ओतितसे मम हरावया प्राण ! ४४
सखये ! भ्रम कां पडला तुजला ? समजून कमलमाला ही;—
हा ! हा ! या मत्कंठीं व्याली तूं घातलीस काला ही ! ! ४५
झालें तप्त शिलातल स्मरतापाकुलतनुव्यतिकरानें !

आणुनि कमलदलें तूं, शय्या एथें रचीं निजकरानें ! ! ४६
मदनज्वरातिरेकें सखये ! मम हृदय हें स्फुरे फार !
कासारांतुनि आणुनि, त्यावरि रचिं कमलनाळ सुकुमार ४७
कामानल पेटुनियां झाला अति तप्त काय हा सारा !
घेउनि पंकजपत्रा, घाल मला आई शीतसा वारा. ४८
हा ! हा ! ऊठ गडे चल सदना, हृदयप्रभेदक नितान्त–
द्विजराज येइ उदया बघ इकडे विरहिणीजनकृतान्त ! ४९
विषमय किरणांनीं हा खल आतां भरिल पूर्ण सकळ धरा !
चल जाऊं सदनाला नातरि मत्प्राण हा हरील खरा ! ५०

द्वितीयसर्ग समाप्त.

——————कै० श्री० ना० मुजूमदार बी. ए.

अलंकारार्पण.

युक्ति.

आर्या.

स्वप्रियमूर्ती काढित, असतां कमला तिच्या सख्या येती
तेव्हां चिन्ह निराळें, तत्कीर्रं देऊनि फसवि त्यांस सती १३०

कोकोक्ति.

आर्या.

गोकुळिं येइल केव्हां कान्हा[1] माझा विचारितां नंद
गर्ग ह्मणे सोस सहा, मासां डोळे मिटूनि हो मोद १३१

[1] कृष्ण.

स्वभावोक्ति.

श्लोक.

पुच्छें करूनि वर धेनु सवत्स येती
वृंदावनीं पळत गोपहि त्यांसभोंती
गोठ्यांत येउनि उभ्या झणिं वासरांतें
सप्रेम चाटिति तरी नच तृप्ति त्यांतें ! १३२

भाविक.

आर्या.

सागरतीरीं जणुं ते निकरानें लढति कीच अद्यापी
अमृतप्राप्तीसाठीं उभय सुरासुर बलाढ्य बहु कोपी १३३

उदात्त.

श्लोक.

वैकुंठीं द्वारदेशीं लटकति सर ते रम्य मुक्ताफळांचे
रत्नांचे ठायठायां विलसति बहु ते बोस खासे मजेचे
द्वाराबाहेर हस्ती झुलति किति ते श्वेत श्रृंगारलेले
कल्प¹श्री²धेनुनीं त्या भजकजैन-मनो³-वांछिता पूर्ण केलें १३४

आर्या.

तें स्थल हेंच असे हो दशरथसुत परशुराम हे उभय
निकरानें या ठायीं लढले अत्यंत शूर वीतभय १३५

श्लोक.

रत्नस्तंभीं बिंबली त्वत्स्वरूपें
रत्नादर्शीं ही तशींही अमूपें

---

१ कल्पवृक्ष. २ कामधेनू. ३ भक्तमनोरथाला.

भक्तीं हीं कीं ध्यात रूपें अनेक
किंवा वाटे विष्णुरूपीच लोकें ! १३६

निरुक्ति.

श्लोक.

लक्ष्मी स्वसाहि असुनी तिजला सुताप—
देण्यास जो न चुकतो द्विजराज पापें
दोषाकरत्वें पदवी प्रति पावला तो
लोकीं जन स्वगुणदोष प्रसिद्ध होतो ! १३७

प्रतिषेध.

आर्या.

हरिसख शकुनिस बोले, शाकुनिका द्यूत हें नसे जाण
तीक्ष्णशरांनीं क्रीडन कितवा युद्धांगणीं मनीं आण १३८

अत्युक्ति.

श्लोक.

दातृश्रेष्ठ परेश तूंच असती तूझ्यापुढें हे प्रभो !
बा ! कल्पद्रुम कामधेनु भुवनीं चिंतामणी ही विभो !
होती सर्वच याचक प्रभुवरा ! ऐसे गमे निश्चित
आहे कोण समर्थ तूजविण या त्रैलोक्यि देवा ! मते १३९

आर्या.

देवा, सातहि सागर त्वत्कोपज्वलनशुष्क ते होतां
होतां दग्ध त्वदाहित तद्वनिताश्रूंनिं ते पुन्हां भरती ! १४०

---

१ विश्व. २ बहीण. ३ ब्राम्हण, चंद्र. ४ पापी. ५ दोषस्थल, रात्रीप्रकाश. ६ अर्जुन. ७ द्यू निपुण. ८ धूर्ता. ९ मान्य. १० तुझ्या क्रोधाग्नीनें. ११ तुझे शत्रु. १२ तुझ्या शत्रुस्त्रीयांच्या अश्रूंनीं.

माळारूपक.

श्लोक

तूं सृष्टीचा हो अलंकार कांत
लक्ष्मीचा तूं होसि शृंगार मूर्त
सिद्धांचा तूं होसि भर्ता अनादि
भाग्याचेंही मूल आहेस आदि १४१

भेदकातिशयोक्ति.

श्लोक

अन्या जगांत तव होय सुरूपशोभा
औदार्य भिन्न भजका बहु देइ लाभा
होई असादृश कृपा तव एक लोकीं
नाहीं तुळी तव कृतीस जगीं विलोकीं १४२

विधिअलंकार.

श्लोक

करूपनृपें पौंड्काभिध तुझ्या समश्री हरी !
चतुर्भुज तुझ्यापरी कृतकें आयुधेंही धरी
ह्मणेच अपुणाप्रती जगतिं वासुदेव प्रभु
खराच ठरतो खरा कृतकें तो न होई विभु १४३

अन्योन्य.

श्लोक.

विभावरीच्या सुसमागमानें—
शशी लसे, तेंवि निशा शशीनें

---

१ सुंदर. २ सादृश्य. ३ लोकविशेष. ४ कृत्रिम. ५ नकल्या. ६ ईश्वर.

श्रीनें हरीही हरिनें रमा ती
दोघेहि शोभाढ्य दिसून येती १४४

श्लोक.

सद्भक्तयोगें प्रभु ! तूं विराजसी
तुझ्या सुयोगेंच सुभक्त तो वसी
श्रीवत्सहारें रमणीय शोभतो
सुहार[1]वक्षें बहु तो विराजतो १४५

काव्यार्थपत्ति.

आर्या.

त्वद्भक्त पांडुतनयां[2] अंतकं[3] न शके परेश ! बाधाया
दुर्योधनादिकांची काय कथा त्यांजला हरि ! वधाया १४६
तव सूतनु ते सहजी चंद्रा जिंकी निजाननें[4] कमला
मग काय हें कथावें जिंकिल ह्मणुनी परेश ! ती कमलीं १४७
लक्ष्मीचा अधर[5] हरी ! आहे ती बंधुंजीव[6]जीव हरी
पर[7]जीवहरणिं लोलुप[8] होइल ह्मणुनी न चित्र यांत करी १४८

श्लोक

त्वत्कांतेच्या ईश वक्त्रें नभांत—
शुभ्रांशू[9]तें जिंकिलें हो क्षणांत
अब्जादींची काय लोकीं कथा ते
वर्णायाला यापुढें शक्य होते १४९

भवाब्धि गहन[10] प्रभो तव सुनाम संकीर्तुनीं
पहा सहज जाति ते भजक तीर्ण[11] त्या होउनी

---

१ सुंदर वक्ष. २ पांडवाना. ३ यम. ४ लक्ष्मी. ५ ओष्ट. ६ लाळ पुष्प (दुपारीं) पक्षीं, बांधवाचा जीव घेणारा. ७ अन्य. ८ तत्पर. ९ चंद्र. १० भयंकर. ११ उतरून.

असे नवल काय तो भजकरत्न चूडामणी—
समुद्र तरुनी बघे जनकजा हनूमान् क्षणीं　१५०

पूर्वरूप.

श्लोक

जगन्माता पद्मा जनक हरि ! एकांतिं रमणी—
प्रदीपातें वातें विझवि तरि, तद्भूषणमणी[1]—
प्रकाशूनी कांती पडुनि विलसे मंदिर महा
पुन्हा येते तेथें प्रथमें सुरुचि श्रीहरि अहा　१५१

आर्या.

विद्वत्कविनीं निर्मित, बुद्धिबळें वाङमयीं अलंकार
हरिचॅरितोदाहरणीं, परमेशा अर्पिले असति रुचिरें　१५२
शतवार करुनि नति त्या बहुदिन विकृतेहि असूनि मी दीन
त्याच्या कृपेंचि झालों कृतार्थ जागीं उचित कृत्य हें करुन　१५३
कवि नसुनि पांडुरंगें नानालंकारवर्णनें हरिस
पारखिकुळ जें प्रभुला भूषविलें आवडो परेशास　१५४

कार्तिक शुद्ध ६ शके १८३२ } पांडुरंग गोविंद शास्त्री पारखी.

माझी कन्या !

पद (चालः—चंद्रकांत राजाची कन्या०)

येतां, जातां, बसतां, उठतां दृष्टीला पडतां,—
सदा निंदितां; सदा चिडवितां; काय असें करितां ? धृ०　१

१ लक्ष्मीच्या भूषणाचीं रत्नें. २ पहिली शोभा. ३ ईश्वर चरित्राच्या उदाहरणांनीं. ४ सुंदर. ५ आजारी.

देवाजीनें दिधली दुहिता, दोष न तिज द्यावा;
कशी असो परि मला सांगतें ती प्राणविसावा ! २
काळी असली, वेडी असली, असली कसलीही,
माझी मजला बरी असे ती; भार कुणां नाहीं ! ३
पुरे पुरे हो ! पुरे खिजविणें किति तरि रडवावें !
काय मिळे कीं तिनें रडावें आपण हांसावें ! ४
ईश्वर निर्मित रूप तिचें हें शक्त न पालटणें !
फुकटचि तरि कीं तिला हिणविणें अथवा बहु हंसणें ५
अंगुष्ठानें किती उजरिलें नाक तिचें जरि हो !
चाफेकळिसें वदा सरळ तें होइल कां तरि हो ? ६
नाकाचा हा वडा, ढेपसा, बत्तासा अथवा,--
वरचेवर हें असें खिजवुनी, कां तिजला चिडवा ७
नानापरिचीं उटणीं उटुनी, काळि न हो गौरी,
नाहीं निर्मळ जीवन जरि तें सावण काय करी ? ८
नका कोळशांमधलें माणिक ह्मणूं तिला आतां;
मूळ वर्ण हा तिचा जरि न ये तुह्मांस पालटतां. ९

चित्र चित्र तें चतुर चितारी चित्रपटीं काढी;
काढुनि खोडी अरसिक कोणी जरि त्याला खोडी. १०
कसें रुचावें तयास, जरि नच बोलाया धजला ?
परी अंतरीं खिन्न कुपितही समजा तो झाला ! ११
स्वेच्छें परि तें लिहिलें त्यानें, चित्र तया प्रिय तें;--
निंदो कोणी वंदो कोणी त्यातें तें रुचतें. १२
प्रसूतिकालीं प्रसूस होती किति नाना क्लेश !
प्रसूच जाणें, न हो ! कल्पना वांझेला लेश ! १३

स्वानंदाच्या साम्राज्यांतरि रंगुनि कवि, कविता--
डोलत, गुंगत, गात गात ती करितो रसभरिता ! १४
कोणी ह्मणती, नाहीं तिजवरि शाल प्रतिभेची !
' मद्रासिण ' ही, नसे कंचुकी अंगिं कल्पनेची ! १५
कोणी ह्मणती ' गुर्जरीण ' ही, अन्वयमुख न दिसे;
' अर्थकुचांचा थांग न लागे ! खासें ध्यान असें ! १६
कोणी ह्मणती भली सजविली नटवी हाटींची !
अलंकार हे किती घातले शोभा गमतीची ! १७
प्रास नूपुरें, तसे घातले तोडर यमकांचे;
कठोर करिती ध्वनी किती हे ! कर्णकटू साचे ! १८
शब्दभूषणें कोणी ह्मणती चोरुनि परक्यांची
उसनी आणी ऐट चोरटी फार दिमाखाची ! १९
पैठणिच्या ती तोऱ्याखालीं, जरि कोणी वदती
चाले गजगति ; जागोजागीं परि ठिगळें दिसती ! २०
असो अशी ती दूषणभरिता भूषणभूषा ही !
कविता अपुली कवीस रुचते, टाकित तो नाहीं ! २१
ओजोहीना दीनविवर्णा रसहीना कविता--
जनें निंदिला; गणी तिला कवि मोहक गुणसरिता २२

ह्मणुन विनवितें परोपरीनें बोलुं नका तिजला
अप्रिय जरि ती तुह्मां गमतसे, प्रियकर बहु मजला २३
असा काल हो ? कधींतरि येइल सुंदर ती दिसुनी,
कोणाचें तरि चित्त सत्वरीं घेइल वश करुनी २४
वेड्या करि जो गोपसुंदरी नटवा श्रीरंग
वेडा झाला कुब्जेसाठीं होउनि मनिं दंग २५

सार-सारसें सुरससुखेसम सुरभि सुमें सारीं
सोडी षट्पद समद संभ्रमें सहकारहि सारी २६
काळोचित तें कर्णिकार-सुम कु-सुम जरी विरस
मधुकर घाली उडी त्यावरी होउनि कीं वि-वश २७
उग्र असे बहु गंध जिचा, ती मंजरि सब्जाची
मनुज चिकित्सक तरीहि हुंगुनि मिरवी करिं साची! २८
मत्स्यासम ये गंध जिला हो! ' योजनगंधा ' ती
स्मृतिप्रणेता पराशर वरी अवगणुनी याती २९
शंतनुभूपति जरी जरठही वरि धीवरकन्या
रंगरूप वा याति न बघतां सत्यवती धन्या ३०
दाव्यामागें पशूस लागे जाया, तें जैसें
जडाजडाही चाळवीतसे प्रेमसूत्र तैसें ३१
चंद्रासंगें जशी चंद्रिका, रविसंगें छाया,
प्रेमासंगें वसे मनासह तशि मानव-काया ३२
प्रेमभाषणा पैस पाड ना, सर्व गोड भासे
वेडिवांकडी बालकवाणी दे सुख भलतेसें! ३३
प्रेम असें कीं देवाजीचें देणें; हे तुकया—
सांगे; प्रेमापुढें खरोखर देहभान वाया ३४
ह्मणुन सांगतें अमर्याद ही धराकालजनता;
केव्हा तरि तिज वरील कोणी, दोष न द्या आतां ३५
भवभूतीनें तत्व मनोहर निजकविता गातां
बोधियलें जें; सार्थ गमे तें अनुभव कीं घेतां. ३६

———

अनंततनय

अंगाईगीत.

निज निज बाळा । सुखशयनाची तव वेळा
दिवसभरी ना खेळ खेळला ?
तेणें तुज बहु श्रम रे झाला
अजुनि परी नच तृप्ती तुजला
पुरे हा चाळा । सुखशयनाची तव वेळा १
भानु सखा तव सदना गेला
पक्षि सवंगडि सोडिति तुजला
नीलांबर पांघरण्या सजला
दिवस, वेल्हाळा । सुखशयनाची तव वेळा २
तिमिरसागरीं बुडेल आतां
दृष्टिविषय तव बघतां बघतां
शिणविशि नयनां मग कां ताता
लागुं दे डोळा । सुखशयनाची तव वेळा ३
कमलदलें कोमेजुनि मिटलीं
वृक्षलतापर्णें हीं नमलीं
शयनसुखा जणुं लोलुप झालीं
सुचविती बाळा । सुखशयनाची तव वेळा ४
सुमंद वायू वाहत येउनि
कुरळ कुंतलें हलवुनि हलवुनि
नेत्रपटल तव स्वयें मिटवुनि
निजवि तुज बाळा । सुखशयनाची तव वेळा ५

" न्याय तुमचा जर मम करांत घाल;
करिन त्याचा तर योग्य मी निकाल "
मांजरें ह्या ऐकून मृदु बचाला,
खवा देती साराच वानराला ६

मांजराकडुनी कीश तागडीस—
आणवोनी, धरि वाम करीं तीस;
विषम भागद्वय करुनि तो खव्यांत
तागडीच्या ते घालि पारड्यांत ७

भाग मोठा ज्या पारड्यांत घाली;
भुईला तें टेकलें त्वरें खालीं
खवा पुष्कळ त्यांतून ह्मणुन घेई,—
कपि स्वमुखीं स्थळ त्यास झणीं देई. ८

खवा पुष्कळ कपि घेइ तयांतून;—
बने हलकें, जड पारडें ह्मणून
त्यामुळें तें वर जाय बहुत वेगें;
दुजें होउन जड भुइस झणीं लागे ! ९

थोर गोळा त्यांतून तैं खव्याचा—
कीश काढुनि, करि एक घांस त्याचा
काल किंचित ही चालुनियां रीत
उरे अल्प खवा एक पारड्यांत ! १०

खवा उरला अत्यल्प हें बघून,
मांजरें ती अति जाति घाबरून !
फार पश्चातापास तीं वरून,
कपिस वदती हें नम्रता धरून ! ११

" पुरी अमुची समजूत होय आतां !
न्याय अमुचा उरला न दयावंता !
ह्मणुनि आह्मांवर करुनि बहु कृपेस,
शीघ्र दीजे आह्मांस खवा शेष " १२

एकुनीयां ही विनति तई कीश,
बहुत गांभीर्यें बोलला तयांस
" द्यावयाच्या पूर्वीच निकालास—
तुह्मी तुमच्या मिटविलें भांडणास १३

तुह्मीं केलें हें फार योग्य खास ;
फार झाला संतोष हो ! अह्मांस
यांत तुमचें सौजन्य दिसुन आलें ;
तसें अमुचें चातुर्य उघड झालें ! ! १४

खव्याविषयीं ह्या पाहतां विचार,
कामिं झाले या श्रम अह्मांस फार ;
ह्मणुनि अमुचा हा अल्पसा श्रमांश—
अह्मी घेतां होईल सुख तुह्मांस ! १५

असें बोलुनि तो शेष खवा खाई ;
न्याय खासा देऊनि निघुनि जाई !
मांजरें तीं होऊनि मनिं हताश,
निघुनि गेलीं तेथूनि भटकण्यास १६

मांजरांनीं जो थोर यत्न केला ;
भांडणानें तो सर्व फुकट गेला !
खवा निष्कारण वानरा मिळाला ;
कलह दोघांचा, फायदा तिज्याला ! १७

गगनांगण नटवाया लागुनि
नयन तुह्मां बालांचे रजनी
नेते ही मोहनी घालुनी
तिची ही लीला । सुखशयनाची जी वेळा ६

बिंबपानिं कां हेतु गुंतला
ह्मणुनि न मिटविशि कमलदलाला
देत्यें, मग जोजवीन तुजला
जो जो बाळा । सुखशयनाची तव वेळा ७

काय असा हुरु हुरू पाहसी
नयन अजुनि कां हे न झांकिशी
माझे उघडे, पाहुनि धरिशी
शंका कां ही ? । झोंप न कां घेई आई ८

परमेशाची जी वत्सलता
तीच भुवनिं ही आंगी माता
होय कसें ती झोंपी जाता
जागी राही । जागरूक वत्सलता ही ९

शंका न धरीं माझी चित्ता
दिसेन तुज मी स्वप्नीं बघतां
हृदयाच्या पाळण्यांत आतां
झोंके घेई । कर सुखें सुखें अंगाई १०

तुतारी मंडळ
पुणें.

———— श्रीराम.

---

१ स्तनबिंब पक्षीं सूर्यबिंब.

कलह टाळावा शक्य तों नरांनीं

दिंड्या.

करुनि मसलतिला दोन मांजरांनीं,
खवा पुष्कळसा आणिला हरोनी;
तई त्याला घेण्यांत विभागून,—
भांडती तीं निज मित्रता त्यजून १

एक वदलें, आयास मला झाले;
यत्न मोठे माझेच फळा आले.
आळशी तूं मति-मंद अशन-भाऊ;
काय ह्मणुनी समभाग तुला देऊं? २

दुजें बोले, " श्रम फार मजच झाले;
श्रमा माझ्या हें थोर फळ मिळालें.
ह्मणुनि घेणें मीं योग्य थोर भाग;
तुला मिळणें अल्पांश उचित-भाग " ३

तंव न लवही कोणीहि हार खाई;
बहुत त्यांचा कलहाग्नि पेट घेई!
एक तेथें तितुक्यांत कीश[1] आला;
खवा पुष्कळ तो बघुनि, मनीं धाला ४

मांजरांच्या पाहून भांडणास,
खवा इच्छी तो कीश साधण्यास;
वरुनि वरुनी तो बहुत सभ्यतेस,
मनीं दुष्टेच्छा धरुनि वदे त्यांस; ५

---

१ वानर.

भांडणानें जातात घरें, दारें
भांडणानें सुख जाय ह्या सारें
भांडणानें बहु हानि हो ह्मणोनी,
कलह टाळावा शक्य तो नरांनीं १८

——— कृष्णाजी बाबाजी कुलकर्णी

पान्थ.

श्लोक.

मला भेटला एकदां एक वाटे । ऋजुत्वें जयाच्या मना मोद वाटे;
करी गोड जो बोल बोलून तृप्त । असा एक सौंदर्यसंपन्न पान्थ. १
स्वरूपें न ये तूलितां कामदेवा । वयें ही जणूं होय तारूण्यठेवा;
तया केलिपात्रा करी शारदा ती । जहाली तया आत्मसर्वस्व देती. २
अशा संगतीं कां न पावे सुखाला- । कवी धन्य मानी कुणीही तयाला;
अहा त्या महा शारदेच्या अगारा- । लुटावें किती दिव्य सौंदर्यसारा ? ३
कवी त्यासवें सेवि संलाप मोदें । प्रमोदा कुणा ज्ञानपीयूष ना दे ?
पुढें अल्पकालें परी भिन्न मार्ग- । जहाला; कथी तो; " क्रमीं तूं स्वमार्ग " ४
कवी मूर्ख बेटा तदा शोक मानी ! । अशा संगतीचा मनीं लाभ नाणी !
तया वाटलें, योग ऐसा घडावा- । पुन्हा; मानवेच्छा सदा लाभ व्हावा. ५
कळे ना कुठूनी जनीं पांथ आला ? । कळे ना स्वतांही कुठूनी निघाला ?
कळे ना तयाला कुठें पांथ जातो ? । कळे ना स्वताला कुठें मार्ग नेतो ६
पिता, बंधु, माता, स्वसा कन्यकाही- । प्रिया, पुत्र, मित्र, स्नुषा आणि व्याही,
दुजे सोयरे, सर्व दायाद तैसे, । निघाले कसे ना कळे मूढ बैसे ! ! ७
दिनीं अन्न खातो, जळा स्वच्छ पीतो; । निशीं कामचेष्टा विहारा करी तो;
कळे ना परी काय हें सर्व आहे ! । पुरा अंध ऐसा जनीं नांदताहे ! ! ८
कुणीही जरा दूर हा आप्त इष्ट; । कदा ना तरी साहवे यास कष्ट !

तयाचें स्वताचें असें काय नातें । कळे मूढ अंधास कांहींच ना तें ! ! ९
नभीं मित्र कैसा क्रमानें विराजे ? । शशीं अम्बरीं नेमिला केंवि साजे !
कशा तारका शोभवीती पटाला ? । कळे ना मुळीं ही तया मंदधीला ! ! १०
असे वेष्टिलें भूमिवृत्तें खगोला; । पुढें पाहतां अंत नाहीं तयाला !
दिसे, सर्व ह्या गारुडा आकळाया- । समर्था न दृष्टी न बुद्धी तदीया. ११
वृथा शोक का हा ? कुणाच्या वियोगें ? । स्वताला न जाणें ! दुज्या केंवि सांगे ?
जगाच्या पथीं सर्वही पान्थ आहों; । करावा वियोगीं न हा व्यर्थ टाहो. १२

——————त्र्यंबक जयराम प्रधान.

जीवितास.

पद- (चाल-- भूपती खरे ते.)

जीविता ! कोण तूं अससी न कळे मजला
परि कळे सोडिशिल, अंतरेन मी तुजला ध्रु. ।
कधिं कसा कोठुनी भेटलासि येवोनी
हें गुह्य अजुनि कीं मला न ये समजोनी
जिवलगा ! वागलों दीर्घकाळ मिसळोनी
आम्हि सुखांत तैसें औदास्यासि गिळोनी
अति कठिण असे प्रिय मित्रत्याग सहणें
तें किती स्फुंदणें अश्रुजलेंहि नहाणें
ठरवुनी गमन कालातें । प्रियकरा
प्रथम दें सूचना मातें । प्रियकरा
मग वरीं स्वीय मार्गातें । प्रियकरा
म्हणु नको " निमालों दिवस आपुला सरला,
' परतेजीं मिसळूं ' सांग न मित्र विसरला १

———— सुमंत.

गरीब गोंवऱ्यावाली !

साक्या.

" हात जोडितें, पदर पसरितें, पायीं लोळण घेतें;
नको नको बा ! नको मला तूं लाथाडूं दीनेतें. १
हाय ! हाय ! हा कसा वाहतो हात तुझा उलथाया–
पाटी माझी ! तशा गोंवऱ्या दाहिं दिशा फेंकाया ! ! २
गवऱ्या इतुक्या करावयातें किती लागले कष्ट ?
याची तुजला काय कल्पना जातीचा तूं नष्ट; ३
गल्ली गल्लीं आळो आळीं--नाहीं--रस्तोरस्तीं
सदा भटकलें नाहिं पाळिल्या लाज भीड या शिस्ती ! ४
रानोरानीं माळोमाळीं ढोरांच्या मी मागें–
सदा हिंडलें, घडीं न बसलें- जीव जरी हा भागे ! ५
न मी बघितली खिंड, दरी कीं, नाहीं डोंगर ह्मटला !
सदैव फिरलें, घडी न बसलें, देह जरी हा वठला ! ६
नाहीं ह्मटला मसणवटा मी, सदा नदीचे कांठीं--
वणवण वणवण किती हिंडलें अपुल्या पोटासाठीं ! ७
सकाळ नाहीं, दुपार नाहीं, नाहीं सायंकाळ,
पहाट नाहीं, रात्रहि नाहीं, फिरलें रे ! अळुमाळ ! ८
नाहीं थंडी, नाहीं वारा, नाहीं पाउस ऊन
सोबत संगतही न पाहिली, फिरलें काव्यांतून ! ! ९
कसलीही भयभीती नाहीं, उजेड ना काळोख;
पोटासाठीं दृष्टि ठेविली भली बुरी कीं चोख ! १०
तहान ह्मटली नाहीं भूकहि, नाहीं गणिली काया !
पोहटि पोहटि शेण जमविलें या पोटा जाळाया ! ११

स्तनास असलें पोर तरीही तसेंचि तोडुनि त्यातें,
शेण धराया धांवत जातें या खळीस भरण्यांतें ! ! १२
ओलें ओझें वाहुनि वाहुनि, कंबर जरि ही मोडे;
वांकुनि वांकुनि तरी जमवितें शेणहि थोडें थोडें ! ! १३
जड ओझ्यानें थाळ जरी ही आली या डोईतें !
तरी न बसतें क्षण न टेंकतें घ्याया विश्रांतीतें ! ! १४
त्या या गवऱ्या दारोदारीं फिरवुनि पोटाकरतां,
पैसा अडका विकुनि मिळवितें मी तेलमिठापुरतां ! १५
नाहीं कळणा, कोंडा नाहीं, नाहीं कांहिं घरांत ! !
मुलें उपाशी सारीं बसलीं लावुनि दांता दांत ! ! १६
ह्मणुनि गोंवऱ्या घेउनि, आलें धांवत धांवत एथें !
चांडाळिण मी पोर तान्हुलें रडत टाकुनी तेथें ! ! १७
बाबा ह्मणतें, दादा ह्मणतें, ह्मणतें माय तुला मी ! !
येवो करुणा अभागिनीची, जाऊं दे मज धामीं ! ! १८
नको नको बा ! नको नेउं तूं माझी दे मज पाटी;
जातें जातें, खरें सांगतें, पुन्हा न येइन हाटीं ! १९
हिसकाहिसकी नको करूं, मज घाल एवढी भीक;
दे दे पाटी दे आतां ही, मागतें न आणीक ! २०
किती ओरडूं ? किती रडूं रे ! पडूं कितीदा पायां ?
कशी न येई हाय निर्दया ! कांहीं तुजला माया ? २१
नको ओढुं फरफरा जराही, नुरलें देहीं त्राण;
कालपासुनी उपवाशी रे ! याच गळ्याची आण ! २२
पोट मिळालें पाटीला हें कसें बांधिलें पाहीं !
काकुळतीला किती येउं मी, पाटी सोड अतां ही ! " २३
परोपरीनें असें विनाविलें जरी तियेनें त्याला;

दया न लवही नराधमाच्या शिवली पण हृदयाला ! २४
फर फर ओढित नेलें तिजला पाटीसह त्या दुष्टें !
अधिकाऱ्यांचें कसें निर्मिलें चित्त गूढ ? हें मोठें ! २५

अनंततनय.

" कवि-काव्य-वृत्ति.

श्लोक.

सहज एक कवी अवलोकिला-रचित जो कविता नव बैसला;
प्रथम तत्कृति-चार विलोकुनी, नवल तें गमलें मम या मनीं. १
रचित वाक्य असे, जुळवीतसे, यमक, वर्ण-समासमही तसे;
गुणगुणूनि, विषण्ण पहूडला; कवि भला थकला दिसला मला ! २
खडबडूनि उठूनि, लिहीतसे ! अडखळूनि मधेंच पहातसे !
निटिल तें स्व-करीं मग ठेवुनी, विरहि-सा बसला टक लावुनी. ३
क्षणिं सुचित्त, सचिंत दिसे क्षणीं, हनुवटी-तटिं ठेवुनि लेखणी,
मुकलितोन्मिलितें नयनें करी ! रमण वाग्वधु आठवि अंतरीं. ४
घडि घडी उघडी, घडि घेडनी; बघुनि वांचुनि हर्षित हो मनीं.
' स्वकृति-भूषण तें न गमे उणें. उगिच नांव कशास्तव ठेवणें '? ५
सहज लेखन वस्तुंस ठेवुनी, यमक चिंतित हा बसला मनीं;
फिरुनि जों बघतो गवसे न ती ! असुनि सन्निध शोधि सभोंवतीं ! ६
अहह ! भूक तहान सुचे न ज्या ! कुठुनि सोंगटि तीं बिझिकें तया ?
वदति बालिश, बालिश हे तुला ! न गणुनी बुझुनी तव हेतुला ! ७
तव अशी कृति पाहुनि, हे पिसे वदति कीं, भरलें तुजशी पिसें;
किति असे जगतीं न कळे खुळे ! मति तिरस्कृति दाविति आगळे ! ८
बकुलपद्मसुमावलिच्या परी कवन-पंक्ति तुझी न कुणा हरी ?
मधु-वनीं मधुपें अवगाहितां, पिकाचि हर्षभरें करि कूजिता. ९

करिं सुहार सुमें अजि गुंफुनी; रसिककंठिंच घालिं तया जनीं.
अरसिकें जरि दोषमिषें कुणीं--लपविला, नच गंध लपे जनीं. १०
पळभरीं घडला तव संग हा; व्यसन हें बरवें जडलें अहा!
स्थिति तुझ्यापरि ही मम जाहली; ह्मणुनि लेखणि तूर्तचि ठेविली! ११

———दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी.

ईश्वरप्राप्ति.

गीति.

मनुजा सावध होई, परमार्थाची मनांत आस धर,
गर्वाला वश होउनि, वागुं नको; योग्य तो विचार कर. १
रात्रंदिन संसारीं मग्न नको होउं त्यांत सौख्य नसे;
दारा-धन-सुत यांच्यापासुनि तुजला बहूत दुःख असे. २
सत्यसुखासाठीं तूं आत्मोन्नति कर झटून हर्षानें;
सारा असार भव हा; मानुं नये यांत किमपि सत्य मनें. ३
विद्युत् चमके स्वर्गीं तेव्हां पडतो प्रकाश अग्नि जसा;
नष्ट घनीं होतां ती पहिल्याहुनि घोर अंधकार कसा? ४
संसारासक्तीनें तीच गती होय सर्व मनुजांची;
प्रारंभीं सुख वाटे अंतीं दुर्धर गतीच दुःखाची! ५
शिथिलेंद्रिय होतां तूं ईशप्राप्ती कुठोनि करशील?
एक क्षणहि न गमवीं ध्यान करीं; ईश मुक्ति देईल ६
ह्मणशील वृद्ध होतां हरिची भक्ती करीन नेमानें;
शाश्वति देहाची या नाहीं ह्मणुनीच कथियलें ऋषिनें. ७
शैशवीं तारुण्यीं जर नाहीं घडलें तुला हरिस्मरण!
आतां कैचें होइल? पुत्रांपौत्रांत होशि तूं मग्न! ८
अन्ध नको रे! होऊं, दृष्टि तुला ईश्वरें अहा! दिधली;

तरि मुक्तीवाट तिनें शोधुनि काढीं भवांत जी दडली. ९
मन ठेवीं हरिचरणीं कीर्तनभजनीं, तसें कथाश्रवणीं;
सख्य करीं देवाशीं, धन-दारा-पुत्र-मित्र तो जाणीं. १०
कित्येक लोक ठेविति यत्न न करितां हरीवरी भार;
उचित नसे हें लोका; प्रयत्न करुनीच ठेविं भारिभार. ११
जेणें ईशप्राप्ती घडे असा भाव नित्य मनिं ठेवीं;
मानापमान सारा सोडुनिया नित्य हरिकथा गावी १२
अन्तर सबाह्य निर्मल ' विष्णुपदीं ' नीररूप हृदय तसें–
परदुःख पाहतांना मन द्रवो बुद्ध धर्मपाल जसे. १३
संसृति निर्झरिणी ही मोहाचा तीस ये भला पूर;
जलचर विहार करिती, षड्रिपु हे नक्रसे महा क्रूर. १४
भवसरितापरतीरीं जाण्याला मुक्ति एक नाव असे;
नावाडी परमेशावांचुनि कोणी दुजा मुळींच नसे. १५
कस्तूरी मृग धांवति वासाचा शोध करित रानिवनीं;
त्यांच्याच नाभिंत असे वास, परी ये न हें तदीय मनीं १६
तद्वत मनुजा ! असतो ईश्वर हृदयीं खराच सर्वांच्या,
नानादेश फिरति कां स्पष्ट असोनी चमत्कृती त्याच्या ? १७
त्याला प्रसन्न करण्या गिरिगव्हर वा नको जटाजूट;
तीर नको गंगेचें गृहिं राहुनियां करीं खटाटोप. १८
संकटिं रक्षण करणें प्राण्यांचें हीच समज हरिपूजा;
व्यसनार्ता साह्य करीं शुद्ध मनें पडति दुःखिं ते ज्या ज्या. १९
ईशा प्रसन्न करण्या योग्य अशीं हींच साधनें असती;
ठेवीं दृढ निष्ठा तूं संसाराब्धी तरूनि हीं नेती. २०

———— पी. एस्. प्रभुदेसाई.

प्रबोधन.

पद.

उघडिं नयन ! रम्य उषा हसत हसत आली !
अरुणकिरणमय वसना अवनी ही ल्याली ! ध्रु०

मंजु मधुर गान करित
आनंदें भुवन भरित
विहगवृंद गगनिं उडत–
या सुरम्य कालीं !
उघडिं नयन ! रम्य उषा हसत हसत आली ! १

हसति फुलें, तरु डुलती
लतिकागण नृत्य करिति
धावति या भ्रमरतती–
सुति तुला आली !
उघडिं नयन ! रम्य उषा हसत हसत आली ! २

स्निग्ध दृष्टि तव पडतां
होय वृत्ति सुखभारिता
रविकिरिं घनपंक्ति तथा–
स्वर्णमय जहाली !
उघडिं नयन ! रम्य उषा हसत हसत आली ! ३

सुप्रभात सुखकर हा
दारुणतिमिरोत्कर हा
रमवी सकलांस पहा–
दिव्यविभवशाली
उघडिं नयन ! रम्य उषा हसत हसत आली ! ४

ऊठ ऊठ! तुजविण परि
नीरस हें मुख सुंदरि!
विफल गमत तें, ज्यावरि–
दृष्टि न तव गेली!
उघडिं नयन! रम्य उषा हसत हसत आली! ५
विकचकमलगंधि पवन
शीतळ करि तापशमन
त्यांत परी श्वसन तव न--
तप्त तनु जहाली!
उघडिं नयन! रम्य उषा हसत हसत आली! ६
खगकूजित अलिरुंजित
लतिकातरुगणसिंजित
सुदति! विफल सकल गमत--
तुजविण या काळीं!
उघडिं नयन! रम्य उषा हसत हसत आली! ७
गगन तरणिकररंजित
चपल धवल घनविहरत
क्षणहि परि न दृष्टि वळत--
तव मुखि दृढ ठेली!
उघडिं नयन! रम्य उषा हसत हसत आली! ८
ऊठ! ऊठ सखि झडकरि
नयनद्युति चपल पसरिं
रम्य मधुर हास्य करीं--
स्वर्ग आण खालीं!
उघडिं नयन! रम्य उषा हसत हसत आली! ९

प्रेमाचा ओघ सरल
वाहो तव मुखिं अविरल
अचरहि जग करुनि तरल--
बुडविं सुखिं विशालीं !
उघडिं नयन ! रम्य उषा हसत हसत आली ! १०

———— रेंदाळकर.

प्रजाकांक्षित !

दिंडी.

विजयशाली हा असो भूमिपाळ;
विमलशांती, आनंद सर्वकाळ--
तेंवि आयुर्बल तनय विभो ! राया--
मिळो; विनती ही तया लोकराया. १
सदा राहो तो नम्र शत्रु-वृंद !
जगतिं पसरो नृप-यशोविमलगंध
नयें पाळिल तो कृती लोक सारे--
सुमति ऐशी दे तया सर्वदा रे ! २

———— अनंततनय.

सुभाषित.

आर्या.

न किमपि उच्चारावें वाक्य अहितकर, असत्य, कटु, सुबडे;
सत्य, प्रिय, हित, मित, वच वदतां, आयास अल्पही न पडे. १

———— चिंतामण माधव पिंपळसकर.

काव्यरत्नावली.

अंक ३ रा.

सुभद्राविवाहकाव्य.

सर्ग तिसरा.

गीति.

झाला निशीथसमय; द्विजराज करूनि चंद्रिकावृष्टि,
पीयूषमय करांनीं तुष्ट करी सकल तरुलतासृष्टि. १
घेउनि दयितां संगें, सौधावरती सितांशुका समदा–
नव कुसुमहार कंठीं घालुनियां, विहरतात या प्रमदा. २
माध्वीकपुष्पपरिमल, चोरी जो करुनि सौधसंचार;
तो गंधवाह दावी सौधावरि रतिविहार साचार. ३
अभिनवमनोज्ञवेषा लाजवि जी दिव्य अप्सरांनांही;
गणिका सुंदर ऐसी गानानें भुलविते नरांनां ही ४
अभिसारिका पथांतुनि संचरती दयितदर्शनोत्सुक या;
प्रियतमनिकेतनातें जाया देई अनंग धीर तया ५
दयिता--रजनीसंगें क्रीडा करि कुमुदबंधु या काळीं;
परि चिन्ताकुल पडला भामाभवनांत सत्य वनमाली ! ६
सुमशय्येवर निजली भामा भामागणीं शिरोभूता;
कमलीं केशर, त्यापरि उडते वदनीं कचावलि विधूता ७
उठती विचारलहरी अतितर यदुनाथहृदयकासारीं
विजयसुभद्रासंगम होईल कसा जनांस सुखकारी ? ८

दादांनां अभिमत तो दुर्योधन, परि न आवडे तीतें;
निर्गुण किंशुक कां हो ! प्रियतम होइल कदापि अलिनीतें
गुणगणविभूषणवती, कोठें चातुर्यराशि ही बाला !
दुष्कृतिरत हा कोठें दुर्योधन न गुणलेशही ज्याला १०
मुक्तामाला कैशी हा ! हा ! ही त्या खरास अर्पावी ?
यज्ञांतिल घृतधारा अर्पुनि, कां भूतपंक्ति तर्पावी ११
एक धनुर्धर ज्यानें वसुधा केली महायशोधवला;
त्या विजया सोडुनियां, इतराला काय उचित ही विमला ? १२
कोणाला नच अभिमत या लोकीं कनकरत्नसंयोग
होवो होवो सत्वर अभिनव हा चंद्ररोहिणीयोग ! १३
यदुकुलपांडुकुलांचा चालत आला अखंड संबंध;
चालावा तो अविरत यांतचि वाटे जना महानंद ! १४
स्पष्ट सकलही हें परि दादांनां अल्पमात्रही न कळे
दृष्टि तयाची वेगें कुरुनाथाच्या धनाकडेस वळे ! १५
विमुख सुभद्रादेवी दुर्योधनपाणिपीडनास खरी;
त्यासचि अर्पायाचा दादाचा हट्ट हा सुटे न तरी ! १६
" कपटोपाय नियोजुनि, दादाचा हेतु निष्फळ करावा;
विजयसुभद्रादेवी यांचा संगम घडून आणावा. " १७
हेतु मनीं हा धरुनी रात्रंदिन मी तदर्थ यत्न करी
उपभोग न आवडती जडली चिन्ता मनास हीच खरी ! १८
आतां काय करावें ? एक दिनावधि विवाहकाल खरा
आणावें विघ्न तया योजुनियां कोणता उपाय बरा १९
कुरुनाथ सुभद्राकरलालस तो पातला असे खचित
त्याला वंचायाला योजावी युक्ति कोणती उचित ? २०
मी विघ्न विवाहाला केलें; हें नच कुणास समजावें,

परि जेणें पूर्णपणें हृदयांतिल हेतु सिद्धिला जावे; २१
संशय माझा हृदयीं दादांनां अल्पमात्रहि न यावा;
मी योग्य कोणता तरि आतां याला उपाय योजावा ? २२
हा कोण्याहि उपायें जाइल टळुनी विवाहकाल जरी;
मजला मासचतुष्टय सांपडतिल कार्यसाधनास तरी. २३
या कुटिल नाट्यरचना करण्याला सांपडेल मग वेळ
या कपटनाटकाचा जगताला दाखवावया खेळ. २४
मत्प्रेरणेमुळें हा अर्जुन आला बनून सन्यासी !
ही गोष्ट विदित नाहीं मजवाचुनिया कुणाहि अन्यासी. २५
आतां सदुपायानें लोटुनियां हा विवाहकाल दुरी,
विजयसुभद्रादेवी यांची सत्वर करीन हौस पुरी. २६
यतिवेषधर विजय हा, याची बहु वाढवूनियां महती,
आणिन घडून त्याची बहुदिन या द्वारकापुरीं वसती. २७
दादाही हे त्याच्या भजनीं मग लागतील सत्य पहा;
अस्मत्सदनीं त्याचा होइल येणें प्रवेश शीघ्र अहा ! २८
विजयसुभद्रा यांचा आणिन मग मी घडून सहवास;
होइल सहजचि कारण तो त्यांची प्रेमवृद्धि करण्यास. २९
कळवून भाव अपुला मग, ते वेगें परस्परां साचा;
होउनि बद्ध प्रेमें करितिल अवलंब उचित मार्गाचा. ३०
यदुकुलचूडामणि तो करि वेगें मग घटोत्कचस्मरणा;
प्रकट तदा होउनि तो बद्धांजलि वंदि यदुकुलाभरणा. ३१
" विश्वाधारा ! कां या दासाची होय आज आठवण ?
आज्ञाधारक जन हा, नतमस्तक आपल्या पदीं शरण. ३२
होय अनुग्रह मोठा या दासावरि खराच हा आज !
सिद्ध सदा सेवेला, सांगा कांहीं करावया काज. " ३३

हरि त्यास वदे; " आला निकट सुभद्राविवाहकाल खरा;
परि ती विजया वांच्छी; दुर्योधन आवडे तिला न जरा! ३४
तरि या विवाहविधिला विघ्न करावें, करूनियां कपट;
इच्छा हीच वसतसे चित्तीं; तुज सांगतों पहा निपट. ३५
गुप्त सुभद्रादेवीजवळीं वत्सा! रहा सदाहि तरी;
कोणी पीडा करितां तिजला, त्याचा उपाय योग्य करीं. ३६
मजला विवाहसमयापूर्वी तूं एकवार भेट पहा;
तोंवरि दक्षपणानें देविसुभद्रेसमीप गुप्त रहा. " ३७
हरिवचन ऐकुनीयां, बद्धांजलि वदतसे घटोत्कच तो;
" त्वरित सुभद्रासदनीं जाउनि, आतांच गुप्त मी बसतों. ३८
उठतां, बसतां, फिरतां, निजतां, मी तिजसमीप राहीन;
साधीन हेतु अपुला; सोडुनि तीस, न कदापि जाईन. ३९
जातां कोठेंही ती, तिजला मी अनुसरेन जशि छाया;
राहिन दक्षपणानें शंका न वसो मनांत यदुराया! ४०
दुर्योधन दुष्टमती, करीन त्याला हताश मी देवा!
पूज्य सुभद्रादेवी मजला; तीची करीन बहु सेवा. ४१
ठेवुनि लोभ सदाही, करिं मातें तूंच पदरजःपूत– "
बोलुनियां वचन असें, झाला तेथेंच तो तिरोभूत. ४२
तो स्वप्नदेवतेतें आठवि मग सत्वरीं रमाकान्त;
तत्काल पातली ती तेथें, लंघूनियां नभःप्रांत. ४३
बोले केशव तिजला, करिं सत्वर एक देवते! कार्य;
नच तुजसमान कोणी या लोकीं अन्य देवता आर्य. ४४
उठविसि तूं मनुजाच्या हृदयीं बहु कल्पनामय तरंग;
बघुनि तुझी नवरचना, सुज्ञाचें हृदय होतसे दंग! ४५
आतांच देवते! तूं दादाच्या शयनमंदिरीं जा गे!

स्वप्नामध्यें त्यांना यापरि वृत्तान्त सर्वही सांगें; ४६
" तव पूर्वपुण्ययोगें आलासे एक थोर संन्यासी;
तेजस्वी तरणीसम लोकीं त्याची सरी न अन्यासी. ४७
लीन तयाच्या चरणीं होतां, न उरेच अल्पही ताप;
तद्दर्शनेंच जातो विलयाला सर्व हा मनस्ताप ! ! ४८
सद्बोधामृत वर्षुनि, पाप हराया, वशिष्टशुकसम जो;
लोकोपकार करण्या अवतरला लोक ईश हा समजो " ४९
वेगें मग ती देती रामाच्या शयनमंदिरीं आली
स्वप्नामध्यें त्याला सर्वहि वृत्तान्त सांगती झाली ५०

तिसरा सर्ग समाप्त.

कै. श्री· ना. मुजूमदार, बी. ए.

दोरा.

(अथवा शुद्ध प्रेमाचें चित्र.)

पुढील काव्यांतली नायिका आंग्लदेशीय आहे. भिन्न भिन्न देशांतल्या विशिष्ट चालीरिती वगळल्यावर, मूळ मानवी स्वभावांत पुष्कळ साधर्म्य दिसून येतें. या दृष्टीनें या काव्यांत आपणांस बोध घेण्याजोगें कांहींच सांपडणार नाहीं काय ?

साक्या.

क्षेत्रीं अल्बन वृद्ध परी तो काल घालवी सारा;
तरुणद्वय तद्गेहीं होतें नामें वुइल्यम, दोरा. १
सूनु तयाचा वुइल्यम, दोरा पुतणी ऐसें नातें--
बघुनि, तयांना विवाहबंधें जोडूं त्यातें वाटे. २
कबूल केली ऐकुनि इच्छा काकाची दोरानें;

करूं लागली प्रीति तयावर भाविपतिप्रेमानें. ३
परंतु हरहर, उलट करी ना प्रेम युवा तिजवरती;
कारण, परिचय अति, दोघे तीं एका गेहीं वसती. ४
तेव्हां अल्बन एके दिवशीं बाहुनियां तनयातें
बोले पुत्रा ! झालीं माझ्या वर्षें बहुत वयातें ; ५
‘ झालें माझें लग्न उशीरा, परि ही इच्छा फार,—
‘ घेइन अंकीं मम पौत्रातें, मृत्यु जोंवरी दूर. ६
‘ विचार माझा परस्परांचें तुमचें लग्न करावें;
‘ ह्मणुनि सांगतों आतां, वागे तिजशीं पत्नीभावें. ७
‘ सुबक देखणी, मितव्ययी ती फार, वयें जरि पोर;
‘ शिवाय तनुजा अनुजाची मम, गुणी असे ती थोर ८
‘ आह्मी दोघे बंधु एकदां बहुत भांडलों; गेला—
‘ वियुक्त होउनि परदेशीं तो, गतासु तेथें झाला ! ! ९
‘ भ्रातृप्रेमें तत्तनयेचें पालन केलें गेहीं—
‘ मी; समजूनी स्वकीय पत्नी घे पदरीं दोरा ही. १०
‘ बहुत वत्सरें रात्रंदिन मम, लग्न तुह्मां दोघांचें—
‘ व्हावें, ऐशी इच्छा, ती मी आज बोललों वाचे. ११
निक्षुनि परि तो वुइल्यम बोले; गोष्ट नको लग्नाची !
‘ दोराशीं जर लग्न लाविलें, शपथ तुह्मां कंठाची ! ! १२
तेव्हां होई क्रुद्ध वृद्ध तो ! हात दुमडुनी वदला;
‘ उद्धट ऐसें द्याया उत्तर, पित्यासि कैसा धजला ? १३
‘ लहान होतों, शब्द पित्याचा तेव्हां मजला आज्ञा;
तैसें होइल आतां, नलगे ऐकायास अवज्ञा ! १४
पाहा इकडे, विचार कर तूं अवधी तुजला देतों ---
मासाची; अनुकूलचि होशी ऐशी आशा धरितों. १५

' अथवा घ्यावा, सत्य सांगतों, निरोप अंतीचा हा !
' विटाळ नलगे अवज्ञतेचा पुनरपि माझ्या गेहा ! १६
अविचारें परि वुइल्यम निष्ठुर उत्तरला चावोनी--
ओष्ठ, न थांबे क्षण, गेहांतुनि जाई तडक निघोनी ! १७
जों जों राही उभी मानसीं दोरा त्याच्या, तों तों--
तिरस्कार तद्विषयीं येई; प्रीतिविरक्त बने तो. १८
निर्दय त्याची कृती भासली हृदयातें अनुरूप,
परंतु दोरा निमुटपणें ती विनयें सोशि अमूप १९
गेला त्यागुनि गृह ताताचें जों न जाहला मास;
सेवक झाला, शेतामध्यें खपला, भोगी त्रास ! २०
प्रेमें कांहीं, द्वेषें कांहीं वरिली प्रौढ वधूला---
नाम जियेचें मेरी त्यानें, होती समानशीला ! ! २१

विवाह--घंटा वाजति, ऐकुनि त्यांचा कठोर नाद
अल्बन वाह्नुनि बंधुसुतेला, बोले तीस सखेद ! २२
' मुली ! जरी मत्प्रेम तुझ्यावर अतिशय दिसतें साच;
तरी सांगतों भाषण झालें त्यासंगें जो नीच ! -- २३
' किंवा परिचय तुझा अल्पही झाला त्याच्या स्त्रीशीं
' मिळेल माझ्या गृहीं आसरा, आस नको ही तुजशीं ! २४
' माझी इच्छा नियम, अन्यथा नोहे ऐसें बोले---
भिडस्त मोठा स्वभाव, ह्मणुनी वचन तिनें त्या दिधलें. २५
परंतु वाटे तिजला ऐसें कदापि ना राहील,
कांहीं काळें मन चुलत्याचें निश्चित हें बदलेल. २६

दिवस लोटले धांवें दुडुंदुडुं बालक वुइल्यम--गेहीं

दुर्दैवें परि संतापे तो संकटपरंपरांहीं. २७
जाऊं लागे दारावरुनी नित्य पित्याच्या, झाला
हृदयभंग जरि, पिता करी ना अल्पहि मदत तयाला २८
परंतु दोरा संचय करि जें अल्प, पाठवी सगळें–
चोरुन; आलें कोणाकडुनी कोठुनि त्यातें न कळे! २९
ऐशा दुःखस्थितींत आला शीतज्वर बुइल्यमला
ऋतु हेमंतीं तो नश्वर या जगता सोडुनि गेला!! ३०

गेली दोरा नंतर मेरीकडे, बैसली हो! ती–
नेत्रांतुन जल वाहे! लावी दृष्टि बालकावरती. ३१
झालें कलुषित मन मेरीचें ती–विषयीं, अपराध–
दिसे तिचा, कीं आणी ती सुतजनकप्रीतिंत बाध ३२
दोरा येउनि वदली तीतें; ' आजवरी चुलत्याची–
' धरिली आज्ञा शिरावरी म्यां, जोड करी पापाची. ३३
' संकट आलें तव भर्त्यावर ऐसें कारण त्यासी–
' प्रथम जाहलें, ह्मणुनि मागतें भीक दयेची तुजसी. ३४
' परंतु मेरी! त्याचेवरती, तुजवरती, तव बाला–
' वरती माझें प्रेम, ह्मणूनी आलें विगणुनि हाला! ३५
' ठाउक आहे तुजला, झालें नाहीं पीक मजेचें–
' इतुकें वर्षें पांच; भोगिती सांप्रत दिवस सुखाचे. ३६
' घेउनि जाऊं दे पुत्राला तव सन्निध चुलत्याच्या;
' असेल रमला प्रमुदित होउनि तो शेतांत गव्हाच्या. ३७
' चीज होय कष्टाचें पाहुनि, तुष्ट मानसीं होतां–
' हृदयीं लाटा प्रेमरसाच्या उठतिल बालक बघतां.' ३८
वदली ऐसें. बाल घेतलें, दोरा सत्वर गेली;

सन्मित्र तू असासि, बा ! रसिकाजनांचा;
येशी गुलाल उधळीतचि सद्रसांचा;
देशी सुरम्यकवनाग–सुमावली त्या,
मासांतरीं-निज-सुगंध-युता अशा ज्या. ४

हें सर्व सत्य, परि आज अहा ! गड्या ! त्वां ?
तीं कोणतीं नवसुमें वद आणिलीं ? बा !
कीं यत्सुगंधभर तोषवितो मनाला;
जो न्यून लेश न गमे, कविसज्जनाला. ५

सारीं विचार करुनी बहिरंग हातें;
हो ! अंतरंग बहुरम्यचि दृष्ट मातें !
हा काव्यपुष्पचय दाटुनियां सुमंद,
वाहे मरंद; सुटला जणुं अर्थगंध ! ६

कीं हे विशुद्ध जल निर्झर वाहताती;
अर्थांश सद्रस तयांत तरंगताती;
ये वर्ण रम्य बहु चित्रविचित्र जेणें;
त्याची चवी मधुकराविण कोण जाणें ? ७

कीं शारदा कनककुंभ धरूनि हातें
आलासि तृप्त करण्या रसिका जनातें ?
ह्या पाहुनी तव अहैतुक-सत्कृतीतें,
संतोषती-बुध समस्त महामती ते. ८

कीं ह्या बकूलनलिनीतरुपुष्पमाला,
ठेवूनि त्यांमधुनि आम्रसुमांजि-याला,
घेऊनि येशि सदया ! हृदयीं धरून !
मत्कंठ सद्गदित होउनि ये भरून ! ! ९

मैत्रींत सौख्य वसतें, न दुजें कशांत ?
हें तत्व पूर्ण भरलें तव मानसांत;
स्नेहार्द्रता मजशि ही तव लाजवीते;
विद्यासमन्वित तुझे गुण दाखवीते. १०

सत्संग जो निशिदिनीं घडतो तुला, बा !
तो सद्गुणाविण जगीं सहजीं मिळे कां ?
येऊनि सद्रस उभे कर जोडुनीयां !
तूं स्वर्गसौख्य उपभोगिशि भूवरी या. ११

——— दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी.

सन्याशाचें गाणें.

[माझे परमपूज्य पितामह श्री पद्मनाभस्वामी (वे. शा. बाळकृष्ण महिपत वावीकर) यांच्या स्मरणार्थ हें गाणें लिहिलें आहे ! याला आधारभूत, स्वामी विवेकानंदकृत ज्ञानयोगाच्या आरंभीं दिलेली , Song of the Sanyasin ' ही कविता असून, तिचें हें यथामति भाषांतर केलें आहे; तेव्हां हें वाचते वेळीं मर्मज्ञांचें हृदय सदय असावें !]

अभंग.

जन्मलें जें तेथें, जेथें नच बाधी । जगाची उपाधी कदाकाळीं,
पर्वतावरील सखोल गुहेंत । अथवा राईत घोर वनीं;
शक्त नसे कीर्ति, कनक वा कांता । जयाची शांतता भंगायातें,
वाहे शुद्ध ज्ञान-प्रवाह जेथोनी । सत्यानंद यानीं परिप्लुत;
सन्याशा तें गाई आदिनाद गान । ॐ तत्सत् जाण उच्चस्वरें ! १

लोखंड, सुवर्ण अथवा त्याहून । असो धातू हीण कसलाही,
पाश तयाचे ते असती दुःसह । गांजावया इह-लोकामाजीं;

प्रीतिद्वेष, बरें वाईट ययाचीं । दुःखमूल साचीं द्वंद्वें जाण.
आवडीचा जरी तरी बंदीवान । आहे पराधीन सर्वदा तो,
सुवर्णाच्या बेड्या कमी बळकट । नसती निकट बांधावया;
तोडोनीया त्यांतें सन्याशा ह्मणून । ॐ तत्सत् गान गाईं प्रेमें ! २

अज्ञानजनक आहे बा जें खास । बनवी उदास संभ्रमानें,
जन्ममरणाची जेथोनी उत्पत्ती । दुस्सह विप्रत्ति-मूल जें कीं,
ऐशा मायाजालीं कदा न गुंतून । घेईं भागवून जीवतृष्णा;
‘ आपणासी जिंकी सर्व तयाधीन ’ । तत्व हें जाणून मार्गदर्शी,
सन्याशा तूं करीं तमनिरसन । ॐ तत्सत् गान गाऊनीया ! ३

पेरी तयालागीं कापणें उचित । बोलती निश्चित जनामाजी,
जैसें असे बीज तैसा ये अंकुर । निराळा विचार नसे कांहीं,
बरें परिणामीं बरेंच होणार । वाईट समाचार नोहे कदा;
तरी जया रूप तया खरपाश । कराया हताश असती पैं;
नामरूपाहून परंतु अलिप्त । त्यापरी विमुक्त आहे आत्मा.
सन्याशा तो तूंच ह्मणी ओळखून । ॐ तत्सत गान गाईं भावें ! ४

फसती मानोनी जन बहुसाल । भव--मृगजल सत्यरूप,
आई, बाप, मित्र, बाईल, पोरें हीं । फसवणूक पाहीं स्वप्नांतील;
लिंगहीन आत्मा कोणाचा जनक । होईल बालक कोणाचें तो !
सर्वांठायीं जरी राही तो सारखा । तरी शत्रु सखा कोणाचा पैं ?
सर्वभूतात्मक, जयावीण देख । नाहीं कोणी एक जगामाजी;
सन्याशा तूं रूप आहेसी तयाचें । ॐ तत्सत् वाचे ह्मण वेगें ! ५

आहे तो एकला स्वतंत्र, जाणता । निजात्मकरूपता, परिसावें;
जया नसे नाम त्यापरी स्वरूप । मग त्या आक्षेप कोठेंनीया !
तैसी ज्याच्या ठायीं स्वप्न जाणवीते । ह्मणती जाणते तिस माया;

सर्वसाक्षी आत्मा-रूपें प्रगटला । तैसा तो भासला प्रकृतीनें.
असती तो तूंच सन्याशा बा पाही । ॐ तत्सत् गाई पूर्णानंदें !

मुढा शोधीसी वद कोठें मुक्ती । इहपरलोकीं नाढळे जे ?
पुस्तकसंभारीं देवळाभीतरीं । शोधीशील तरी व्यर्थ श्रम !
नलिकेउपरी जैसा तो बैसोनी । शुक बद्ध मानी आपणासी,
तैसा निज हस्तें ओढोनी धरीसी । तयानें तूं जासी ओढीला कीं
ह्मणून बा ! सोडीं हातींचें हें सारें । ॐ तत्सत् गा रे एक सार !

शांतीचा भजक होई तूं निस्सीम । करीं विश्वधाम शांतीमय !
अत्युच्च ठिकाणीं वास जे करीती । तैसे विचरति भूमीभागीं
प्राणीमात्र सारे आत्मवत ते कीं । लोटी नच दुःखीं त्यासी कदा
इहपरत्रींचे आपुलें जीवित । स्वर्ग, भू, नरक, आशा, भय,
अवघे निश्चित सन्याशा सोडून । ॐ तत्सत् ह्मण शांतीदायी ।

विसरुनी जाई मग देहभावो । कर्मौघानें वाहो शरीर हें.
कोणी घालो गळां कुसुमाचे हार । उन्माद साचार न हो तयें;
अथवा बा ! लत्ताप्रहार कोणी केला । न होई क्षोभला चित्तीं तरी.
स्तुतीनिंदा दोन्ही समान वाटावी । सद्वृत्ती बाणावी ऐशी तुज.
शांतीचा सन्याशा आहे तींत वास । ॐ तत्सत् ध्यास लावी मना !

कीर्ती कनक कांता यांसी जो अपेक्षी । सत्यासी उपेक्षी निर्धारें तो
कामिनी कांचन यांचा मी मालक । मानी जो, तो लेख अर्धवट !
क्रोध मत्सरादी सहा चोर जाण । तयासी हैराण करितात;
कैसा तो सुटेल मायाजालांतून । त्यागील्यावाचून अवघ्यासी ?
सन्याशा तूं होई सावध ह्मणून । ॐ तत्सत् मान एक तुझें !

गृहबंधन हें तुज विमुक्ताला । पाहिजे कशाला सांग बापा ?
आकाशाचें छत्र, तृणाची सुशय्या, । उचित सेवाया तुजलागीं.

मुके तोंडीं ओला कच्चा असो घास । करो न उदास तुजसी तो.
दिव्य आत्माराम आपणा जाणता । अन्न जल सत्ता तेथें कैची ?
नदीच्या प्रवाहासारखा स्वच्छंद । ॐ तत्सत् छंद सन्याशा हो ! ११

सत्याचा महिमा जाणतात थोडे । बाकी सारे धोंडे द्वेषाचे हे;
करतील तुझी निंदा उपहास । देई ना तयास थारा मनीं
विमुक्त तूं घेई देशोदेशीं धांव । धरुनीया हाव सन्मार्गाची,
काढीं मूढ जना घोर तमांतून । मायाजालांतून -सुदयेनें.
दुःखभीती किंवा सौख्याची ती आशा । उल्लंघावी ऐशा महत्कार्यी
धीरोदात्त होवो पूर्ण तुझें मन । ॐ तत्सत् ह्मण सुखदायी ! १२

ऐसा हळुहळु कर्माचा विपाक । होतां आपोआप सुटशील;
जन्ममरणाची फिरून उपाधी । कोठोनीया बाधी मग तूज ?
मी, तूं किंवा सर्वसाक्षी परमेश, । अथवा मनुष्य, कांहीं नाहीं !
स्वतः जो मी तो सर्वत्र व्यापलों, । सर्वतेनें झालों चिदानंद !
तूही सन्याशा बा आहे तोच एक । ॐ तत्सत् घोक मुखें सदा १३

श्रीमत्पद्मनाथस्वामी चरणारविंदार्पणमस्तु शुभं भवतु

राजहंस

माझी ज्योत्स्ना !

साकी.

निदाघकालांतिल दारुण तो अस्तंगत रवि झाला
हृदयकैरवा हासवीत विधु उदयगिरीवरि आला ! १
मधुर सुधेच्या ओघीं बुडवुनि तरल करित जगतास—
पसरे त्याची रम्य चंद्रिका, झाला ताप-विनाश ! २
रोमहर्षण प्रसंग तो, जड जाया वेडावून !

काय नवल जरि कवि मी गेलों आनंदांत बुडून ! ३
प्रेमाश्रूंचें वर्षण करुनी भिजवियला भूभाग
मीलितलोचन बसलों स्वस्थचि काय करि न अनुराग ! ४
ब्रह्मानंदीं घडिभरि वृत्ती झाली होती लीना
नयन उघडिले, सुभग मेदिनी दिसली तों बहु दीना ! ५
अकालजलधरपटलें भरुनी गेलें अंबर सारें
तिमिरमज्जिता शून्या मजला दिसली हाय ! रसा रे ६
" हतनयनांचें आनंदैकस्थान जाहली होती
गेली कोठें अवचित मधुर ज्योत्स्ना प्रेमज्योती ? ७
" प्रति क्षणाला नव रस दे जी दावुनि मृदु मधु केली–
सांग सांग ती हृदयविलोभन करुनी कोठें गेली ? ८
" मरुप्रदेशीं भ्रमतां दिसली निर्झरिणी नयनाला–
मृगजलसम ती गुप्त जहाली ! ये न दया दैवाला ! ९
" कुठें लाडकी माझी ती मज सांग फिरुनी मिळेल ?
प्रियोत्तमा ती स्थळीं कोणत्या या दीनास दिसेल ? १०
" केव्हां प्रेमें पाहुनि मजला गालीं मंद हसेल ?
गाढ करांनीं पुन्हां काय ती मजला आलिंगील ? ११
" अहा ! कसा मी स्वर्गसुखाचा अनुभव होतों घेत ! --
पूर्वजन्मिचीं दुष्कर्में हीं सांप्रत छळिताहेत ! १२
" काय करावें ? कसें करावें ? प्रिया कशी भेटेल ?
तडिल्लता ही तरी काय मज नभिं घेउनि जाईल ? १३
" क्रूर मेघ हे करिति गर्जना विपत्ति मम पाहून !
दुष्टांचें मन कठोर गमतें बहु पाषाणाहून ! १४
" कुठें लाडके असासि चंद्रिके ? शोकाकुल हा दास !
अमृतपूरित स्निग्ध दृष्टिनें अवलोकन करि त्यास ! " १५

सुटला झंझावात जवन तों देव कृपाळू झाला
सकळहि मेघव्रात अकस्मात् अहा लयाला गेला ! १६
पूर्ण कलेनें रम्य इंदुचा पुनरपि उदय जहाला !
माझी ज्योत्स्ना अहा ! सुधेनें न्हाणी अवनितलाला ! १७
मृदुलकरांनीं अश्रु पुसुनि मम चुंबुनि वदन प्रेमें !
आलिंगियले मींहि समुत्सुक हासुनि त्या अभिरामे ! १८

रेंदाळकर.

मोहवी मदिरा मना.

श्लोक.

मोहवी मदिरा मना; नर योग्य रीतिस सोडितो !
सभ्यही पुरुषास शब्द असभ्य भाषणिं योजितो !
आपल्या सुहृदांसवें विनयास सांडुनि बोलतो !
स्त्रीसवें तनयांसवें करि वर्तणूक कठोर तो ! १

मोहवी मदिरा मना; नर नीति निर्मळ लंघितो !
सत्य वर्तन, सत्य भाषण, सत्य चिंतन, त्यागितो
जें मिळेल तयास तें मदिरेमधे धन वेंचितो !
सांचले धन संपतां, करि चौर्य; लेश न तो भितो ! २

मोहवी मदिरा मना; नर धर्मबंधन तोडितो !
श्राद्धपक्ष न हव्यकव्य न देवधर्म न पाळितो !
मंदधी मदिरेंत होउनि दंग तींतचि रंगतो !
धर्म विस्मरतो, सदा मदिरा पितो, जरि खंगतो ! ३

मोहवी मदिरा मना; नर लक्षिना स्व अनामया !
व्याधिच्या मदिरा पितां, लवमात्र तो न धरी भया !

घालवी मदिरानिषेवणें तो अनिद्र सदा निशा !
इंद्रियें विकलें ह्मणूनिच शून्य होति तया दिशा ! ४

मोहवी मदिरा मना; नर सर्व आंचवतो सुखा !
बंधुबांधव त्याचिया नच इच्छितात बघो मुखा !
त्यास टाळिति सर्व, तो जणुं रक्तपीतिनिपीडित !
हाय ! हाय ! अशापरी दिन कंठितो जनवर्जित ! ५

मोहवी मदिरा मना; नर ती अहर्निश सेवितो !
तो पितो मदिरा सदा, जणुं ती सुधेपरि भावितो !
अन्न टाकुनि, तो पितो मदिरा, पुन्हा मदिरा पितो ! !
धर्म यांतच, मोक्ष यांतच मूर्ख तो जणुं मानितो ! ६

मोहवी मदिरा मना; नर मोहिला मदिरा पितो !
चार चार करोनियां, मग मुर्खता जनिं दावितो !
त्यापुढेंहि गटारतीर्थजळांत तो करि मज्जन !
धिक्करोनि तयास, सर्वहि खेद पावति सज्जन ! ! ७

जनें बोध स्मरावा कीं, **मोहवी मदिरा मना !**
त्यजावी ती अशी आहे वामनात्मजकामना. ८

——————— विद्याधर वामन भिडे बी. ए.

सुभाषित.

आर्या.

अपमान होय, तेथें योग्य न वास्तव्य; हें मनीं आणा-
प्राण प्रिय सकळांना; प्राणापेक्षांहि मान सुजनांना. १

——— ——— चिंतामण माधव पिंपळसकर.

काव्यरत्नावली.

अंक ४ था.

सुभद्राविवाहकाव्य.

सर्ग चवथा.

गीति.

आनंदोद्यानीं जो शीत लतातरुनिकुंज बहु साजे;
त्यांत सुभद्रादेवी सायंकाळीं सखीसह विराजे. १
सुकलें वदनकमल तें ! नयनांतुनि गळति अश्रुच्या धारा !
पुसुनी पुसुनी त्यातें ओला वस्त्रान्त जाहला सारा ! ! २
मुक्तामालामंडित वक्षःस्थलिं बिंदु जे गळति फार;
त्यायोगानें तेथें बनला दुसरा मनोज्ञ नव हार. ३
पांडुच्छाया वदनावरी पसरली इतस्ततां फार !
तरिही पूर्णत्वानें विलसें तें सर्वसुभगतासार. ४
सुतनु जरी धैर्यानें अन्तःपीडा समस्तहि निवारी;
तरिही उष्णश्वास प्रगट अहा ! दावितात ती सारी ! ५
ती त्वरित चारुगात्री नेत्रातें मग पुसून पदरानें;
बोले हळुहळु सखितें विकला हृदयस्थितासुखभरानें; ६
" अससी या जीवाची प्रियकरिणी तूंच एकली लोकीं;
तूं एकमात्र हृदयीं कळवळशी बघुनिया मला शोकीं. ७
बालपणापासुनिया मजवरि करितेस फार तूं ममता
शोभे तुजलाच खरी नच अन्या मातृदेवकीसमता. ८

जेव्हां शोकावेगें फुटतें हें हृदय विकल होउनियां ! !
आश्वासन देशी तूं त्यासमयीं मधुर शद्ब बोलुनियां. ९
सकल मनोरथ माझे जाउनि सिद्धीस, मी सुखी व्हावें;
यास्तव रात्रंदिन तूं करिशी सखये ! प्रयत्न सद्भावें. १०
परि सखि ! त्या यत्नांचा शेवट नाहींच जाहला गोड !
मम दैवदुर्विपाकें दुःखाची मात्र लाभली जोड ! ! ११
सखि ! काल विवाहाचा हा हाय ! उद्यांच पातला साचा !
तो काल विवाहाचा नच सखये ! सत्य सत्य मरणाचा ! ! १२
तेव्हां यदुकुलमंडन,-विश्व जयाचें सदाहि यश गात—
वृक वदनीं एणीला अर्पुनि तो धन्य होइल जगांत ! १३
या समयींच कसें बघ चहुकडुनी दैव होय वक्रगति !
प्राणप्रिय तो मजला पूर्णपणें विसरुनी, भ्रमे जगतीं ! १४
असतां जरि तो एथें; तरि मग येतां प्रसंग कां असला ?
हाल करुनिया माझे बहु, मजला जो गिळावया बसला ! १५
ज्यानें मजजवळ सदा वानुनियां विजयगुणगणा खचित,
त्याच्यावरि मन माझें नियोजिलें, यत्न करुनिया अमित; १६
तो कृष्णनाथहि बसे हा ! हा ! आतां पहा उदासीन !
येवो मरणहि, होइन कुरुनाथाची कधींहि दासी न ! ! १७
द्यावें सुयोधना मज; दादाचा हट्ट हा असे भारी !
चित्तप्रवृत्ति माझी परि तो अणुमात्रही नच विचारी ! १८
जननीजनकमनीषा कीं, मी विजयास माळ घालावी,
न चले कांहीं त्यांचें परि हा ! हा ! काय वेळही यावी ? १९
मरणावांचुनि मार्ग न या दुःखांतुनि सुटावया अन्य !
हा प्राण सख्यासाठीं जातां, मानीन त्यास मी धन्य ! २०
तरि निश्चय हाच सखे ! बसुनी जीच्या तटावरि खुशाल;

रम्य कथा बोलुनियां, आनंदें लोटिला बहुत काल; २१
त्या दीर्घिकाजलीं हा आतां मी प्राण शीघ्र सोडीन;
जन्मांतरिं तरि सखये! नाथाचें पादपद्म जोडीन. २२
केलें आजवरी तूं मजवरि उपकार फार गे! देख;
पूस सखे! नयनांतें करि सेवा हीच अन्तिमा एक. २३
मी नामशेष होतां, येइल एथें कदापि जरि कान्त;—
तरि त्याला प्रियसखये! माझा साद्यंत सांग वृत्तान्त. २४
ही घेइं मुद्रिका मम; हृत्कोशीं जपुनि फार ती ठेव.
अर्पण करिं मग त्याला प्रेमाची अल्पमात्र ही ठेव. २५
तत्करिं घालुनियां ही, यापरि मग सांग त्यास त्या कालीं;—
“ तव विरहार्त सुभद्रा शोकानें प्राण टाकिती झाली. २६
तत्प्रेमचिन्हभूता होवो ही मुद्रिका कराभरण;
राहो हृदयीं अपुल्या आतां तीची सदाहि आठवण; ” २७
मग तीस सखी वदली; “ साहस असलें शुभांगि! हे नँ करीं;
या दुःखसागरांतुनि तारुनि नेइल तुला दयालु हरी २८
परि हा! हा! बघ सखये! दुर्योधन नटुनि मर्कटासम हा;
इकडेच येत आहे तुज लक्षुनियां सहर्ष दुष्ट महा! ” २९
ललितसुभद्रावदनांबुज अवलोकित विलोल नयनांहीं;
आला कुरुपति तेथें लवही ज्याच्या मनांत नय नाहीं! ३०
बोले मग तीस, “ अहा! लाजे रति बघुनि यद्वदनकान्ति;
ती नयनचंद्रिका तूं दैवानें लाभलीस एकान्ती! ३१
गे! युवतिरत्नभूपे! करिशी कां आज अश्रुगत खरी?
पाहुनि खिन्नवदन तव, दुःखाच्या उठति अन्तरीं लहरी! ३२
सकलां स्पृहणीय असा विवाह अपुला उद्यांच होइल गे!
मग मग्न सौख्यसागरिं होऊं; हें तुजसि सांगणें नलगे. ३३

सखि ! पूस लोचनांतें, बैस अशी मजसमीप येउनिया;
सुखवीन विकल हृदया, वेगें तव अधरबिंब सेवुनियां ३४
तव विरहज्वालांनीं सुकला गे ! जीववृक्ष हा सारा !
सखि ! त्यास जीववीं तूं वर्षुनियां मधुर वाक्सुधासारा. ३५
दुःखामध्यें सखये ! तुजवांचुनि काल सर्व मी कंठीं !
बोलुनि यापरि वचनें, टाकी निजहस्त शीघ्र तत्कंठीं ! ” ३६
झिडकारुनियां तत्कर, वदे सुभद्रा तयास; “ कुरुराय !
अभिचार आपुला हा उचित कुमारीजनासवें काय ? ३७
कां ही विटाळितां तनु झालें मी जों न आपली दार !
हा ! हा ! नीचजनोचित योग्य न भूपास हा दुराचार. ३८
एक धनुर्धर जगतीं, जो पांडुकुलप्रदीप नरवीर;
या देहाचा स्वामी या लोकीं होय तोच रणधीर. ३९
त्याला मी प्रेमभरें माझी ही सत्य अर्पिली काया !
दुर्लभ ही इतराला त्यावांचुनियां खरीच नृपराया ! ४०
जा जा एथुनि आतां; माझी इच्छा न अल्पमात्र धरा;
स्पर्श कराल जरि मला, प्राणाचा त्याग मी करीन खरा ! ” ४१
बोले तीस सुयोधन, “ अप्रिय हें वचन बोलसी कां गे !
हा दास लीन चरणीं; अवलोकीं सखि ! तयास अनुरागें. ४२
राज्यपदाला मुकुनी, विचरे जो भणगसाच दिनरात्र !
या रत्नाला कंठीं धारण करण्यास काय तो पात्र ? ४३
तव तातानुमतानें या तनुचा मीच जाहलों स्वामी;
नाना विलास भोगिन आतां तुजसह सुरम्य आरामीं. ४४
मदनानल पेटुनियां, काया ही तप्त जाहली जाण;
तव अधरसुधापानावांचुनि हा सुकुनि चालला प्राण ! ४५
सुटला सुखकर वारा; वृक्षावरती मयूर नृत्य करी;

निर्जन वन हें विलसे; ताडी स्मर कामुकास पंचशरीं ! ४६
या कालीं मज रमणी ! आलिंगुनि, शान्त हा करीं काय; "
बोलुनि यापरि खल तो, भुज पसरुनि, तिजसमीप मग जाय. ४७
तोंच घटोत्कच हाणी लत्ता त्याला महा उरावरती;
पडला खल तो खालीं वमला शोणित अपार दुष्टरति. ४८
ओरडली मोठ्यानें भीत सुभद्रा प्रकार तो बघुनी;
आले धावुनि परिजन; धरिती वेगें नृपास सांवरुनी. ४९.
बळराम, कृष्णनाथहि आले धांवुनि तदा उपवनातें;
मूर्छित सुयोधनातें गेले घेउनि सवेंच सदनातें. ५०

चवथा सर्ग समाप्त.

——————कै. श्री. ना. मुजूमदार बी. ए.

भागीरथीतीरावरील प्रभात.

[काशी येथील भोसल्याच्या मंदिरीं उभें राहून प्रभातकाळच्या देखाव्याचें व गंगेचें पाहून केलेलें वर्णन.]

श्लोक.

शय्या सोड सखे ! कशी अजुनि तूं झालीस निद्राकुला ?
या पुण्यस्थलिंचा पवित्रमुखिचा सर्वत्र कोंदाटला,–
मोहध्वांत विनाशक, त्रिनयनप्रेमातिरेकान्वित,
आला घोष तुझ्या न कां श्रुतिपथीं अद्यापि कालोचित ? १
चित्तोत्पन्नतरंगशक्तिनिकरें गंगापगा पावनी–
लीला नैक करी कशी निरलसा हर्षें दिवायामिनी !
त्यातें पाहुनि, मोहुनी, निजमनीं, आकाशिंच्या गायकीं
गाणीं मंजुळ गाउनी, स्तुतिपरा केली उषा ही सुखी. २

कांते ! ये; स्मितहास्य हें बघ हिचें, हा चेहरा उज्ज्वल.
ही गंगोर्मि पहा तटावरि करी आघात खेळाकुल.
जाणो सूचवि सुप्रसन्न मन हें माझेंहि झालें सये !
खेळूं आपण या परस्पर अतां स्नेहान्विता निश्चयें. ३

व्योमीं चित्रविचित्र वर्ण असतां, पूर्वेकडे तांबडें—
एकाकी इतुक्यांत ये, कुठुनियां ? ही काय लीला गडे,
आहे कां रुधिरप्रवाह असुरीं केल्या रणाचा दिवीं ?
किंवा आणिलि लालशाल अनिलें दिक्सुंदरीची नवी ? ४

होती आजवरी घरीं जननिच्या आलीचिया संगतीं;
आलें सत्वर वल्लभाकडुनियां बोलावणें संप्रति;
आली यास्तव ती गमे निजगृहीं प्राग्देवता संभ्रमें;
शोभे भव्य कपाळ तत्सखिजनीं लावीयल्या कुंकुमे ! ५

वारा घालित गंधवाह तिजला संमिश्र शीतोदकें;
वृक्षीं तद्यश भूमिला सुममिषें विज्ञात केलें निकें;
झाल्या चांदणिया प्रणाम करित्या स्वर्गाचिया वासिनी;
गेल्या पुष्करिणी प्रसन्न कमलीं सानंद हेलावुनी; ६

झालें काय बरें, सखे ! प्रियकरे ! आलें तुला कां हसें ?
कांहीं अद्भुत भासलें तुजसि कां कीं लागलेसे पिसें ?
“ नाथा ! वेड नसे, परंतु ह्मणत्यें वेडीच वाग्देवता;
जी कां भास्कर सारथ्यास गणिते ही कुंकुमें भूषिता ! ७

मी व्यर्थ भ्रमलों, खरेंच चतुरे ! वाटेच वेडावलों !
नादीं कल्पकतेचिया न कळतां वेड्यापरी लागलों ;
माझें वेड बघून हास्य तुजला आलें जरी सुंदरी !
धिक्कारें कविता झुगारुनि परी देई न मातें दुरी. ८

देते ज्या सुरसा रसास कविता सोत्साह प्याया मला;
थोडासा तरि तूं मनोज्ञ रमणी आस्वाद घे त्यांतला.
घेतां स्वाद, तुला कळेल मम कीं वेडी जगीं कोण या ;
वाग्देवी अथवा तव प्रकृति ती जी चंचला निर्भया. ९

गेला सारथि तो, तलातलिंहुनी अत्यंत तेजोयुत;
आहे काय बरें सुनील गगनीं, जें येतसे अद्भुत ?
पाताळीं दिधलें जया नृपतिला लोटोनियां वामनें;
स्वर्गी तो निजपूर्वजास बघण्या जाई गमे सन्मनें. १०

नोहे भूपबळी; गमे अहिंचिया शीर्षांतला तो मणि;
जाते घेउनि अप्सरा दिवि कुणी घालावया भूषणीं;
फांके कांति चहूंकडे, जसजसें येई वरी यान तें;
आला हा ह्मणती नभीं ' दिनमणी ' या कारणें जाणते. ११

गंगेच्या सलिला, तशीच कमला, त्या बाजुच्या सेतुला,
या प्रासादतला, द्विजातिततिला, देवांचिया मूर्तिला,
सांगूं काय तुला, विशेष सगळ्या विश्वांतल्या वस्तुला
शोभा रम्य पहा किती जिवलगे ! आली असे निस्तुला ! १२

होतां मंदपणा प्रवाहिं जिचिया; ती जान्हवी चंचला–
झाली केंवि अशी अचानक बरें हें काय झालें हिला ?
गेल्या दृष्टिसमोर वीचिततिया सर्वत्र विस्तारुनी;
भारी व्याकुळ ही खरोखर दिसे गेलीच भांबावुनी ! १३

नौका नाविक घेउनी, लगबगा संचारती कां असे ?
सारे पाणबुडे जळीं बुडुनियां, धुंडाळती कायसें ?
कोणाचें दिसतां मधेंच मुख तें पाण्यामधीं पोहतां,
तें तें काय बघा ह्मणोनि करिती गोंगाट कोणी वृथा ! १४

येथें या मणिकर्णिकातटकटीं भूदेव बैसोनियां,
भस्मोद्धालित साभिषेक करिती घोषास रुद्राचिया;
त्यांची सान मुलेंहि निश्चल, जलामाजी उभीं राहुनी;
गायत्रीस्तवनें प्रसन्न करिती त्या भास्करालागुनी ! १५

शेला पांघरुनी करांत कळशी घेवोनियां उत्सवें,
आल्या स्नान करावयास तरुणी त्या एकमेकांसवें;
कोणी पाय परी न टाकिति जळीं ठेवोनियां अंबरा !
या चिंतातुर कां तटीतटिं उभ्या काशींतल्या इंदिरा ? १६

झाली वेळ नसे तरी मग कसा हा चौघडा थांबला ?
जो कां संतत रंजवी सनइचा आवाज, तो लोपला !
घंटा वाजत नित्य जी समयिं या दत्ताचिया मंदिरीं;
ती तद्भक्तजनीं कशी न अजुनी केली सुरू सुस्वरीं ? १७

विशद रुचिनें, सौंदर्यानें अलंकरणापरी–
असित गगनांभोधीलागीं विभूषित जो करी;
घनतिमिरिं जो देई चंद्र स्वयें द्युति शीतला;
विमल सलिलीं तो गंगेच्या निशीं प्रतिबिंबला. १८

उदकिं अमृतस्यंदी शीतांशुचें प्रतिबिंब ते–
बघुनि, सगळे झाले गोळा अही तळिंचे तिथें !
निकट अपुल्या पाहोनीयां सुधांशु, तसा फणि,
प्रमुदित बहू झाली चित्तीं त्रिलोकविहारिणी. १९

अमृत-किरणें, येतां व्योमीं प्रभातिं दिवाकर,
सदनिं भगणासंगें केलें पलायन सत्वर !
सहज मग तें त्याचें तोयीं दिसे प्रतिबिंब न !
फिरुनि फिरुनी पाहे भागीरथी जरि शोधुन. २०

त्यजुनि मजला गेला, वाटे तिला शशि-शेखर !
अहह ! फसवी व्हावा कैसा पुन्हा परि गोचर ?
ह्मणुनि इतुकी शोकोद्वेगें भयाकुळ जान्हवी—
रडुनि रडुनी वीचिक्षोभें स्वतांप्रति कष्टवी ! २१

तटगत जनीं दुःखी तीतें विलोकुनि अंतरीं,
बहुविध तयीं यत्नां आरंभिलें अपुल्या परी;
हुडकुनि शिवा काढायातें, तिला सुख द्यावया,
सदयहृदया चिंता-क्रांता ह्मणोनि उभ्या स्त्रिया. २२

बघ बघ सखे झालें आतां प्रशांत तिचें मन;
करिति दिसती हर्षें सारे जळीं अवगाहन.
द्विजमुखकृत प्रेमोल्लासें स्तवें शिव मोहुन,
गहिंवरुनिया गेला तेणें तिचें करि सांत्वन. २३

परिमळभरें गेल्या ज्यांच्या दिशाहि विमोहुनी;
कुसुमखचिता माला शुभ्र प्रफुल्ल सुशोभिनी;
दिसति मधुनी कोठें कोठें तरंगति जीवनीं;
सबल दुसरें सान्निध्याचें न लक्षण याहुनी. २४

पुलिन किति हें गंगेचें गे ! चकाकत लाडके !
सकल सिकता ह्या देवीची विमिश्रित अभ्रकें;
पडुनि किरणें आली शोभा विशेषचि आणखी;
वसुमति जणों केली सूर्यें अलंकृत तारकीं ! २५

मृदुल सिकता पाहोनी ती मुलें मुलि गोमटी—
सहज धरिती हस्तामध्यें; घडोघडि दापिती;
कितिक अपुल्या वस्त्रांमाजी भराभर ओतिती;
कितिक करुनी चेंडू त्याच्या सख्याप्रति दाविती ! २६

बघुनि शिशुचीं आनंदाचीं तया स्थळिं लोळणीं,
समजुनि मनीं गेलेलीं हीं मुलें मम, तत्क्षणीं–
पसरि अपुलें आलिंगाया तरंगकरद्रवें;
परत परि घे गाळोनीयां टपाटप आंसवें ! ! २७

दिवस वरती आला याचें निदर्शन गे प्रिये !
भवंति अपुल्या छत्र्या मोठ्या उभारिति घाटियें;
सकल जनता घ्याया जाई पहा विभुदर्शन;
परि न धुतलें गौरांगी ! त्वां अजून निजानन ! ! २८

झडकरि चल, आर्ये ! ऊठ शय्या त्यजून;
परिचयगण आले, बाहती ओरडून;
त्वरिताचि अपुली घे घालुनी नाट[illegible]गी;
मृदुल कचकलापीं पुष्प ठेवीं सुवर्णी. २९

मधुरतर सुगंधी तैल अंगास लावीं;
स्मृति परि मम तेव्हां काळजीनें करावी;
सुरुचिर अवतंसीं भूषवावी स्वकाया;
मिळुनि मग शुभांगी ! स्नान जाऊं कराया. ३०

सुबक कुशलतेनें बांधिल्या चित्ररंगी–
उडुपिं मग बसोनी, जाउनी मध्यभागीं,
निगमनुत गिरेनें जान्हवी वाद्य-[illegible]षें–
सहचरि ! तुजसंगें अर्चु पूजाविशेषें. ३१

विसरं न अजि घ्याया गोड लाडू खव्याचे;
बहुविध पुरवाया कोड मत्स्यादिकांचें,
विफळ सकल पूजा तृप्त केल्याविना ते !
जननि कार्वि न जाते टाकुनी लेंकरातें. ३२

अमृत भवगदार्ता पेय वृंदारकांचें,
भरुनि रजत पात्रीं तोय गंगानदीचें,
करुं मग अभिषेकें तुष्ट विश्वेश्वराला;
निजनगर जयानें दाविलें आपणालां ! ! ३३

जगदधिपतिलागीं प्रेम भक्त्यादरानें,--
स्तवननमनयोगें मोकळ्या मानसानें,
हितगुज कळवूं; गे ! आपला तात तो कीं--
प्रभुविण भजकाला कोण आधार लोकीं ? ३४

विलंब मग कासया ? प्रभुकृपाच कीं वाहते !
वृथा न दवडीं अशा सहज आलिया संधितें
दयामय शिवाचिग्या नगरिं काय आहे उणें ?
घरोघरिं हिमालयीं मृगमद प्रयत्नाविणें ! ! ३५

चक्रवर्ती.

तेव्हां आणि आतां.

पुढील कवितेंत कवीनें आपलें बाल्य आणि तारुण्य यांत पडलेला फरक दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

गाणें.

'तेव्हां' बुलबुल बोल बोबडे--
प्रिय सर्वांतें असुनि वांकडे !
'आतां' जरि वच सुज्ञपणाचे;
मूळ उगवतें तरि वादाचें ! १
'तेव्हां' मज्जननी प्रेमामृत--
वर्षत होती मजवरि संतत ।

‘ आतां ’ प्रेमामृत तें कुठलें !
दुःखविषानें जग हें भरलें ! २
‘ तेव्हां ’ बाळा ’ जननी-वचनें—
होतें, तें मज सुख हो मिळणें !
‘ आतां ’ मजला ह्मणोत मोठा;—
खरें न सुख, तरि त्याचा तोटा ! ३
‘ तेव्हां ’ रडणें, हसणें हें जरि,--
रडणें होतें हसणें तें परि !
‘ आतां ’ रडणें रडणें सारें !
हसण्याचें नच हृदया वारें ४
‘ तेव्हां ’ नच उदराची चिंता !
सदैव होता प्रमोद चित्ता !
‘ आतां ’ पोटासाठीं सारें !
तरि न सुखाचें लागे वारें ५
‘ तेव्हां ’ मम सौख्यार्थ पसारे—
हसें, खेळणें, गाणें सारे !
‘ आतां ’ हें दुःखाचें वारें—
साहुनि थकलें शरीर सारें ! ६
‘ तेव्हां ’ मजला चंद्रादिक तें--
कुटुंब सारें जग हें होतें
‘ आतां ’ जरि लघु कुटुंब, परि तें—
पोसायातें बहु जड जातें ! ७
‘ तेव्हां ’ ‘ आतां ’ तोलुनि बघतां,
गेलें वरवर कितितरि ‘ आतां ’ !

' तेव्हां ' परि तें खालीं आहे !
न हले तिळभर नवल पहा व्हें ! ८

' तेव्हां ' भेटे कविता येतां,
तद्गानामृत प्राशन करितां;
' आतां ' पुनरपि अदृश्य होतां !
त्याविण नच ये कांहीं हातां ! ९

ये ये कवित्ते ! दयिते ! आणिं--
' तेव्हां ' अक्षय, जोडीं पाणी;
' आतां ' लोटी परतें परतें !
मागें नच मी तुज यापरतें ! १०

——————. पारुजी नारायण मिसाळ.

एक लहानशी गोष्ट.

गीति.

बुध हो तुह्मांपुढें मी दोषांनीं युक्त ही कृती ठेवीं;
ग्रहण करा सार, जसा हंस जला सांडुनी, दुधा सेवी. १
ग्रामामध्यें एका सज्जन खल उभय असति शेजारी;
करि खल सज्जन-हेवा; जगतीं सज्जन असे खला वैरी ! २
सज्जन मनीं विचारी, हेवा नर आपुला करी हा कां ?
कारण त्यास पुसाया खलास मारीतसे तदा हांका. ३
परि तो जवळ न येतां दगडा फेंकोन उत्तरा देई;
जरि सज्जन गोड वदे तें भाषण मोद ना तया देई; ४
कित्येकदां तयानें प्रयत्न केला प्रकोप विझवाया;
जैसें त्रिनवुनि दगडा पाझर फुटणें खरोखरी वायां. ५

“ वीज जशी वृक्षांतें, अथवा पारा असे जसा क्षारा;
शेजारी मी ह्याच्या; मत्सर ह्यास्तव करीतसे थारा. ६
शेजारा सोडोनी जावें मजला गमे खरी युक्ती
षडरि छळोत न त्यासी; त्या दीना लौकरी मिळो मुक्ती ! ” ७
ऐसें चित्तीं चिंतुनि, तो जाई दूर देशिं राहाया;
सज्जन तत्पर असती परसौख्या प्रखर दुःख साहाया. ८
परदेशीं जाउनियां गृह बांधी तो सुरम्य परि सान;
सज्जन-कीर्ती जगतीं कोण ह्मणे प्रज्ञलोक परिसा न ? ९
मिळति यति सदाचारी मित्र तया, दूर देशिं जरि गेला;
हेमा रत्न मिळावें; कर्माची ही असे सदा लीला. १०
सद्धर्मानें चाले, पृथ्वीवर कीर्तिगंध तो पसरे;
जनभृंगसमूह मुले; “ तद्दर्शन घे ह्मणूनि पाप सरे. ” ११
ह्मणती कितिएक असें; “ धर्मानें वाढला पहा नर तो !
चित्त रमो सद्धर्मीं पापीं परि तें कधीं मुळीं न रतो ! ” १२
धर्म असे प्राण्यांचा मित्र, परी शत्रु सर्वदा पाप;
रंकाचा राव बने, सद्धर्में होइ ना कुठें ताप. १३
कीर्ती पसरत पसरत, गेली त्या मत्सऱ्याचिया कानीं;
ऐकुनि तन्मन भंगे ! चित्तीं तन्नाश तो सदा आणी ! १४
त्यांते छेदुनि येइन, दुष्टाला मी जिवंत ठेवीं न;
कीर्तिसुगंध तयाचा यायोगें थांबवून ठेवीन. १५
ऐसा निश्चय करुनी, सोडी तो आपुलें सुरम्य घर !
कितितरि दुःखद मत्सर ! ! प्याया लावी कधीं जबास गर ! ! १६
जाउनिया नगरामधिं, घर शोधी सान संतरायाचें;
वचन गमतसे ज्याचें तारूं भवसागरा तरायाचें. १७
सज्जन-गृहांत जाई तो; तेव्हां संत त्यास सत्कारें—

मोदें वंदूनि वदे " मित्रा ! येणें तुझें इथें कां रे !" १८
कपटें त्यास खल ह्मणे; " झाली तव दर्शना बहू अब्दें !
दर्शनमात्रें होई मोद मला वर्णवे न तो शब्दें ! १९
त्या संतासी वाटे, सोडी खल सर्व दुःस्वभाव अतां;
सज्जनजीवाजाच्या करण्या खल-लांडगा टपे अंता. २०
एकदिनीं दुष्ट ह्मणे " संता ! जाऊं चला फिरायास;
सृष्टीवैभव पाहूं; त्यायोगें हरति सर्व आयास. २१
बोलत बोलत त्यानें नगरापासोन दूर त्या नेलें;
आरक्तदुकूलावृत दिनकर पाहून, पश्चिमा डोले. २२
सज्जनघात करिल हा दुर्जन वासा न हा उचित काय—
समय रवि असें जाणुन, परिजन घेवोनिया त्वरें जाय. २३
रवि अस्तासी जाई, तेव्हां तो सज्जनास गिरिशिखरीं—
नेउनि त्यासी लोटी शिव ! शिव ! त्या हो दया न काय वरी ? २४
संतसुदेवें होत्या पाण्यामध्यें अनेक जलदेवी,--
वांचविलें त्यास तिहीं तारुनि जलांत कमलदल जेवी. २५
त्यांपैकीं मुख्य ह्मणे; " वत्सा ! तव भाग्यकाल ये आतां;
त्या दुष्टें टाकियलें तुज एथें परि करूं नको चिंता. २६
चारित्रानें तव रे ! केलें संतुष्ट देवदेवांही !
" ऐसाच पूत ठेवुनि सत्कार्या देह मी वदें " वाहीं. " २७
तव शुद्ध चरित्राची कीर्ती बा पसरली असे जगतीं;
भूपति येईल उद्यां भेटाया ठेव चित्तिं शीघ्र गती. १८
स्थाना सुरम्य अमुच्या नृपसुत तो करुनि टाकि उध्वस्त--
तेव्हांपासुन अमुचा मोदरवी पावला असे अस्त ! ! २९
आह्मी छळितों त्याला, नृपती येइल अशाच कामाला;
अनुमति घेईल तुझी व्यार्धीतुनि पुत्र सोडवायाला. ३०

त्या समयीं तूं सांगें, त्यातें तें स्थान रम्य बांधाया;
आह्मी छळूं न त्याला तरि शंका बाळगूं नको वायां. ३१
इतकें बोलोनि तिच्या दासीना ती ह्मणे; अगे! ऐका;—
पोंचवुनी गृहिं त्याला द्यावें, न विचित्र कर्म लीला कां? ३२
दुसरे दिवशीं येई भूप, स्वसुतास घेउनी संगें;
सज्जन-मनिं मोद भरे पृथ्वीपति बघुनि पातला अंगें. ३३
संता सुत-व्यथेतें सांगे तो भूप फार विनयानें;
जलदेवीनें कथिला, कथिला सदुपाय त्यास सुजनानें. ३४
कांहीं दिवसानंतर पुत्राची व्याधि सर्वही जाय;
पाचारुनि संताला अर्धें अर्पी तयास [illegible] राज्य. ३५
तो सज्जनास भेटे खल फिरतां फिरुनि दीन होऊन;
तेव्हां दासांकडुनी बो[illegible]वेलें त्या रथांत बसवून. ३६
आणोन त्यास दिधलें अगणित धनही अपार संपत्ती;
आदर करुनी त्याचा, लाजविलें त्यास हरुनि आपत्ती. ३७
सरदार लोक ह्मणती; " असें महाराज! हें कसें करितां?
गांभीर्यें त्यास वंदें शोभे जे त्याचिया विमल चरिता— ३८
त्या सर्वांला कथिलें त्यानें, तें पूर्ववृत्त जें घडलें;
ऐकुनि त्या वृत्तासी, जन तेथिल मोदसागरीं पडले. ३९

" चातक."

सुभाषित.

आर्या.

स्वैराचारी नृपती, सचिवहि मंत्रानभिज्ञ, ज्या देशीं—
जन उद्विग्न सदोदित, बरवें तेथून गमन परदेशीं. १

चिंतामण माधव पिंपळसकर.

मे. १९१२ वर्ष २२ वें.

काव्यरत्नावली.

अंक ५ वा.

सुभद्राविवाहकाव्य.

सर्ग पांचवा.

गीति.

बसला सौधावरती बळरामासह सचिन्त वनमाळी;
मंद सुगंधित वारा पालवि तेथें तयास त्या काळीं. १
कृष्णातें अनुलक्षुनि हलधर मग वचन यापरी वदला;
" सर्व प्रकार पाहुनि कृष्णा ! हा, नवल वाटतें मजला ! २
बलसागर दुर्योधन, त्याला लत्ताप्रहार कोण करी ?
तेथें गुप्त फिरतसे राक्षस, अथवा पिशाच काय तरी ! ३
आनंदोद्यानीं जन आनंदें सर्वकाल वास करी;
परि नच अनर्थ असला घडला कृष्णा ! कदापि आजवरी ! ४
दैविक कोप ह्मणावा कृष्णा ! कां हा ? कळे न अल्प मला;
अससी चतुर खरा तूं सांग मला, काय वाटतें तुजला. ५
झाला मास, परंतु न कुरुनाथ स्वस्थचित्त बघ झाला;
तो समय आठवोनी; वाटतसे भय अझूनि बहु त्याला. ६
परि दैव आपलें ! तो सुटला त्या घोर संकटांतून !
इष्ट असें या समयीं काय तरी आपणास याहून ? ७
आला होता खचितचि कुरुनाथावरि अनर्थ हा घोर !
परि त्यास वांचवोनी, ईशें केला प्रसाद हा थोर. ८

कथिलें गर्गमुनीनीं, उरला त्याला अपाय नच कांहीं.
आश्वासन हें ऐकुनि, झालों मी स्वस्थचित्त लवलाही. ९
भगिनीची दुरवस्था त्या कालीं बघुनि, जीव घाबरला;
आतां ईशकृपेनें दुःखाचा काल सर्व तो सरला. १०
नाशी अज्ञानतमा दिनकरसम, सत्तपोद्युति जयाची
त्या गर्गगुरुश्रेष्ठें केलि सकल शांति त्या अरिष्टाची. ११
ज्या रुष्ट देवतांहीं केला प्रतिबंध हा विवाहाला;
त्यांचें अर्चन करुनी, केलें संतृप्त जाण मीं त्याला! १२
भूतभविष्यज्ञाता रैवतकावरि यतींद्र जो निवसे;-
कथिलें त्यानें मज कीं, भाग्याचा काल फार दूर नसे. १३
अनुरूपकुलजपतिसी वरिल सुभद्रा खरी अचिरकालें;
सरलें अरिष्ट सर्वहि; आनंदाचे समीप दिन आले. १४
आतां मासचतुष्टय लग्नाला नच मुहूर्त योग्य असे;
तोंवरि काय करावें! वद मज जें तव मनास योग्य दिसे." १५
मग कृष्ण वदे, "दादा! अपुला हा तर्क युक्त न खराच;
या पुण्यपुरीमध्यें कोठुनि येतिल निशाचरपिशाच? १६
वीरश्रेष्ठ सुयोधन त्यास सुरेश्वरहि सांजलि भजेल;
चित्तेंहि काय त्याला शिवण्याला खल निशाचर धजेल; १७
पाहून सुभद्रेची एकांतीं दिव्य मूर्ति अनुपम ती,
एकाएकीं आली त्याच्या आनंदसागरा भरती; १८
होउनि आनंदाचा भर त्याला असहनीय त्या कालीं,-
पडला एकाएकी वेगानें भूपनाथ तो खालीं. १९
ज्याची भार्या सत्यचि वसुधा ही जलधिमेखला झाली;
तो प्राप्त होत असतां वर ईतें सकलगुणकलाशाली,- २०
संक्रुद्ध होउनीयां, दैवानें विघ्न आणिलें त्यास;

कुलदेवतार्चनानें शमवावें सर्वथा तरि तयास. २१
जी आपल्या प्रभावें त्रिभुवन विवडी, घडी क्षणांत खरी;—
ती आदिशक्ति काली रैवतकावरि सदैव वास करी. २२
आनंदानें जीतें वृंदारकवृंद सर्वदा गाती;
सेवा तिची सुभद्रा मासचतुष्टय करील तरि गा ! ती. २३
करितां सेवा तीची, जाइल संकटपरंपरा विलया;
लाभेल मग सुभद्रा त्वरित पतीला समस्तगुणनिलया. २४
जें होय हृदय तीचें गतगोष्टी स्मरुनियां, विकल फार;
जगदंबिकार्चनीं तें होइल रममाण पूर्ण साचार. २५
त्या घोर विपत्समयीं भरली तीच्या मनांत जी भीति;
श्रीपादपूजनानें जाइल वेगें समस्त निघुनी ती. २६
जो योग्य वाटला मज उपाय, तो आपणास मी कथिला;
स्वीकारावा वेगें जरि गमला युक्त आपल्या मतिला." २७
बळराम वदे, "कृष्णा रुचला तव हा उपाय मन्मतिला;
पूजार्चनरत होतां, या दुःखाचा पडेल विसर तिला. २८
ज्याच्या दर्शनमात्रें अघपर्वत होय दग्ध निमिषांत;
ऐसा यतिवर विलसे रैवतकीं, पुण्यमेरु जो ख्यात. २९
सद्बोधानें निरसी रविसा जो हृदयगततमःप्रकर;
अवतरला साक्षात् तो ताराया नतजनास सत्य हर. ३०
कृष्णा ! त्याची सेवा मासचतुष्टय करो सुभद्रा ही;
होतां प्रसाद त्याचा, होइल युक्ता खरी सुभद्रांहीं. ३१
त्याच्या सांनिध्यानें हरेल सर्वहि इचा मनस्ताप;
होइल शुद्धिमती ही, ऐकुनियां पुण्यमय कथालाप. ३२
सकलमनोरथदात्री कल्पलता जाण सत्य तत्सेवा;
देवासहि पाहुनियां सयश त्याचें, गमेल बहु हेवा. ३३

त्याची भाषासरणी ऐकुनि, वाचस्पतीहि शिर तुकवी;
तो पुण्यकथालापें हृदयस्था अघतरंगिणी सुकवी. " ३४
मग कृष्ण वदे, " दादा! गमतो मज योग्य हा नच उपाय;
चोराच्या हस्तीं निज द्रव्य अर्पील सुज्ञ जन काय? ३५
सुरललनारमणीया कोठें लावण्यराशि ही बाला!
कामुकसम तो कोठें यति नवयौवनभरांत जो आला! ३६
अत्यन्त सूक्ष्मदृष्ट्या त्या यतिचे विविध चार ते बघुनी,
गमतें मज, नच त्याला वश झाली विषयवासना अझुनी; ३७
होतो तरलहृदय बहु, पाहुनि सुंदर विलासिनी जवळ;
चोरुनि शंकित पाहे असकृत् तो कामिनीवदनकमल! ३८
त्याच्या जवळ सुभद्रा ठेवावी, हें अयुक्त सत्य पहा;
या योगानें होइल निःसंशय शेवटीं अनर्थ महा! ३९
प्रबला विषयाशा ही! घाली विद्वज्जनांसही भूल!!
वात्या शिलोच्चया जी विदारिते, काय तिजपुढें तूल? ४०
षष्टिसहस्राब्दवरी तप केलें घोर भक्षुनी लोह!
तोहि महामुनि पावे, पाहुनियां ललित अप्सरा मोह! ४१
इंद्रियनियमन केलें ज्यानें तो एकलाच शुकराज;
ज्याचें निस्तुल सयश गाती संतत महाबुधसमाज. ४२
कोठें प्राकृत यति हा! कोठें तो सकलइंद्रियविजेता!
द्रव्याचा निज ठेवा, चोराच्या करिं बळेंच कां देतां? ४३
ठेवुं नका यतिसंनिध दादा! क्षणमात्रही सुभद्रा ते;
कां आपणावरि बळें ओढुनिया आणितां अभद्रातें? ४४
पाहुनिया एकांतीं ललितस्त्रीरत्नभूत ही बाला,
सोडून तपश्चरणा, होइल वश सत्य सत्य मोहाला! ४५
वश नच झाला अल्पहि इंद्रियगण हा जयास अनिवार;

पाहुनि सुंदर वनिता, तन्मनिं उपजेल कां नच विकार ? ” ४६
बलराम वदे, “ कृष्णा ! वचनें हीं काय बोलशी ? हाय !
त्या साधूचा महिमा तुज पाप्याला कळेल तरि काय ? ४७
निंदा थोराची जो करि नच तो एकलाच या लोकीं,
परि जो ती श्रवण करी, तोही जन पापशील, अवलोकीं. ४८
जो तीव्र तपस्तेजें नेइ मनस्तम समस्त विलयातें;
बद्धांजलि सतत न कां मग पामर मजसम स्तविल यातें ? ४९
तो थोर महात्मा या लोकीं आला जनांस ताराया;
निजपुण्यमय कृतींनीं सर्वांचा ताप दूर साराया. ५०
लावीन तरी आतां त्याच्या सेवेस मी सुभद्रा ही;
जाईल अरिष्ट लया; याची शंका मला न लव कांहीं. ” ५१

पांचवा सर्ग समाप्त.

——————कै. श्री. नां. मुजूमदार. बी. ए.

चित्रचातुरी.

कथानक.

शुचि आणि रुचि ह्या नांवांच्या दोन चितार्‍यांमध्यें कौशल्य श्रेष्ठतर कोणाचें, ह्या बाबतींत वादविवाद झाला. परस्परांनीं परस्परांच्या चित्रांतील दोष काढले, आणि आपआपली कारागिरी अधिक आहे, असें प्रत्येक ह्मणूं लागला. शेवटीं असें ठरलें कीं, श्रेष्ठतरत्वाचा निर्णय करण्यासाठीं प्रत्येकानें एक एक चित्र तयार करावें व ज्याचें चित्र उत्कृष्ट ठरेल, तोच उत्कृष्ट चित्रकार समजावा. शुचीनें द्राक्षाचा घोंस काढिला, तो इतका हुबेहूब साधला होता, कीं तो खरा समजून पक्षी त्यावर चोंची मारूं लागले. रुचीनें भिंतीवर एक पडदा काढिला, तोही इतका उत्तम साधला होता, कीं त्याला शुचि देखील फसला. शुचीच्या चित्रास निर्बुद्ध पक्षी

फसले, परंतु रुचीच्या चित्रास शुचिही ज्याला चित्रकलेचें पूर्ण ज्ञान होतें तोही फसला. ह्यावरून रुचीची करागिरी उत्तम प्रकारची ठरली. हा विषय ह्या काव्यांत आहे.

चित्रचातुरी ह्मणजे चित्रें काढण्याचे बाबतींत कौशल्य.

दोहा किंवा दोहरा वृत्त.

पूर्वी चितारी मणिपुरीं होते दोन रहात;
दोघे चित्रकलेमधें होते अति निष्णात. १
चित्रें काढुनि विकुनि तीं पैसा ते मिळवीत;
त्यांची होती हीच हो निर्वाहाची रीत. २
प्रमाणशुद्धा तत्कृती, रंगांनीं अति गोड;
सारे जन वाखाणिती, कीं तींत नसे खोड. ३
मत्सरही त्यांच्या कृती बघतां जाइ जिरून !
कीं त्या भिन्ना नोव्हत्या सत्य निसर्गाहून. ४
एकहि ऐसें नोव्हतें गृह त्या मणिनगरांत;—
शोभादायक नोव्हतीं त्यांचीं चित्रें ज्यांत. ५
चित्रें त्यांचीं टांगिलीं होती राजगृहांत;
कौशल्याचा जाहला होता कळस जयांत. ६
देवांच्याही आलयीं तच्चित्रें बहुसाल—
शोभत होतीं सर्वदा सुंदर भव्य विशाल. ७
मानव, पशु, बैसारणें[1], द्विजे[2], किंवा त्रिदिवेशें[3],
काढियले जे जे तयीं, दोष तयांत न लेश. ८
त्यांणीं आकृति काढिल्या त्या साऱ्या रमणीय.
परमावधिला पोचलें नैपुण शुद्ध तदीय ! ९

१ मासे. २ पक्षी. ३ देव.

त्यांच्या चित्रांतिल नद्या, पर्वत, पारावारें[1].
वृक्ष, अरण्यें, गव्हेंर, दिसले सुंदर फार. १०
विस्तरें[2] राहो; एकदां पाहों नदिचा कांठ--
गेले, तेथें जाहली त्या दोघांची गांठ. ११
तेथ तयांचीं भाषणें त्या समयास रसाल–
जीं झालीं, तीं ऐकुनि जन हो! प्रमुदित व्हाल. १२
चित्रकला हा तेधवां होता विषय तदीय;
त्यावर त्यांचें बोलणें झालें अति रमणीय. १३
मत्सर नव्हता भाषणीं, होता शुद्ध विनोद;
तो ऐकियला तूमच्या भरिल मनीं आमोद. १४
ऐकेकानें आपुलें वर्णुनि नैपुण फार,
दुसऱ्याची कृति निंदिली देउनियां आधार. १५
रुचिनें शुचिच्या दाविली आलेख्यांतें[3] उणीव;
मान्य करि ना ती शुची, दावी रोष अतीव. १६
शुचिनेंही रुचिच्या कृती निंदियल्या अतिमात्रें[4];
पुष्कळ दावुनियां स्थळें जीं दोषाला पात्र. १७
वदला रुचिला तो शुची निंदात्मक वचनास;
वचन परी तें झोंबलें रुचिच्या नैव मनास. १८
“ प्रमाणशुद्धा एकही त्वत्कृति नैव दिसेल;
वर्णयोजना सृष्टिच्या वस्तूशीं न जुळेल. १९
मजपेक्षां आलेखनीं त्वत्कौशल्य न थोर;
मोरापेक्षां नर्तनीं अधिक नसे लांडोर.” २०
शुचिचें हें वच ऐकुनि रुचि वदला हे बोल;
“ मित्रा, तव हें बोलणें मजला गमतें फोल. २१

१ समुद्र. २ पाल्हाव. ३ चित्रांत. ४ अतिशय.

माझ्या आलेख्यांतला सत्य असे अनुभाव[1];
अनादराला त्यांचिया न बुधांस मिळे ठाव. २२
चित्ताकर्षक एकही मित्रा, त्वत्कृति दाव;
एकाही त्वत्कृतिमधें शुद्ध नसे अनुभाव. २३
दोष नसो त्वत्कृतिमधें, मधुर न त्यांत उठाव;
भुलवि मना जें चित्र तें एक तरी तव दाव. २४
मत्कृतिपुढतीं त्वत्कृति एकहि पळ न टिकेल;
स्पर्धा शुद्ध घृतासवें करिल कधींहि न तेल. २५
शुचिला रुचिवच जाहलें मान्य न हें लवलेश;
ह्मणुनि वदे तो " गा ! रुचि नेणसि मम उद्देश " २६
रुचि बदला शुचिला पुन्हा, शुचिही रुचिला फार;
क्रमें क्रमें हें जाहलें संभाषण अनिवार. २७
बहु झाल्यावरि वाद हा वदला रुचि हे मातें[2];
व्यर्थ कशाला वाद हा अर्थ न अल्प जयांत ? २८
मदधिक तूं किंवा सख्या, त्वदधिक मी हा वाद--
ऐसा चालुनि आपणां होइल बहुत विषाद. २९
ठरवायास्तव आपुलें नैपुण चित्रांतील;--
सुचते मजला युक्ति ही; निर्णय तीच करील. ३०
एक चित्र मी काढितों; काढीं तूंही एक;
नैपुण्याचा आपुल्या तेणें होउ विवेक[3]. " ३१
मान्य झाली युक्ति ही शुचिच्या फार मनास;
सरला तत्क्षणिं वाद तो नव्हता अंत जयास. ३२
ठरलें कीं, दावावया पटुतेचा अतिरेक,
चित्रें काढावीं तयीं एकेकानें एक. ३३

१ मनांतील विकार. २ भाषण. ३ निर्णय.

चित्रें तीं अमक्या दिनीं व्हावीं दोन्ही पूर्ण;
हें ते ठरवुनि चालते झाले स्वगृहा तूर्ण. ३४
शुचिनें घेउनि काळजी, वेंचुनि पाटव सर्व,
चित्र काढिलें व्हावया गर्व रुचीचा खर्व[1]. ३५
ठरल्या दिवसां जाहलें चित्र शुचीचें पूर्ण;
तें गृह भित्तिस लाविलें बाहेर तयें तूर्ण. ३६
चित्र तिथें तें देखुनि, झाला हर्ष तयास;
मग गर्वानें रुचिचिया गेला तो सदनास. ३७
वदला यापरि शुचि तया, " झालें आहे पूर्ण—
मच्चित्र; पहायास तें चल मत्सदना तूर्ण. ३८
मच्चित्र बघाया रुचि! ये माझ्या सदनास;
व्हावें त्वां मन्नैपुणा देखुनि माझा दास. ३९
माचित्रांतिल दावितों ये तुजला कौशल्य;
तें बघतां त्वन्मानसा वेधिल मत्सरशल्य. ४०
रुचि गेला शुचिच्या गृहा मग देखाया चित्र;
शुचिनें मार्गीं वर्णिलें निज कौशल्य विचित्र. ४१
गृहास दोघे पोचतां शुचि वदला मित्रास;—
" आपण दोघे ये बसूं लपुनी या स्थानास. " ४२
तेथें बसल्यावरि वदे शुचि मित्रा हे बोल;
" गृहभित्तीवरि माझिया पाहुनि चित्रा डोल! ४३
माध्वीकांचा[2] देख तो गोंडस घोस रसाल;
वर्णांची[3] जुळणी पहा सलक्ष्य किंचित्काल. ४४
हिरव्या वर्णावरिल तो वर्ण पहा रे! श्वेत;
वद येतें हें स्वमना, किंवा नाहीं येत? ४५

१ नाहींसा, भंग. २ द्राक्षांचा. ३ रंगांची.

छायेची बघ चातुरी, कीं फलकवचांतून–
दिसतो थबथबला फलाभ्यंतरिं सुरस अनूनें ! ! ४६
घोस पहा तो निमुळता, शाखा, पर्णे, नीट;
मित्रा, बघ तो बारका, पर्णावरचा कीट. ४७
सत्य निसर्गांतिल जसा माध्वीकांचा वृंदें;
तसाच मच्चित्रांतला दे न कुणा आनंद ? ४८
बोलत असतां हें शुची, आला शुकसमुदाय;
तो माध्वीकांच्याकडे रसलोभानें जाय. ४९
प्रत्येकानें चंचुचा घोसावरि आघात–
केला लोभानें अहो ! खाया रस जो त्यांत. ५०
त्या घोसांत न बिंदुही रस ते शुक लाहून,--
नैराश्यें आल्या पथें गेले शीघ्र निघून. ५१
गर्वानें फुगला शुची दावूनि चमत्कार,--
रुचिला वदला, " गा सख्या ह्मण हें पाटव फार. ५२
माध्वीकांचा घोस हा चित्रालिखित मदीय,--
भुलवी पक्ष्यांचीं मनें कीं तो अति रमणीय. ५३
चित्रकलानैपुण्य जें तें ह्मणतों मीं हेंच;
माझें पाहुनि चित्र हें उतरावी तव रेंच. ५४
शुचिचें वच हें ऐकुनि वदला रुचि हें त्यास;--
" माझेंही बघ चित्र तूं, ये रे ! मत्सदनास. " ५५
गेले दोघे तेथुनी रुचिच्याही सदनास;
मग शुचिला वदला रुची; " बघ ये माच्चित्रास. ५६
या मार्गानें चल पुढें, मी येतों मागून;

१ पुष्कळ. २ घोस. ३ तुझा गर्व कमी झालाच पाहिजे.

चित्र पहा तूं एकला लक्ष्य शुचे ! लावून. " ५७
शुचि पुढतीं मग चालला, रुचिचित्र पहायास;
त्याच्या मार्गी जवनिका दिसली एक तयास. ५८
असेल तीच्या पलिकडे चित्र असें समजून,
जाऊं लागे आंत तो तीतें सरकावून. ५९
बोटांनीं ती जवनिका पार्श्वी सारायास---
शुचिनें केला कर पुढें, घाई झाली त्यास. ६०
तों भिंतीवरि तन्नखें खरडुनि त्या समयास,--
कर्कश झाला ध्वनी, तयें विस्मित केलें त्यास. ६१
होता रुचि मागें उभा तोही स्मित करि मंद;
फसला शुचि ! हें पाहुनि झाला त्या आनंद. ६२
शुचिही झाला तेधवां सत्रपै किंचित्काल;
मग वदला मित्रास हें; " त्वत्कौशल्य विशाल ! ! ६३
माझ्या चित्रें फसविले बुद्धिविहीन विहंग;
माध्वीकांचा घोंस ते देखुनि झाले दंग. ६४
परि मी ज्ञानी एवढा चित्रकलानिष्णात,--
त्वच्चित्रानें फसविलों; खोटी हे नचि मात. ६५
घड्या, दोर, मळ, सुरकत्या, सुंदर ह्या अति वेल;
तव ही देखुनि जवनिका कोण न नर तोषेल ? ६६
मदधिक मित्रा ! शतगुणें असती चित्रकलेंत;
चित्रकलादेवीस तूं क्रीडाहेतुनिकेत. ६७
आजपासुनी तूं मला गुरुसा अतिमहनीय;
आजपासुनी तुजपुढें सरला गर्व मदीय. ६८

---

१ पडदा. २ बाजूला. ३ सलज्ज. ४ विहार करावयाचें घर. ५ परमपूज्य.

लोह जणों मत्पाटव त्वत्पाटव जणुं हेम;
तव कोप नसो मजवरी संतत राहो प्रेम. ६९
ऐसें बोलुनि आपुल्या गेला शुचि सदनास;
रुचिगुरुलाभें[1] जाहला मोठा हर्ष तयास. ७०
शुचिरुचिचित्रांचा पुरीं लोकांना वृत्तांत--
कळला तेव्हां जाहले सारे हृष्ट नितान्त. ७१
रुचिची देखुनि जवनिका लोकांना आनंद--
झाला, जैसा हो पिका पाहुनिया माकंद[2]. ७२
परि होता हा जवनिकादर्शनभवें[3]आनंद--
शुचिनिर्मत्सरतोद्भवानंदाहुनि[4] तो मंद. ७३
शुचिची वृत्ती आदरा, मत्सर द्या सोडून;
ह्मणजे जन हो! ह्या जगीं[5] व्हाल भवें नचि दून[6]. ७४
"मत्सर सोडा" हा जना करि विद्याधर बोध.
ह्या बोधाहुनि ना ढळे उत्तम करितां शोध. ७५

श्लोक.

षट्पदासि जशि कञ्जमाधुरी[7],
सज्जनासि तशि चित्रचातुरी--
आवडो; अमलशांति[8] संयुत--
हा निरंतर असो उमासुतें[9]. ७६

---------विद्याधर वामन भिडे. बी. ए.

---

१ रुचिरूपी गुरु मिळाल्यामुळें. २ आम्रवृक्ष. ३ पडदा पाहून झालेला आनंद. ४ शुची मत्सरशून्यता पाहून होणाऱ्या आनंदापेक्षां. ५ संसारानें. ६ पीडित, गांजलेले. ७ कमलरसाची गोडी. ८ शुद्ध शांतीनें. ९ विद्याधर.

शकुंतलाजन्म.

[राजा रविवर्मा यांनीं शकुंतलाजन्माची काढलेली तसबीर
पाहून सुचलेले विचार.]

चाल — चंद्रकांत राजाची कन्या.

मुनिवर्या[१] ! ही आपण अनुचित रीत कशी धरितां ?
तुह्मीच ज्याला जन्म दिला त्या बाला कां त्यजितां ? १
वाम करानें वाम लोचना अपुल्या झांकून,
सव्यकरें टाकितां बालका कां झिडकारून ? २
हांसत केलें कर्म तुह्मीं जें; त्याचें फल आतां—
सेवाया कां शोक कोपही अज्ञासम करितां ? ३
हें मम सहवासाचें फळही, असें न वाईट;
वीट न याचा माना; उघडुनी नयन बघा नीट. ४
या बाळाचा वर्ण केतकी-समान किति छान !
याची नासा शुकचंचूसम; मीनच जणुं नयन ! ५
हें न वदन निष्कलंक शशि कीं पूर्ण, फुल्ल कमल,
कमलांहूनहि शोभति याचे हस्त पाद विमल ! ६
मूर्ति किती ही असे गोजिरी वर्णवे न वाचे !
नवसांनींही नाहीं असलें मूल मिळायाचें ! ७
मूल नव्हे, हें, श्री मूर्तीमती क्षितिवरतीं काय—
धारण करुनी अवतरली या तोकाचा काय ! ८
असली स्वसुता त्यजितां आपण, योग्य असे कां हें ?
शोक कोप वा करणें समया या निष्फळ आहे. ९
केला होता जुल्म कोणीं तुमच्यावर ? बोला.

१ मेनका विश्वामित्रास म्हणते.

प्रेमें आपण होउनि दिधला जन्म तुह्मीं याला ! १०
असें असोनी, या बाळाला तुह्मी नको ह्मणतां;
गेला कोठें विवेक तुमचा सर्व, तशी ममता ? ११
बाळ खास हें तुह्मांस आतां नसे सुटायाचें !
कांहींहि करा रक्षण करणें भाग तुह्मां याचें ! ! १२
ह्मणाल " आपण दोघेही या वत्साच्या जननीं–
आहों वांटेकरी, पिता मी तूं यांची जननी. " १३
पण मी वेश्या माया न मज; न लाज स्वमनाची !
भीति न मज पापाची किंवा जनापवादाची ! १४
ह्मणुनी सोडुनि एथें जातें मी या बाळाला;
याचें कांहींही होवो, तरि चिंता नच मजला ! १५
परंतु या बाळाला त्यजणें, तुह्मां अयोग्य अती;
कारण आपण मुनिश्रेष्ठ जनवंदित या जगतीं. १६
तुह्मांस घडते अपत्य-हत्या याला त्यजिल्यानें !
भरून जाइल सकळ मही ही तुमच्या कुयशानें ! ! १७
यास्तव आतां नको नको तप; रक्षा या बाळा;
निजलीलेनें तुह्मांस देवो हें चिर सौख्याला. १८
चिर विरहास्तव इंद्रादिक सुर आठवीत मातें–
असतील; मुनिश्रेष्ठा ! ह्मणुनी आतां मी जातें. १९
असें कौशिका वदुन मेनका त्यजुन बाळकाला,
अपत्य-वात्सल्याला विसरुन गेली स्वर्गाला ! २०
कसलें अपत्य–वात्सल्य तिचें जी वेश्या आहे !
जिच्या स्वरूपें अनीति जगतीं काय जणों राहे ! ! २१
जी पुरुषाला मोहुन, हरिते तद्धन–बल–कीर्ति !

दारिद्य–गदा–नीतीची जी त्या बनवी मूर्ति !! २२
स्वहेतु साधुनि घेउनि, पुरुषा जी ढकलुनि देई !
प्रपंच–परमार्थाला ऐसें जी विलया नेई !! २३
दूर रहावें यास्तव वेश्या–संगापासून;
भुलून जावें नरें कधींहि न बाह्यरूप बघुन. २४

——————— कृष्णाजी बाबाजी कुळकर्णी.

खर्ड्याची लढाई.

श्लोक.

जातां अस्तास घेतो तरणि बहु जसा उग्र रूपास थोर;
भासे आतां कराया अखिल जगतही भस्म येई समोर !
तेजें केलें जयानें चकित सकल, तो आमुचा विक्रमार्क–
झाला दैदीप्य अस्तीं, द्युति तदिय अती पाहुनी लोक थक्क ! १
खर्ड्याचें युद्ध मोठें निकर नग तया वाटला पश्चिमेचा;
घेऊनी चंड रूपा प्रखरतर तयीं गांठला मार्ग त्याचा !
सोडूनीयां मयूखां अतुलरिपुतमोध्वंस केला तयानें;
दुर्दैवाब्धी तयाची द्युति मग सगळी आहुती घेउनी ने. २
झाला उन्मत्त भारी निजकटकमदें श्रीमदेंही निजाम;
गर्वानें अंध झाला, सचिव मशिरही सोडिली नीति साम.
आर्यांची मानहानी करुनि चिडविली पेशवाई समस्त !
सोंगें नानापरींचीं नटवुनि करवी वीरनिंदेस मस्त ! ३
पैसा देईन ऐसा तह करुनि पुन्हां मोहियेलें बचाला;
नानारीतीं असा तो यवन अवगणी पेशव्यांच्या कुलाला !

---

१ दारिद्य रोग आणि अनीति यांची.

पाहोनीयां मराठे यवनमद असा क्रुद्ध झाले मनांत;
घेऊं प्राणास ह्याच्या समर करुनियां बोलली रंगणांत ! ४

केली निर्णीत वेळा सकल भट रणीं सिद्ध झाले शिरायां;
झाले सोत्कंठ किंवा स्वरिपुगजमदा केसरी ते हराया;
गेले खर्ड्यास घेती जलधिसम चमू संगरातें कराया;
उल्हासें थोर तेव्हां अनुभव नसतां संगरीं जाय राया ! ५

शौर्याद्री वीर शिंदे पथक सकल, घे आणखी तोफखाना;
घेई दादा जिऊबा सचिव बहुत जे शूर भी दे रिपूंना;
आले ते भोसलेही, चिटणिसहि तसे, होळचे धीर वीर;
शूरानें विंचुरीच्या निजभुजबल तैं दाखवीलें अपार. ६

धैर्याचा मेरु वाटे समर करि जवें तो हरीपंत तात्या;
भाऊनींही बलातें अनुपम रणिं तैं दाखवीलें पहा त्या.
एकाहूनी दुज्याचें अधिक बल दिसे श्रेष्ठ कोणा गणावें ?
शिंद्यांचीं भोसल्यांचीं परि बहुत तदा जाहलीं ख्यात नांवें ७

म्लेच्छांचा नाश झाला जलकण न मिळे प्यावयाला तृषार्ता !
पावे तापा ह्मणे मी शरण मजसि द्या हो ! क्षमादान आतां;
झाला माझ्या करानें न कळत अपुला घोर ऐसा प्रमाद;
हा घ्या पैसा कराचा बिनचुक सगळा, वाढवा हा न वाद. ८

द्यावा आह्मां मराठे ह्मणति मशिर तो घालुं त्या बंदिमाजी;
उन्मत्ता त्यास जाऊं द्रुत निजनगरीं घेउनी सत्य आजी;
इच्छा ही आमुची जो सुफल नच घडे साम तो हा रुचे न;
गांठूं बांधू तयाला निजवचन खरें दाखवूं रे ! करून. ९

उल्मुल्का जहाला प्रिय यवन तदा पेशव्यां तूर्ण देतां;
पैसाही दे कराचा त्वरित गळतसे यूथपाची अहंता;

केलें ज्या पेशव्यांनीं जगींत दुमदुमेशा महा विक्रमातें—
कीर्तीचा वृक्ष त्यांच्या उमळुन न पडे उग्रही कालवातें. १०

———— त्र्यंबक जयराम प्रधान.

विरहालाप.

आलाप १ ला.

श्लोक.

तुझी कनककान्ति ही रुचिरवर्णसालंकृता,
नटे रमणरंजनास्तव मदालसाऽलंकृता;
वनीं कुसुमसंचयें विनत होय जेंवी लता,
मला तव गमे तसी मदनवल्लरी ! चारुता. १

तुझे कमलनालसे विमल बाहु शोभावती !
स्फुरज्जलज—मालिकावलयभूषणें शोभती;
गळां बकुलमालतीविमलहार सौगंधित—
रुळोन, तनुला करी गमत फार मर्यादित. २

न तूं बहुल भूषणीं विनटशी सुधास्यंदिनी !
परी सुरवरांगना करिशि मानहीन क्षणीं !
सरक्तरुचिराम्बरें सुभगता नितम्बाप्रती,
कुचां लकुच कंचुकी दिसत चारुसी संप्रती. ३

अशोककुसुम--मंजरी अलक--पाश--बद्धा, करी--
सकाम नर अन्तरीं सलत जी शराचे परी;
न ही भ्रुकुटि, चाप हें मदनवीर घेवोन ये;
न भृंग नयनाम्बुजावरिल सत्य प्रत्यंच हे. ४

सुरेन्द्र-वर-नन्दिनी, विरहतापविच्छेदिनी,
सुधामधुरहासिनी, नयनरंजिनी शोभिनी,
कदम्बतरुच्यातळीं स्तिमित लोचना कां उभी?
प्रफुल्ल न मुखाब्ज कां, स्वमनिं शालिनी घेत भी?

विहाररस-रंजिता कुसुमितांग गे! गोरटी!
अशा समयिं कां फिरे विगत-चेतना एकटी?
कपोलतल शोभलें विपुल घर्मबिन्दुपरी!
सुरत्ननवमौक्तिकावलि विभूषली साजिरी.

स्फुरत्कनकवल्लरी! नवलसत्प्रभामंडला,
तडिद्वलयशोभना तरुतळीं दिसे तूं मला;
त्वदाननशशिप्रभा गलितगर्व देवांगना--
करी, कर सरोरुहा मुदित कां न तीं सन्मना?

तुझा गळुन घर्म हें शिथिल जाहलें अम्बर!
विलिम्पित उरोज हीं भिजुन शोभले सुन्दर!
यदीय मधुगंध बाहुन अभंगधीरध्वनी,
मदांध मधुपावली रसलुटीस ये धावुनी.

कदम्ब-तल-वासिनी जनमनोहरा मानिनी,
स्वभावसरले! कसा प्रणयभाव लोपे क्षणीं?
विलोकिन कधीं तुला करित शान्त मन्दस्मिता?
तदा शमति लोचनें कमललोचने सर्वता.

तुवां त्यजुन मंचका निज विभूषणा सारिलें,
जलार्द्र वसना अहा! शिशिरपीडिता प्रेमले!
लतातलविहारिणी! भ्रमर-संघ-उच्छेदिनी!
विलासगतिविभ्रमा! प्रणयबाष्पसीक्तानती!

वनद्रुमलतासुमान्वित कराम्बुजे ! पावन–
नतावन करावया व्रत धरीत कीं--पाहुन;
असह्यविरहाकुलप्रभित भूवरी जे जन–
विमुक्त सुख ओपिते प्रणयगुच्छही घेउन. ११

मदोद्धतशरान्वित प्रचुर विद्ध होती नर;
सकामकरुणार्द्रविव्हल परीसतां ते स्वर,
करीं धरुन सत्वरीं सुमन ढाल ही चालली;
अपूर्वतर ही चमत्कृति खरोखरी वाटली ! १२

महाप्रणयपेशला, भुवनमोहिनी, सुन्दरा,
मनस्तिमिरसंहरा, वदत कां न ही इन्दिरा ?
तुझा प्रणयभाव गे ! सहज मोहवी या जना;
अकारण सखे ! कसा कुटिल कोप आला मना ? १३

तुझा वदनचंद्रमा विमलदुग्धधारोपमा--
स्रवे भुवनसुन्दरी ! हृदयहारि मंजुस्वना;
तया परिसुनी सखे ! सुख नितान्त हो त्वज्जना;
सकामसुखदा मनामधुनि मूर्ति ही जाइ ना ! १४

विलासवनवल्लरी ! वदनचंद्र होतां दुरी,
तुझा प्रियचकोर गे ! विरहिं सांपडे दुर्धरीं !
तवाधरसुधामधूमधुर लंपटा शासन–
न कोप-अनुराग गे प्रणयबद्ध जो कां जन ? १५

अये ! कमललोचने ! कनककेतकीसन्निभा,
विलासगतिनृत्यविभ्रममदालसांगा शुभा,
विनोदवचनें कुठें ल्पविलीस तीं शोभिनी !
सुसौधशिखराप्रती त्यजुनि राहसी काननीं ! १६

अशी अदयता कशी निपजली तुझे अन्तरीं ?
सुरंगमकरंदसें हृदय कां तरी कातरी.
धरी प्रणयभाव जी सकल सारखा सुंदरी !
कशी रुसुन जातसे प्रणयिनी सुधा ती दुरी ? १७

प्रफुल्लसुमनोहरा मदभरालसा ही सती,
कचाग्रसुमवासिता सुखविलासलीलावती,
मधुश्रवणमंजुलध्वनिनियुक्तनूपूर-ती,
विलाससुखविन्मुखावृत धरीत कां ही रती ? १८

त्वदीय रदनप्रभा मणिनियुक्त कीं सोज्वल,
करी धवल चंद्रिका रुचिर हास्य कीं निर्मल,
सखी रदन निंदिती कुसुमकुंदलज्जायुत,
कचाग्रकुटिलांतरा विरमवी तुझे सांप्रत. १९

नभःस्थउडुमालिकानयनरंजिता सारिके !
द्युतीवलयभिन्नता तव सुरम्य होई सखे !
प्रभुत्व तव सर्वदा हृदयपंकजीं या वसे;
अये ! विनयशालिनी ! परत शक्य घेण्या नसे ! २०

प्रबोध-वचबोधिनी ! प्रणयाधिप्रशांताननें !
नभस्तलनिवासिनीघनपरंपरा वायुनें—
निज प्रबलबाहुनें करित दुर्दशा; त्यासम—
निरस्त तव होतसे हृदय सत्सुखाशा मम ! ! २१

मिलिन्दरवरंजिता-तटवनस्थ-कुंजस्थल,
विलाससुखदायिनी-जल-विहार मन्दानिल,
तुला सुखद जाहले परि तुझेविणें शून्य तें—
भुजंगगरलाहुनी मज असह्यसें वाटतें ! ! २२

अये ! मदनवल्लरी ! मदनतप्त मी सुंदरी ! —
नसे; परि सकाम हा अरिसमान तप्ता करी !
मदीय तनु जाहली विकल ही तुझे सारखी;
परी किमपि सोडि ना हृदयमूर्ति जी मत्सखी. २३

निशासमयिं शोभतें नभ सुनील चंद्रप्रभे;
प्रभुत्व मिरवी तसें नवमुखेन्दुयुष्मत् प्रभे;
विलासगति होउनी स्वलितगर्व कौमोद्गमें,
अलंकृत-सती न, ती रमवि गाढ आलिंगनें. २४

यदा मधुर गुंजतां मधुपपंक्ति सोत्कंठिता,
मना सहज वाटते चरण नूपुरीं साम्यता;
तुझा श्रवणमंजुलस्वन विशून्य होतां सखे !
रितें हृदय जाहलें भ्रमित मानसासारखें ! २५

मनोहर.

सैरंध्री.

धांवा.

द्रुपद-कन्यका पांडवजाया—
गांजियलीसे फार— । मुरारी,
धांव सख्या कंसारी ! ध्रु०
विराट-शालक कीचक कुमती
सोडुनि लज्जा, धर्म, सुनीती,
मदांध बनुनी दुष्ट दुर्मती,
कुशद्व वदतो नच ऐकवती !
गोपरिपालनिं दक्ष ! मुरारी,
धांव सख्या कंसारी ! ॥ द्रुपदकन्यका० ॥ १

दुष्ट दुर्मती खल दुःशासन,
करुनी माझें केशाकर्षण,
राजसभेसी नेई ओढुन;
मदांध टाकी वसनें फेडुन!
रक्षिलि तेव्हां लाज–मुरारी,
धांवुनिया कंसारी! ॥ द्रुपद० ॥ २

सतींसुदेष्णादत्त सुरा ती--
नेतां दुष्टें धरिलें हस्तीं,
तेथुनि सुटुनी जाय सभेप्रति,
ताडियलें तई पादाघातीं!
रक्षिशि कां नच गाय-मुरारी?
धांवुनिया कंसारी! ॥ द्रुपद० ॥ ३

कीचक-कृत हें अकांड तांडव--
डोळां पाहति पांचहि पांडव!
स्तब्धचि बैसति कीं नरपुंगव!
हीन बल, गदा, धनुष्य गांडिव!
तूं मम बांधव असुनि-- मुरारी,
धांव तरी कंसारी! ॥ द्रुपद० ॥ ४

नको नको अज्ञातवास हा!
नच तिळ स्वातंत्र्यहि यांत पहा;
स्वातंत्र्याविण जन्म वृथा हा!
करि बलवंता बलहीन अहा!
धर्म सहाय्यहि असुनि-- मुरारी,
धांव तरी कंसारी! ॥ द्रुपद०॥ ५

किती आळवूं तुज गोविंदा!
रक्षियलें त्वां त्या व्रजवृंदा;
ये लवलाहीं भक्तच्छंदा;
ना तरि अर्पिन जीव मुकुंदा,
बांधव असुनिहि अदय-- मुरारी!
धांव सख्या कंसारी! ॥ ध्रुपद० ॥ ६
मुक्त केश सति द्रौपदि देवी--
खळ खळ अश्रुजलें उर भिजवी!
पदर धरुनि करिं त्या पिरगटवी;
फांस करुनिया कंठ करचवी!!
(अंतरिं परि हरि-चरण आठवी.)
तों ये सदवन-दक्ष-- मुरारी;
धांवुनिया कंसारी. ॥ ध्रुपद० ॥ ७
घनःश्याम हरि मोरमुगुटधर,
कृष्ण चतुर्भुज अलोक सुंदर,
प्रकटे सायुध नयनमनोहर;
अहर्निश जया स्तविती मुनिवर;
तो ये सदवन-दक्ष-मुरारी---
धांवुनिया कंसारी. ॥ ध्रुपद० ॥ ८
द्रौपदि कृष्णपदांबुज वंदित;
अश्रुजलें पद तदीय न्हाणित;
दाटुनि कंठीं धाय मोकलित;
तों वनमाळी तिजशी निवारित;
भक्तावनकर दक्ष-मुरारी---
धांवुनिया कंसारी ॥ ध्रुपद० ॥ ९

" प्रबोधिलें म्यां भीमा स्वप्नीं;---
" जाउनि चेतवि तत्कोपाग्नी;
" एकचि मुष्ट्याघातें करुनी---
" भीम कीचका टाकिल रगडुनी---
" हो मग निर्भय चित्त; " -मुरारी---
सांगतसे कंसारी. ॥ ध्रुपद० ॥ १०

कृष्णमंत्र हा सतिनें जपिला,
भीम भुजंग जवें फुसफुसला;
कीचकाधमा जाउनि डसला !
तुडवुनि अस्थी रक्तीं घटला;
दुर्जनशासनिं दक्ष--मुरारी---
धांवुनि ये कंसारी. ॥ ध्रुपद० ॥ ११

अनुकीचकगण छळितां सतितें,
सलील वधुनी वृक्षाघातें,
भीम शांतवी सति द्रौपदितें,
पुसुनी अश्रु स्वकियें हस्तें;
भीमसेन हृदिं मूर्त--- मुरारी---
प्रगटुनिया कंसारी. ॥ ध्रुपद० ॥ १२

भक्त गांजतां त्रिभुवन--पालक---
हो खल, दुष्टांचा संहारक;
रक्षित भक्तां जगदुद्धारक;
स्मरा कृष्ण तो संसृति-तारक.
संकटिं एकचि वालि--मुरारी--
धांवुनि ये कंसारी. ॥ ध्रुपद० ॥ १३

————

किरात.

काव्यरत्नावली.

अंक ६ वा.

सुभद्राविवाहकाव्य.

सर्ग सहावा.

गीति.

विलसे नयनमनोहर सद्म अतुलमणिगणांहिं जें खचित;
शोभातिशयानें जें जिंकी सुरमंदिरासही खचित ! १
बसली पर्यंकावरि तेथें श्रीदेवकी जगज्जननी;
सुरवरगणही सेवी, जोडुनियां हस्त जीस दिनरजनी. २
जीतें उमारमाही नच तुळती अल्पमात्रही खास;
तीच्या सौभाग्याची गणना करवेल काय कोणास ? ३
ज्याच्यासाठीं करिती संतत मुनिजन वनीं तपश्चरण;
तीच्या उदरा आला पुण्यबळें तो पयोधिजारमण. ४
जी सत्य आदिमाया, त्रिभुवन विरची पळांत जी पाहीं
ती रुक्मिणी वरांगी चरण तिचे चुरितसे निज करांहीं. ५
घेउनि पंखा हस्तीं रत्नांहीं खचित रम्य जो सारा,
तिज रेवती सुगात्री घालितसे शीत मंदसा वारा. ६
विगतच्छविमुखकमला विकल सुभद्रा असे निकट बसली;
वदली मग " जननी ! ही तुज न दिसे काय मम दशा असली ? ७
ज्यानें थोर यशानें केली ही धवल सकलही धरणी;
विस्मित होती सुरही पाहुनि ज्याची रणीं अतुल करणी. ८

एक धनुर्धर जगीं जो, ज्यासम नाहींच अन्य नरवीर;
ब्रह्मांडातेंही जो प्रलयीं देणार एकला धीर; ९
त्या पांडुकुलाभरणा विजयातें देह अर्पिला हा मीं;
आतां या देहाचा निःसंशय तोच तोच गे! स्वामी. १०
त्यावांचुनि इतराला दुर्लभ माझी विशुद्ध ही काया;
निश्चय हा न ढळेलाचि, जरि आला कालही मज गिळाया! ११
प्रियजननी हा यावत्काल वसे प्राण सत्य या देहीं;
याला स्पर्शायाला तोंवरती अन्य शक्त नच देही. १२
जी एकवार शिरली हृदयीं प्रियमूर्ति देवतासम ते;
हालेल कशी आतां! तेथें ती सर्वकालही रमते. १३
त्या विजयाला टाकुनि ह्मणती मजला सुयोधना सेवीं.
रत्नाला टाकुनियां काचमणी आदरील बुध केवीं? १४
विभव तयांचें पाहुनि, दादादिक सर्व बंधुजन भुलले;
गुण याचे नच बघती! पाहुनि निर्गंध किंशुका खुलले! १५
अप्रिय कुरुनाथ मला विदित असे हें तयांस पूर्ण जरी;
तरि वदति आग्रहानें मजला कुरुनाथ यास शिघ्र वरीं. १६
मजवरि दुर्दैवाचा आला घोर प्रसंग हा हाय!
बुडतें दुःखसमुद्रीं रात्रंदिन मी अनाथ असहाय!! १७
छळितो क्रूरपणानें मजशि सुहृद्वर्ग दुष्टशत्रुपरी!
आतां या दुःखांतुनि हा! हा! मज सोडवील कोण तरी? १८
ज्यापरि अनाथ हरिणी अगोवी वृकरांत दीनमुखी;
त्यापरि त्यास मला बलि अर्पुनि होतील दुष्ट बंधु सुखी. १९
दुःखावेगें हा! हा! करुनी जरि सर्वकाल तळमळतें;
तरिही या दुष्टांचें हृदय न गे! अल्पमात्र कळवळतें २०
हें दुःख निवाराया समर्थ गे! एक मात्र तूं असशी.

येइल माझी करुणा इतरांला तुजसमान सांग कशी ? २१
पाहुनि ही दुरवस्था, अन्य कवण तुजविना कळवळेल ?
दुर्गत दुहिता बघुनी, जनयित्री एकली हळहळेल. २२
प्रिय जो या हृदयाला, अर्पी त्यालाच ईस तूं माते !
प्रिय मानितेस विजया हृदयीं तूं जेविं सर्वदा मातें. २३
स्वार्थपरायण सत्याचि होय सुहृत्बंधुवर्ग हा फार !
नच हृदयवृत्ति माझी चित्तीं आणी ह्मणून अविचार. २४
आतां या दीनेची दया न आली तुलाहि अल्प जरी;
मरणावांचुनि उरली हा ! हा ! लोकीं मला न गति दुसरी ! ! " २५
मग रुक्मिणी वदे तिस, " भाषण विपरीत काय हें करितां ?
ह्मटती सर्व सुहृज्जन सद्भावें आपल्या हिताकरितां. २६
अपुलें कल्याण खरें व्हावें, यास्तव सदाहि ते ह्मटती;
अनुरूप वर मिळावा अपणां, त्यांची ह्मणून खटपट ती. २७
दुर्योधन भूपाची येइल अन्या नृपास काय सरी ?
जलनिधिवलयांकित ही वसुधा प्रेमें तयास सत्य वरी; २८
गुणरूप बघुनि त्याचे, झुरती सुरसुंदरीहि अनुदिवस;
तत्प्राप्तिस्तव बाला करिती ईशास सर्वदा नवस. २९
निश्चित केला वर तो नृपमंडन आपणास बंधुजनीं;
त्याच्यासम गुणकुलवान् दुर्लभ नरवर खराच या भुवनीं. ३०
जें जें गुरुजन करिती, सर्वहि तें आपल्या हिताकरितां;
प्रथम गमे अप्रिय, परि सुखकर अन्तीं, मनीं न हें धरितां ? ३१
अपुल्या कल्याणाची इच्छा हृदयीं स्वबंधुवर्ग धरी;
करितां अपशब्दांची वृष्टि तयावरि किमर्थ हाय ! तरी ? ३२
हित काय बालिकांचें ? अनुभववृद्धांचि गुरुजनां समजे;
करितिल निजभगिनीचें अहित कसें बंधु पूज्य गुरुसम जे ? " ३३

बोले हसुनि सुभद्रा, " बोधामृतवर्षिणी अपूर्वा ही
कादंबिनी अकस्मात् उद्भवली सत्य अभिनवा; पाहीं. ३४
शिकलीस तरी कोठें वहिनी ! सर्वहि अगाध हें ज्ञान ?
जें ऐकुनियां, होइल लज्जित हृदयीं प्रबुद्ध सज्ञान. ३५
उपदेश गोड इतरां करणें, बहु होय गे सुलभ लोकीं;
परि तदनुसार वर्तन करणें, दुष्कर खरेंच अवलोकीं. ३६
दुःख बघुनि अन्याचें, कळवळतें सांग मन किती कांचें ?
' शीतल दुःख पराचें, ' सज्जन हें तत्व सांगती साचें. ३७
जेव्हां तत्र बंधूंनें नियोजिलें तुज नृपाल शिशुपाला;—
तेव्हां लज्जा सोडुनि लिहिला कां प्रणयलेख यदुपाला ? ३८
गुणरूपवैभवानें होता शिशुपाल भूप काय उणा !
पाहुनि भुलती हृदयीं सुरांगनाही तदीय रूपगुणा ! ३९
करितिल निजभागिनीचें अहित कसें बंधु ? यापरी वदसी;
बंधुकृत योजना मग आवडली सांग कां न ती तुजसी ? ४०
शौर्यानें धैर्यानें शोभे भूपावलींत जो पहिला;
नरनाथ सोडुनी तो, रुचला गोपाल केंवि हा वहिला ? ४१
बंधुजनांची उपकृति फेडाया, प्रेषुनी सुदेवातें,—
त्यांना विटंबिलें बहु तेथें नेऊन कृष्णदेवातें ! ४२
तेव्हां गेलें होतें कोठें तरि तव अगाध हें ज्ञान ?
बंधुजनांची उपकृति न कळे मज मी खरीच अज्ञान ! ! ४३
बोला हो ! बोला हो ! वहिनी ! कां स्वस्थ मूकसम बसलां ?
लावा उपदेशानें सन्मार्गी जन सुदीन हा फसलां. " ४४
वदली जननी मग ती, " बाले ! करिसी किमर्थ वाक्कलहा ?
पंडित परोपदेशीं, स्वार्थपरायण परी जन सकल हा ! ४५
वरिलेंस तूं मनानें विजयाला; तोच आवडे मजला.

बलदेव कां कळे ना घाया तुजला सुयोधना सजला ? ४६
गमतो प्रियतम मजला अर्जुन चित्तीं खरा तनय साच;
तनये ! या लोकीं तो विराजला मूर्तिमंत नय साच. ४७
सकलधनुर्धरजेता तुजलागीं तोच पार्थ वर साजो;
सौंदर्यानें स्मरसा धैर्यद्युतिनें सहस्रकरसा जो. ४८
आहे एक जगीं तो वर तुजला योग्य सद्गुणनिवास;
ज्याच्या सच्छीलाचा जगीं पसरला प्रमोदखनिवास. ४९
जा मालिनि ! वद कृष्णा, ' जननी बोलवि; सवेंच यदुपा ! ये. '
भगिनीची दुरवस्था तोच झडकरी हरील सदुपायें. ५०

सर्ग सहावा समाप्त.

——————कै. श्री. ना. मुजूमदार. बी. ए.

विरहालाप.

आलाप २ रा.

श्लोक.

उभी सतत अंजुली रचुन सुन्दरी ! राहसी;
विलास–सुख–विन्मुखा सहज जाहलीसे कशी ?
न वा परम घोरशा विरहशासनें शासुनी,
सहास्यकरबंधनें निबिड बांधिसी येउनी ! १

स्वयें रचित रम्यशा विपुल दावुनी सत्कृती,
कचित् प्रणयकेलिचा कलह माजवोनी सती !
क्षणोक्षण विलक्षण प्रकटवोनि रम्य च्छटा,
अपांग–शर टाकुनी हृदयचौर्य सारि स्वतां २

असेल जर बैसलों विकल खिन्न मी होउनी;
हरी घनशशि--प्रभा वदन--चन्द्र ते ! भामिनी !
तुझीं सुयननासवें नच सुधासवें गाळेतां,
मृता मिळति जीवनें मग कशी टिके खिन्नता ?

प्रभातसमयीं यदा बघसि घाइनें चालतां,
तुझें हृदय--वल्लभें कृत--कुचस्थ--चिन्हान्वितां,
तदा स्मरसि जाहली अधरखंडना, लाजली;
नियोजित पराभवा करिन वल्लभा बोलली.

स्मरे बहुत ज्या कथा सुरस मारलीलान्विता,
अहा ! सतत लोचनीं दिसत ना परी मागुत्या !
तुझ्यासह रसा किती सुखद चाखिलें साजणी !
निजप्रियजनांन्तरीं अदयता कशी कामिनी ?

प्रफुल्लकमलापरी सहज तें असावें मुख;
विहाररसमग्न तो रमण पाहिजे कामुक;
तडिद्वलय लुप्तसें सहज होय तेंवी सखी !
तुझे प्रियजनागुणा क्षणिक दाउनीया द्युती !

प्रतप्त तनु होतसे प्रियजनोत्तमा व्याकुल;
सखे समय पावता सुखद मंजु मन्दानिल !
रमे न मन हें वमे नयनयुग्मधारा गमे;
शमेल तनुशामले ! विमल गाढआलिंगनें

प्रतप्तहटकापरी तनु वियोगदु:खानलीं,
तदा धरुन जाहली प्रणयवर्धिणी शोभली;
असेल जर अन्तरीं प्रणयवास कांहीं तया,
यदीय मन वाहिले चरणपंकजीं हो दया.

त्वदीय रमणांतरीं प्रणय मूर्तसा खेळला;
अतां गहन दारुण प्रकटवीत दुःखानला!
तुझा विरह साहि ना प्रणयकर्दमीं मी रुतें!
कठोर सखि! होशि कां धरुनिया अशा भीरुते? ९

यदा तिलक रेखुनी विमलभालदेशावर,
सुसौधशिखरावरीं विहरसी प्रशान्तान्तर;
त्वदीय वदनप्रभा गमत तुच्छ चंद्रप्रभा!
मला वदन आठवे, मदन जाळितो हा उभा! १०

प्रशान्तगगनोदरीं जरि विलोकिलें सुन्दरी!
तरी नयनरंजिता विहरसी तया--भीतरीं!
द्युतीवलयकामिनी गगनशोभना ना उणी!
इतःस्तत दिसे तुझी सहज मूर्तिही मानिनी! ११

सखे! स्मरतसे मुखोच्छ्वसित गंध मन्दाकुले!
सुमान्वित लतावली कितिक जाहल्या त्यामुळें;
तव प्रणय--लोलुप--भ्रमर जाहला मोहित;
तवाधर सुधा मधू मधुर पाज निःशंकित. १२

तुझ्या सुखदगोष्टितें कितिक आठवूं, साठवूं?
निजप्रियजनान्तरीं प्रणय पूर्ण राहो बहू.
कसा सहज आटला असुख काळ हा पातला!
खरी कपटपेशला युवतिजाति ही चंचला. १३

यदा रुसुनि जाय मी प्रणयकेलिमाजी कधीं;
असह्यविरहाकुलप्रचुरदुःखिता होय जी;
रहस्य कथि गूढ जी निज शिरा उरीं ठेवुनी;
मुखा स्तिमितलोचनें खिळति आठवे ती मनीं! १४

कधीं स्खलितवाक्सुधाश्रवणसंपुटीं ओपिसी ?
स्वयें प्रणयभाव तूं उकलुनी कधीं दाविशी ?
विशंकित कदा वदे " प्रणय पूर्ण ठेवाल ना ? "
प्रसारितभुजामधीं धरुन देशि आलिंगना ! १५

चळें मन, उचंबळें सहज हावभावामुळें,
बळें प्रथम मोहिलें प्रणयवेड गे ! लाविलें !
कसें हृदय जाहलें विनयहीन चंद्रप्रभा–
सुशीतलपणा कसा त्यजुन राहते ही नभा ? १६

प्रतारणपरंपरापटुमती जरी जाहली;–
तरी तुजवरी सखे ! प्रणय पूर्ण मी आदरीं;
दया मजवरी करीं करुनि केलि नानापरी,
सकामसुमनांतरीं प्रणय राहुं दे सुन्दरी ! १७

घडो मग घडेल तें, त्वरित दे पुनर्दर्शन !
तुझ्या सुभग मूर्तिचें अनुदिनीं घडो पूजन;
तुझ्या सुखदसंगतिस्तव मनीं सदा मी झुरें !
चिरें तव पदाम्बुजीं ह्मणुनि लोळतों सादरें. १८

निशाकरविभूषिता परम सौख्यदा यामिनी,
क्षणीं मन उचंबळें प्रणय शद्ब तो ऐकुनी !
स्रवो भुवनमोहिनी ! प्रणययुक्तसौख्यासवा;
मदोद्धतवनीं भ्रमूं मग नितान्त--कामोद्भवा ! १९

निशासमय होतसे स्फुटितपुष्पसंयुक्त जो,
सुतप्तजनमानसा निरसवीत निःशंक जो;
सुतप्तविरहाग्निनें सतत पोळतों अंतरीं,
तरी प्रिय सखी कशी अझुन शांतता तूं वरी ? २०

तुझें हृदय ठाउके प्रणयरागवेशान्वित;
कसें सहज जाहलें कपटपेशलादूषित ?
अनन्यशरणागता जरिहि लीनता येतसे;
तरी सुख तुझ्याविणें सकळ भूवरी ना बसे २१
अशी मति विदीतही असुन निर्मळा वृत्ति ही,
कशी तव मनीं रिघे विफल संशया वृत्ति ही ?
तुला हृदय जें दिलें करिन मागुती तें रितें—
कसें तुजसि वाटलें ? हृदय हाय झालें फिकें ! २२
सखे ! विमल वाहतो प्रणय ओघ, सांगू किती !
तुला सुखद कल्पना अझुन पूर्ण झाली न ती !
यदा तुजसि होइल प्रणयदा परीक्षा, तदा—
तुझें हृदय डोलतां मग न भोगिसी आपदा. २३
अये ! कुसुमकोमले ! प्रगट तूं तडित्प्रायसी--
प्रमुग्धवचनें तदा प्रणयराग तूं ओपिसी ?
कधीं वदुनि गोडसें हरण दुःखभारा करी;
अहा ! प्रणयमूर्ति ती प्रगटते न कां स्वान्तरीं ? २४
सखे ! कमललोचने ! खचित आत्मभूता यदा--
सुधी सुमति होशि तूं सुखद लोचनातें तदा;
कधीं वरियलें नसे अनुमताविना कार्यही;
मदीय--सुखचंद्रिके गमत शांत दिग्भागही ! ! २५

मनोहर.

नलदमयंती.

पद (चाल— भीमकबाळा ह्मणे नृपाळा.)

विदर्भ--भूपति--भीमक--तनया स्वरूपसुंदर दमयंती;
यद्गुण परिसुनि हंस--प्रशंसित स्वमनीं वरि तिज नल नृपती. १

विदर्भ नृपवर मांडि स्वयंवर नरवर, सुरवर ज्या येती;
त्यजुनि सुरपति, नल–कंठाप्रति भूषवि माल्यें ती सुदती. २
रमानायका रमा शोभते तशि दमयंती नळाप्रती;
सुपुत्र–दुहिता--लाभ जाहला रूप गुणान्वित जीं असती. ३
भोग भोगिले; विलास केले सुखें सेविलीं सुरपुरिंचीं;
प्रजारंजनीं यश संपादुनि, पुण्यश्लोकचि होय शुची. ४
पुष्कर--संगें द्यूत खेळुनी, राज्यहि बसला हरपूनी !
द्यूत-व्यसनीं पडतां फसुनी, तरला कोणि न या भुवनीं ५
नळ दमयंती वनास मग तीं निघती सोडुनि निषधपुरी;
मुलांस धाडुनि विदर्भदेशीं पीडित होती वनांतरीं ! ६
वनिं नच सरणी, चढाणि उतराणि, दुर्धर दुःखासह त्या विपदा !
कंकर, कंठक, शूळ बोंचुनी दुखविति किति तन्मृदुल-पदा ! ७
प्राण अन्नमय, अन्न न मिळतां उरे कुठुन बळ मनुजांत ?
उपवासी तीं वनीं भटकती लोचन निम्न बनुनि जात ! ८
पांडुरता ती पसरे वदनीं अन्न न मिळतां गळबलती !
तोंचि नळ बघे दूर एक खग होता क्रीडत भूवरतीं. ९
त्यास धराया तो नळराया, फेंकि विहंगावरि वसना;
वसना घेउनि पक्षि उडोनी गगना लक्षुनि करि गमना. १०
पक्षिहि गेला, अन्ना मुकला, होइ दिगंबर तो नृपती !
दुर्दैवाचा फेरा येतां, बुद्धिहि फिरते स्वैरगती ११
असह्य विपदा भ्रंशित करि मति कुठें उरे मग धृती जनां ?
दमयंतीतें नल नृप सांगे; ' पितृगेहा जा त्यजुनि वना. ' १२
कांतारीं त्या प्रियकरा कांता टाकुनि कांता जाति कशा ?
अशा मधुरशा वचा वदे ती नळनृपतीप्रति लोलदृशा. १३
ते श्रांता आणि रजनी येतां, हो निद्रिस्था अवनिवरी.

नल फाडुनि घे तदर्धवसना, त्यजि शशिमुखिस तमोनिकरीं १४
होतां जागृत नलास बाहे, नच दिसतां तो, मूर्च्छित हो;
मूर्च्छा जातां सखि शोकार्ता अचेतनासहि वदलि अहो ! १५
" काय पाहतां माझ्या अंता ? धांवुनि कांता ! भया हरा, "
असें वदत जों भटके कानीं पडे अहिमुखीं भयंकरा ! १६
व्यसनोत्तीर्णा ती, अतिदीना, शोकविलीना शशिवदना,
मातृ--स्वसा--गृहिं पावुनि अंतीं, करि दमयंती निज अवना. १७
विदर्भ--कुलगुरु सुदेव तीतें शोधुनि नेई नगरिकडे,
अहि--दंशें नल विरूप होउनि, ऋतुपर्णाच्या पदरिं पडे; १८
दमयंतीचें पुनःस्वयंवर--वृत्त परिसुनी, तो नृपती--
अश्व--हृदय--पटु नल--सूतासह जाय तिथें मग पवनगती. १९
परि दमयंती नला ओळखुनि करि सहबालक त्या प्रणती.
अहि--विष शमुनी, रूप उजळुनी राज्यहि लाभे मग नृपती. २०
पुष्कर आला शरण नळाला; क्षमिता झाला अतुलकृती;
राज्य शासुनी प्रजा रक्षिल्या; कीर्ति मिळविली महिवरती. २१
सुख-समयीं लव मत्त न व्हावें; विपदिं धरावें धैर्य नरें;
सुखदुःखें तीं सतत न टिकती; सत्य नीति परि सदा उरे २२
ईशकृपेचें कवच तदंगीं सत्यनीतितें जो वरितो;
कालि-मलिन-मती दुःखीं बुडती, त्यजिति न कुमती जोंवरि तों
द्यूत भयंकर व्यसन अनावर, दे दुःखज्वर जन-हृदया !
लोटुनि संकटिं, नेइल शेवटिं मनुष्यकोटी पार लया ! ! २४
तरि सकलांनीं त्यजुनी, दुर्गुण गुणां वरोनी सुखि व्हावें;
सन्मार्गातें लावुनि मतितें प्रभुचरणातें मनिं ध्यावें. २५

किरात.

वादाचा चोख निकाल*.

श्लोक.

एके काळीं नाक आणीक डोळे--
जे शेजारीं वागले एक मेळें;
लागे त्यांचा एकमेकांत कज्जा;
दोघांनींही सांडिली लोकलज्जा ! १

कज्जा लागे जेधवां आपसांत,
तो दे आई नारळाची करांत;
या तत्त्वाची ख्यात लोकीं प्रचीती;
क्रोधावेशें ये, परी, ती न चित्तीं. २

चष्मा झाला मूळ या भांडणाला;
“ तो कोणाचा ? ” वाद ऐसा उदेला.
दोघेही ते बोलती आग्रहानें;--
“ माझी सत्ता त्यावरी न्यायमानें ” ३

या वादाचा न्याय होण्या यथेष्ट,--
जे त्या यत्नीं लागती खर्च कष्ट;
ते सोसाया सिद्ध दोघे जहाले;
न्यायाधीशा शोधण्या यत्न केले. ४

साकी.

जवळ असोनी वस्तु, तियेचा शोध करावा दूर !
अनुभव ऐसा जगांत लोकां येतो वारंवार. ५

* इंग्लीश कवि उल्यम कूपर (William Cowper) याची लॉकेस (Law Casse) म्हणून कविता आहे त्या आधारें ही कविता केली आहे.

योग्य स्थल कन्येस पहाया, लांब भराऱ्या मारी–
पिता; परी तें सहज लाभतें गांवाच्या शेजारीं. ६
न्याय मूर्ति ते द्विकर्ण असुनी जवळचि दोघापाशीं !
दुर्दैवें ते पडले होते भ्रांति--रज्जुच्या पाशीं ! ७
खोल अंतरीं मूकभाषणीं, अचल आसनीं ध्यानीं;--
न पक्षपाती, ऐसे पटलें दोघांच्याही ध्यानीं. ८
न्यायवितरणीं चूक घडावी न कधीं अगदीं थोडी;--
यास्तव न्यायाधीशांचीही गमे निवडली जोडी. ९
परी लागतो वकील अपुला तेथें भांडायाला;
न्यायाधीशांपुढतीं सारे मुद्दे मांडायाला. १०
नाकानें हें आणुनि चित्तीं, वकीलपत्र जिभेला–
देउन, निश्चित केलें तीचें येणें न्याय--सभेला. ११
डोळ्यांनीं, परि, विचार केला खरा आपला पक्ष;
"सत्य होतसे विजयी" ह्मणती नीतिन्यायीं दक्ष. १२
नलगे द्याया अपुल्या सोज्ज्वल सत्पक्षास वकील;
न्यायमूर्ति ते न्याय आपुला नीट साच करतील. १३

श्लोक.

मोठा मंडप घालुनी सजविली जागा सभेच्यापुढें;
एकीच्या वर उंच रांग दुसरी; दृष्टी न जेणें अडे–
आले सभ्य तसे महाजन बहू जिज्ञासु जे अंतरीं;
"या वादांत वकील जीभ चतुरा बोलेल कैशापरी" १४
आली जीभ पुढें बघे चहुंकडे जी बोलकी फाकडी;
सर्वांगीं बहु पाणिदार लवणासंगें जशी कांकडी !
नाहीं भीति तिला, अतीव चपला, अंगीं मृदू साजिरी;
बोले निर्भिड शब्द, तें वच तिचें टोंचे कुशाग्रापरी. १५

वक्तृत्वें परिपूर्ण कीर्ति बरवी, धंद्यांत दे लक्ष्य ती;
ऐसे सद्गुण जे वकील गणण्या आद्याक्षरी लागती;
ते सारे भरपूर जींत वसती, तेणें बहू मान्यता;
पावोनी वकिलींत, सुज्ञ ह्मणुनी नांदे जिची धन्यता. १६

चष्मा घेउनिया करीं मग तिनें सर्वांस तो दाविला;
त्याचा हक्क तिनें विवाद करुनी नाकाकडे स्थापिला;
बोले " बैठक मध्यवर्ति, मनुजें चष्म्यास जी नेमिली;--
नासादण्डसमानें[1], तीहि धनुषाकारी पहा निर्मिली. " १७

" नाहीं नाक तरी कशी स्थिति धरी चष्मा? विचारा मना;
दे ना शीर्ष बळी[2] तरी स्थल कुठें पादा तिज्यां[3] वामना?
नाहीं वारि तरी सरोजउपरी राहील कैसें सरी?
सभ्यानों, मम ही विचारसरणी आणा मनीं साजिरी." १८

" चष्मा भूवरि जन्मतां प्रथमतां नासाश्रयातें धरी;
ही त्याची वहिवाट ये अनुभवां लोकांस साऱ्या घरीं
सारा भोगवटा अबाधित असा नाकाकडे येतसे;
याची साक्ष पटावयास न पुराव्याची अपेक्षा दिसे." १९

" आहे वंशपरंपरागत अशी ही चाल अव्याहता;
हा मुद्दा वहिवाटिचा, सबळ दे हक्कास संपूर्तता.
चष्म्याच्या घटनेंत ठेवण पहा नासावलंबी कशी?
न्यायाधीश; तसेच सभ्यजन हो! हें सर्व घ्या मानसीं." २०

मुद्देसूद असें विवेचन, जिभेची वाक्पटुत्व--प्रभा,--
यांनीं स्तब्ध, विदीसलोचन, अशी ती सर्व झाली सभा!

१ नाकाच्या दांड्याप्रमाणें. २ बळीराजा. ३ वामनाच्या तिसऱ्या पावलास.

सर्वां मानवली तिची चतुरता, गंभीरता, सत्यता;
" वादातें " सगळे विशंक वदती " जिंकीलही तत्वता " २१

कानांनीं वकिली–विवेचन तिचें ध्यानांत तें आणुनी,--
साऱ्या साधक बाधक प्रवचनांचीं योग्यता जाणुनी,--
न्यायाची समतोलता धरुनियां फर्माविलें रोकडें;
ते गंभीर सुशब्द न्याय–पतिचे साद्यंत ऐका पुढें. २२

" नाकाला मिळला वकील कुशल, ज्ञानी, भला बोलका;
नाकाचा अविभक्त हक्कचि तयें प्रस्थापिला नेटका.
चष्मा व्यापुनि बैसतांच अपुलें सुस्थान नाकावरी;--
डोळ्यांनीं निज पापण्या मिटुनियां विश्रांति घ्यावी बरी ! " २३

——— लक्ष्मण पांडुरंग भोसेकर.

तिमिराप्रत !

पद. [चालः-- उद्धवा शांतवन.]

ये ये बा ! तिमिरा ! आतां, निजजननीरजनीसंगें;
तूं निदान एकांताचें, सुविचारें गमसी जगतीं;
शुचिनिधान सुविचाराचें, त्रस्त मना देशी शांती;
तूं पिधान तेजोवलया, बाह्यीं तरि गर्भी प्रगती;
गुरु वितान आनंदाचें, अध्यात्मिक परमा सुगती;

या द्विजिव्हजनतासर्पा--
कां भीसी तूं निष्पापा !
जरि बसति मृदंगा थापा;
रंजनार्थ झिजवी स्वांगें. १

भीममूर्ति वरुनी दिससी, स्वांतीं परि कोमल असती;
कृष्णवर्ण बाह्यात्कारीं, तेज हृदीं तळपे भारी;
भीषण रव करिसी वरती, प्रेमाची मंत्रावलि ती;
समदृष्टी हितकर साधू, तूंच; असो तुजला प्रणती.
उच्च नीच, अबलप्रबल,
कुटिल वक्र, अथवा सरल,
मलिन पूर्ण, किंवा विमल,
सम बघसी या अनुरागें.

हें श्मशान देवायतन, कुटि किंवा भूपतिभुवन;
पंकिलपल्वलजल ना हें; कीं मंगल मांदाकीन;
हा ईशध्यानानिमग्न, अथवा हा पापविलीन;
हा भूपति सुकृतिनय--ज्ञ, हा किंवा दुष्ट कृतघ्न,
समसमान सारे गणिसी;
त्या सर्वेचि आंगीं धरिसी;
भेद न हा ठावा तुजसी;
आत्मलीन (कीं) मचें झिंगे !

संसृति हें सासर जीवा, हा प्रकाश तेथिल दूत;
सजविला मनो--रथ नामी, जुंपुनी मनोरथ--वाजी;
लोभाचे फटके मारी, उडवी हय खूरीं चारी;
पतिकाम स्वेच्छाचारी, नणदुली असूया मारी;
ईर्ष्या ही सासू दुष्ट;
अभिमान सासरा नष्ट;
मदकोप दीर पापिष्ट;
छळिती जरि तनु ही भंगे !

या प्रपंचरजनीमाजी, संयमीन जागे असती;
परधन तें हरण कराया, जीवाचें भयहि न धरिती;
परयुवती श्रेष्ठप्राप्ती, या ध्येयध्यानाध्याती;
स्वस्वरूपमादिरापानीं, देहभान विसरुनि जाती;

गुणधर्मविभिन्ना जनता,—
रक्षितोसि भेदातीता !
तूं ह्मणुनि जगता गोसां;
त्वद्भावीं होतिल दंगे ! ५

तूं नेसी माहेरा या, कैवल्यमोक्ष--धामाला;
सुविचार पिता हा जेथें, शांती ही माता विमला;
बंधुमोद रिझवायाला, बहिण दया खेळायाला;
शुचिभाव हंसदूताला, धाडितोसि कळवायाला;

धैर्याचा गज सजवीला;
अंबारी संयम झाला;
भक्त्यंकुश हाकायाला;
कोण न वद तेथें रंगे ? ६

अनंततनय.

---

१ सदर कडव्यांत श्लेष आहे. संयमीन (संयमी–संयमी न) संयमीन जागे असती आत्मसंयमन करणारे जागे असतात; संयमी न जागे असती ह्मणजे जे आत्मसंयमन न करणारे असतात ते ही पण जागे असतात. २ परधन = श्रेष्ठधन = ज्ञान व परधन = दुसऱ्याचें धन; ३ परयुवतीः–मुक्ति (पक्षीं) परक्याची कांता.

हे ! निर्धना !

श्लोक. (वसंततिलका.)

बा निर्धना ! अहह ! कां रडशी असा रे ?
हें अश्रुनें वसन चिंबच होय सारें ?
हा टाक टाक तरि मोह द्रुत क्षणैक;
चित्तास सुस्थिर करीं करुनी विवेक. १

गुंजेपरी तव विलोचन लाल झाले;
आरक्त ते अधर सर्व सुकूनि गेले !
आली पहा किति तरी कृशता तनूस
हीं जाळितील अंसवें तुझिया मनास ! २

हा सोड मोह; धरिं धैर्य करीं विचार;
आरंभिलेस शिशुच्या सम काय चार !
ही काढ मान वर जानुमधील बापा,
सोडूनि दे सकल शोकविचारतापा. ३

" हें दृश्य नश्वर; सुखी जगतांत कोण ? "
या रामदास--वचनास मनांत आण.
एथें सुखास असुखास मिळे न थारा;
मायाविनिर्मित पहा अवघा पसारा ! ४

एथें सदैव फळती निजपूर्वकर्मे;
दुःखें सुखें तदुपरी मिळती स्वकर्मे;
चित्तीं विवेक तरि हा मनुजें करावा;
धैर्यें मनोगज हळू हळु आंवरावा. ५

कन्या, स्वसा सुत, सहोदर आणि दारा--
हीं सोयरीं सकळ विघ्नगणांस थारा!
वित्तास जोंवरि असे अवकाश गेहीं;
दंभानुराग बहु दाविति तों भुतें हीं! ६

शेतें पिकूनि कणसें भरदार येती;
घेती उड्या सकळही मग पांखरें तीं.
नेतां मळून सगळें उपटूनि धान्य,
येतात कां फिरुनि तीं? कथ रे वदान्य, ७

होती शितें तंव भुतें बहु गोड गोड;
जातांच तीं उठवितात शिव्यास झोड!
जाणूनि हें कवळितोस कशास यांना?
हा दाखला तुज सुजाण कसा करीना! ८

जाती तुला सकळ सोडुनि निर्धनाला;
हा खेद कां वद बरें उपजे मनाला?
सोडोनि दे सकळ तूं अभिधान त्यांचें!
घे नाम मंगल मुखें रघुराजयाचें. ९

तूं एकटा? समज भाग्य तुझें उदेलें;
दुर्दैव तें दशदिशांस भयें पळालें;
आतां सुखें दृढमनें तप आचरून,
घे निर्धना, महिवरी ह्मणवोनि धन्य. १०

आहेस तूं अधन, वा धनवान मोठा;
विद्वान कीं, निपट अज्ञ महा करंटा,
पाहे कधीं नच असें रघुरायमाता;
जा! ऊठ! जा! शरण त्या जननीस आतां. ११

तूं जन्मलास जननी--जठरीं यदा रे,
संगें तुझ्या कवण तैं जन येति बा रे ?
कां रे, तरी ढळढळां रडतोस सांग.
होतें मदंतर[1] बघूनि तुला दुभंग ! १२

देतात हे सकळ लोक तुला न मान;
कां घालिशी ह्मणुनि तूं गुडघ्यांत मान ?
' हा लोक ओक[2] धरितां धरितां नयेच !
हें संततीर्थ[3]वच कां श्रवणीं[4] न येच ? १३

कोणी पुसे कुशलही न तुझें स्वकीय[5] !
पाहोनि हें रडसि कां ! बद हायहाय !
वेड्या ! कशास तरि त्यांस अपेक्षितोस[6] ?
तीं होत भूवरि खरोखर वित्त--तूस ! १४

हे निर्धना, ह्मणुनि हा त्यज सर्व शोक;
तूं मान ईश--भजनांत सदैव तोख;
सारूनि दूर भवपाश, रमापतीला--
अक्षय्य जा शरण चिरसुख[7] सेवण्याला. १५

घेवोनि मंगल मुखें हरिनाम गोड,
कामादिकां[8] अदय होउनि झोड ! झोड !
दुष्टस्वभावरिपुनाश पळांत होतां,
येईल ! येइल चिरंतन[9] सौख्य हातां. १६

———— लक्ष्मण हरी बराडकर.

१ माझें अंतःकरण. २ ओकारी. ३ संत हेच कोणी तीर्थ. ४ कानांत. ५ आप्त वगैरे. ६ इच्छा करितोस. ७ चिदानंद सौख्य. ८ काम, मोह वगैरे. ९ नित्य.

ऐक्यबोध.

श्लोक.

श्रीशंभु स्वयमेव एक दिवशीं आले परीक्षावया—
आचार्याप्रति, बोध पूर्ण दिधला अद्वैत दावोनियां;
ऐका वृत्त तुह्मी, मनीं दृढ धरा तथ्यांश जो लाभला;
बाह्यांगासचि वस्तुच्या निरखुनी दोषी न तीला भला. १

गंगास्नान करूनि येत असतां आचार्य गेहाप्रती,—
जाती त्यांजवळून अंत्यजतनू बुध्याच गौरीपती;
' चांडाला ! सर दूर ' त्यास वदले आचार्य तारस्वरें.
त्यांतें शांतपणेंचि उत्तर दिलें हांसोनि विश्वेश्वरें. २

" अन्नानें तनु पुष्ट ही द्विजवरा, माझी तुझीही तशी;
तीमध्यें सम चित्कला वसतसे; हें मान्य आहे तुशी ?
आतां दूर कुणा करूं ? मज वदे हा देह चैतन्य वा ?
मी नेणें वदतोसि काय सुजना, हा शद्व मातें नवा. ३

कैसें भिन्न शशांकबिंब ह्मणिजे चंडाळमार्गीतलें—
कीं गंगाजलींचें ? तसें नभ वदे मृद्धेमपात्रांतलें ?
ज्ञानानंदनिधी तुडुंब भरला विश्वामधें व्यापुनी;
तेथें हा द्विज, शूद्र हा भ्रम असा त्वां आणिला कोठुनी ? ४

जाग्रत्स्वप्नसुषुप्तिमाजि स्फुरते जी स्पष्ट रे, चित्कला--
जी ब्रह्मादिक भूतमात्रतनुला चैतन्य दे निर्मला;
ती मी ज्यास रहस्य हें उमजलें; अंगीं पुरें बाणलें;
त्यातें ब्राह्मणशूद्र भेद नसतो, तूतें न कां हें कळे ? ५

नित्य ब्रह्मचि मी असें; जग तसें विस्तीर्ण हें तन्मय;
अज्ञानें त्रिगुणात्मकें उभवितों हें मीच मायामय.

ज्यालागोनि रहस्य हें उमजलें; अंगीं पुरें बाणलें;--
त्यातें ब्राह्मण शूद्र भेद नसतो, तूतें न कां हें कळे ? ६

बोधें सद्गुरुच्या--' अनित्य जग हें सारें--मनीं बिंबलें;
ज्याला ब्रह्मचि नित्य; चित्त अवघें तेथें सदा रंगलें;
जाळी भूत भविष्य जो चिदनलें; प्रारब्धवेगें हले;
त्यातें ब्राह्मण, शूद्र भेद नसतो, तूतें न कां हें कळे ? ७

जी पक्षीनरदैवतीं स्फुरतसे जाणीव ' मी मी ' अशी;--
जाणे सत्त्वबळें जिच्या जिव जडा प्रत्येकही वस्तुशीं;--
ऐशी ती मुनि भावितो रविसमा दीप्ती सदा स्वांतरीं.
स्वानंदीं रमतो तया सुजन दे धन्यत्व सर्वापरी. ८

ज्या सौख्यांतिल लेशमात्र मिळतां ते देव आनंदले ;--
उर्वीमंडळिं पूर्ण तृप्त वसतो योगी जियेच्या बळें;--
अंगें ब्रह्मचि जाहला मतिलयें; तो ब्रह्मवेत्ता कसा ?
देवेंद्रासहि वंद्य तो मग जगीं हा बोलही फोलसा ! ९

तात्पर्यार्थ पहा विचारुनि मनीं, आहे कसा दाविला;--
जाती, वर्ण, वृथाभिमान त्यजुनी, जाणा खरी चित्कला.
कर्में कीं सहभोजनें विफल हीं ऐक्यास जोडावया !
विश्वमाजि अखंड मीच भरलों ही खूण ऐक्योदया. १०

गो. मो. बोकील.

कविराजैश्वर्य.

पद.

प्रातःकालीं उठलों मीं; दिनकरदर्शन घेइं नमीं;
पक्षी गाती गाण्याला; कविचें स्वागत करण्याला. १

कविचें स्वागत विहग करी; गाणें गाउनि परोपरी !
उडी घेउनि तो गगनीं; प्रदर्शवी आनंद वनीं. २
वसंत आला सामोरा कविला, घेउनियां भारा—
फुलांफळांचा संतोषें; कविही फार मनीं तोषे ! ३
पुढती कवि तो वनिं गेला; सामोरा वनराज भला.
तदा कवीला नेइ घरीं; तोषवि त्याला परोपरी. ४
वसुंधरा सुंदरि आली; कविला सामोरी गेली;
कंठीं माला पुष्पांची कविच्या ती घाली साची. ५
परते कवि सदनीं जाण्या जलदहि आलि त्या बघण्या;
चपला आली त्या न्याया, क्षणार्धांत सदनीं जाया. ६
जइं सदनीं कविराज गमे; आम्रवृक्ष तो पुढतिं नमे:
क्षुधा--शांति करिं कविराया, आम्रा माझ्या भक्षुनियां. ७
क्षुधा--शांति कविची झाली; त्याला निद्रा ती आली;
वृक्षें छाया ती केली; वसुंधरा वारा घाली. ८
निद्रा कविची ती झाली; संध्या उठवाया आली;
साडी नेसुनि ती लाल, शोभा कविला दावील. ९
कवी निघे हिंडायाला, संध्याशोभा बघण्याला;
पक्षी आले सामोरे; कविला ते करिती मुजरे. १०
स्वारी पुढतीं ती गेली; सूर्याची तृप्ती झाली;
घाई करि पाताळिं गमे; चंद्राला जाऊनि ह्मणे. ११
जा चंद्रा ! पृथ्वीवरती, कविला भेटी देई ती;
इन्दुविकासी कमलें ती घेउनि आला निशापती. १२
वाही कवि संतोषाया; पुढतीं कवि थकला जाया;
वायू आला त्या न्याया पाठीवरती बसवुनियां १३

पहा कवींचें ऐश्वर्य नृपराजांहुनि तें थोर;
शिवसुत विनवी तुह्मांला गा गा गा ऐश्वर्याला. १४

सतीशकुमारदत्त.

माझी कन्या.

[प्रहर्षिणी.]

मत्कन्या प्रियतम ही सुरम्य साची;
लाजे ती बघुनि उषा प्रभा मुखाची !
सौख्याची निरुपम खाण लब्ध मातें;
मूर्त श्री विलसत आज मद्गृहातें ! १

नोहे ही सुमकलिका, सदैव हांसे !
नोहे ही कविकविता, प्रगूढ भासे !
नोहे ही हिरकणि ही, मृदुत्व दावी !
नोहे ही उडुपकला, चिर प्रभावी ! २

ही भू, हा जलनिधि, हें नभोवितान,
ओवाळूं इजवरुनी धनासमान !
लोभानें मजसि इच्या प्रहर्ष वाटे !
कोणाचा शिशुविण तो प्रपंच थाटे ? ३

सुमंत.

सुभाषित.

आर्या.

सुज्ञानीं दाखविला व्यवहारीं मार्ग जो सुगम, त्यातें
आदरिती, ते पावति संतत सुख इतर बहुत दुःखातें. १

चिंतामण माधव पिंपळसकर.

जुलै. १९१२ वर्ष २१ वें.

काव्यरत्नावली.

अंक ७ वा.

सुभद्राविवाहकाव्य.

सर्ग सातवा.

गीति.

ऐकुनियां मातेचा निरोप, तो येइ यदुकुलाभरण;
करुनीयां नतमस्तक, मातेचे शीघ्र वंदिले चरण. १
वदला मग बद्धांजलि, " बोलविलें बालकास कां ! माये
तव चरणदर्शनानें सुख गमतें, तें मनांत नच माये ! २
वद जननी ! बालातें चिन्ताकुल तूं किमर्थ बसलीस ?
दुःखभरानें दाटे मन हें पाहून तूज, असलीस ! ३
वद वद. अंबे ! आतां चिन्तेचें काय कारण मला ? गे !
पाहुनि दुःखित तुजला, हुरहुर हृदयास घोरतम लागे ? ४
चरणीं शिर मी ठेवीं, वद वद या दीन बालकाला गे !
प्रिय जननी ! तव हृदया चिन्ता ही सर्वकाल कां लागे ? ५
सेवी अनन्यभावें सुत दादासम कृतान्त काळ जिला;
हा ! हा ! अंबे ! ती तूं वरिसी कां गे ! नितान्त काळजिला ? ६
पीडा जें तव हृदया दुःखाचें शल्य, सांग सत्वर तें.
सेवावें म्यां तुजला सतत, तसें हलधरेंहि सत्वरतें. ७
जननीदुःखनिवारण करण्या तव न, जरि झिजे तनय-काय;
हा ! हा ! तरि मग उरला सांग मला या जगांत नय काय ? " ८

माता मग त्यास वदे, " कृष्णा ! हें वचन सत्य तूं वदसी;
माझें दुःखनिवारण करण्या, तव सिद्ध हा सदा सदसी. ९
भगिनीची दुरवस्था परि न दिसे काय ही तुला ? तनया !
दुःख तिला देउनियां, कां करितां ! हाय ! यापरी अनया ! १०
पूर्वीपासून तिचे असे मनोगत तुम्हां विदित सारें;
मग कां छळितो हलधर तीस ? अहा ! तूंहि निरवधि तसा रे ! ११
दुर्योधन, दुष्टमती कपटकलानिपुण, दानवासम हा;
दुष्टजनांहीं परिवृत, नयविन्मुख नीच, अघनिवास, महा ! १२
चातुर्यनभोभूषा कां देतां काजव्यास तारा ? हो !
कां माझी दुहिता ही हा ! हा ! संतत विपद्गता राहो ? १३
ज्याच्या सुयशःकथनीं आनंदानें सदा सुधी रमती;
गुणरूपांहीं ईतें होय उचित पार्थ तो सुधीरमति. १४
कोठें अर्जुन गुणनिधि ? वीरांचा एक थोर नायक तो;
कोठें भीरु सुयोधन ? दुर्मति जो साधुवचहि नायकतो ! १५
आहे महाभिजन या पांडुकुलाशीं प्रशस्त निज नातें;
सोडुनि विजया, मग कां देशि इला या तमःखनि जनातें; १६
विजयसुभद्रा यांचा मदनरतीसम निकाम हा जोडा !
तत्संगम घडवुनि, यश तुह्मी यदुनायका ! महा जोडा. १७
दुहितेची दीन दशा पाहुनि ही, होय दुःख फार मला !
परि हलधर दुर्योधनगुणगणसंकीर्तनींच हा रमला. १८
भगिनीची दुरवस्था पाहुनि, तव जीव लव न तळमळला !
इच्छा तुझी, सुभद्रा यावि तया जो अधांत खळ मळला. १९
बालपणापासुनि मी विजयाही तुजसमानच समजतें;
तुमचें बालपणींचें स्मरतें कौतुक निशादिवस मज तें ! २०
यावी त्यास सुभद्रा गमलें तेव्हांच गुणनिवास ! मज;

कैळासनाथसम तो विजय सुभद्राहि ही शिवा समज. २१
या समयींच तयाला झाली तीर्थाटनीं अतीव रति!
न कळे, सांप्रत कोठें भ्रमतो तो वीर वसुमतीवरती? २२
तरि आतां श्रीकृष्णा! त्याच्या शोधार्थ बहुत यत्न करीं;
तो एक योग्य लोकीं धरण्याला हें अनर्घ्य रत्न करीं. २३
विजयसुभद्रा यांचा होइल अभिमत विवाह ज्या समयीं;
दुःखावस्था सर्वहि सरेल तेव्हांच सत्य तापमयी" २४
मग रुक्मिणीसुभद्रावदन विलोकून तो वदे हसुनी;
"हा! हा! दुरवस्था ही झाली तव! पुत्र मी तुझा असुनी! २५
आहे प्रियतम मजला आत्मप्राणासमान अनुजा ही;
कां कोपलीस? अंबे! केलें अप्रिय न अल्प तनुजांहीं. २६
भगिनीचें अहित कसें करील दादासमान साधु निका?
गे! स्वैरगामिनी या बाळा असती समस्त आधुनिका. २७
जरि योग्य योजिला वर, लाजवि जो रूपराशि कामातें;—
तरि वदते दुःशीला, "देत असां या खराशि कां मातें?" २८
अन्यावरती धरुनी कितीक बाळा अनन्य भावरति,
अपशद्बवृष्टि करिती निष्कारण हाय! बांधवावरती! २९
सोडुनि सर्वहि लज्जा, अवमानुनि गुरुजनां धवाकरवीं,
कोणी अविनयशीला परिभवपद सर्व बांधवां करवी! ३०
गंधर्वाच्या विधिनें करि दयिताचा कुणी करग्रहहीं;
निजबंधुवर्ग तीतें अदय गमे जेंविं नच खरग्रहही. ३१
न कळे कोठें फिरतो यासमयीं तो धनुर्धर? न गवसे!
भगिनीगतचिंतेचा दादाच्या मनिं सुदुर्धर नग वसे!! ३२
दादांनीं योजियलें ह्मणुनि सुयोधनमहीवराला गे!
संतत यत्पदपंकजसेवेला ही मही वरा लागे; ३३

नृपवर गुणरूपांहीं दुर्लभ जगतीं पहा सुयोधनसे !
प्रख्यात गदायुद्धीं तत्सम कोणी अहा ! सुयोध नसे. ३४
यास्तव नियुक्त केलें दादांनीं त्या नयज्ञ जनपाला;
पक्वान्नातें सांडुनि सेविल कां गे ! नयज्ञ जन पाला ? " ३५
कृष्णोक्तिनें, घनावलि झंझावातें, तशी बहु खवळली–
मातेकडे सुभद्रा संकोपानें प्रदीप्तमुख वळली; ३६
" भगिनीसौख्यपरायण बंधूचे ऐक बोल हे; माते !
लाजावें ऐकुनि ते गुरुनें; त्यांचें न मोल हेमातें ! ३७
पीडी हृदयास सदा, दुर्भाषण हा करूनियां कृष्ण !
अभ्यंतरींहि आहे कृष्ण, जसा हा वरूनिया कृष्ण ! ३८
मज नित्य वदे, खल नच कोणी दुर्योधनासम जगांत;
परि आज यशोगीतें त्याचीं फसवावयास मज गात ! ३९
मम भाव योजिला गे ! यानें त्या सत्य पांडवावरता;
वीर धनुर्धर ज्यासम नच गवसे सत्यपांड वावरतां. ४०
वदतो हा, नच समजे कोठें नरवीर मम दयित रमला ?
केला शोध तयाचा यानें केव्हां कधीं अयि ! तर मला ? ४१
करुनी अप्रिय माझें, हितकरसा सत्य हा मिरवि वरती;
खद्योताला अर्पी रत्ना जी सर्वगामि रविवर ती ! ४२
हा ! हा ! अभागिनीची या आतां कोण काळजी वाहे ?
पीडी दुःखावस्था विषमतरा सर्वकाळ जीवा हे ! ! ४३
बंधुजनांनीं माझा जननी ! छळ सर्वकाळ चालविला ! !
त्यांनीं सुविचाराचा हृदयांतिल दीप पूर्ण मालविला ! ४४
छळ बंधुवर्ग माझा समजुनि उमजूनि सर्वकाल करी !
यापेक्षां कां मजला नच देति जमूनि सर्व काल-करीं ? " ४५
वदली मग जनयित्री, " दुःखित तव कृष्णनाथ ! अनुजा ही;

भगिनीदु:ख हरावें करुनीयां यत्न बहुत मनुजांहीं; ४६
कुरुनाथाशीं ईचा संमत नाहीं विवाह कालीतें;--
म्हणुनी केलें तीनें विघ्न अकस्मात् विवाह--कालीं तें. ४७
वरिलें बालेनें त्या वीरश्रेष्ठास विमल भावानें;
यत्न करुनि भगिनीचें पुरवावे हेतु सकल भावानें. ४८
गुणरूपविक्रमानें नाहीं लवमात्र तो उणा रामा;
धाडुनि वेगें दूतां, आणी शोधून त्या गुणारामा. ४९
पुरवीं सर्व मनोरथ; दु:खस्था अल्पमात्रही नुरवीं;
दु:खीं हृद्यतमातें तिमिरा जेवीं सहस्त्रभानु रवी. ५०

सातवा सर्ग समाप्त.

————कै० श्री० ना० मुजूमदार बी. ए.

चित्रांस.*

साक्या.

काय लक्षिसीं लोललोचनीं ? ललिते ! ललने ! सांग.
वदन मुरडुनी, मागें करुनी किंचित् दृष्टि आंपग ! १
कुरलकेश नि:स्नेह तुझे हे रुळती वदनावरती !
करांगगुलींनीं तरि न सारिशीं पुनरपि कां ते वरती ? २
भुरुभुरु उडती वायुलहरिनीं गमती जणुं हे भृंग !
पुंडरिकाच्याकडे धांवती होउनि चित्तीं दंग ! ३
विपांडु-मुख हें नीलकुंतलीं धूसर विधुसे भासे !
निसर्ग मधुरा निस्तेजस्त्वहि शोभवि सुंदर खासे ! ४

* प्रस्तुत कविता करमणुकीच्या सन १९११ च्या क्यालेंडरवरील चित्रास उद्देशून लिहिली आहे.

विगलित झालीं गात्रें सारीं नुरलें देहीं त्राण !
झाले नेत्रीं एकत्रटुनि जणुं गोळा पंचप्राण ! ५
डोळे गेले खोल किती हे ! वासा नाकाचाही
किती निवाला ! बोल बोल ! कीं क्षणभर इकडे पाहीं ! ६
गाल जहाले विरक्त कैसे ओष्टहि भारी म्लान !
बगळ्यापरि गे ! किती निवाली उंच तुझी ही मान ! ७
वळीव इकडे मान एकदां बोले कीं, मजसंगें;
भंगे तव मन अथवा कोठें सांग तरी तें रंगे ! ८
केशाखालीं कर्ण झांकले; ऐकुं नये का ह्मणुनी ?
बळेंच किंवा हें बधिराचें सोंग आणसी जपुनी ? ९
चुकलों चुकलों सोंग नसे हें कोंगहि तैसें नाहीं;
खरोंचि तुजला भान नुरे गे ! तनुचें अपुल्या कांहीं ! १०
स्कंधाखालीं पदर गळाला ! झाला अस्ताव्यस्त !
उरोज उघडे तुझे दाविती प्रमाण आजी व्यस्त ! ११
गद गद ! गद गद तुला हलवुनी जागृत करुं कां आतां ?
छे ! छे ! धीर न परि तुज होई स्पर्शाया या चित्ता ! १२
" काय करूं ? मी कसें करूं गे ! शब्द एक तूं बोल.
दगडाच्या या हृदय-कपाटा खोल, खोल गे ! खोल ! १३
हाय ! कशी ही उच्चारीं मी निंदावाणी अदय !
मृदुल सुकोमल फूल असें कीं नवनीत स्त्रीहृदय ! १४
हाय काय वा दृष्टी फसवी चित्रींची तूं पुतळी !
नव्हे नव्हे ! मी प्रबुद्ध वेडा भूल असे ही सगळी ! १५
सुषुप्तींत वा स्वप्नामाजी असें काय मी कांहीं ?
चिमटे काढुनि, त्रिवार ह्मणतों नाहीं ! नाहीं ! नाहीं ! १६
प्रखर अशी ही भेदक दृष्टी लावुनि बघसी काय ?

पुरे पुरे गे ! दृष्टि फिरिव ती फुटेल धरणी-काय ! १७
बाई ह्मणतों, ताई ह्मणतों, ह्मणतों माय तुलाही !
पहा मजकडे हृद्गत सांगुनि शांतवि मजला कांहीं ! १८
गोरें मोरें तोंड बघोनी, तिळतिळ काळिज तुटतें !
उठति उमाळे पोटामधुनी मन हें दुःखें कढतें ! १९
हृदय गंहिवरे ! कंठ भरे हा ! नुमटे परि ही वाणी !
करुणमूर्ति तव या हृदयाचें करिते पाणी पाणी ! २०
नको भिऊं तूं, नको लाजुं गे ! सांगाया मज गूज;
मूढहृदय मी नसें खरोखर सृष्टीचें अलगूज ! २१
कवी न गे ! मी परी कवीचें हृदय मला हें आहे;
क्षणांत हंसतें ! क्षणांत रडतें ! क्षणांत रुसतें पाहें ! २२
फूल जणूं कीं, मूल जणूं कीं, कविचें अंतर्याम;
चिरंजीव तें असुनी पावे क्षणांत अंतर्धाम ! २३
उदास होतें, प्रफुल्ल होतें, होतें तेंवि कठोर !
राजनीतिपर, कपटी, किंवा अट्टल जेंवी चोर ! २४
साधें भोळें वेडें लहरी त्रिकाळज्ञही तैसें !
वर्णहीन परि ठायीं ठायीं भिन्नचि जल तें जैसें ; २५
असो; नको जा सांगूं मजला, ओळखिलें तव गूढ !
गताब्द बघसी सिंहदृष्टिनें होउनि चित्तिं विमूढ ! २६
हेंच खरें ना कारण बद तव तीर्यग्दृष्टीचें या ?
रवी न पाहे, बघे कवी तें; गुह्य लपविणें वाया ! २७
वळीव दृष्टी पुन्हां सांगतों, मान न का ही मोडे–
लागुनि कळ मी; लळा पुरवितों तव हा वाडें कोडें ! २८
श्वेतद्वीपीं श्रीमत्तांचा दीनांशीं कलि माजे !
तोडाया तो ईशमंदिरीं गेले अमुचे राजे ! २९

घायव्येला बुद्धिबळांचा डाव मांडिला होता,--
नृपप्रजांनीं परस्परांना चकवुनि द्यावा गोता ! ३०
कितीक वरुषें खेळ चालला ! गताब्दिं शेवट झाला !
प्यादी केली फार मजेची ! जुलुमी भूप पळाला ! ३१
ईशान्येला चीनपती तो लोकमताल्या तनया--
अधिकारोचित पाहुनि, सांगे नृपदंड करिं धराया ! ३२
रीस रशीया, चीन लांडगा, मेष कोरिया सान--
इच्छिति खाया ! परी गिळी तो जंबुक चतुर जपान ! ३३
गतवर्षींच्या ठळक चार मीं कथिल्या गोष्टी तुज या;
अधिक नको कीं गतवस्तूंचें स्मरण जाळितें हृदया ! ३४
" वर्ष नवें हें सुखकर होवो. " माग ईश्वरा आतां--
अनन्यभावें; पूर्ण करिल तो सकल जगाचा त्राता. ३५

अनंततनय.

सावित्रीबाई ठाणेदारीण.

कुतूबशाही तर्फे, शिवाजीचा सरदार, दादाजी रघुनाथ यांजबरोबर बेलवडी किल्ल्याजवळ केला तो युद्धप्रसंग.

श्लोक.

कीर्तीनें भुजविक्रमासि भुलुनी, माळा गळां घातली--
ऐशीं हो ! नरबालकें अमितशीं या भारतीं जन्मलीं !
झाल्या जी वनिता, श्रमापरिचिता, तीणें परी दाविला--
जो कां स्वामिहितीं पराक्रम महा तो पाहिजे गाइला. १

जातां यादव रामदेव मग ती संस्थापना ब्राह्मणी--
राज्याची यवनें करोनिच तिथें आरंभिली यावनी !

होते शूर परी अबिंधपदरीं राज्यासि आधार जे;
मंत्री सैन्यपती जया विलसतें येसप्रभू नाम तें. २

स्वातंत्र्यच्युत आत्मदेश बघुनी, राजा शिवाजी रडे;
आंबेचा वर घे, न कां मग दुरी होईल तें सांकडें ?
आरंभी परदास्ययज्ञ तयिं दे म्लेंच्छाज्य आहूतिस
होई आहुति ज्या निरर्थ सतिची तैं हन्त ! वंदू तिस. ३

किल्ला बेलवडी कुतूब-अमलीं कर्नाटकीं देखुनी,
घ्यावा योग्य दिसे अनेकपरिनें मानी शिवाजी मनीं.
दादाजी प्रभुवीर योजि नृप त्या काजीं तदा त्या ह्मणे,
त्या येस प्रभुला जपा; रणिं सदा ज्या " जी " जयश्री ह्मणे. ४

दादाजी भट जाय सत्वर शिवाज्ञेनें चमू घेउनी;
होता येसहि सज्ज शत्रुहननीं सांभाळण्या यावनी.
जाती, धर्म सबन्धुता मुळिंहि ती ज्या स्वामिकार्यी नसे;
सेवाधर्म मनीं धरोनि भिडली अन्योन्यि ते सिंहसे. ५

घेतां हस्तिं कृपाण शौर्यनगसे दोही दळां भासले !
किंवा क्षत्रियतेज मूर्त गमलें भूमीवरी पातलें !
किंवा ते मृगराज दोन समरीं येती मनीं क्षुब्धसे;
कीं वाटे क्षितिमंडला हलविणें यांना न दुःसाध्यसें. ६

सेनाही निजनायकासि बघतां उद्युक्त झाल्या रणीं;
दावी बाहुबला स्वशीर्षकमला हस्तीं पहा घेउनी.
पाहोनी रणिं शूरता प्रबल ती आश्चर्य वाटे सुरां;
केली भूषित शौर्य दावुनि तदा सैन्यें अहा ! ती धरा ! ! ७

दोघेही लढले मनीं उमजले, संग्राम ना चांगला;
आहे गांठ कठीण; शत्रु दिसतो ज्याची न कोणा तुला.

होता हो अनुकूल काळ परि त्या राया शिवाजीस तो;
तेणें येस पडे; तिथेंहि बदला स्वस्वामिनामास तो ! ८

जातां नायक धीर वीर खचले; झाले रणीं दीनसे;
गेलें धैर्य ! पुढें तयीं रिपुवरी जाण्यास कोणी नसे.
येई थोर जवें हयारुढ सती सावित्रि खड्गासह;
जातां, मर्द ह्मणे कसे मग तुह्मी ? या वीर माझ्यासह. ९

गेले नाथ ! जगोनि काय करणें आतां जगीं या मला ?
धारातीर्थींच अर्पिणें तनु बरें जी वीरपत्नी तिला;
स्वामीच्या लवणास केविं विसरूं आहे जरी म्लेंच्छ तो ?
सेवा म्यां पतिमागुनीहि करणें हें न्याय कीं इच्छितो. १०

देतां धीर अशापरी, परत तो उत्साह येई तया;
जो तो भीति नसे ह्मणे मनिं मुळीं शौर्या चला दावुं या
जेणें नायक वीर येस वधिला, त्याला गतासू करा;
घेऊं सूड पुराचि देवुं वनिं त्या भक्षावया सूकरा. ११

सावित्री मग अग्रभागिं चमुच्या नामा शिवाच्या वदे;
सेनाही अनुकार तोच करि; तें ईर्षा रणीं फार दे;
आश्चर्यें रिपु जाहला चकित त्या स्त्रीला रणीं देखुनी;
सावित्रीपद तें ह्मणे मिळविलें हो सार्थ युद्धांगणीं. १२

होता केशकलाप तो विखुरला सावित्रिचा कृष्णसा;
जो संस्कारविहीन नाथनिधनें शोभे तरी फारसा.
घेतां अंबर सांवरोनि समरीं जेव्हां रिघे कामिनी;
अश्वारूढ कृपाणपाणि दिपवी तीं जेंवि सौदामिनी. १३

वाटे हैमवती स्वधाम त्यजुनी आली जणूं रंगणा;
कीं निस्तेज उषा करी सकलही दैदीप्य तारागणां.

येई कीं रणदेवता धरुनियां दिव्याकृती मानवी !
रूपें त्या सतिचीं अनेक दिसलीं वर्णू किती थोरवी ! १४

येतां धूरिपदीं महासति चढे प्रोत्साह सर्वा रणीं;
झाले मोदभरें पुढें हय; तया भीती न कांहीं मनीं.
शस्त्रा सज्ज करोनि शूर सरले गेले अरातीवरी;
वीरश्री चढतां नरास गमतो संग्रामलीलेपरी. १५

युद्धा रंग चढे बहू उपसितां म्यानांतुनी खड्ग तें;
झाला नाद खणाण एकच तयीं, झाले रिपू छेदिते !
भालेही सरले वपूंस भिनले शूरांस नेती वरी;
ढालाही करिती न काम पडता घाला दिसे ना अरी ! १६

वाहे शोणित रंगणीं विपुल ना कोणी तयाला गणी !
गेले धूर्जटिवास शोधित किती सीमा न त्यालागुनी ! !
होती खञ्ज करें विहीनहि किती नेत्रांसही मूकले !
हा ! हा ! दृष्टिपथीं पडे भयद जें तेणें नरा मूर्च्छिलें ! १७

म्लेच्छांच्या चतुराननें नियमिलें नाशापरी तेधवां !
कल्लोलास न भी लढे जणुं सती आल्यें क्षणे कीं धवा !
हाहाकार उडे न वालि यवना, कामा बहू सैन्य ये !
वीरश्री न खचे; वदे " शिवहरे ! " कोणास अश्रू न ये ! १८

होतां यत्न निरर्थ आत्मचमुचे सावित्रिच्या बंधनीं,
दादाजी कुलदेवता स्मरुनियां येई सती मागुनी;
शस्त्रें निर्घृण पृष्ठपादयुग तें छेदी तिच्या वाजिचें !
येई भूमिवरी सती ! हय न ये तो दीन कामा तिचे ! १९

येतां भूवरि चालुनी अरि तिचा गाठी सती मागुतीं;
तीही त्या समयीं करी यमपुरीवासी किती ना मिती !

हा ! हा ! बद्ध करोनि, घालि अरि तैं पादीं तिच्या शृंखला !
आर्यस्त्रीबलधैर्यदर्शक असा संग्राम तो जाहला ! !

—————— त्र्यबंक जयराम प्रधान.

प्रेम.

पद.

जीवलतेवर कळी उमलली,
गुलाब त्याचा हा फुलला
प्रेम जगीं ह्मणती याला.
चित्‌ब्रह्माचा अंश भूवरी,
जो ईशें ओतोनि दिला
प्रेम जगीं ह्मणती त्याला.
हास्य विधूचें, सुरांगणाचें,
गान स्वर्गीं ह्मणती ज्याला
प्रेम जगीं ह्मणती त्याला.
हसती फुलती नभीं गुंगती,
तारागण बघुनी ज्याला
प्रेम जगीं ह्मणती त्याला
भूप्रारंभापासुनि मारुत
धुंडितसे त्रिभुवनिं ज्याला
प्रेम जगीं ह्मणती त्याला
ज्या जादूनें भारुनि ब्रह्मा,
चालविलें ब्रह्मांडाला
प्रेम जगीं ह्मणती त्याला

सृष्टीच्या नैसर्गिक सौंदर्याचा,
  जो भरला प्याला
  प्रेम जगीं ह्मणती त्याला ७

ज्या स्फूर्तीनें तन्मयतेनें,
  कवि करतों नवकाव्याला
  प्रेम जगीं ह्मणती त्याला ८

मधुकर.

" अगम्य लीला. "

चालः– त्रिखंड हिंडुनि धुंडितसे.

हेंचें गांव तें; जागा ही;
जेथें निर्घृण हस्तांहीं
पूज्या प्रेमक जननीचें
केलें दहनहि म्यां नीचें !
    पूर्ण जाहलें
    वर्ष न पहिलें
    नयन न सुकले !
जनकदहन तों ये भाला !
अगम्य दैवा ! तव लीला ! १

स्वर्गसौख्य वनिं पतिसंगें;
तद्विरहें तें सुख भंगे !
नाका नरककला येई !
विषामृतीं भेद न राही !

---

१ जननीचें व जनकाचें दहन एकाच जागेवर झालें.

हे तारागण—
जणुं अभ्रककण !
गीतहि रोदन !
कंटकत्व सुरसुमनाला !
अगम्य विरहा ! तव लीला ! २

अद्भुत प्रीतीचे दूत—
झाले मार्ग कुणा ज्ञात ?
लेखन नयनशलाकांनीं
कागद हृदयाचा करुनी !
दृश्यनलेखन !
दुर्गम वाचन !
मूकहि भाषण !
साध्यासाध्य न प्रेमाला !
प्रेमा अगम्य ! तव लीला ! ! ३

स्वर्गीतुनि ये संदेश
मज्जननीचा जनकास:
चण्डांशु-रथीं स्वकरांनीं
घे नारायणें बसवोनी !
रथ सप्तमि दिनीं
दुःखिं लोटुनी,
कुणा न पुसुनी
अस्ता मित्रासह गेलें !
अगम्य नारायणलीला ! ! ४

१ लेखणी. २ नारायण- कवीचा जनक. ३ सूर्यास्तास चालले.

लक्ष्मीपूजनिं लक्ष्मीला--
लक्ष्मि मिळाली, स्वर्गाला!
ह्मणुनी नारायण नेला
नंदनवनांत रमण्याला!
सुखमय जगतीं
प्रमोद वरतीं
दुःख खालतीं!
रडणें माझ्या वांट्याला!
अगम्य लक्ष्मी तव लीला. ५

उमारमण.

प्रियाविसर्जन.

श्लोक.

हा हा! आली कठिण विपदा! कोण हो हीस वारी?
सीते! मीनापरि तळमळें! संपलें सौख्यवारी!!
देवी!–देवी! विमलचरिते! निंदिती का तुलाही?
दुःखाग्नीनें अहह! तनुची जानकी! होय लाही! १

दावीयेलें प्रखर करुनी दिव्य, पावित्र्य कांते!
कां तें सारें जन विसरले अल्प कालांत शांते?
दुर्दैवानें कहर करुनी आणिला दुष्प्रसंग!
शोकाशीं गे तुजसि करणें पातले क्षिप्र संग! २

दूताचें तें वचन न शिरीं कोसळे वीज खास!
शोकोद्वेगें हृदय भरलें! दूर झालें सुखास!

१ लक्ष्मीपूजनाच्या दिवशीं ऐन पूजेच्या वेळीं लक्ष्मी– कवीची जननी वारली.

झालों शून्य क्षणभरि मनीं भान गेलें लयाला !
जाळायाला बहु भडकली आग सौख्यालयाला ! ३

हा हा ! कांते ! सुविमल तुझा जन्म पृथ्वींत झाला !
या वार्तेनें तव शुचिपणा आज सारा बुझाला !
तूं जन्मोनी वसुमतिस या पूर्ण पावित्र्य आलें !
निंदा गारा परि तुजवरी फेंकिती आज बाले ! ४

राजर्षी तो जनक तव गे तात विख्यात लोकीं !
शंका शीलविषयिं तुझिया लोक घेती विलोकीं !
हा ! हा ! अग्नी, गुरु गुरुसती वर्णिती त्वयशाला !
त्या तूं ते हे असुरसदनीं--आणि बोलूं कशाला ? ५

तूंतें रामाविण न रुचले थोर राज्योपभोग !
देवी ! देवी ! तुजवरि अजी पातला कोण भोग ?
माझ्यासाठीं विपिनहि तुला जाहले गोड बाले !
होसी निंदाविषय कशि तूं आजि अर्धेंदुभाले ? ६

झाली पृथ्वी शुचि तुजमुळें--निंदती त्या तुला गे !
त्वन्निंदेचें वचन हृदयीं शल्यसें हाय ! लागे ! !
सीते ! देवी ! ! मधुरहरिते ! ! ! तूंच आधार लोकां !
नाहीं--नाहीं तुज परि ! करीं गे निराधार शोका ! ७

भार्ये ! तेव्हां सहज वधिलें त्या खरादूषणातें,
वारूं कैसा हतबल परी या खरा दूषणातें ?
इक्ष्वाकूचें प्रथित कुल हें पूज्य सर्वा जनांला
झालें निंदाविषय ह्मणुनी दुःख वाटे मनाला ! ८

देवी ! तूतें कठिन हृदयें त्यागितों मी नृशंस !
प्राणत्यागीं विपिनिं सखये ! या अलीका प्रशंस !

प्रेमाच्या मी अजि सुमधुरे ! हा कडेलोट केला !
आशी:शद्वा करिल बघुनी व्याघ्र तूतें भुकेला ! ९
विश्वासानें हृदयिं पडुनी माझिया झोंपलीस !
मुग्धे ! सोडीं त्वरित मजला ! वंचिता जाहलीस !
वेढीशी हा विषमय तरू चंदनाच्या भ्रमानें !
नाहीं झाला मधुर तुझिया प्रीतिच्या विभ्रमानें !
झालासे हा निरयसम, जो स्वर्गसा जीवलोक !
आधारोन्मूलनचि घडलें जीवितांचें विलोक !
जीर्णारण्यासम भुवन हें जाहलें शून्य आज !
संसारीं या रुचि न, नुरलें जीवितांचेंहि काज ! ११
वज्राऐसें हृदय बनलें पूर्ण आहे कठोर !
दुःखाचाही हरहर कसा आज चाले न जोर !
होई ना कां हृदय शतधा हाय ! देवा विदीर्ण ?
मृत्यो ! शोकोदधि उसळला ! धावुनी येइ तूर्ण ! १२
माते ! दुष्टें विपिनिं तव ही लोटिली आज सून !
झालों आहा ! अदय, सतिचा दोष कांहीं नसून !
बा सुग्रीवा ! श्रम सकलही ते तुझे व्यर्थ झाले !
या मूढाला विधिगतिवशें व्यापिलें मोहजालें ! १३
लंकानाथा ! पवनतनया ! थोर युष्मत्प्रयत्न
नेले नाशा ! अदय बनुनी फोडिलें आज रत्न !
किंवा राहो ! अधम पशु मी नामसंकीर्तनाला
नाहीं योग्य स्वचरितवशें दूषवीलें कुलाला ! १४
विश्वासानें निजलिस उरीं ज्याचिया राजकन्ये !
हा ! हा ! तो त्वप्रियकर नव्हे ! नोह सोडीं अधन्ये !

देवी ! ठेवी चरण तव हा मस्तकीं आदरानें !
सिंचोनीया नयन सलिलें क्षाळिले राघवानें ! १५

रेंदाळकर.

ॐ.

वृक्षोपदेश.

[दिंडी.]

सहज गेलों मी उपवनीं फिराया;
चित्त भवदुःखत्रस्त शांतवाया;
बघुनि शोभा रमणीय, चित्त धालें !
शमुनि भवदव " मम " लया स्मरण गेलें ! १

रवी होता दिक्प्रांत आक्रमीत;
उभी पश्चिम ही मधुर गीत गात;
गीत गाते जणुं रवि— स्वागताचें;
वसन सुंदर नेसोनि ठेवणीचें. २

भरुनि गेलें नभ कोकिलस्वनानें;
नभीं उडती खग गात गात गाणें;
मधुर मलयानिळ थंड गंध आणी;
नव्हे उपवन हें खास सौख्यखाणी ! ३

मधुर गुंजारव करुनि मधुप पानीं,
सर्व उडती तैं गगन बहु तऱ्हांनीं;
फिरुनि फिरुनी चुंबूनि पुष्कराला,
समुद उद्यानीं करिति विहाराला. ४

तरू चूतादिक फुल्ल तिथें झालें;
लताकुसुमांनीं पथहि ते बुझाले;
गंध चेतोहर इंवरला दिशांत.
गळुनि थकवा, मम चित्त होय शांत ! ५

सुबक, सुंदर विस्तीर्ण भूरुहाची–
बघुनि छाया बहु गार अशोकाची,
लत्ताकुंजाची शांततमा छाया–
सालिल सेवाया ठेवियली काया. ६

करुनि शय्या वर वृक्ष–पल्लवांची,
खोळ वरती टाकूनि धोतराची,
दृष्टि लावोनी निश्चला नभांत,
जगल्लीलेतें अनुभवीं मजेंत. ७

मनीं नानाविध उपजले विचार,
करीं लागे चित्तांत “ मीत्व ” चार !
तोंच वृक्षांतुनि शद्ववाणि झाली;
क्षणीं मीत्वाची भावना निमाली ! ८

कोण तूं गा ? कोठील ? कासयास ?
इथें आलासी ? सांग काय आस–
हृदीं तूझ्या ? उद्विग्न मानवा ! रे !
कथीं; हेतू तव पूर्ण करूं सारे. ९

बोल बाळा ! सोडूनि भीड सारी;
कळिव पीडा ती हृदय जी विदारी;
लोक-कार्याची उच्च तुला आस–
असावीसें वाटतें मन्मनास. १०

बोल हेतू जो येरितो मनाला;
उघड हृदिंच्या बंदिस्थ वासनांला.
सुधा पाजूं तुज दिव्य बुधाधारा;
भयें पळतिल तैं त्वरित दहा द्वारां ! ११

वचन ऐकुनि हें सहज निराशेची– '
कठिण ग्रंथी मग उकळली हृदींची;
हर्षबिंदू नयनांत सर्वे आले;
पुसुनि पुसुनी ते वसन होय ओलें. १२

सदय ! साधो उपकारपरा चूता !
हृदयसंतापाशमन होय आतां–
तुझ्या वचनीं उपकार तुझा थोर;
धन्य पुण्यात्मा तूंच गुणागार ! १३

सतत करिशी उपकार जगीं साधो !
तुझ्या उपदेशें मुदुद्देश साधो;
लोक-कार्यास्तव देह हा झडावा;
संग संताचा सतत आवडावा. १४

धरुनि ऐशी हृदयांत सदा आशा,
यत्न करितों; तों जाळिते निराशा !
कार्य पाहावें एवढीच आस--
फिरुनि फिरुनी या डांचते मनास ! १५

वचन माझें हें जों न पुरें झालें--
तोंच वृक्षांनीं हास्य विकट केलें !
खेदलहरी मग उसळल्या मनांत !
अचळ पडलों होवोनि उपवनांत. १६

काय वेडा मी ! काय वेड माझें !
निराशेचें हें जाल काय माजे ?
हाय ! देवा ! ये धांव पाव कृष्णा !
करीं कवळुनि या दूर करीं तृष्णा। १७

तीव्रखेदानलदग्ध बघुनि मातें--
दया नैसर्गिक उपजली तरूतें;
तरू वदला तैं; " ऊठ ऊठ वत्सा !
परिस वचनें हीं त्यजुनि सर्व कुत्सा. १८

उच्च आहे प्राप्तव्य, उच्चं पंथ--
तुझा आहे; परि कार्य करी संथ.
फलासाठीं कां अधिर मुला ! व्हावें ?
काय येवोनी उपवनीं पडावें ! १९

कार्य आहे हें थोर तुझें लोकीं;
वेळ तैसाही लागतो विलोकीं.
धनें येती उगवोनि सर्व वेगें;
इक्षुदंडाला काळ बहुत लागे. २०

बीज भूमीमधिं टाकितां पळांत,
वृक्ष फळतो कां सांग या जगांत ?
कधीं कोणी लावोनि इक्षुदंड,
पिउनि झाला क्षणिं तृप्त रस उदंड, २१

लता फुलती कां देंठ लावितांच ?
चूत फळतो कां कोय उगवतांच ?
कधीं कोणीं हें ऐकिलेंचि नाहीं !
खुळीं आशा तुज वाटते कशी ही ? २२

कर्म करणें हें एवढेंच काम--
फळाचा दे सोडोनि झणीं काम;
कर्म कर्मास्तव करुनि, झिजव काय;
यशःप्राप्ती मग धरिल तुझे पाय ! २३

यशोविन्मुख होवोनि पुढें चाल;
करी ध्येयावर नीट धडक चाल.
सत्य चिरडुनि जरि टाकिलें धुळींत;
तरी उगवोनी येच ये जगांत. २४

अह्मी आहों बलवंत तरू लोकीं;
तरी होतों कां शैशवीं विलोकीं ?
नसे आह्मां फलकाम कधीं ठावा;
हाच अमुचा अक्षय्य सौख्यठेवा. २५

ऊठ, वत्सा ! या सोड निराशेतें;
करीं उत्साहें कार्य जें असें तें;
हृदीं घेई बिंबूनि कृष्ण-गीता;
समुद कर्मैं कर; ऊठ भग्नचित्ता ! २६

पवन नोहे हा भाग्यभानु-दूत--
तुला प्रेमानें कथिन, " ऊठ ऊठ. "
ऊठ वत्सा ! जा कर्म आचराया;
विफल शिणवीशी हाय काय काया ? " २७

पिउनि तरुची ही बोधसुधा गोड,
हृदयभेदाची बुझुनि जाय खोड;
समुत्साहें सप्रेम त्या तरूतें--
सवें नमिलें जोडूनि दों करांतें ! २८

वृक्ष दिसशी तूं चूतवरा ! स्पष्ट;
परी कोणी तरि साधु तपोभ्रष्ट;
खचित अवतरसी वाटतें मनाला;
थंड आत्मा ऐकोनि बोध झाला. २९

प्रचुर उन्मूलन पावुनी निराशा
लया गेली मनिं बिंबली पराशा;
कर्म कर्मास्तव जाउनी करीन;
तुझा साधो ! उपदेश आदरीन. ३०

असें बोलोनी, धरुनि विनयभाव,
समुद नमुनी, तो साधु चूतराव,
गृहा आलों परतोनि कृष्ण-गीत--
पथीं आनंदें सहज गात गात. ३१

वसंततिलका.

गेला उडोनि हृदिंचा मळ दूर सर्व;
तीं चूतबोधवचनें गमलीं सुपर्व
कर्मार्थ कर्म करुनी जगतीं कृतार्थ--
होईन; वा पडुनि राहिन मी निरर्थ. ३२

लक्ष्मण हरी वराडकर.

कवितासुंदरी.

श्लोक.

स्रष्ट्यानें सृष्टिकालीं सदयतर गुणें निर्मिली रम्य भाषा;
त्या रम्य सुंदरीला तरुणपणिं पुढें चारुवक्त्रा सुवेषा--
बाला झाली शुभांगी, मग जनिं कविता नाम पावे सुरेख;
अंगींच्या सद्गुणानें अमरपण जगीं पावली फार देख. १

शीलानें यौवनानें सुरुचिर वपुनें शोभते दिव्य-वर्णी;
शोभेतें द्यावयाला अधिक; धन कुणी पाहिजे तो सुवर्णी;
जैसा जैसा सुकाव्यीं कुशल धव मिळे सुंदरीला विलासी,
तैशी तैशी स्वरूपें अधितर खुले गात्रयष्टी सुवासी. २

श्रीमंता ती न भाळे गुणरहित अशा; द्रव्य आशा तिला ना;
भाळे ती त्या कवींना गतधव अथवा पंगु वा अंध त्यांना;
रूपाचें भूषणाचें नच मुळिं तिजला मूल्य वाटे जगीं या;
काव्यालंकार कोणी तिजवरि चढवी सिद्ध ती त्या वराया. ३

शब्दालंकार घाली, नटवि तनु तिची शब्दलालित्य वस्त्रें,
गांभीर्यें सौष्टवानें मधुर नव रसें वाग्विलासें विचित्रें,
अर्थानें कल्पनेनें रुचिरतर गुणें भूषवी जो तियेला,
कंठीं माला स्वहस्तें रमणिय कविता अर्पिते त्या नराला. ४

भार्येतें सहचारिणी जन अशी देती विशेषाभिधा,
मातें तथ्यविहीन तें गमतसे, ती योग्य ना त्या पदा;
आहे एक वधू जिनें कवि हृदीं आवास केला सदा;
योग्या ती कविता असे कविमनीं एकत्र जी सर्वदा. ५

गांगेय

नीतिसार.

आर्या.

आपत्ती दे देवा ! मायापाशीं न गुंतुं दे हृदय
तव भजन नित्य करुनी, रानीं राहीन सत्य शांतमय १

सदाशिवात्मज.

काव्यरत्नावली.

अंक ८ वा.

बाष्पबिंदु !

श्लोक.

सूर्याचीं किरणें सुवर्णमय हीं वा शारदेंदुप्रभा
तारामंडलमंडितांबर, लैसद्देवेंद्रकोदंड तें
संध्याकालिकरागरंजितपयोवाहभ्रमत्खंड ही
हा ! हा ! दग्धमनोविनोदन कसें यांहीं करावें बरें ?
तेजोगोल नभःस्थ सर्व दिसती निस्तेज मल्लोचनां
स्वस्यामानन लाजुनी लपविती मेघां करोनी पुढें !
आहे चित्त मदीय गाढ तिमिरें व्यापून गेलें पुरें—
बाहेरील वृथा प्रकाश जड हा त्यातें निवारी कसा ?
गानें मंजुल काय होत मजला कैल्लोलिनीची गडे !
विद्युन्नर्तन तारकाविलसन प्रेक्षोनि वाटे श्रम !
कुंजान्तीं अलिपुंजगुंजनमिषें गाती वनश्री किती
आकर्णून तयास शूल उठतो मन्मस्तकीं तीव्रसा !
सांगें दुःसह ही वियोगरजनी आहे अजूनी किती ?
कंठावें वद नष्ट जीवित कसें गाळीत अश्रू सदा ? १

वर्षाकालिं मदीय दुःख बघुनी दुःखाश्रु ढाळी घन
हेमंतीं तरुवृंद दीन दिसती गाळोनि पर्णें पहा !

---

१ शोभिवंत इंद्रधनुष्य. २ नदी.

ग्रीष्मीं प्रेयसि ! पाहिं कोमल मना जाती सुकोनी नद्या
मद्दु:खें जडही रडे मग गडे कां तूंच ही निष्ठुर ?
हा ! हा निष्ठुर मानुनी तुज वृथा देऊं कसा दोष मी ?
आहे इंदुकरांहुनी मृदुल त्वच्चित्त हें जाणतों !
त्वत्प्रेमाचरणें पवित्र मधुरे ! येतां मनीं मोहुनी
आनंदाश्रुतरंगिणी प्रियकरे ! वाहे जवें लोचनीं !

नाहीं निष्ठुर लाडके ! मन तव प्रीती असीमा असे !—
आहे दु:सह हा वियोग मजला झाला ह्मणूनीच गे !
मेघव्याप्त निशीथकाळिं तरला विद्युत् प्रकाशे क्षण
वाटे दारुण अंधकार मग तो, झाली तशी मत्स्थिति !
नाहीं हा विरह त्वदीय जर गे ! होणार केव्हां दुरी—
घे हें प्रेम तुझें कसें ! मज नको तें नित्य दु:खप्रद ! २

हा धिक् ! उन्मन होउनी प्रलपतों, घेऊं नको तें मनीं
प्रेमावीण तुझ्या क्षणैकहि कसें राहील हें जीवित ?
अस्मन्मेलन तें कदापि न घडो आ[1]देहपात प्रिये—
नित्य प्रीति परस्परांवरि करूं झाली जरी निष्फळ !

ती होईल परंतु निष्फळ कशी ? प्रेमीं असिद्धी नसे !
प्रीती गे करणें प्रियावरि सदा प्रेमी गणी लाभ हा !
हे दु:खाश्रु पुसावया जवळ तूं नाहींस आतां तरी--
आहे याहि मला स्थितींत सुख तें लाभेल कोणास का ?

हे निश्वास, उदासवृत्ति अथवा उष्णाश्रुबिंदुव्रजें
यांहीं दु:ख दिसे मदीय परि तें आहे बहु श्रेष्ठ गे !

१ मरेपर्यंत. २ समुदाय.

स्वेच्छें पंकिलैंपल्वलांबुकणिका सेवून आनंदणें
हें सोडून तृषार्त चातक सदा कादंबिनी प्रार्थितो !
हीनानंदनिमग्न होउनि वृथा जावें मनीं गुंगुनी
त्यापेक्षां मज उच्च दुःखहि गमे आहे सुखाचें खरें ३

नाहीं रूक्ष मदीय दुःख परि हें होतें मन व्याकुल
अश्रु श्रेष्ठ असोत गे किति, परी अश्रूच आहेत ते !
होणें जीव सरिन्निमज्जित दवज्वालावलीवेष्टित
आहे अंतर फार यांत सखये ! मृत्यूच येतो तरी !
अर्धोन्मीलितरम्यपद्मनिभ तें हास्योल्लसत्त्वन्मुख
केव्हां पाहिन ?--चिंतनीं अहह ! या जाती अहर्यामिनी !
वाक्पीयूषतरंगबिंदु सखये प्राशीन केव्हां मुदें ?--
अश्रू धन्य मनोरमे ! तव करस्पर्शें कदा होतिल ?
ही केव्हां तरि गे सरेल तिमिरव्याप्ता निराशानिशा
सोन्याचा दिन मंगल प्रभुकृपें येईल सौख्यप्रद !--
आशाबंधन हें जरी न असतें, होती निराशा पुरी,
घेता हा तव दास भग्नहृदय स्वर्गीं भरारी जवें !
प्रेमानंदसरोविहार करुनी तूं हर्षवीशी मला
केव्हां, कोंवि, खरेंच सांग, दयिते होशील दृग्गोचर ? ४

शोभे मेघपरंपरेवरि कशी तेजस्विविद्युच्छटा
या पापी जगतीतलीं विहरसी तूं प्रेममूर्ती तशी !
नीलाकाश अनंत दिव्यविलसत्तारागणीं राजतें
तैशी ही हतमेदिनी तुजमुळें धन्या जहाली खरी !

---

१ चिखलानें भरलेलें. २ मेघमाला.

स्वर्गा सोडुनि धावुनी सुरधुनी आली जशी खालतीं
तूंही सत्य तशीच जन्मुनि गुणें पृथ्वी अलंकारिली !
तूं देवी मम ! शांतदृष्टिस तुझ्या होईन का आस्पद ?
झाली दुःसह अल्पकालविरहीं दीना मदीया स्थिति !
नाहीं शोक करावयास मजला देवें गडे निर्मिलें
जाणें हें परि दुःख हेंहि मजला भासे महातीव्रसें !
प्रेमस्थानच नाहिं ज्यास असले आहेत लोकीं किती
माझ्याभोंवति सर्वतां उसळती प्रेमोर्मिमाला सदा !
सांगे गे पण काय ठाउक नसे येणार आहे रवि ?—
होती म्लान तरी दिनान्तसमयीं अंभोरुहें लाडके ! ५

मी लोकव्यवहार पाहुनि करीं यत्नें मनःसंयम
केला फार विचार अल्पहि तरी नाहीं समाधान गे !
त्वत्प्रेमस्मृति होउनी विरह हा झाला न केव्हां उणा
गंगेच्या स्मरणें कदा न सरते तृष्णाकुलाची व्यथा !
प्रत्यक्षांत मिळेल जें सुख न तें ये कल्पनेनें कधीं
शांती केवि करील वास हृदयीं या त्वद्वियोगीं गडे ?
आहे हा अविचार तूंहि ह्मणसी, नाहीं ह्मणावें कुणी ?
वेडें प्रेम परी मदीय सरले ! हें धावतें सारखें !
उत्कंठाज्वलनप्रदग्ध जन हा त्वद्दर्शनांबूत्रिणें
कैसा होइल शांत ? धन्य नयनें होतील केव्हां वद ?
या दीना हसवीत इंदुकलिका येणार रम्या कदा ?
केव्हां होइल शीतचंदनरसें ही मेदिनी सिंचिता ?
प्रेमोत्कंठित दृष्टि लावुनि तुझ्या मार्गाकडे सारखा
आहे कंठित काल दुःसह तुझा हा भक्त कैसा तरी ? ६

१ गंगा.

बाष्पांभःसरिता[1] मदीय नयनापासून जी वाहते
सारें विश्व तिच्या प्रवाहिं सखये जाईल विध्वंसुनी !
लोकानंदन मी कवीच जर गे ढाळीत अश्रू बसूं
आशा प्रेमविलास हास भुवनीं उत्पन्न होती कसे ?
ये, माझ्याकरितां नको, परि गडे लोकोपकारास्तव !
दावी हास्यमुख त्वदीय, सुवचें वारून चेतस्तमा
होओत प्रियदर्शनें तव सदा गे धन्य मल्लोचनें
आनंदीं बुडवीन विश्व सगळें मी गायनें गाउनी !
श्याम व्योम विशाल सोडुनि जयें येतील तारे भुवि
रत्नें सुंदर लोळतील चरणीं पाषाणखंडापरी
सोत्कंठामरसुंदरी करितिल प्रेमें इथें नर्तन
पापेच्छा लवही न लोकहृदयीं राहील चेतोरमे !
स्वर्गाचें रमणीय रूप भुवना आणीन मी सत्वरीं
माझ्यासंन्निध हासत प्रियकरे तूं मात्र राहीं सदा ! ७

अंभोदावळि अंबरीं विलसते विद्युत्प्रभा भासुरा
हर्षें लास्य मयूरवृंद करिती सोत्कंठ तद्दर्शनें
तें तन्नर्तन पाहुनी चकित गे होतात भिल्लांगना
पाहोनी तुज, रम्य गान करितों, ऐकून डोले जगत् !
तूं मूर्त प्रतिभा न सन्निध कसें गाणें सुचावें मग ?
गानाभावि जगांत हास्य कुठलें उत्पन्न होईल गे ?
तूं हास्योद्गम, न प्रमोद तुझियावांचून कोणा मिळे !
झाली शुष्क पहा तुझ्याविण गडे ही सौख्यकूलंकषा[2] !

---

१ अश्रुजलाची नदी २ नदी

तेजस्विप्रखरांशुतप्तपुलिनीं झाली तनु व्याकुल
दीनाला तुजवीण सांग दुसरा आहे कुठें आश्रय ?
ये ये प्रेमसुधांबुवर्षिणि ! तमः[1]पुंजेंदुरम्य प्रभे !
आनंदांबुधिला चढोत मधुरे ! वीची[2] नभःश्चुंबिनी !
देवांनी स्वपुरास जें पळवुनी पीयूष नेलें पुरा
तें त्यांशीं झगडून संगरिं गडे आणीन या भूवरी !

भृंगांचें मज मंजु गुंजन गमे तें शोकगीतापरी
वाटे हा विकचें[3] प्रसूननिकर प्राणेश्वरी म्लानसा ?
गाती निर्झर गान भासत मला तेंही विलापासम
हा ! हा ! आज मनोज्ञ सृष्टि सगळी झाली विपर्यस्त[4] ही !

होत्या हासत ज्या सदा, विलपती त्या आज या तारका
अश्रू ढाळिति, ते पहा दंवमिषें पुष्पांवरी साचले !
सारी सृष्टि उदास दुःखित पहा झाली वियोगें तुझ्या
सिंधू वाढति, वाहतात तटिनी, अश्रूच हे सृष्टिचे !

शोकाच्या लहरींत विश्व सगळें गेलें बुडोनी दिसे
गेलें प्रेम लयास, खास गमतें आनंद झाला मृत !
आतां काय जगांत ? शून्य अवघें ! ढाळीत मी दृग्जला
चेतश्चंद्रकले ! कठोर मरणा प्रार्थीत आहे इथें !
झालें भग्न न हें मदीय हृदय, प्राणें न जों त्यागिलें
तों ये धांवत मानसैकललिते ! दे एकदां दर्शन !

आहे दीन कशी त्वदीय विरहें झाली मदीय स्थिति—
हें ही कोमल शांत वायुलहरी सांगेल सारें तुला

१ अंधकार समुदास चंद्राच्या कांतीप्रमाणें असणारे २ लाटा ३ विकासि पुष्पांचा समुदाय ४ उलटी

चित्तीं आठवुनी तुज प्रियकरे ! अश्रू सदा गाळितों
तैं तन्मार्जन हीच नित्य करुनी दावी दया निस्तुला !

झाली काय विशुष्क पूर्ण अहह ! त्वत्प्रीतिकल्लोलिनी ?
कां माझा बघतेस अंत ? तुजला येओ दया थोडकी !
माझे अश्रु बघून काय छलिके आनंद होतो तुला ?
ये ये सत्वरि गे विनोदसमय प्राणेश्वरी ! हा नसे

सांगें तीव्र वियोगकाल अजुनी आहे किती शोभने ?
केव्हां होइल रम्य दर्शन तुझें याला चिराकांक्षित ?
या जन्मीं दिन तो खरेंच सखये येईल कां गे कधीं ?--
कीं तेव्हां विरह त्वदीय पळही होणार नाहीं मला !
आहे काय खरेंच भाग्य असलें माझें ? न वाटे खरें
ही आहे हतभागिनी वसुमती, ती स्वर्ग व्हावी कशी ? १०

होते ही अवनि प्रकाशतिमिरें कालक्रमें आवृता
संसारीं सुखदुःख तेवि सतत प्राण्यावरी येतसे
आले सांगत थोर कीं, न टिकते केव्हांहि एक स्थिती
तेजस्वी दिन आणि गाढ–तिमिरा रात्रीहि जाते लया !

तत्वाची मधुरानुभूति मजला येईल या केधवा ?
आहे मानसकैरवेंदुकालिके ! कीं शुष्क पांडित्य तें ?
केव्हां येइल ती सुरम्य उदया त्वद्दर्शनोषा प्रिये ?
किंवा राहिल ही वियोगरजनी प्राणावधी दुःसहा ?

सारी सृष्टि नितांतमोहक, दिसे झाली तमोमज्जिता
या बाष्पाकुल लोचनां न दिसते कोठेंहि अल्प प्रभा !

हा ! हा ! दर्शन दर्शनीय ललिते ! होई न जेथें तुझें
पाहूं काय दुजें भयाण जगतीं ? माझी वृथा दृष्टि ही !
प्रेमालाप तुझा न मंजुल तरी मत्कर्ण हे निष्फळ
नाहीं स्पर्श तुझा तरी झडकरी हा देह जाओ लया! ११

तेजोभूषित, इंद्रकार्मुक करीं या दिव्यनीलांबरा
मेघश्यामलमालिका[1] सुहसिते ! आधीं तिथें उद्भवे
तूं नाहींस सुमंजुभाषिणि ! परी उत्साहसंवर्धिनी
वाटे विस्मय हाचि कीं-अजुनि ही वास्तव्य माझें असे !

कर्तव्यच्युत होउनी निशिदिनीं ढाळीत अश्रू बसें
दुःखाची मम कल्पनाहि न जयां वेडा तयां मी गमे !
मी वेडाच असों, कधीं न मम हे जाओ लया वेड गे
स्वार्थी ज्ञान नको मला विसरवी त्वन्मूर्ति जें प्रेमला !

अश्रू वाहुनि सर्वदा तनुहि ही जाओ विरोनी गडे
किंवा या विरहानलें हृदय हें होओ कसें भस्मसात् !
आहा ! त्वद्गुणचिंतनांत असतां वृत्ती विलीना मम
आला मृत्यु तरी न धन्य दुसरा भूमंडळी मत्सम !
होओ दर्शन गे त्वदीय, अथवा येओ कसा मृत्यु तो
हा ! हा ! तीव्र वियोग संप्रति परी झाला महा दुःसह ! १२

रेंदाळकर.

---

१ मेघांची कृष्णमाला.

सुभद्राविवाहकाव्य.

सर्ग आठवा.

गीति.

रम्य कुटी दलनिर्मित शोभतसे रैवतकनगावरती;
कुसुमश्री पाहुनियां, ताप न तेथें उरेच पाव रती, १
ब्रह्मानंदीं लावुनि लय, त्या स्थानीं यतींद्र तो बसला.
वैराग्याचा बाणा त्याच्या हृदयांत सर्वथा ठसला. २
दिपवी निज तेजानें नयनातें जेविं चंड--भानु रवी;
हृदयस्थ अंधकारा त्याची शिवशील चंडभा नुरवी. ३
पर्णकुटीच्या संन्निध रम्यलतातरुनिकुंज नव साजे;
सुखविति तुषार तनुतें, तेथें चरतात रात्रदिवसा जे. ४
होउनि मत्त, निरंतरपुष्पलतागलदमंद मधुपानें,
श्रवणसुखद गुंजारव चालविला सर्वकाल मधुपानें. ५
बसली रम्य सुभद्रा सखिसह तेथें शिलासनावरती;
वदली सखीस होउनि हृदयाची वृत्ति मग अनावर ती; ६
“ सखये ! दुःख उभें हें अनुदिन नयनांसमोर सत्य पहा !
अणुमात्रही करी ना करुणा मजवरि दयाळु सत्यप हा ! ७
असतां यतिसेवारत, त्याचा लवमात्र पडतसे विसर;
परि अन्य काळ येतां, नयनांतें व्यापि घनतमःप्रसर ! ८
चिन्ताग्निज्वालांनीं गेलें हें गात्र सकल जळुनीयां !
मळलें कपोलतलही नयनांतुनि अश्रुपूर गळुनीयां ! ९
होय समस्तहि माझा आनंदाचा समुद्र विरस रिता !
होई शुष्क प्रतिदिनिं तनु मम ! ज्यापरि निदाघगत सरिता ! १०
स्वप्नीं बघुनि सुयोधन मूर्तीतें मी नितान्त--भयदेतें,

ओरडतें मोठ्यानें ! आतां मज कोण गे ! अभय देतें. ११
गमती भोग विषासम ! तनु जडे हीं ! बंधुवर्ग हा यमही !
झाली आतां मजला जीर्णारण्यासमान हाय ! मही ! ! १२
पाहुनि दुरवस्था ही, मातेचा मात्र जीव कळवळतो;
परि हाय ! हाय ! सखि ! हा अणुमात्र न बंधुकर्म खळ वळतो ! १३
मातेनें कृष्णा बहु कथिलें, परि होय तें निवळ वायां !
सांग सखी ! दुष्टातें कोण जगीं या समर्थ वळवाया ? १४
आतां यतिसेवा ही मम दुःखा हरिल या विपत्कालीं;
चित्तीं प्रसन्न होउनि नेइल सत्वरि लया विपत् काली १५
ब्रह्मानंदें सद्यश हा साधुसमाज गाय तव माये !
नच विश्वमूलभूते ! अद्भुत महिमा जगांत तव माये. १६
सजला--कल्पुनियां बलि,--मजला जन हा यमा यजाया गे !
झालें विजयाची मी भज लाज न हाय माय जाया मे ! १७
भेदन करिती विजयास्तव शर हृदयास कामदेवाचे;
तव करुणेविण जन हा हाय ! कसा दासकामदे ! वांचे ? १८
समुचित सहकारातें लता अनुसरे न कोमला कां ही ?
मी अनुसरेन पार्था; याविण दुसरें नको मला कांहीं. १९
जगदंबे ! या लोकीं करुणेची तुजसमा नदी नांहीं;
नाहीं त्यापरि अन्या विपद्गता मजसमान दीनाही. " २०
वदली तीस सखी, " मज दुःख गमे बघुनि या वदन--कमला;
सखि ! पूस नेत्र वेगें; करील करुणा दयासदन कमला. २१
वदला यतिवर, ' अचिरात् मिळविल अनुरूप वर सुभद्रा ही; '
जगदंबिकाप्रसादें युक्ता होईल वर--सुभद्रांहीं. २२
भूतभविष्यज्ञानहि जगदंबा ज्यास भद्रिके ! वितरी !
होइल त्या साधूची वितथ गडे ! ही सदूक्ति केविं तरी ? २३

सुकवी निजप्रसादें अंबा सकला विपन्नदीनातें;
तीच महादु:खांतुनि रक्षी विकलां विपन्न--दीनांतें. २४
तरि पूजीं अंबेतें तच्चरणीं धरुनियां महानिरतिं;
होइल कल्याण सदा नच होइल गे ! कदापि हानि रतिं. २५
जीचें सेवन करितां, न उरावा भोगतापदाह रतीं;
विचरे नामसुधा हीं सर्वत्र मनोगता पदा हरती. २६
चल ऊठ गडे ! आतां; जाऊं या यतिवरा नमायाला.
त्याच्या शुभ करणीला पुरी पडे क्षिति बरा न मायाला." २७
झाल्या तच्चरणीं मग लीन सुखें, जेविं भृंग मधुपातीं;
वरिती पदरेणु, जसा सेवावा पुष्परेणु मधुपांनीं. २८
वदला यति मग तिजला, " हो धन्या शिवपरंपरा--लाभें;
अनुगुण पतिला मिळवुनि, लोकीं सुखवैभवां परा लाभें. २९
श्रीजगदंबा देवी पुरवो गे ! तव समीहित वरा तें;
तीच्या वरप्रसादें मिळवी वेगें समीहित--वरातें ३०
प्रेमभरानें जीतें सेवितसे सर्वदा सदाशिवही;
वितरो तूज दयाघन जगदंबा सर्व--दा सदा शिव ही. ३१
उष्णश्वास तुझा हा, अन्तर्गत दु:ख सत्य तव दावी;
शंका न धरींच शुभे ! दुरवस्था मज मनोगत वदावी. ३२
अभिनव यौवन भरलें, लावण्याची लताच नव सुतनु;
थोर कुळीं जन्म तुझा, दुरवस्था होय केविं तव सुतनु ! ३३
सिद्ध सदा वीरांची करण्या तव इष्ट काज नव सेना;
तुजसम लोकीं विमले ! भाग्याचा कन्यका-जन वसे ना. ३४
बलराम--कृष्णनाथहि जपती जीतें सदाहि सुखत्राया;
कोण समर्थ जगीं या वद तूतें चारुगात्रि ! दुखवाया ! ३५
तुझिया लावण्याची कीर्ति पसरली खरी महीवर ही;

त्वत्पदकमलमरंदीं लोळति मधुपापरी महीवरही ! ३६
दुर्लभ नाहीं तुजला वस्तु खरोखर जगांतली कांहीं;
मग सांग सांग बाले ! दुरवस्था तूज पातली कां ही ? ३७
कोणासाठीं हृदयीं झुरसि सदाही ? सुगात्रि ! मशि वद; ने--
शंका हृदयांतिल ही सत्वर विलयास पूर्णशशिवदने ! " ३८
लज्जित होय सुभद्रा; वदली मग तत्सखी यतिवरातें;--
" झुरते हृदयीं बाळा, चिन्तुनियां निज महामति वरातें; ३९
रूप तयाचें चिन्तुनि, रात्रंदिन बहु मनांत झुरते ही !
विरह--जनित दुःखानें जातें भरुनी समस्त उर तेंही ! ४०
उत्कंठेनें सखिचें होउनियां चित्त लोल, तळमळतें !
अविरत नयनजलांहीं तन्वंगीचें कपोलतल मळतें ! ४१
लागुनि गेला त्याचा ध्यास, इला कोण अल्प समजावी ?
विरहानल पेटुनियां हृदयीं, बहु, रात्र कल्पसम जावी ! ! ४२
गेला प्राणसखा तो सोडुनि, सखितें न करमतें कांहीं !
क्षम कृशकाय सखी मम सोसाया दुःख परम तें कां ही ? ४३
स्वप्नीं प्रियमूर्ति बघुनि, जागी ही होतसे खडबडोनी;
हृदयस्था दुरवस्था दावि असंगत असें बडबडोनी. ४४
मध्यान्हीं तप्त करी जेव्हां क्षिति सूर्य भीष्मकिरणांहीं
तेव्हां लोळत पडते लतानिकुंजांत मरणशरणा ही. " ४५
यति तीस वदे, " हा ! हा ! मुकली विमलस्वभाव सुमती ही;
गवसे ना रत्न असें, भ्रमतां रत्नप्रभा वसुमतीही; ४६
झटतील अन्य जनही सुभ्रु तुझें नव नव प्रिय कराया,
हा ! हा ! तुजला टाकी काय ह्मणावें तव प्रियकरा या ? ४७
टाकुनि तुजला दुःखीं, जो अन्यसुखामधें बहुत रमला;
हा ! हा ! निर्दयमति तो गमतो प्रियकर तुझा बहुतर मला ! ४८

बोले ! चिन्ता व्यर्थचि ही तव हृदयास कासया लागे ?
शोधी स्वयेंच मधुकर, नच कधिं कलिकाविकास याला गे ! ४९
जी निजभक्तजनांचें दुःख सकलही हरावया जागे;--
ती ही श्रीजगदंबा; पूजन तीचें करावया जा गे ! ५०

आठवा सर्ग समाप्त.

————————कै. श्री. ना. मुजूमदार बी. ए.

बा ! दावानळा !

श्लोक.

येऊनी घन नील शांतविति भू संतप्त धाराजलीं;
होऊनी अमलान्विता नवमही तेणे बहू राजली;
हेमंतें सदलंकृता करुनियां गेला न मासावधी;
तों ही निर्घृणता तुवां पसरिली कैशी खला ! मंदधी ? १

वृक्षांहीं परिवेष्टिता तरुलता जेथें बहू डोलल्या;
प्राशोनी मकरंद भृंगततिही तैशा सुखें हिंडल्या;
जेथें मोर पिसें उभारुनि बरीं आनंदुनी नाचले;
तेथें स्वैरपणें तुवां अजि असें हें काय आरंभिलें ? २

झाले त्रस्त पशू तृणाविन जई, संतप्त होती इथें;
तूं कां व्यर्थ बरें तदीय अशना संहारिशी बा ! तिथें ?
वृद्धा जाहलि ही धरा; न गृहिं तत्सद्बंधु मेघावली !
तूंतें हें करण्या विडंबन तिचें संधी बरी फावली ! ३

ज्वाला ह्या गगनीं तुझ्या उसळती राहूनि राहूनिया;
काष्ठांचा उठतो ध्वनी कडकडा चोहींकडे त्यांत हा;

झालों कानीनं मी तटस्थाचि असा त्वद्रूप हें पाहुनी !
होते आंतिल कल्पना कधिं कधीं ती बाह्यरूपाहुनी.
ज्यांहीं प्रेमभरें धरा प्रतिदिनीं ही न्हाणिली येउनी;
ज्यांहीं भूषविली जणों हरित तो शाल्ढू करीं घेउनी;
वर्षर्तू घनसंगमें मितदिनीं येती जईं बा इथें,
तैं त्यातें कथिशील काय ? अथवा जाशी लपोनी कुठें ?

पाहोनी तव दुष्कृतीस, घन हे सक्रोध कीं जाहले !
जाणों तन्मुखिंही झणी पसरली आरक्तता त्यामुळें !
क्रोधोर्मी उठतां मनीं तदिय ह्या गंभीर कीं गर्जना;
कोठें तूं असशी कसा न दिससी आतां खला दुर्जना ?

हीतें भूषवुनी तशीच जलदश्रेणी फिरे ती पुन्हा;
' कीं जो दंडियला अपाय न करी. ' हें सत्य वाटे घना,
हा ! हा ! काय वनानला फिरुनियां त्वां हेंवि आरंभिलें ?
" जात्या जे खळ तन्मती न वळतें " हें तत्त्व आहे भलें.

रे ! रे ! घाबरली पहा ! हरिणि ही त्वज्जालरेषांतरीं;
प्राणार्थी पथ शोधिते न गवसे हो दुःखिता अंतरीं !
गाळी तत्पति अश्रु तद्रमणिही भावी वियोगानळें !
हा ! हा ! देखत घात तद्रमणिचा केला खळें त्वां बळें !

त्वज्ज्वाला, ध्वनि, धूर पाहुनि, जणो वर्षर्तु हा पातला,
ऐसें जाणुनि, बर्हिवृंद अवघा नाचावया लागला.
वृक्षांच्या समवेत भक्षुनि तया त्वत्तृप्ति ना जाहली !
येथें मात्र अतां तुझी अदयता संपूर्णता पावली ! !

हो ! हो ! शांत गड्या ! पुरे, न अजुनी कां कोप हा जाहला ?
कीं ज्या घर्षण मात्र कारण असे तो शांत होवो भला !

छे! मी काय असें खला कथितसें ज्या लेश ना हें रुचे ?
होता हें तृणहीन कानन तदा जाळावया कायसें ! १०

——— दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी.

समाधान पत्र.

ठेविलें अनंतें तैसेंची रहावें, चित्तीं असूं द्यावें समाधान.

—तुकाराम.

दे. भ. श्रीमति साळूबाई अनगळ,

मु० मुंबई,-- यांस.

श्लोक.

न पादस्पर्शें मी तव पुनित झालों महिवरी.
तुझ्या श्रीचा गंगा कधिं न वळली गे! मजवरी.
नसे म्यां पाहीलें नयन भरुनीयां कधिं तुला.
न मीं ऐकीली तत्‌श्रवणमधुरा वाणि अतुला. १

तुझा माझा कांहीं मुळिं निकट संबंध नसता,
कळे ना कां माझे मनिं खळबळे शोकसरिता !
लता सौभाग्याची कुसुमित गृहोद्यानिं रमतां,
गजानें वैधव्यें तुज तुडविलें ! दैव फिरता ! २

शशीसान्निध्यानें विलसत जशी रोहिणि असे,
जलौघस्पर्शानें कमलिनि जशी सुंदर दिसे,
जशी गंगा शोभे जलनिधिनिवासें त्रिभुवनीं,
तशी तूं होतीस प्रियपतिसवें भूषित जनीं ! ३

सुखाची त्या गेली घडि उकलुनी कायम परी.
सुरी उद्वेगाची निशिदिनिं तुला व्याकुल करी !

पती नेला बाई ! उचलुनि तुझा कालगतिनें
करावें कैसें त्वां विधिहत सुशीला युवतिनें ?

किती तूं नाथातें स्मरशिल मनीं हाय विनयी ?
किती वेळां त्याची करशिल उभी मूर्ति हृदयीं ?
कितीदां तत्प्रेमार्णव सुखदसा न्हाणिल तुला ?
तुझ्या प्राणेशाचा चिर विरह जाळील तुजला !

अहा ! पोटीं पाठीं तुज इहजगीं कोणि नुरला
तुझी वृद्धा सासू ! स्थविरपण कष्टप्रद तिला !
अशा वार्धक्यांत स्वसुतविरहानें करपणें
अगे त्यापेक्षां तें मरण बरवें व्यर्थचि जिणें !

तथापी तत्सेवा समयिं असल्या योग्य करणें
सुशीला साध्वीनें अनुपम यशानें मिरवणें;
करावें तें आर्ये ! स्मरुनि पतिच्या सुंदर गुणां
तदात्म्यातें संतोषवि खुणवुनी त्वत्प्रियजना

निघूनीया जावा कुडितुनि क्षणीं प्राण सहज
तुझी तेवीं झाली स्थिति दिसतसे येथुनि मज !
पती गेला हा ! हा ! त्यजुनि तुजला देवसदनीं
गमे पक्षी गेला उडुनि दुसरें झाड बघुनी !

पतीवांचोनीयां तुज समज सारेंच लटिकें
जिथें प्रेमा नाहीं हुरहुर तिथें केवळ टिकें.
जिथें निष्कापट्यें हितगुज कथायास न पती
तिथें कैची आशा तिळभर सुखाची भगवती ?
सुखाच्या आशेचा झटकन असा तंतु तुटता
वियोगाग्नीनें त्वत्तनु भडभडां दिव्य जळता

'पती माझी संजीवनि' समजुनी जाशिल सती
परी घे ऐकूनी क्षणभर तरी एक विनती. १०

सतित्वाची व्याख्या तनुस दहणें ही मुळिं नव्हे
सतित्वानें मुक्ती सखि बनतसे सत्य नचि हें !
पतीचे हेतू जी पुरविल तया चिंतुनि मनीं
खरी ती साध्वी गे ! तिजसम दुजी धन्य न जनीं ११

करी स्वदेहाचें सतत भगिनी ! सार्थक असें
तुझी सेवा देवाजवळ रुजु होई भरवसे !
मना वाटे व्हावा दयित अपुला सन्निध सदा
मनातें यासाठीं करि दयितरूपी हरिखदा ! १२

मना संबोधूनी स्ववश करुनी निश्चितपणें
नराचाही नारायण बनतसे धीरकृतिनें !
सती सावित्र्यादि स्ववश करुनी एक मन तें
सुकीर्तीच्या झाल्या प्रिय भगिनि मोठ्या स्वचरितें ! १३

जरी आहे ऐसें तरि मन तुझें आधिन करी
तयाच्या योगानें चिरसुख तुला होइल घरीं !
सुखाची भोगेच्छा, पतिविषयक प्रेम अथवा
असे जी जी वांछा, विभुमय करी ती अभिनवा ! १४

बघावें हें सारें त्रिभुवन बये ! ईश्वरमय
मनातें संबोधी 'स्वमनिं धर तूं ईश्वरमय !'
मना आहे आत्मोन्नति करुनि घेणें प्रथमतः
म्हणूनी तूं घेई विबुधवचनीं लाभ पुरता. १५

पूर्वीच्या सुकृतें सुखासुख जसें दैवें मिळे आपणा
घ्यावें भोगुनि तेवढें जगिं तसें सोडोनियां मीपणा

शोकाचे समयीं विवेक करणें शंभू मनीं चिंतिणें
आत्म्याचे चिर उन्नतीस्तव तया भक्तीबळें प्रार्थिणें. १६

आत्मोन्नतीवर असे तव सौख्य भावी
भावी तिथेंच परमेश्वर, रूप दावी;
हें सर्व विश्व भरलें परमेश्वरानें
त्या आळवीं सतत तूं करुणारवानें. १७

सारांश ईश हृदयीं दृढ आकळावा
ज्ञानें करूनि मग तो मनिं ओळखावा!
संपादुनी गुरुकृपेप्रति घे अपार
तूंतें करील तरि ती भवसिंधुपार. १८

बाई! तुझें सुख तुझ्या करिं नांदताहे
तें भाव तूं अनुभवी तुज सूचना हे.
' अंतीं विनंति करितों भुवनैकपाला
' येवो न संकट असें कधिंही कुणाला.' १९

माझी कधींहि कविता नसते रसाळ.
मत्कल्पनाहि नसते सहसा विशाळ.
शोकार्णवीं तदपि मग्न तुला बघूनी—
नौका दिली त्वरित ही तुज पाठवूनी. २०

दादर, ता० ४–११–०९ } नम्र देशबांधव
कै० एकनाथ गणेश भांडारे.

प्रेमाचा पाळणा.

(चाल:—चद्रकांत राजाची०)

मदंकसिंहासनिं बैसुनियां रुचिर बाळराजा,
प्रेमें करितो दुग्धपान जैं स्तनिं यथेच्छ माझ्या. १

मम जीवाचा आधारचि तत्प्रेम मला भावे;
आनंद मला तैं होई, तो ब्रह्मांडिं न मावे. २
आंबेरे न हा पान्हा, पाना करिं माझ्या बाळा.
पोट भरुनि घे तृप्ति आपुली करूनि लाडिवाळा. ३
अंकावरि या निजुनी बाळा ! निद्रासुख घ्यावें;
माता, धात्री, तेविं पाळणा तुझा म्यांच व्हावें. ४
गृहकार्यांतुनि अल्पचि अवसर लाभे तुजसाठीं;
साधे ना लावाया दिन तव लालनिं, मी कष्टी ! ५
योजिन सर्वहि तव कार्यीं दिन; मोठी आस अशी--
आशा परि ती निष्फल होई ! ह्मणुनी दुःख मशी. ६
तथापि जोंवरि, सत्य सांगतें, जिवांत जीव असे;
तोंवरि वाहिन देह कार्यीं हा तव बाळा परिसें. ७
घेइं घेइं तूं झोंप सोनुल्या ! अंकावरती या;
तुझ्या सुखास्तव तुजवरि टाकिन ओंवाळुनि काया. ८
सुखें निजसि तैं वत्सलतेचा पूर हृदयीं लोटे !
मजसम सत्य न एक भूवरी अन्य धन्य ! वाटे. ९
शांत, मधुर, तव घर्मबिंदुयुत मुखारविंदातें--
पुनः पुन्हा अवलोकीं मी परि तृप्ति न नयनांतें १०
आनंदाचीं स्वप्नें तुजला दिसती सुंदरशीं;
मधुनि मधुनि तव मंदस्मित हें व्यक्त करी मजसी. ११
मंद निवति तव मधुर मधुर जों हे व्यक्त श्वासोच्छ्वास !
सुखास ये मम पूर, ओहटी ये भव-दुःखास ! १२
नीज सुखानें गोजिरवाण्या ! मम हृदयानंदा !
हेंचि गीत तुज गाउनि निजविन माझ्या सुखकंदा ! १२

सी. वा. पेंडसें बी. ए.

खगकूजन.

श्लोक.

लंघून मार्ग बहु, अस्तगिरीस आला--
जाया रवी थकुनियां निज मंदिराला;
दिक्प्रांत पश्चिम तयें बहु तप्त झाला!
प्राचीस त्या सुखविण्यासि सुधांशु आला. १

जाती सुखें चरुनियां खग ते गृहाला;
सोडोनियां कलकला, वरिती सुखाला.
धेनू वनांतुनि सुखें स्वगृहासि येती;
वत्सांसवें निजतनूस विसांववीती. २

ती भृंगपंक्ति मकरंद लुटून गेली;
आहे सुखें बहुत जी स्वगृहीं निजेली;
वायूहि वाहत असे बहुशीत शांत;
ऐसें धरी अवनि मौन अती प्रशांत. ३

ऐशा सुशांत रजनी-धव-राज्य झालें--
मी दंग फार; फिरण्यासि सुखें निघालों!
दूरूनियां परिसिलें खगकूजनाला;
झाला नहू भयद जो रव मन्मनाला. ४

ऐशा प्रशांत समयीं रव हा कुणाचा--
येई भयप्रदहि थोर कठोर साचा?
ज्या पादपावरुनि शब्द निघे महा तो--
जाई मनें बहुत शंकित मी तिथें तों. ५

घूत्कार तो पुनरपी बहु थोर होई;
जातां पुढें मज उलूक दिसून येई.

सप्रेम त्यास वदलों "वद पक्षिराया!
घूत्कार हा करिसि तूं अपरात्रिं कां या! ६

ती स्तब्धता स्वकरिं माळ जगास घाली;
गंभीरता अवनिसी अति तेविं आली;
विश्रांतिच्या समयिं ओरडसी असा कां?
विश्रांति घेसि दिवसा, फिरसी अतां कां? ७

रे लोक मूर्ख तुज मानिति तें न खोटें;
मूर्खत्व हें न विहगा तव काय मोठें?
जातात बा! तव खगोत्तम ज्या स्थानें--
तो नावडे तुज, रहा अपुल्या मतानें! ८

तूं श्रेष्ठलोककृत विस्मरलास रीत;
त्याच्यामुळें त्वद्वमान जगांत होत!
स्वीकार थोर जन वागति ज्या पथानें,--
तो पंथ; या जागिं रहा मग तूं सुखानें. ९

येणेंपरी करुनियां उपदेश त्यातें,--
जातां, पुन्हां परिसिलें खगकूजनातें;
मूर्खास आज बहु जो उपदेश केला;
तो सर्वही मम सुयत्न लयास गेला! १०

वासुदेव कृष्ण भावे.

विश्वांत शाश्वत न एकहि वस्तु पाहीं.

श्लोक.

झाले किती नृपति या जगिं सार्वभौम!
यन्नाम ऐकुनि भयें अरि भग्नकाम!

गेले परी सकल टाकुनि काल-गेहीं !
विश्वांत शाश्वत न एकहि वस्तु पाहीं ! १

तारे मना सुखविती चमकोनि व्योमीं;
त्यांतील कांहिं तुटुनी पडतात भूमी;
जाणें यमालयिं असे सकलां जनांही !
विश्वांत शाश्वत न एकहि वस्तु पाहीं. २

तो पूर्ण चंद्र गगनीं उगवोनि, देई--
आनंद सज्जनगणां; विलयास नेई--
दुःखास त्या [illegible]हुलीं क्षय केविं येई !
विश्वांत शाश्वत न एकहि वस्तु पाहीं ! ३

शौर्यें जयें सुरवरां रणिं हारवीलें;
ब्रह्मादि सर्व सुर बांदिंत ठेवियेले;
तो जाय राघव करें परि काल-गेहीं !
विश्वांत शाश्वत न एकहि वस्तु पाहीं ! ४

कंसें सुरां सकाळिकां छळिलें बहूत;
गो-ब्राह्मणांप्रति तसा बहु ताप देत;
मृत्यू तयां भगिनिपुत्रकहस्त देई !
विश्वांत शाश्वत न एकहि वस्तु पाहीं ! ५

केले पराक्रम बहू, जग जिंकियेलें !
जिंकावया जगत अंतिं न राहियेलें !
गेला शिकंदर असा यमराजगेहीं !
विश्वांत शाश्वत न एकहि वस्तु पाहीं ! ६

गोब्राह्मणांस छळिलें यवनें, ह्मणोनी--
स्थापी स्वराज्य अरिगर्व रणीं हरोनी;

त्यातें परी अदय अंतक गेहिं नेई !
विश्वांत शाश्वत न एकहि वस्तु पाहीं ! ७

नेपोलियन् नृपतिनें अरि मारियेले;
यूरोपखंड सगळें भयभीत केलें !
बंदींत वास करणें परि त्यांस येई !
विश्वांत शाश्वत न एकहि वस्तु पाहीं ! ८

जो देश वैभवगिरीवरती विराजे;
देखोनि ज्यांस अमरावति चित्तिं लाजे;
अंतीं परी विभव तें विलयास जाई !
विश्वांत शाश्वत न एकहि वस्तु पाहीं ! ९

त्र्यंबकसुत.

माझी आवड.

पद.

(चाल:— वाटे स्मशान शान्तिस्थान.)

आवड माझी छान. धृ०
शहाणपणा तो नको वाटतो;
स्वैराला जो बाध आणितो;
वेडाचा मज ध्यास बरा तो;
त्यांतच निशिदिनिं, गुंगुनि जाउनि फिरेन रानोमाळ. १

पुष्प--मालिका नको मुळीं; ती--
क्षणांत सुकुनी, होइल खंती !
कंटक त्याहुनि बहु आवडती;
मम हृदयाचे, चिरकालाचे, करिन सोबती त्यांस. २

प्रकाश वाटे फार भयंकर,
ऐक्य नाशुनी टाकी सत्वर;
तिमिराची मज आवड फार;
त्या शान्तींत, युगें अनंत, कंठिन माझा काळ--
अवकाशाच्या पायावरती--
रविकिरणाच्या रचुनी भिंती,
माड्या बांधुनि माड्यावरती,
त्या माड्यांत, सुख स्वप्नांत, निद्रा घ्यावी गाढ--
चैतन्याची सृष्टी रचुनी,
स्फूर्ति तियेची राणी करुनी,
आनंदानें गावीं गाणीं;
त्या गाण्यांत, त्या तानांत, विरुनी जावें पार--
जडता सोडुनि दूर पळावें;
दिसे न जें जें तेथें जावें;
अंधुक जें तें ठळक करावें;
काव्य तयाचें, गुंफुनि साचें, फेकुनि द्यावें छान.
आवड माझी छान.

राधानंदन.

सुभाषित.

आर्या.

स्वेच्छातृप्त्यर्थ नरें पातक लवही कधींहि न करावें.
क्षणभंगुर चपलेसम ऐहिकसुख नित्य हें मनिं धरावें.

चिंतामण माधव पिंपळसकर.

काव्यरत्नावली.

अंक ९ वा.

वायुलता अथवा ' व्हॉयोलेट् '

साकी.

अभिनव ' वायुलता '-कुसुमा ! हे ! शिशिरप्रांतनिवासी
ही तव सुंदर सुनील सुषमा मोहुनि टाकी मजसी ! १
कांति तुझी ही नयनमनोहर आनंदाची खाणी
शरत्कालिंच्या प्रसन्न गगना गौणताच कीं आणी ! २
असतीं सुंदर कुसुमें नानापरिचीं तीं उद्यानीं
तैशीं मनुजालागीं न कळत असंख्य फुलती रानीं. ३
एकहि नाहीं त्यांमाजी परि साम्य तुझें ज्या येई
सुवर्ण तैसा सुगंध तव तो मिळे न एका ठायीं ! ४
गंधहीन कुणि वर्णहीन कुणि ऐशीं बहु आढळती
परि नच सुम जें जयामाजि हे दोन्ही गुण तव वसतीं. ५
गुलाब चंपक परिमलविभवें ख्यात असति या देशीं
योग्य न असती परी तुझे ते व्हाया प्रत्यादेशी. ६
दिसे न कोठें महीतलीं उपमान तुझ्या कांतीचें
परी आढळे एकच गगनीं इंद्राचापिं तें साचें. ७
स्वातष्प्यिा त्या सरस वनाला रंगवि सुरकार्मुक जें
तान्निर्गतजलबिंदु होउनी कुसुम काय तव राजे ! ८
महासागरीं स्वातिसलिलकण शुक्तिगर्भि जरि पडती
मूल्यवंत अति विमल तयांच्या मुक्ता सुंदर बनती. ९
रत्नगर्भ त्या मेघाचे जे बिंदु वनांतरिं गळले
इंद्रनीलमणि त्वद्रूपीं हे काय होउनी ठेले ! १०

वनदेवीचा अलंकार तूं मनोज्ञ गमसी, खाशा !
गर्वहीन ज्ञाणि करिसी शारद धवलकांति त्या काशा ! ११
कुसुमें तव वा वनदेवीचीं काय चामरें असतीं
सम्राटाच्या रत्नखचितशा चामरांस लघु करिती. १२
मयूर नाचे निजवर्णाच्या गर्वानें आनंदें
तुला पाहतां विरमुनि परि तो ढाळि अश्रुजल खेदें. १३
प्रातःकालीं तुहिनबिंदु जैं चमकति तुझिया कोषीं
विरहकातरा कांता मम तैं येइ मनिं सजलाक्षी. १४
प्रेमोष्मा विरहिणीनयनजल सुकवि कांतकरपाशीं
भानुकरांचा स्पर्श तसा ने हिमकण तव विलयासी. १५
रविचें दर्शन होतां, सुहास्य खुलवी तुझिया वदना
मोद कुणाला जगीं न होई मित्र आलिया सदना ? १६
वनपटलें जशि झांकुनि टाकिति गगनीं सोज्ज्वल तारा
तेविं रोधिती घनपल्लव तव रुचिरकांतिविस्तारा. १७
विघ्नसहस्त्रां सारुनि गेई उदया जसा प्रतापी
किसलयबंधा छेदुनि तूंही विहरसि रवि-प्रतापीं. १८
निराश होतां नच जो धैर्या तुझ्यापरी अवलंबी
सुखप्राप्ति त्या निश्चित अंतीं, विघ्नें जरि आरंभीं. १९
निजपर्णांतुनि रविमुख बघसी हांसत डोंकावूनी
बुरख्यांतुनि जणुं निरखी पतितें विनयवती नव तरुणी. २०
प्रातःकालीं खेळत तुझियासंगें मारुतलहरी
हरण करोनी गंध मधुर तव दूर दिगंतीं विखरी. २१
मधुलोलुपशा मधुपावलितें त्वदीय परिमल मिळतां
तुला सेवण्या धांवे सोडुनि इतर लता सुमखचिता २२
अदृश्य राहुनि करिसी सुरभित मधुगंधें आरामा

प्रणयसुवासित कांतमना करि वियोगिनी जशि रामा. २३
तुझी माधुरी कुसुमा ! भूतलिं अतुल खरोखर गमतें
नंदनांतुनी कल्पलतासुम अवतरलें कीं येथें २४
अथवा कमलोद्भवा इन्दिरा प्रसन्न तुजवर झाली
अर्धोन्मीलित कलिका तव बा ! काय तिनें चुंबियली ! २५
प्रेमानंदीं दंग करी मज हा तव सुगंध खासा
युवतिललाम प्रिय दयितेचा मुखोच्छ्वास मधु जैसा. २६
दिव्य सुखप्रद कोमलता अति वसे तुझ्या आमोदीं
जेविं नवोढ प्राप्तयौवन प्रमदाप्रणयास्वादीं २७
चिरकालें तव विकास होतां सुमना ! सुखद वसंतीं
उसळति लाटा आनंदाच्या रसिकजनांच्या चित्तीं. २८
सुहास्यमुख तुज पाहुनि तैसी प्रफुल्ल होई सृष्टी
आत्मविकासें वाटे करिसी दिव्य सुखाची वृष्टी ! २९
मोदभरानें डोलति तरुवर मित्र तुझे प्रेमाचे
विलोकुनी तव ऐश्वर्यातें लतिकाभगिनी नाचे. ३०
मंजुलकंठें तुझी विहंगम गातीं वैभवगीतें
त्यांहिं टाकिती दुमदुमुनी ते सकलही दिग्भागातें. ३१
सौंदर्याचा निधि केवळ जो त्या तुज विकासित बघुनी
सृष्टीची चित्कला सहज ये प्रेमें उचंबळोनी ३२
सौंदर्याचें सार अशी जी विलसे भुवनीं वस्तू
सर्वकालिं ती होइ चिरंतन आनंदाचा हेतू. ३३
विकास ऐशा सुंदरतेचा कोणाला नच रिझवी ?
प्रेम जडे नच सहज कुणाचें सुंदरतेच्या विभवीं ? ३४
स्वतंत्रतेची सुविख्यात जी लोकीं विलासभूमी
जन्म घेसि तूं देशीं ऐशा तुहिनाच्छादित नामी. ३५

जन्मभूमिच्या अंकावरि तूं वाढसि अपुल्या छंदें
विहार करिसी वनीं उद्यानीं निर्झरतटिं वा मोदें. ३६
हंससी रवितें निरखुनि गगनीं, नाचसि पवनासंगें
तरंगिणीच्या संगीतीं तव अंतर तेथें रंगे. ३७
शिशिरकालिं जरि तेथिल, कुसुमा ! शीर्णदेह तूं होसी
जन्मभूमिच्या सहज आपदा सकल सुखानें सहसी. ३८
जिकडे तिकडे हर्षे फुलसी तेथें रानोमाळीं
भूपृष्ठातें नयनमनोहर करिसी वसंतकाळीं. ३९
मुग्धबालिका चंचलचित्ता प्रेमाच्या जणुं कलिका
धुंडिति तुज तैं नदीतटाकीं गिरिकंदरिं निःशंका. ४०
जमवुनि कुसुमें तुझीं मनोहर गुंफिति त्यांच्या माळा
कंठिं घालिती कोणी त्यांहीं भूषविती अलकाला. ४१
स्वतंत्रतेच्या विमल पताका गमति खचित त्या बाला
होउनि तव परिमललोलुप वा अप्सराच अवतरल्या ! ४२
प्रकाश रविचा, मारुतलहरी, संगति नव बाळांची
निवास विपिनीं, सकलांचि अभिरुचि तुज दे स्वातंत्र्याची. ४३
प्रीतीचें तुज पुष्प मानिती प्रणयीजन जगिं सारे
त्वत्सहवासें मनीं संचरें अनुरागाचें वारें. ४४
तव कुसुमांहीं प्रणयपत्रिका करिति सुगंधित कोणी
प्रियेसि कुणि तव गुच्छ अर्पिती प्रेमचिन्ह निज ह्मणुनी. ४५
हिमधवलांगी प्रणयवती त्या पीनपयोधर युवती
अर्धप्रकटित निज कुचगुच्छीं तव गुच्छा स्थापीती. ४६
शोभसि तेथें हिमनगशृंगीं श्याम पयोधर जैसा
धवल विधूच्या बिंबावरिच्या विलससि अंकासरिसा. ४७
विहार करि ही नौका अथवा क्षीरोदधिच्या फेनीं

सुधापूर्ण वा रजतकलशिं हे भ्रमर लुब्ध रसपानी ! ४८
स्फटिकाविनिर्मित मदननृपाच्या सिंहासनिं कीं राही,
क्रीडाकंदुक रतिदेवीचा विश्वातें जो मोही; ४९
प्रीतिदेवतानिवासमंदिर सुविख्यात जें भुवनीं,
सौंदर्याचें निधान अथवा एकाचि ये जें दिसुनी; ५०
कल्पलतेच्या सुमनांचा मधुमधुर गुच्छ जो साचा,
कनककलश वा भरिलेला जो दिव्य प्रेमरसाचा; ५१
ह्या सकलांचें भूषण होउनि सुखनगशृंगीं रमसी
जीवित तेथें तुझें खरोखर धन्य गमे अति मजसी ! ५२
तपोनिष्ठही मुनींद्र ज्याच्या स्पर्शें विचलित होती,
नृपालेंद्रही यत्प्राप्तीस्तव राज्यवैभवा मुकती; ५३
समरकेसरी वीरशिरोमणि आत्मयज्ञ रणिं करिती,
ज्यास्तव कामुक भाग्यहीन परि अंतरिं निशिदिनिं झुरती; ५४
सहज मिळे तुज ऐसा अनुपम दिव्य सुखाचा ठेवा
वाटावा मग कसा न रसिकां, कार्थि कुसुमा ! तव हेवा ! ५५
तरुणींच्या कुचतटीं कितिकजन इच्छिति सुखविश्रांती
तिथेंचि वांछिति पावायातें विराम कोणी अंतीं. ५६
सुख कोणाही मिळे न अन्या तुजवांचुनि हे ! धन्या !
महद्भाग्य तव ह्मणुनि मिळे तुज रमण्या तेथ वरेण्या ! ५७
सुदैवयोगें तिथें सेविसी यथेच्छ आरामातें
प्रियकरगाढालिंगनिं पावसि अंतिं विरामहि तेथें ! ५८

* * * *

गौरांगी त्या विलासिनीसह येउनि भारतवर्षीं
तुवां जिंकिलें सहज अज्ञांतें पुष्पा ! हृदयाकर्षी ! ५९
लावियलें जरि तुजला येथें सुंदरशा उद्यानीं

विकास पावासि नच तूं जैसा जन्मभूमिच्या रानीं. ६०
लालन पालन केलें जरि तव येथें सुप्रीतीनें
सौख्य अल्पही कां न गमे तुज तैशा उपचारानें ? ६१
सुनील पुष्पा ! आनंदें तूं हांससि नच या देशीं
गिरिकुहरीं वा निर्झरतीरीं स्वैर विहार न करिसी. ६२
केवळ कृत्रिम उपवनिं दिससी मृत्पात्रीं एकांतीं
विशाल तरुच्या छायेखालीं प्रकाशरहित प्रांतीं ! ६३
वाटे तुजला बंदिवास परि काय तिथें तरुखालीं
ह्मणुनिच कां तव जीवकळेला अशी क्षीणता आली ? ६४
स्वदेशीं तुजला विचारिती नच, नच कोणी बहुमानी
वाढसि, फुलसी, अंत पावसी, यदृच्छया वनिं विजनीं. ६५
स्थापिति कोणी तुज नच तेथें नेउनियां उद्यानीं
शिशिरीं बर्फामध्यें पडसी मृतप्राय होवोनी ! ६६
येथ आलिया तुला लाविती उपवनिं सुंदर पात्रीं
तुझी काळजी निशिदिनिं घेती ललना कोमलगात्री. ६७
प्रखर रवीचा ताप न व्हावा शैत्याचा तुज तैसा
उचलुनि तुजला ठेविति वरिवरि सुखस्थलीं प्रिय शिशुसा. ६८
सकल जनांच्या चित्तालागीं खुलवी जो मधु गंधें
गुलाब तोही ऐशा प्रेमळ उपचारांसि न लाधे ६९
वेधुनि टाकी नयना जरि तो अपुल्या विचित्र रंगें
तरिही तुझियाठायींच पटुमति रसिकवरांची रंगे. ७०
सुवर्ण-परिमल-युक्त सुमें जीं अनुपम वैभवशाली
वर्णनिं कविजनपंक्ति जयांच्या सदैव दंग जहाली. ७१
उपवनिं वससी येथ अशा तूं सुमनांच्या सहवासीं
प्राप्त होइ ही गुणाढ्यसंगति काय तुला निज देशीं ? ७२

श्रेष्ठपदातें पावसि येथें सकलां कुसुमांमाजीं
इच्छिसि मग कां निजदेशींची हिममय ती वनराजी ? ७३
देशिं आपुल्या वैपुल्यानें चहूंकडे आढळसी
आयासाविण तव संगतिसुख लाभे तिथें जनांसी. ७४
गौरव ह्मणुनिच तुझा न करिती स्वदेशबांधव तेथें
दुर्लभता तव विदेशिं बनवी परि त्या तुझे चहाते. ७५
दुर्मिळ होतां वस्तु तियेची महती कळोनि येई
विपुल जरी ती मिळे तरी तिज मान कोणि नच देई ! ७६
अतितर परिचय, तशी विपुलता, प्राप्ति सहज वस्तूची
तदीय अवमानातें कारण जनांत होई साची ! ७७
तत्त्व अबाधित दिसुनि येइ हें सर्वकाळिं या भुवनीं
अनुभव त्याचा असेल आला तुज इकडे येवोनी ! ७८
कठोरता ती स्मरुनि काय निज अरसिक आप्तजनांची
खिन्नवदन तूं दिससी, किंवा परवशता तुज जाची ? ७९
स्वसुखपरायण बांधव जरि तव आदर बहु नच करिती
अपूर्व माना लाधशील या विदेशिं रसिका हातीं. ८०
गुणीजनांची पारख कधिंही होइ न तद्देशीं खरी
मलयचंदना इंधनकार्या योजिति तेथिल नारी ! ८१
उदासीन जन गुणग्रहणीं जरि समकालीन गुणींच्या
महती त्यांची खरी कळुनियां येइ अभावीं त्यांच्या. ८२
सर्वच देशीं समान दिसुनी येई ही जनरीती
ह्मणुनि गुणीजन रसिकप्रेमा विदेशिं संपादीती. ८३
वाहतील तुज ईशमस्तकीं भक्त इथें प्रीतीनें
वंद्य होउनी जीवित होइल धन्य तुझें बा ! तेणें. ८४
सुविख्यात जगीं असे जयांचा कुसुमाविषयीं प्रेमा

आर्यबालिका कोमलहृदया गातिल तव गुणमहिमा. ८५
एकनिष्ठता वसे जयांच्या प्रेमीं ऐशा आर्या
चंचलचित्तें त्यागितील कां तुजला कधिं ? सुमवर्या ! ८६
स्थापितील तव गुच्छ आपुल्या केशपाशिं नव बाला
जणों हराया निजकुटिलालकनीलकांति गर्वाला. ८७
विमलचरित्रा पतिव्रता तुज शीर्षी धारण करितां
खचिताचि होइल जगांत या तव जीवाची सार्थकता ८८
कृपापात्र तूं होशिल येथिल झडकरि सकल कवींचें
मधुरगानिं ते अपुल्या करितिल अमरकीर्ति तुज साचें. ८९
वाग्देवीचे कंठमणि श्रीकालिदास-भवभूती
यांहिं गाइली तुझ्यासारिख्या कुसुमवरांची भूती. ९०
बकुल मालती कमल केतकी गुलाब चंपक जाती
भारतवासी कविजन केवळ ह्यांचा महिमा गाती. ९१
असासि विदेशी ह्मणुनि तुझा ते गौरव करण्या भीती
शंका ऐसी येउं न देईं कधिंही अपुल्या चित्तीं ! ९२
होतां महिमा विदित तुझा त्या, गातिल ते तव गीतें
निजपरभेदा देति न थारा, असति गुणांचे भोक्ते ! ९३
सरस्वतीसौभाग्यतिलक जो कुसुमगानिं आनंदे
कविवर ऐसा महाराष्ट्रि या तव दैवें आजि नांदे. ९४
पूर्ण रंगुनी वृत्ति तयाची जाइल तुजला बघतां
गाइल वैभव तुझें सदोदित त्याची कविता ललिता. ९५
भूषविती जे रसिकशिरोमणि अन्य सुकवि देशा या
त्यांचीही प्रिय कन्या कविता येइल तुजसि वराया. ९६
यास्तव कुसुमा ! उद्वेगातें सकल मनांतिल टाकीं
प्रफुल्लवदनें भारतवासी रसिकां सतत विलोकीं. ९७

———— 'इन्दुकान्त.'

सुभद्राविवाहकाव्य.

सर्ग नववा.

गीति.

तारानायक परितां आकाशीं अमृतपूर्ण कर विखरी;
जणुं तप्ता वसुधा ही क्षीरोदधिमग्न पूर्ण करवि खरी; १
अथवा काय पसरला रजताचा द्रव नभांत सिततम हा!
निज रुचिनें सुख वितरी व्यापी दिग्भाग सर्व वितत महा. २
विचरे गगनीं मारुत, चोरुनियां मालतीपरागातें;
उपजवि कामुकहृदयीं या समयीं तो विलासरागातें. ३
रमली निशीथसमयीं घेउनियां चंद्रमा, शिवा रजनी;
चालविलें नृत्य ललित सुखवाया प्रियतमांशि वारजनीं. ४
दिव्यांगनासमा ही नत्तरुणी, धीमती, वरा गाते;
उपजवि कामुकहृदयीं ललिताभिनयें अतीव रागातें. ५
अभिनवमनोज्ञवेषा, ललिताभरणा, प्रकामधीरमती,—
सौधावरि पतिसंगें वनिता या मत्त कामधी रमती. ६
सेवुनियां मधुमदिरा, लाजवि जी उत्तमा नव सुधेतें,
सुरतमहोत्सवरत जन गणिती स्वर्गासमान वसुधेतें. ७
अभिसारिका समुत्सुक होउनियां विकल ही मदनदावीं,
संकेतका निघाली; मार्ग तिला सकळही मदन दावी, ८
यदुपाल रुक्मिणीसह सौधावरि तेधवां विहार करी;
तत्कंठीं तो घाली गंधोत्कट पारिजात-हार करीं. ९
तीस वदे, "रुससी कां? लाजविती नेत्र रक्त कमलांही;
हा! हाय! कशी झाली आज मजवरी विरक्त कमला ही! १०
कां कोपलीस सुंदरि! तूं व्यर्थचि या निरागसावरती?

कोपानें तनु हाले ! हा ! हा ! बाले ! सवेग सावर ती.
उद्भवला भालावरि घर्माचा बिंदु मौक्तिकोपम हा;
हा दास लीन चरणीं; सोडुनि-वद कोमलेरित-कोप महा !
घेऊं लोळण आतां; तव चरणीं हा निबद्ध-कर कां मी ?
अधरामृत वर्षुनिया, प्रेमानें हा निबद्ध कर कामी.
तूं रुसतां, मज भासे लोक सकल जीर्णकाननासम हा !
तूं हसतां, मी मानीं स्वर्गासम जीर्ण काननास महा.
सुंदरि ! बघ हा नाचें रचुनीयां निज करांजलि समोर;
प्रावृट्कालीं ज्यापरि पाहुनि गगनीं घनावलिस मोर."
तत्कंठीं कर घालुनि, मग वळला अधरबिंब सेवाया;
झिडकारी ती वेगें, यास्तव तो यत्न होतसे वायां.
वदली मग कोपानें "आलो प्रसवावयास कां मातें ?
भामासदनां जा हो ! ईप्सित पुरवावयास कामांतें.
कोठें चंद्रकला ती ! कोठें ही म्लान तारका हीन !
सुख आपणास एथें यदुराया ! लाभणार कांहीं न.
जावें वेगें एथुनि तरि आतां तीस यदुप ! रमवाया;
हा ! हा ! हतभागी मी ! झाली मम सत्य तनु परम वाया.
या समयीं मम झाली दैवदशा व्योमकेश ! वामा ते;
ह्मणुनि न विलोकितां हो ! आतां सप्रेम केशवा मातें !
विनवावें जरि कांहीं, होय सदा तरि तिरस्कृति तयाची;
प्रेम दिसे हें वचनीं; साक्ष पटे ना मुळीं कृतींत याची.
धि:कार सदा करितां, जरि केली प्रार्थना पदीं कांहीं;
जन्मा आली खचितचि भोगाया यातनापदा कां ही ?
भगिनी अपुली रडते, धेनु जशी ती अनाथ हरिकरगा !
विनवी संतत इशा, " अन्त इचा विश्वनाथ ! हरि ! कर गा !

सुरसुंदरीहि लवली पाहुनि ज्या रूपगुणवतिस मान;
देतां विगुण वराला भगिनी निज कोंवि ती रतिसमान ? २४
आठवुनी विजयाला, चित्तीं करि ती निशादिवस हाय !
परि या आपत्काळीं न होय कोणी तिला लव सहाय ! २५
विनवी संतत तुह्मां; परि गणितां लव कदा न विनतीतें;
देतां नित्याचि निष्टुर होउनियां आपदा नविन तीतें ! २६
बघुनी द्युति ज्याची, नच हाव धरी धीरही रवि जयाची;
होवो भगिनी अपुली भार्या त्या वीरहीर विजयाची. २७
त्याला सोडुनि आतां, शिवेल ती प्रियतमा ! न परकाय;
प्राणव्ययेंहि साधी निज हेतु न नियत मानपर काय ? २८
जावें एथुनि आतां, प्रिय नच जरि ही मनास दारा जी !
सेवावें तिजला जी पुरवाया कामना सदा राजी " २९
बोले हरि तीस " अहा ! पावे किति चारुगात्रि ! तनु कंपा !
हा कोप सर्व सांडुनि या दासवरि करींच अनुकंपा. ३०
मी दास लीन चरणीं मजवरि कां धरिशि हाय ! इतराजी ?
या लोकीं नच वसते प्रिय मजला तुजशिवाय इतरा जी; ३१
तूं एकमात्र असली सुंदरि ! माझी विलासरससरिता;
सन्निध नसतां पळ तूं गमतो हा लोक सर्व विरस रिता. ३२
तूं रुसतां सखि ! गमते जीर्णारण्यासमान मजाशि रसा !
सखि ! हास; करीं आज्ञा; होइल ती सत्य वंद्य मज शिरसा. ३३
दादा वदति, सुभद्रा अर्पावी त्याच अपसदाला ही;
हें ऐकुनियां; होई तनुची अत्यंत सखि ! सदा लाही ! ३४
परि काय करावें ? गे ! चाले माझा उपायहि न रमणी !
हट्टास पेटुनी तो धिःकारी हितवचासहि नरमणी ! ३५
ऐकेल काय माझें ? सांग न जो जन्मदा-वचन मानी !

अवमान करुनि द्याया, वदती मजसम कदा वच न मानी." ३६
मग रुक्मिणी वदे, "नच समजे हें आपलें कपट कां मी?
या गोड भाषणानें फसतिल जन सर्वथा निपट कामी. ३७
अपुल्या चिरसहवासें मी हा अपुला खरेपणा समजे;
निज हृदयांतिल इंगित नच करिती व्यक्त, आपणासम जे. ३८
करितां विफल सदाही कपटें भावोजिंचा सकल हेका;
कापट्यानें ज्यापरि, तेंवि फळें कधिंहि आस कल्हें कां! ३९
पुरवा त्यांचें वांच्छित तरि आतां युक्ति करुनियां कांहीं;
द्रवतें न आपलें मन दुःस्थिति त्याची बघूनियां कां ही? ४०
शोधुनि विजयाला, जरि भगिनीचें नच समीहित कराल;
होईल निश्चयानें तरि वेगें मग निजाहित कराल!" ४१
यदुराय बोलला मग, "दुःखाचा हा प्रकार मज समजे;
बसतिल काय उगे, नच करितां त्याचा निकार, मज समजे? ४२
पीडाकर भगिनीचे हाल सती? सर्वकाळ जीवा हे!
तुजपेक्षांही तीची हा लसती! सर्व काळजी वाहे. ४३
स्वस्थ बसेन कसा मी! पाहुनि ही यातना कुलवतीची,
झटतों संतत मी कीं, दुरवस्था ही उरो न लव तीची. ४४
अचिरात् दिसेल सुंदरि! विजयसुभद्राविवाह तुजला गे!
हा मी समर्थ असतां, चिन्ता कां ही निरर्थ तुज लागे?" ४५
हर्षोत्फुल्लमुखी ती मग वदली प्रियपतीस मानवती;
"झालें प्रिय माझें हीं सत्कृत्यें मन्मतीस मानवती." ४६
कृष्ण वदे, "हरिं आतां स्मितरुचिनें निबिडतर तमोराशीं;
गे! कादंबिनि! सुखवीं या विकला पादनिरत मोराशीं; ४७
मंगलमय रजनीसह आकाशीं दिव्य चंद्र हा रमला;
आलिंगीं कंठांतुनि काढुनि हा दिव्य चंद्रहार मला. ४८

अवलोकीं; उद्यानीं वृक्षलतावृंद हा समद नाचे.
या समयीं चालतसे राज्य सखे! रतिविलास मदनाचें. ४९
हो! हो प्रसन्न देवी! स्मरशर करिती तनू विकल सारी.
शीततनुस्पर्शानें वरतनु मम ताप हा सकळ सारीं." ५०

नववा सर्ग समाप्त.

————कै. श्री. ना. मुजूमदार बी. ए.

पतंग.

पद.

उडविं पतंग, होउनी स्वैर निःसंग--
बघ सुटला हा अफाट वारा;
खवळुनि टाकी भव्य सागरा!
वृक्षलताही भीति थरथरा!
जाइल वेळ, तूं मांड आपुला खेळ. १
उठलें असतां काहुर असलें,
भीतीनें जे स्वस्थचि बसले;--
आनंदाच्या लाभा मुकले!
बंदे दास, मायेचे झाले खास. २
दाविल कोणी तुजला भीती,
अथवा पाहुनि कितीक हंसती,
ठेवुं नको तूं त्यांची महती.
खुला बाजार, तूं घ्यानीं धर हें सार. ३
जातां पतंग वरती वरती,
पाहुनि सज्जन कौतुक करिती;

आनंदाची येइल भरती;
सोडीं सैल, लाविशी उगा कां वेळ? ४

पतंग बा तव हा बहु रंगी,--
नभोमंडळीं घेतां गुंगी,
होउनि जाइल मग बेरंगी!
दोरा सोड, कर उच्च पदाची जोड. ५

लावीं पुच्छ भक्तिचें त्यास;
गोता चुकेल तेणें खास;
प्रीति गुणाचा तोडीं फास;
होइल वास, मग ब्रह्मानंदीं त्यास. ६

अथवा होतां काटाकाटी,
पडेल वनिं वा तटिनीकांठीं;
एकांताशीं पडेल गांठीं;
एकासाठीं, तूं उडी घेइं उफराटी. ७

राधानंदन.

प्रणयि-प्रणयिनी.

(माल्यभारा.)

" क्षणमात्र न वास एथ व्हावा
न विषाला कलि षट्पदा विसावा; "
" दिसती मजलागिं कोमलांगि!
अमृताच्या कलिकाच सर्व भागीं! " १

" वर जेविं तसीच आंत काळी
अलिचित्तें! कालिजात पूर्ण भोळी. "

" प्रिय सर्व कळ्या जरी सुकोशी !
न रमे षट्पद, जेविं शेंवतीशीं ! " २
" करुनि श्रुतिमंजु गुंजनातें
कपटें लाडुनि घेइ भृंग नातें, "
" रचि तो कलिकावरून गाणें
साखि ! पूर्वापर योग कोण जाणे ! " ३
" अनिलें वनिं वेणु गाय जैसा
परि न प्रेम मनीं, द्विरेफ तैसा; "
" वनिं नाचति त्याच वेणुनादें—
वनदेवी ! कलिकाहि भृंगशब्दें ! " ४
" जरि होय वरून चाटुकार
परि चित्तीं अलि पूर्ण जादुगार ! "
" शिकला कलि-चित्त रंजवाया
अलि विद्या, साखि ! सेवुनी रसा या ! " ५
" रसयुक्त कळ्या बळेंच चाखी
प्रणयाचा लव मागुती न राखी ! "
" प्रणयीं अलि-मूर्ति, मुग्धकोपें !
प्रणयाचींच समस्त जाण रूपें ! " ६
" कलिका बहु भृंगगायनाला
भुलल्या आजवरी; अतां कशाला ? "
" भुलला नच कोण गायनातें ?
फुटतो पाझर, जाण पत्थरातें ! " ७
" हरला मदुपाय एथ बाई,
न चले कांहिहि, चित्त मुग्ध होई ! "

" नच त्यागिल चंद्रिका विधूतें
प्रलयींही, मनिं जाण सुंदरी ! तें " ८
" मम चित्तविहारि राजहंसा !
विशदप्रेम विशालरक्तवासा ! "
" मम चित्तसरोजराजहंसि !
प्रणयस्मेरमृगाक्षि ! मंजुभाषी ! " ९
" मम हें मन बाइ वैरि मेलें
क्षणमात्रें च कसें सुतप्त झालें ! "
" परिरम्भणवापिकेंत केली,
मजसंगें तुज पाहिजेच केली ! ! " १०

नागेश.

रत्नावलीस पाहून.

पदः– (चंद्रकांत राजाची०)

कविचें मन हें आगर, त्यांतिल काव्यें हीं रत्नें;
हारचि त्यांचा रचिला कीं हा भासे बहु यत्नें. १
कवि कारागिर सुंदर मंदिर रत्नावलि आहे;
रसिकांस्तव हें अति चातुर्यें निर्मियलें पाहें. २
दुःखरूप ह्या महिषा निवटुनि, भक्तां ताराया,
रत्नावलि ! भगवंति ! घेसी तूं अवतारा या. ३
द्वादशांक तव बाहु भासती काव्यें हीं शस्त्रें;
अनेक त्यांतिल वृत्तें जीं, तीं जपसी कीं अस्त्रें ! ४
कवि–मानसिं जनि ज्या हा ऐसा काव्यपद्मवृन्द;
सेवायास्तव रसिक हंस हे त्याचा मधुगन्ध ५

काव्यंतर हें अंबर त्यांतिल काव्य--तारकांचा
रत्नावलि हा भासतसे कीं समूह मज साचा ! ६
अथवा कविजन उद्यानस्थित भास्वत्कुसुमें
निवडुनिया हा गुच्छचि रचिला यत्नें बहुत गमे ७
श्रीमन्नारायण ह्या शैलापासुनि निघुनीया
स्वर्धुनि धांवे कीं हे रसिकांबुधि आलिंगाया ८
स्वसे ! पाहुनी तूंतें वृत्ती तन्मय मम झाली !
तवसंगें मज सृष्टि भासते जणुं मोदें भरली ! ९
निंदा स्तुति मम करो कुणीही परवा मज नाहीं
वृत्ती ऐशी इथेंच रमुं दे मुदें अतां पाही ! १०

शारदासुत.

ईशमहिमा.

आर्या.

श्री भगवंता ईशा, तव चरणीं सर्व काल मी लीन;
तव गुण-महिमावर्णन, करण्याला शक्ति मागतों दीन १
शुक-सनकादिक मुनिवर, आद्य कवि व्यास, वाल्मिकादिक ते--
थकले गुण तव गातां, जे धीवर मान्य सर्व जगतातें. २
ऐसा तव गुण-निधिचा, महिमा वर्णावयास मूढमती--
केवीं समर्थ होई? परि वर्णायास दे प्रभो शक्ति. ३
रवि शशि तारक-वृंदहि, लीलेनें त्वां अगाध निर्मियले;
देखुनि रचना त्यांची, तव चातुर्यें अतर्क्य मन धालें. ४
स्वेच्छाबळें समर्था ! तुझिया ब्रह्मांड चाललें आहे;
चेतन अचेतनांतहि, अंश तुझा भरुनि राहिला आहे. ५
तव रूप-शोधनास्तव, शास्त्री, वेदांतविद महायोगी,--

होउनि मग्न विचारीं, थकले परि तर्क हा न त्यांलागीं ! ६
निर्गुण, सगुण विभो ! तूं, वा तव आकार हा कसा आहे ?
सुगुणजनीं विद्वानीं, वाद असा गहन सर्वदा राहे. ७
काष्ठीं पाषाणीं जलिं, सच्चिन्मूर्ते ! तुझाच अंश वसे;
जगचालक जगदात्मा सार्थ तुला नाम हें प्रभो ! विलसे. ८
तव इच्छेविण नाहीं हालत तरुपर्णही पहा जगतीं;
उत्पत्ति स्थिति लय हीं, अवलंबुनि व्यापका तुझ्यावरती. ९
तव रूप, शक्ति महिमा; तेज तुझें कार्य वर्णण्या मनुज--
अगदीं समर्थ नाहीं; आहे तच्छक्तिबाह्य हें काज ! १०
अगणित खेचर गोलहि; पृथ्वी, जल, तेज, मारुतादि अशीं--
पंचमहाभूतें हीं अयनें तव मूर्तिचीच सुंदरशीं. ११

गांगेय.

पश्चात्ताप.

श्लोक.

कोठें तूं वसशीं ? प्रभो ! सुखकरा ! मातें कृपाहस्त दे;
झालों मी अति दीन पाडस तुझें ! माझ्या हरीं आपदे
गेलेही दिन कैक ! येति पुढतीं ! कैशी न येई परी--
सद्बुद्धी मज पामराशि समया ? झाली फजीती पुरी ! ! १
वर्षे आज कितेक वास मम या आहे जगाम्यंतरीं !
नाहीं म्यां परि आणिली कधिं मनीं श्रीविष्णुची वैखरी ! !
झालें काय लहान पाप जगिं हें ? ज्याचीं फळें भोगितों--
वाटे मी मतिहीन ! आज म्हणुनी ईशा ! तुला वंदितों. २
नाहीं तारक या जगीं गुरुविणें, जें जाणते बोलती;
माझी दुःस्थितिही तुलोनि बघतां, ये प्रत्यय संप्रतीं !

लागे ना कधिं ईशपादिं मन हें ! सत्संग नाहीं मुळीं ! !
थारा यास्तव घे कधीं न मन हें ! सद्‍बुद्धिही लोपळी ! ! ३

नाहीं आजवरी कधीं स्तवन म्यां केलें तुझें ईश्वरा !
नाहीं यास्तव सत्य सौख्य मजला झालें कधीं पामरा
झाल्या मच्छिरिं पापराशि किति या ! आतां स्मरें तूजला !
पश्चात्ताप-विदग्ध-मानस अतां नेत्रांत आणी जला ! ! ४

नम्रत्वें अति जे पदांस भजती त्या तारिसी ईश्वरा !
ऐसा म्यां महिमा तुझा परिसिला आहे दयासागरा !
देवा ! यास्तव आजि धाष्टर्य करुनी यांच्या क्षमेची करीं;
झालें मत्करिं पाप आजवरि जें नाशीं तया सत्वरीं. ५

नम्रत्वें प्रणती तुला करितसें, ही आज पद्माकरा !
ठेवीं मस्तकिं सौख्यदायक तुझ्या त्या आतपत्रा करा;
माझ्या हीन मतीस मार्ग सुचवीं ऐसा जगीं या बरा;
पश्चातापद जो न होय मजला ! भक्तीस दे आसरा. ६

म्यां मूर्खें विपथ प्रवास करुनी, जें पाप संपादिलें;–
तेणें वृत्ति चळे ! न मानस वळे जें अंधसें जाहलें ! !
देई गा जननायका ! वर असा कीं म्या विनम्रें मनें--
घ्यावें गुंजन भृंगसें तव पदीं कृष्णानुजें प्रीतिनें. ७

स. ग. कालेकर.

काळ.

(वियोगिनी.)

फुलतें सुम वल्लरावरी । मधुगन्धा पसरी दिगन्तरीं
करि हास्य जनांहि हासवी । गळुनी हाय पडे परी भुवी ! १

चपळा लहरी सरीं उठे । हसुनी नृत्य करीत ती सुटे
बघुनी तिज चित्त डोलतें । परि अन्य क्षणिं नष्ट होय तें ! २
नलिनीदळिं अम्बुबिन्दु हा । नवमुक्तामणिसा दिसे पहा !
पवनें हलतां परी असा । सहसा लुप्तचि जाहला कसा ? ३
तरुशीं गुजगोष्टि हा करी । मधुनी निर्झर जाय सत्वरी
करि येथ विलास चारुता । परि येणाराचि यास शुष्कता ! ४
भुलवी मन भूषवी मही । लतिकावेष्टित वृक्षराजि ही
कशि राहिल रम्यता नवा । बघ होईल विशीर्णपल्लवा ! ५
सहकारिं बसून कोकिळ । कलनादें हृदयास मोहिल
पवनीं मिळला परी ध्वनी । फिरुनी तो परतेल कोठुनी ? ६
विकचाम्बुजवृन्दगान्धित । करि वायू मनुजास मोहित
परि जी लहरी वहावली । फिरुनी तीच कुणास लाभली ? ७
चमके चपला नभोऽन्तरीं । तिमिरीं उज्ज्वल तेज ती भरी
सहसा मग लुप्त होतसे । बुडवी गाढतमामधीं रसे ! ८
रमणीय सुवर्णरंजित । गगनीं वासवचाप शोभत
भुलते मन पाहुनी तया । क्षणमात्रें परि जाय तें लया ! ९
उदया विधु येत अम्बरीं । पसरी निर्मल कान्ति भूवरी
फुलवी कुमुदांपरी मनें । चुकतें त्यास न अस्त पावणें ! १०
प्रणयध्वनि कर्णसम्पुटीं । धरितां मानव होय हिंपुटी
रव जे शिरले नभोऽन्तरीं । फिरुनी ते मिळतील कां तरी ? ११
दिसतें आजि तें उद्यां नसे । फिरतें संतत चक्र हें असें
करुणा न धरीं मनीं पहा । करितो केलि नृशंस काल हा ! १२
क्षणभंगुर संसृती असे । नर मोहें भरुनी वृथा फसे
विलयार्थचि वस्तु जन्मते । नर मन्द स्थिर मानितात ते ! १३
वश सर्वहि वस्तु हा करी । बलवान् काल असे खरोखरी

सुर, दानव, यक्ष, किन्नर । चिरडी; क्षुद्र तिथें कुठें नर! १४
अवितर्क्य तदीय विक्रम । न तया वाटति अल्पही श्रम
नगरोपवन स्मशानसें । करणें हेंहि अशक्य त्या नसे! १५
स्वबळें करि दर्पखण्डन । बलवंतासहि नेत ओढुन
चुकवून तदीय दृष्टिला । जगतीं मानव कोण राहिला? १६
फसवून तया कुणी सुटे । दडुनी जीव बसेल हा कुठें?
खल काल कराल हा नसे । स्थल कोठेंहि न सांपडे असें! १७
सदनीं विपनीं कुठें चला । भरुनी काल तिथेंहि राहिला
वदतां हसतांहि खेळतां । असतो काल उभाच तत्वतां! १८
निजकार्य सदा करीतसे । न विसावा क्षणमात्र त्या असे
रजनीसमयीं सुनिद्रित । असतां आपण, काल जागृत! १९
विसरूंहि तयास आपण । पण आह्मां विसरे न तो क्षण!
स्थिरधी अवधान ठेवुन । करि सर्वत्रहि दृष्टिचालन! २०
दवडीं न घडी वृथा कदा । न तरी कोसळतील आपदा
जलबुद्बुदसें स्वजीवित । करिं कांहीं तरि आपुलें हित २१
यश ठेवुनि रम्य मागुतीं । जड देह त्यजितात जे कृती
चिरशान्तिसुखास पावती । भय कीं देईल काल त्यांप्रती? २२
करिती न सदुद्यम क्षण । अळसें घालवितात जे दिन
भिववी बहु काल त्यांप्रती । धरि माथां कृतकार्य सन्मती! २३

रेंदाळकर.

' सुंदर प्रतिध्वनी. '

(चाल–भूपती खरे ते०)

हें विश्व शांतलें, शांत आपुली अवनी
साम्राज्य पसरलें शांतीचें ह्या भुवनीं

हा मित्र शांतला, ह्मणुनी झोंपी गेला
रात्रींच्या समयीं जडगण सारा निजला
परि वाद्य वाजतां प्रशांत सुंदर समयीं
हलविली तार ही पृथ्वीच्या ह्या हृदयीं
प्रेमभरें सरिता गाती । सुंदर
नाचती सूर मिळविती । निर्झर
आनंदें पुलकित होती । तरुवर
सौंदर्य सृष्टिचें रम्य निशासमयाला
भासतें अलौकिक ऐकुनि मधुवाद्याला

परि प्रतिध्वनी त्या नैसर्गिक वाद्याचा
उमटवी धरित्री दर्शक तो प्रेमाचा !
प्रेमें प्रतिध्वनी प्रेमळ हृदयीं उठती
अपवादक कशी राही अपुल्या जगती
वर्षाव सुधेचा करी सुधाकर नित्य
आनंदित तेणें, सृष्टीचें हो चित्त !
प्रेमानें भरती येई । सागरा
रोमांचित प्रेमें होई । ही धरा
आनंदें मग ती पाही । सागरा
प्रेमाची प्रेमें फेड करी ही जगती !
या निसर्ग नियमां जन प्रतिध्वनी ह्मणती

सौंदर्य-पूर्ण परि प्रतिध्वनी प्रेमाचें
त्यापुढें तुच्छ ते नाद सकल वाद्यांचें !
चंद्रमा अंबरीं, प्रकाश भूवर विलसे
कीं धवल हिमाचा पाउस भूवर वर्षे !

शुभशुभ्र प्रकाशीं रमणीसह फिरतांना
मधुनाद प्रीतिचे श्रवणीं पडले नाना !
त्या वेळीं भरती आली । प्रीतिला !
रमणीच्या चुंबा गालीं । अर्पिला !
उलटुन मज चुंबी भालीं । प्रेमला
वाटली प्रीतिचा प्रतिध्वनी तो मजला !
मधुनाद तयाचा मोही या जगताला ! ३

——————— नारायण केशव बेहेरे.

ब्रह्माविष्णुमहेश्वररूपैक्यदर्शक.

त्रैमूर्ति–आरति.

भवहर सुखकर कणकालेश्वर परमेशा !
विधिहरिहर–रूपात्मक जयजय विश्वेशा ! ध्रु०
मरालखगपतिनंदीवहना, भक्तवशा !
सत्याधिप वैकुंठाधिप कैलासेशा !
सावित्रीमागिरिजानाथा, अविनाशा !
अंबुजदिव्यसुदर्शनत्रिशूल–धर ईशा ! १
स्रष्टापालक अघसंहारक जगधर्ता
निर्गुण सगुण निरंजन भव–भयपरिहर्ता
जृंभासुरकालासुरभस्मासुरहंता
दैविक भौतिक अध्यात्मिक–हर सुखकर्ता २
पंकजपन्नगपरिकरभृत–भूमी–शयना !
रातोत्पलरविकांतीरक्तांकितनयना !
कलिकिल्मिष कुमती––नग कुसुमायुध–दहना !
चतुरानन अमितानन पंचानन, गहना ! ३

नारदमन्मथगणपतिताता, नतशरणा !
त्वंपदतत्पदअसिपददाता, जगभरणा !
राजससात्विकतामसगु--गुणत्रयहीना !
निर्मलनिर्ममनिरहंकारा शिवकरणा ! ४
संसृति--भीती हृत्तापादी परिहरिसी
तनुमनधनदा दासां नितरक्षण करिसी
त्वच्चरणांबुज लोलुप कणकावति--वासी
विष्णु, प्रार्थित सुमनें भक्तां उद्धरिसी ५

विष्णु बाळकृष्ण जोशी.

माझ्या मनाची स्थिती.

पद.

मी श्रमें गान गात
नदितिरीं रम्य कुंजांत १
गुणगुणें स्वतःशीं कांहीं
परि नुमगे मजला तेंही २
सर्व मी भान विसरलों
कीं तन्मय त्यांतचि झालों ३
शून्यपणें इकडे तिकडे
मी--मूढ पिशासम हिंडें ४
मम मानस कोणी हरलें ?
का वेड लागलें न कळे !-- ५

मंजुबाळ.

काव्यरत्नावली.

अंक १० वा.

मोहिनी.

प्रसंग पहिला.

साक्या.

(१)

गगनमंडला भेदित ज्यांचीं शिखरें गेलीं तुंग,
बघुनि भव्यता मानव होतो कुतुकाश्चर्यें गुंग,
सागरलहरी मंजुगायनें करीत पादरजातें
क्षाळुनि संतत किंकरीपरी सेविति सादर ज्यातें,
विंध्यगिरी तो प्रचंड लोकीं कोणा ठावा नाहीं ?
तदीय रम्या शोभा कवणें न श्रविली कानांहीं ?
नक्षत्रांशीं साम्य कराया ज्यांचीं पुष्पें गेलीं
विशाल तरु बहु असती एथें दृढ वेढिति ज्यां वेली.
वारंवार प्रभंजनानें सुमनें गळती खालीं
कुसुमित वनभू मरंदलुब्ध भ्रमरीं होते काळी !
घनतरुराजीमधुनी स्वेच्छें धावति निर्झरमाला,
रम्य विलासीं नूतन शोभा आणिति विंध्यवनाला !
चंचल मोहक हरिणबालकें बागडती स्वच्छंद;
तरुशाखीं खग बसुनी गाती मधुगानें सानंद.
प्रवातकंपित तरुपर्णांचा संतत मर्मर चाले;
व्याघ्रगर्जितें गजक्रीडनें काननभूमी हाले !

तरि नैसर्गिक गभीर शांती भंग न पावे लेश.
कुठुनी होती एथें मनुजा संसाराचे क्लेश ?
राहति तापसवृंद किती या आनंदमय स्थानीं;
मधुनी मधुनी विंध्याचल हा शोभे बहु उटजांनीं.

(२)

होता संध्यासमय रम्य तो सुखकर मधुमासींचा,
अर्पी शीतल मंद गंधवह आनंद स्वर्गींचा !
विंध्यगिरीचीं शिखरें रविच्या सोनेरी किरणांहीं--
सुंदर दिसतीं, त्या शोभेला अन्या तुलना नाहीं.
विहगांच्या कलनादें तें वन भरुनी गेलें सारें,
वाटे भरलें सृष्टिसतीला उत्साहाचें वारें !
खळखळ धावति निर्झर, मारिति उड्याहि बालकुरंग,
पवनकंपिता लता नाचती, उडती गगनिं विहंग.
शोभे वरतीं आकाशाचें भव्य सुनील वितान,
विंध्याद्रीचा प्रशस्त देहहि वाटे तेव्हां सान.
दिसे नभा तो सावरणारा गिरि अपुल्या शिखरांनीं
कृष्णा दुजा गोवर्धन अंगुलिवरि धरणारा रानीं !
तापसकुमरी निर्झरतीरीं येती न्याया वारी,
हास्यविनोदें क्रीडत मोदें जाती त्या माघारी.
पुष्पें, समिधा, कुश आणाया गेलेले मुनिबाल
येती उटजीं, बघुनि ससंभ्रम झाला सायंकाल.
विश्वावरचें स्वर्णतंतुमय वसन दूर होणार,
भीषण दुःसह घन तिमिराचें दाट पटल पडणार,--
होता त्याला अवधी कांहीं, अस्ताचलिं दिनकांत
रागदृष्टिनें मुग्ध सृष्टिला पहात होता शांत !

(३)

ज्याला कुतुकें नंदन अभिधा दिधली मुनिबाळांनीं
वाहत होता गात गात तो निर्झर मंजुल गाणीं.
त्याच्या तीरीं प्रस्तरखंडीं करतलिं टेकुनि गाला,
लावुनि अचला दृष्टि एकली बसली होती बाला.
निसर्गसुंदर तनुवरि पसरुनि तारुण्याची कांति
शुद्धानंदप्रमोह सत्वरि भरी प्रेक्षकस्वांतीं.
कपोल कोमल, अरुण अधर तो, तेजस्वी ते डोळे,
बघुनि एकदां मनीं कुणाच्या तिची न मूर्ती घोळे?
भृंगश्यामल कुंतलराजी, अर्धेंदूसम भाल,
मृदुतर तत्कर बघुनी गमती कठोर अंबुजनाल!
खिळुनी राही तरुण जनांची तिजवरि मुग्धा दृष्टि;
फार कशाला, स्त्रियाहि तिजला बघुनी वरिती तुष्टि!
वसंतलक्ष्मी, विपिनश्री, कीं विंध्यवासिनी देवी—
मूर्तिमती ये! सुरूप असलें मिळे मानवी केवीं?
शरीर झालें तरुण तरी मन बाल तियेचें होतें;
क्रीडे बाल्योचित पावित्र्य स्पष्ट तन्मुखीं हो तें!
तिच्याजवळुनी नंदन होता हांसत धावत मंद
रविकिरणोज्ज्वल मणिसम जलकण उधळित तो स्वच्छंद.
तुषार तनुवरि पडुनि बालिका मोहक भारी भासे.
काय दोष, जरि मूढ जहाला कोणी कामविलासें?

(४)

अवचित उठली तों व्याघ्राची भयद गर्जना रानीं,
एकतानता भंगुनि तेणें आली बाला भानीं.

दचकुनि मागें वळुनी उठली भयकंपितहृदया ते,
तोंच देखिलें समीप भीषण संक्रुद्ध व्याघ्रातें!
अंगारापरि लोहित लोचन, दंष्ट्रा तीव्र बघून
भ्याली कुमरी, नवल न! धीरहि टिकेल तेथें कोण?
पुन्हां प्रचंड व्याघ्र गर्जना करुनी वनप्रदेश--
मुनिहृदयांसह कांपवि, दे मृगपशुंनां भीतिक्लेश.
सहसा वळली बालेवर तों त्या क्रूराची दृष्टि;
गमलें आजच गेली विधिची प्रयत्ननिर्मित सृष्टि!
मुग्धा भिउनी मूर्छित पडली फोडुनियां किंकाळी,
प्रखरशरानें विद्ध जहाला व्याघ्रहि तो त्या काळीं!
तें अश्वांच्या चरणध्वानें वन गजबजुनी गेलें,
क्षणांत कांहीं स्वार त्या स्थलीं अवचित येउनि ठेले.
सर्वांपुढतीं एक तरुण नर होता सुंदर साचा,
धीरललित तो सौंदर्याचा पुतळा वीररसाचा.
रम्य मुखश्री अधिकाराच्या तेजें चमकत होती;
दिसे तयाच्या दिव्य लोचनीं विशद प्रीतिज्योती!
अश्वावरुनी उतरुनि सत्वर तो ये तरुणीपाशीं,
रम्य रूप तें पाहुनि तत्क्षणिं सांपडला स्मरपाशीं!

(५)

निर्झरसलिल स्वकरें तन्मुखिं सेचुनियां प्रेमानें
वारा घालित बसला सन्निद्ध बघत तिला कुतुकानें.
पवनें हालुनि वसन, मनोहर दिसे स्पष्ट तनुकांति;
दृष्टी जडुनी तिथें, उठति नव विकार युवकस्वांतीं.
पाषाणासम दिसला स्थिर तो, दुसरी वार्ता नाहीं.
सौंदर्यसुधा ती प्राशन करि तृष्णाकुल नयनांहीं!

" रूप असें हें " ह्मणे तरुण तो " न देखिलें मीं कोठें.
अशी सुंदरी वनीं वसे ही, नवल गमे हें मोठें !
मृदु तनुलतिका नगरोपवनीं उचित रहायाला ही,
कठोर दुःसह विंध्यविपिन हें योग्य इयेला नाहीं !
विंध्यमार्ग हा कंटकसंकुल शिलाशकलसंकीर्ण,
कोमल पद हे इचे पाहुनी होतें हृदय विदीर्ण !
अहा ! धन्य हा प्रखरखंड, स्पर्श इचा या झाला !
खचित नसे हो तुलना दुसरी या निर्झरभाग्याला !
शिलातनू हा विंध्य श्रेष्ठ स्पष्ट गमे मज लोकीं;
देह इयेचा वाहुनि पृष्ठीं झाला धन्य विलोकीं !
कृतार्थ इथले पशू–इचा स्वन मिळतो त्यां ऐकाया !
अहा ! पवन हा धन्य धन्य बहु ही स्पर्शुनि मृदु काया !
या बालेच्या रम्य दृष्टिला विषय तरी व्हायाचें–
आहे माझें भाग्य काय हो ? ईप्सित नान्य मनाचें ! "

(६)

क्षणभरि थांबुनि वदे युवक " ही आहे काय कुमारी ?
असेल किंवा खचित असावी–कीं वनिं ही वसणारी !
भाग्यवंत तो या पुष्पाचा भोक्ता कोण असेल ?
धन्य धन्य तो–प्रेमानें ही ज्याला बघुनि हसेल !
इच्या मनोज्ञ प्रेमालापा विषय कोण होईल ?
अहा ! धावुनी रभसालिंगन कोणा ही देईल ?
कोमल तनुचा या अधिकारी भुवनीं कोण असावा ?
आश्रय करुनी या बाहूंचा घेइल कोण विसावा ?
' मी तुमची ! ' ही ह्मणेल कोणा ? भाग्य कुणाचें आहे ? "
विचारमग्न क्षणभरि युवक स्तब्ध तदा तो राहे.

" वनभूषा ही असेल किंवा अर्धांगी अन्याची–!"
विचार मनिं हा येतां झाली म्लान मुखश्री त्याची.
पुनरपि सेची जल वदनावरि, वारा शीतल घाली;
उपचारांनीं अशा तदा ती शुद्धीवरती आली.
हळुहळु लोचन उघडुनि भीता सभोंवार ती पाहे,
तों दिसला स्मर दुजा असा नर जवळीं बसला आहे!
पदर सावरुनि लज्जित तरुणी राहे दूर उठोनी,
पूर्वस्मृति कारि सभोंवार निज रम्य दृष्टि फेकोनी.
बघुनि गतासु व्याघ्रा, लोचन युवकावरि वळवोनी
पुसे विनीता " कोठिल आपण? आलां एथ कुठोनी?"

(७)

या प्रश्नानें धन्य आपणा मानुनि वीर वदे तो:–
" प्रताप ज्याचा अरिहृदयातें अजुनी भीती देतो,
त्या स्वर्वासी जयसिंहाचा संगरैकवीराचा
चंद्रचूड मी तनय जाण गे वीरजनोत्तंसाचा!
निजजनकाचा निरोप घेउनि रमणा भेटायाला
निघे शर्मदा जिथुनि नर्मदा जशी उत्सुका बाला,
तेथुनि आहे सन्निध नगर श्रीपुर या नांवाचें.
जाण शोभने! स्थान तेंच मम आहे राहायाचें.
या दासाला त्या प्रांतीचे लोक मानिती राजा.
आलों इकडे साधाया मी सुंदरि! कांहीं काजा.
या व्याघ्राच्या मुखांतुनी तुज आज सोडवायाचें
सुयश लाभलें मला, जाहलें सार्थक मम शौर्याचें!
तूंहि सुंदरी कोण? इथें या वससी कां विपिनांत?
सांग वृत्त तव, हें होओत श्रवण पवित्र जनांत!"

पुसुनी ऐसें उत्कंठेनें चंद्रचूड तिजलागीं
दृष्टि तन्मुखीं लावुनि राही, होय जसा अनुरागी !

[८]

चरणनखानें भूमि विदारित पहात खालीं बाला
बघुनि एकदां वरी, बोलली विनयें त्या तरुणाला:—
" थोर तपस्वी एक या वनीं समीप उटजीं राहे,
कन्या त्याची एकुलती ही वीरमणे ! मी आहें.
जन्मभूमि मम बिपिन असे हें, मज न पुराचा वारा,
जीवदान या अबले देउनि केलें ऋणी कुमारा !
होऊं कैशी उतराई मी विपिनवासिनी बाला ?
नृपाल आपण, मीं दीनेनें द्यावें काय तुह्मांला ?
श्रमला आपण शिकार करुनी, रात्रहि झाली आहे,
विश्रांतीस्तव माझ्या उटजीं चला सर्व लवलाहें.
तपःकामना धरुनि जनक मम आहे क्षेत्रीं गेला,
तरिहि चलावें मान देउनी दिनेच्या वचनाला. "
वदुनी ऐसें पुढें होउनी बाळा चालूं लागे;
तेव्हां सानुग कुमारही तो तिच्या निघाला मागें.

[९]

दिनलक्ष्मीचा रमण जाउनी अस्ताचलिं त्या कालीं
' शुभ्रज्योत्स्नापुलकित ' सारी अवनी होती झाली !
नव्हता ऐकूं येत अल्पही कलकलाट विहगांचा,
झाला होता सारा सुप्त प्रदेश विंध्यवनाचा !
पवनलहरि तों मंजुल गायन ओती त्यांच्या कानीं,
हर्षास्तिमिता बाला झाली व्याप्ता रोमांचांनीं !

" थांबा क्षणभरि " ह्मणुनि तदा तीं निश्चल तेथें राहे,
गानध्वनि तो आला जिकडुनि तिकडे निरखुनि पाहे.
भरुनी टाकित मंजुल गानें सारा विपिनप्रांत
एक तरुण ये तेथें, वाटे दुसरा रजनीकांत !
अश्वावरुनी उतरुनि बालेसन्निध येउनि राही;
पुनःपुन्हां त्या सशस्त्र लोकांकडे विस्मयें पाही.

[१०]

प्रेमभरानें कर त्याचा ती धरुनी निजहृदयाशीं
लज्जामंथर मधुर वाणिनें वदली वचन तयासीः--
" जीवितनाथा ! प्रसंग कसला होता आजी आला !
या वीरानें वांचविलें मज वधुनी त्या व्याघ्राला.
जरि दुर्दैवें--हाय ! नको ती नको कल्पना देवा--
तदा वाटलें अंतरली मज खचित आपुली सेवा !
देवानें हा वीर धाडिला नसता सखया आजी,
तरी तुह्मां ही तनू विदीर्णा दिसली असती माझी !
प्रिया !--" न तिजला पुढें बोलवे कंठ भरोनी आला,
गळूं लागले अश्रुबिंदु जणुं तुटली मुक्तामाला !
गहिंवरला तो युवकहि, त्याला वदवेना त्या कालीं
पुसे तदश्रू, दृष्टी त्याची बाष्पाकुल परि झाली !
" गडे मोहिनी ! " विवेक करुनी युवा वदे अनुरागें,
गतभीतीनें त्रस्ता आतां वृथाचि होसी कां गे ?
तुझ्या रक्षणा समर्थ आहे माझी खड्गलता ही,
सहज मित्र हा वीरहि झाला, आतां भय तुज नाहीं ! "
" खरेंच ! " बाला वदली " पडला विसर कसा हा मातें
चला पुढें, मी परिचय त्यांचा देतें करुनि तुह्मातें.

चंद्रचूडजी! वीरकांत हे--" पुढें न वदली बाला,
लाजुनि खालीं मुख करि सस्मित बघुनी निज दयिताला!
वीरकांत तैं हंसुनी तिजला पाहुनि, बोले त्याला:--
"शूरा! आजी त्वदुपकार हा मोठा मजवरि झाला.
रम्य रत्न हें तूंच दिलें या खचित वीरकांतास.
आजपासुनी मानीं मजला नम्र आपुला दास!"

[११]

मधुर भाषणावरी परी या उत्तर नाहीं आलें,
सरुनिर्गमनीं खड्गांचे ध्वनि भीषण अमित निघाले!
होउनि विस्मित वीरकांत बहु सभोंवतीं जों पाहे,
तों ये दिसुनी स्वारांनीं त्या त्यास वेढिलें आहे!
वीरकांत बहु रोषें सरकन कराल असि उपसून
बोले लोचनतेजें केवल शत्रुगणा दिपवून:--
"चंद्रचूडजी! वीरत्वाला योग्य असे हें काय?
सैनिक अपुले अविचारें कां मित्रा करिति अपाय?
राग न यावा तुह्मां तयें, जें नम्रपणें वदलों मी;
कृष्णपयोधरपटल न उठतें शारद नील व्योमीं!
मिठी मोहनी मारी भ्रांता तदा वीरकांताला
कातर अश्रुव्याप्त दृष्टिनें बघत चंद्रचूडाला.
वीरकांत तन्मुख कुरवाळुनि ह्मणे "असासि कीं वेडी?
भितिस भीरु! व्यर्थ कां अशी? स्थिर हो, मजला सोडीं!
केला नाहीं आपण यांना केव्हांही अपकार,
अरिसमुचित कीं अह्मां दाविति समशेरीची धार?

१ म्यानांतून बाहेर पडतांना.

मजसम त्यांचा असेल शत्रू कोणितरी दुसरा गे,
तोच मानुनी मला भ्रमानें वेढिति हे बहु रागें."

[१२]

"छे, छे, भ्रम हा !" चंद्रचूड तैं वदला गांभीर्यानें
निज खड्गाची विधुप्रकाशीं धार बघत अभिमानें.
"जयसिंहाचा पुत्र असें मी अनुज वीरसेनाचा.
आहे माझा असि प्रखर हा तृषित तुझ्या रुधिराचा !
शौर्यनिधी मम बंधु संगरीं वधिला तूं मत्तानें,
त्या दुःखानें गमन स्वर्गी केलें मत्तातानें.
त्या दोघांना तुष्ट कराया हवें रुधिर तव आहे;
नीट सावरुनि खड्ग, लढाया सिद्ध होउनी राहें.
हे वीरांनों ! दूर असावें तुह्मीं, न तुमचें काम.
एकाकी मजसह संगर हे करोत वीरललाम !
नको मोहिनी ! रागानें मजकडे अशी तूं पाहूं,
मृतजनकाची आस पूर्ण मी केल्याविण कीं राहूं ?
मी जातीचा क्षत्रिय आहें, पुत्रहि रणशूराचा,
निश्चय केला त्यास कदापि न कलंक लावायाचा !"
वदुनि असें तो चंद्रचूड मग सावरुनी तलवार
युद्धा झाला सिद्ध भरोनी आवेशें अनिवार !

[१३]

वीरकांत परि हंसला ऐकुनि सर्वहि भाषण त्यांचें.
"मला वाटतें तुला नसावें ज्ञान व्यवहाराचें !
युद्ध कराया पुढचा सारा काल संपला काय ?
आज माझिया सदना वीरा ! लागावे तव पाय.

मला करूं दे आधीं तुझिया उपकाराची फेड;
अवश्य पुरविन नंतर मी तव युद्धाचें हें वेड !
श्रीपुर माझें जोंवर माझ्या झालें न स्वाधीन,
तोंवरि उपसुनि खड्ग असा मी समरोत्सुक राहीन !
लढावयाची केव्हांही मजकडुनि तयारी आहे;
प्रसंग परि हा नसे, अयोग्य स्थलही आहे बा हें.
भयकंपित या तापसललना सभोंवार जमलेल्या
भीषण तेजें खड्गांच्या, तदृष्टी दिपुनी गेल्या.
जाऊं आपण अन्य स्थानीं प्रात:कालीं सारे,
रात्र एवढी काढ सदनिं मम शांतपणानें बा रे.
काय वाटलें तुला एकटा सांपडलों मी आहें ?
माझें सैन्य प्रचंड होइल इथें प्रकट लवलाहें ! "
घाली वेगें शीळ कर्कश क्रोधें तो त्या कालीं;
असंख्य असि तों चमकुनि तेजोव्याप्ता वनभू झाली !
काय विपिन तें तदा वाटलें लागे चालायाला ?
अमित शस्त्रधर वेढुनि ठेले त्वरित चंद्रचूडाला !

[१४]

प्रसंग आतां दारुण कांहीं खचितचि ओढवणार
बघुनि असें तैं मनीं मोहिनी झाली दु:खित फार.
अश्रुव्याप्ता मुग्ध दृष्टिनें बघत वीरकांतातें
गद्गद वदली " सखया आधीं खड्ग तीक्ष्ण मज द्या तें. "
" कशास वेडे ? " " आणा इकडे. " " करिसी याचें काय ? "
" वांचविला मत्प्राण जयें त्या करितां नाथ अपाय ? "
प्रेमें हंसुनी खड्ग तत्करीं दिलें वीरकांतानें.
श्रीपुरनायकसन्निध गेली तेव्हां ती वेगानें.

" मजकरितां तरि चंद्रचूडजी राग आवरां आतां.
चरणीं तुमच्या स्वसा दीन ही पहा ठेविते माथा.
वैर नको हें, नको समर हें, आतां तरि व्हा शांत.
चला आमुच्या उटजीं बंधो झाला भारी श्रांत.
या भगिनीची चंद्रचूडजी ! विनति न निष्फल व्हावी.
आतां कुटिला खड्गलता ही निजकोशीं ठेवावी ! "

[१५]

झालें प्रेमाचरण तिचें जें प्रथम वीरकांताशीं
बघुनि निराशावन्हिज्वाला जाळित सुटल्या त्यासी.
" बंधो " या बहु अप्रिय वचनें तेल ओतिलें त्यांत !
चंद्रचूड तैं अचल दृष्टिनें राहे तिजसि पहात.
कठिण समयिं या खरी कुशलता विधिची दिसुनी आली:
तिच्या सरल त्या मुग्धाचरणें वश तद्वृत्ती झाली !
स्वतंत्रता ती लोपे सर्वहि, त्याचा तो नच राहे.
अहा ! पवित्र प्रेमाचा हा प्रभाव ऐसा आहे !
असो कोणतेंही तें नातें, त्यावर कांहीं नाहीं.
नांदे तेथें पूर्णाद्वैत प्रीती जेथें राही !
अमक्या स्थानीं असतो पूर्ण प्रीतीचा उत्कर्ष
लटकें ह्मणणें हें, कोठेंही ती करि केलि सहर्ष !
प्रीती नाहीं बाह्य परिस्थितीवरि अवलंबुनि खास.
जेव्हां वाहे पूर अश्रुचा तेव्हां करि ती हास !
इथेंच-पाहा खड्गें चमकुनि शोणित वाहायाचें
तेव्हां आलें पवित्र दिसुनी हें चित्र प्रेमाचें !
प्रथमदर्शनीं जी त्यां वाटे आत्मीयता मनास,
अशा प्रसंगें ती सर्वांच्या आली निदर्शनास !

परस्परांस्तव आपण इतकीं झटूं अशी त्यांनाही
अहा अजूनी सत्य कल्पना झाली नव्हती कांहीं !
होतें यद्यपि विकारजनित प्रेम चंद्रचूडाचें,
तरि तें होतें प्रेमचि, ह्मणुनी वळलें चित्त तयाचें !
कामविकारें प्रीति जन्मली त्याची—नाहीं खोटें;
परि होतें त्या कामाचेंही स्वरूप निर्मल मोठें !
कामाकरितां प्रीती ? अथवा प्रीतीकरितां काम ?
काम असे हें साधन मात्र, प्रीती हृदयाराम !
काम हवा कीं प्रीति हवी तुज; ह्मणुनी पुसिलें कोणीं,
खरा मनुज तो तरि घेईल प्रीतिलाच मागोनी.
या साधारण नियमा नव्हता चंद्रचूड अपवाद.
प्रीतिरहित तो कामीं गुंगे, चढला ज्या उन्माद !
परंतु तेव्हां विचार इतका नव्हता झाला त्याला,
गेला वागत सरळ तिजपरी भ्रांत जसा कीं झाला,
त्यासच कारण सांगवलें त्या नसतें आचरणाचें.
क्रोध संपला, त्वेषहि जिरला, नुरलें भान रणाचें.
होती त्याला आशा तेव्हां तत्प्राप्तीची काय ?—
छे छे, कुठली ? ती केव्हांच स्पष्ट लयाला जाय !
त्या आचरणा कारण नव्हतें दुसरें; कारण तेंच--
गाजविला हा प्रभाव सारा दिव्य प्रेमानेंच !

[१६]

निर्मल हृदयांतून वाहतो झरा प्रीतिचा जेथें,
अन्य कामना वा सूडाची इच्छा नसते तेथें.
सदा झटति जन कीं सहवास प्रिय वस्तूचा व्हावा;
अपुल्यावरती प्रेम नसो परि त्याचा क्रोध नसावा.

अपुला दयित न मधुर भाषणें करो कदा प्रेमानें,
तरि इच्छिति जन--बघुनि आपणा सहज हंसावें त्यानें.
कितीहि अपुल्या सत्प्रेमाची ठरो योग्यता हीन,
तरि नर इच्छी ' सादर त्याच्या सेवेला राहीन!'
दूर असो तो कुठेंहि, अपुली स्मृतिहि नसूं दे त्याला,
तरि आनंदित त्या पाहुनि जन धन्य गणिति अपुल्याला!
उडुललनांसह केलि करी जो इंदू अंबरवासी
वांछा कसली भूस्थित तदुदयविकसित कुमुदवनासी?
आहे शुद्ध प्रेम असें हें या भुवनांत ह्मणून
आनंदाचा हस्यमधुध्वनि येतो श्रवणिं अजून!

[१७]

असो. पुरे ही प्रेमवर्णना उत्कंठाभंगाची.
उभी बिचारी असे मोहिनी तिकडे ती केव्हांची.
प्रेमळ बाला तैं हातीं ती धरुनि चंद्रचूडास
उभा रमण निज होता, आली तेथ कारित शुचि हास!
वीरकांत मनिं ह्मणे " अहाहा! भाग्यवंत मी लोकीं.
या रत्नाच्या लाभें भुवनीं धन्य धन्य झालों कीं!
अहा! हजारो खड्गांनीं जें झालें नाहीं काज,
एका शद्वें तें रमणीनें केलें कैसें आज
प्रचंड सरिता रिपुरुधिराची वाहुनि झाली व्यर्थ,
तें साधाया दुष्कर कर्म प्रियाच होय समर्थ!"
चंद्रचूडकर निजकारें धरुनी सादर बोले त्याला
" मित्रा! आधीं क्षमा करीं मज जो अपराध जहाला!"

जणों भेटले प्रेमळ बंधू दूरागत बहु काळें
क्षणांत त्यांचें मन अपकारा अगदीं विसरुनि गेलें!
तरि न बोलवे कुणास कांहीं, मूकपणें तेव्हां ते
हळुहळु तेथुनि पहात खालीं सर्वहि झाले जाते.

प्रसंग पहिला समाप्त.

प्रसंग दुसरा.

(१)

"नाहीं जा मी बोलणार हो तुमच्या संगें आतां.
अजवरि फसवुनि पुन्हां मज असे हांसत काय पहातां?
चला, दूर व्हा, स्पर्शहि तुमचा नको यापुढें मातें.
चारित्र तुमचें हें आहे का उचित वदा प्रेमातें?
पुसलें कितिदां, तदा ह्मणे 'मी आहें वनचर एक.'
भोळी मी, तें खरेंच समजुनि होतें, मज न विवेक.
ठाउक तातां खचित असावा सर्व युष्मदितिहास,
कीं ते 'राज्ञी' ह्मणुनि एकदां वदले मजसि सहास!
मीं नेलें तैं हंसण्यावारी परी खरें तें आहे—
असें वाटतें, सर्व वृत्त तरि सांगा मज लवलाहें.
आपण राजे श्रीपुरचे, मग वसतां कां या रानीं?
कोमल काया ही श्रमक्लिन्नसां कां दुःसह हालांनीं?
सैन्य कोठुनी तुह्मीं आणिलें, मला न कळलें कैसें?
सांगा सांगा कपट अजवरी केलें कां हें ऐसें?"

एका कोमल करें भूषवुनि कंठ वीरकांताचा
मनोमोहिनी करी मोहिनी वर्षाव प्रश्नांचा !

(२)

होता रजनीनाथ अंबरीं मध्यावरि आलेला.
ज्योत्स्नापूरीं विंध्यमहीधर दिसला बुडुनी गेला !
नीळाकाशा शोभवीत बहु चमकत होत्या तारा.
कुसुमपरिमळें तर्पित सकळां वाहे शीतल वारा.
सर्व स्थानीं गाढ शांतता नांदे पूर्णत्वानें;
गगन दशदिशा दराकंदरा प्रशांत दिसती रानें.
उटजाजवळिल रम्य उपवनीं तदा वीरकांताला
लाडें लाडें असे विचारी प्रश्न मोहिनी बाला.
तदुत्कंठिता वृत्ति अशी ही पाहुनि तो बहु हासे.
प्रेमानंदीं मग्न जहाला तिचिया ललितविलासें.
" गडे मोहिनी ! कशास माझें वृत्त हवें तुजला गे ?
छे छे, कथितों, थांब, नको या आव्या घालूं रागें !
कोण मान हा ! कां या दीनावरी अकारण कोप ?
सोड जाउं दे आतां, आली आहे भारी झोंप ! "
" व्याघ्रमुखांतुनि मला सोडवुनि भारी श्रमलां आज,
तेणें आली काय ग्लानी तुह्मां ही नृपराज ?
बसतें एथें मी, तुह्मी जा व्हाया निद्राधीन,--
परि मी आतां कोठुनि निजुनी तुह्मां स्वस्थ देईन !
या बाहूंचा आश्रय करुनी मजवरि टाका भार,
बसा इथें परि, पुरवा माझी उत्कंठा अनिवार.
चरित्र तुमचें सर्व समजल्यावीण न मी निजणार,
अशीच बसुनी निजूं तुह्माही मी नाहीं देणार ! "

हंसुनी, जवळी ओढुनि तिजला, वीरकांत सोत्कंठ
करद्वयानें तिच्या आपुला करवी वेष्टित कंठ !
संमुख तिज दृढ आलिंगुनि तो प्रेमपूरितस्वांत
ह्मणे " जिवलगे, ऐक आज हा सारा मम वृत्तांतः--

(३)

" माझा तात प्रसेन होता शूर धाडसी फार.
असे सर्वदा नाद तयाला मृगयेचा अनिवार.
केव्हां केव्हां एकटाच तो जाय निबिड वनिं दूर.
भीति कशी ती नव्हती त्या, बहु वधी श्वापदें क्रूर.
परी साहसीं संकट केव्हां तरी सत्य यायाचें;
पार पडति नर त्यांतुनि, असतां आनुकूल्य दैवाचें.
एके दिवशीं त्याचें झालें युद्ध तीन वाघाशीं;
प्रसंग होता कठिण फार तो, गाठच ती प्राणांशीं.
एका व्याघ्रा वधुनी केला दुसऱ्यावरती वार,
खड्ग पावलें भंग तदा, तो झाला यद्यपि ठार !
आली गर्जत त्यावर तिसऱ्या व्याघ्राची तों स्वारी,--
स्वजीविताशा तेव्हां सुटली मम जनकाची सारी !
एक युवा तों धावत आला तेथें आवेशानें,
त्या व्याघ्राचीं शकलें केलीं दोन तयें खड्गानें.
कृतज्ञ माझा जनक प्रेमें आलिंगन दे त्याला,
तों युवकाचा देह विकंपित रोमांचित गे झाला !
आश्चर्यानें निरखुनि बघतां चकित होय मम तात;
कीं ती होती कोणी सुंदर तरुणी नरवेषांत !
यौवन आर्धी, प्रसंग तसला, प्रेमहि जडलें फार,
मग ऐशा या सर्व साधनीं काय घडुनि येणार ?

विपिनदेवता साक्षी करुनी प्रेमानंदें त्यांनीं
आनंदानें लग्न लाविलें सखे तदा त्या स्थानीं.
मम जनकाची शूर गुणवती ती वनपरिणित भार्या
तीच जाण गे जननी माझी स्वर्गदेवता आर्या !

(४)

झाला नाहीं परी बरा या लग्नाचा परिणाम;
शोकें भरलें श्रीपुर, होतें जें मोदाचें धाम !
माझी जननी रत्नपूरच्या कन्या भूपाळाची;
या लग्नाच्या वृत्तें झाली वृत्ति क्रुद्ध तयाची !
कीं होता या उभय कुलांत द्वेष फार दिवसांचा,
तो भडकाया कारण झाला विवाह हा दोघांचा.
रत्नपुरानें शीघ्र तयारी संग्रामाची केली,
दोहोंकडचीं मनें भरोनी आवेशानें गेलीं.
अनेक झालीं युद्धें, सैनिक पुष्कळ कामा आले,
शोणितसरिता प्रचंड वाहुनी सागर लाल जहाले !
एकालाही परी जयश्री रणीं माळ घालीना.
गेलीं वर्षें बारा, शांत त्वेष परी होईना !
होता अमुचा तैं जयासिंह प्रधान विश्वासाचा.
नीचपणानें त्यानें केला घात स्वीय नृपाचा !

(५)

विभवलालसा दुर्निवार ही सुटली गे कोणाला ?
दुर्दैवें हा तिच्या अंकित प्रधान अमुचा झाला.
सुवर्णराशी पाहुनि दिपला, विचार सोडुनी सारा
रत्नपुरा वश झाला, केला ऐसा मोह-पसारा !

एका तिमिरव्याप्त यामिनीमाजी निष्प्रतिबंध
रत्नपुराधिप शिरे श्रीपुरीं क्रोधें होउनि अंध.
प्रिय कन्येचा कुंकुमतिलक स्वकरें हाय पुसाया,
सौभाग्यावर निज दुहितेच्या स्वतां धाड घालाया,
तिच्या पतीचें मस्तक तोडुनि भूमाते अर्पाया,
दूषित रक्तस्रावें त्याच्या स्वविमलकीर्ति कराया,
जनकप्रेमा जनकपदाला कलंक लावायाला,
क्रोधावेशें वृद्ध भूप तो नगरीं शिरता झाला !
जयसिंहानें द्वारें उघडुनि मार्ग दिला सैन्यास;
अमुच्या सौख्यावरि नीचानें केला अनलन्यास !
गाढ शांतता नांदत होती, निद्राकुल जन सारे,
तों भरलें पुर तें, वीरध्वनियोगें हाहाकारें !
भूप असावध, रात्र तशी ती, नसे तयारी कांहीं,
खड्‌गें उपसुनि शत्रु संगरा दारामध्यें राही !
काय घडावें तेव्हां, अमुचें हा हा ! सरलें भाग्य--
नष्ट जाहलें मम जननीचें त्या रात्रीं सौभाग्य !
पतिनिधनानें क्रुद्ध अशी मम माता सैनिक सारे--
जमवुनि अरिवरि गेली, चढलें आवेशाचें वारें !
या हल्लयानें रत्नपुराधिप सानुग ठार जहाला;
परी बळी ती मम जननीही पडली अरिखड्‌गाला ! ! "

(६)

क्षणभरि पूर्वस्मृतिनें दाटुनि कंठ वीरकांताचा
भूमातेला भिजवी तेव्हां प्रवाह अश्रुजलाचा !
अपुल्या स्कंधावरि तन्मस्तक घउनियां त्या काळीं
गालावरि निज गाल मोहिनी टेकुनि अश्रू गाळी !

निजदयिताच्या दुःखश्रवणें आपण दुःखित व्हावें
हें प्रेमाचें मधुर शील हो नाहीं कोणा ठावें ?
मिठ्या मारुनी परस्परां तें प्रणयियुगल त्या स्थानीं
बसलें होतें अन्योन्याला न्हाणित अश्रुजलांनीं.
हें स्वर्गीय प्रेम पाहुनी लज्जित तेजोहीन
विषयलुब्ध विधु जाय पश्चिमक्षितिजीं व्हाया लीन !
शीतल वायू रक्तप्राचीप्रेषित वाहे मंद;
मधुर मंजुल प्रेमगायनें करी विहंगमवृंद;
त्या प्रणयींना तदा सुखविती लतिका कुसुमामोदें;
मर्मरशद्बें तरुवर त्यांचें प्रेम वर्णिती मोदें;
उषा स्वविभवप्रदर्शनें बहु झटे त्यांस रमवाया;
सृष्टिसुंदरी करी मनोहर अभिनव विभ्रम वाया !
नव्हती त्यांना शुद्धी तनुची, स्मृती बाह्य जगताची.
अहा ! कुणाला मिळेल असली अनुभूति प्रेमाची !

(७)

प्रेमानंदीं विलीन झालें आहे हृदय तयांचें,
हलवुनि त्यांना कोणीं व्हावें अधिकारी पापाचें ?
प्रेमोत्कर्षप्रदर्शनास्तव लिहितो काव्य कवी हा,
भानावर त्यां आणायाची कशी होय मग ईहा ?
प्रेमभंग हा कुणीं करावा अरसिकता दावोनी ?
प्रेमाश्रूंतें अविचारानें अवमानावें कोणीं ?
नीरस जग हें होतें रसयुत ऐशा प्रेमाश्रूंनीं;
नसती अश्रू तरी वृथा तें वृथा जगीं राहूनी !
प्रेमाश्रूंविण आनंदाचा उद्भव होइल काय ?
प्रेमाश्रूंविण तरू सुखाचा निश्चित करपुनि जाय !

रूक्ष जगा या स्वर्गपदाला अश्रू पोचविणारे,
थांबवुनी त्यां कुणीं धरावे शिरिं पापाचे भारे ?
तोंवरि कथितों मीच रसिक हो ! तुह्मां पुढिल इतिहास.
अश्रु वर्षुनी कमी करूं द्या त्यांना दुःखोच्छ्वास.

(८)

स्वभाव होता ठाउक सकलां कपटी जयसिंहाचा,
नाश कराया चुकताहि न तो मुग्ध राजतनयाचा !
प्रसंग दुर्धर जाणुनि कांहीं विश्वासू दासांनीं
गुप्तपणें नृपकुमरा नेलें तदा पुरांतुनि रानीं.
अज्ञातपणें शैशव त्याचें गेलें घन कांतारीं;
मारायाला कोण सबल त्या, ईश जयाला तारी !
विंध्यवनीं या व्याघ्रसंगतीं साहस शिकला बाल,
हरिसहवासें शूर होय तो कराल दुसरा काल !
वनींहि त्याचें राजतेज तें उज्ज्वल न कदा झाके,
घनतिमिरींही सद्रत्नाची मोहक कांती फाके !
वैभव होतें गेलें सारें, परिमित उरले दास,
कांतारीं त्या तरीहि कांहीं उणें न पडलें त्यास !
लतिका विकसित पुष्पें गुंफुनि तया अर्पिती हार,
शिरें डुलवुनी तरुगण त्यावर ढाळिति चामरभार !
प्रभातसमयीं बंदिजनांसम गाउनि मंजुल गानें
विहंगकुल नृपसुता निद्रिता उठवि बहु प्रेमानें !
ताप निवारी शीत समीरण वीजनकर्म करोनी,
हरिणशावक क्रीडनलीला रमविति त्या दावोनी.
वनदेवींनीं वाढविलेला कुमार तो गुणशाली
भीमविक्रमें ख्यात जहाला लोकीं यौवनकालीं !

[९]

श्रवुनि तदीय प्रताप अद्भुत भ्याला बहु जयसिंह,
मुक्तासंकुलगुहागत जसा शृगाल, येतां सिंह.
तन्नाशार्थ स्वबल विंध्यवनिं वरचेवारि तो प्रेषी,
धाडी दनुजां कंस गोकुळीं जैसा कृष्णद्वेषी !
स्वगुणें केले वश नृपकुमरें भिल्लादिक वनवासी,
तत्साहाय्यें निराश कारितो समरीं जयसिंहासी.
श्रीपुरचे बहु पिढीजाद तैं शूर धीर सरदार
प्रसेनकुमरा त्वरें मिळाले सोडुनियां घरदार.
अल्पावधितचि विंध्यकाननीं त्या निर्मानव ठायां
तयार झालीं कराल खड्गें रिपुरुधिर प्राशाया !
निशीं बोलती गुहा, निश्चलहि पर्वत दिवसां चाले,
वन स्थलांतर करी, *विचित्र प्रकार ऐसे झाले !

[१०]

एके दिवशीं मृगयाकुतुकें वीरकांत त्या रानीं
असतां हिंडत, त्यास वेढिलें तों कांहीं स्वारांनीं.
एकाकी तो वीर शोभला त्या लोकांमधिं तैसा
तरंगताडित रत्नाकरगत मंदरपर्वत जैसा.
अशनिपातसम कृपाण त्याचा पडला अरिवारि वेगें;
तेहि धावले गर्दी करुनी खड्गें उपसुनि रागें.
राजसुताच्या चपल अश्व तों प्रखरशराघातानें
विव्हल होउनि रुधिरसिक्तवपु उसळे बहु वेगानें !
हां हां ह्मणतां फळी फोडुनी शत्रु टाकुनी मागें
अश्व उधळला, स्वारहि धावति गाठाया त्या रागें.

---

* सैनिकांचा कोलाहल आणि हालचाल यांनीं असा भ्रम होई.

बघतां बघतां वीरकांत घनवनीं दिसेना झाला,
निराश विस्मित पहात ठेले अरिगण परस्परांला !

(११)

चंद्रमरीचि व्योम त्यजुनी शिरला सिंधूमाजी;
दारुणतिमिराक्रांत जाहली सारीही वनराजी.
ऐशा समयीं वीरकांत निज बाष्पाकुल नयनांनीं
पहात होता मृत स्वतुरगाकडे निर्जन स्थानीं.
" गड्या ! काय हें केलें ? सोडुनि कसा मला गेलास ?
तुझ्या जिवावर होती माझी शत्रुजयाची आस !
काय चपलता ! काय हुषारी ! काय तुझा तो वेग !
सुगुणस्मरणें तुझ्या प्रबळ मम होतो शोकावेग ! "
वदुनी ऐसें, वीर खरा तो परि शोकाश्रू गाळी;
शून्य दृष्टिनें बघे तुरंगा, हस्त टेकुनी भाळीं.
मृदुल समीरणलहरी त्याचे नेत्र पुसे प्रेमानें,
ताररमणी कुरवाळिति त्या मधुरकिरणजालानें !
हळुहळु त्याचा भर शोकाचा ओसरला मग कांहीं,
वीरकांत तें स्थान सोडुनी कष्टें उठुनी राही.
" काय करावें ? विपिन अपरिचित, संगें नाहीं कोणी,
बिकट व्यसनीं तुरंगमहि हा गेला मज टाकोनी ! "
अशा विचारें जड हृदयानें सभोंवार तो पाहे,
तों दिसला त्या दूर मंदसा दिवा प्रकाशत आहे !
अमित तारका विलसत होत्या शोभवीत आकाशा
दीपदर्शनें परि वाटे बहु त्याला आनंदाशा !
बघुनि एकदां तुरगा दुःखें, सावरुनी तलवार
वीरकांत तें क्रमूं लागला हळूहळू कांतार.

(१२)

काहीं काळें प्राची लागे मंद मंद हांसाया
रमणा पाहुनि मुदित न होई अशी कोणती जाया ?
चंद्रहि सस्मित करीं वेढुनी चुंबी तद्वदनास.
प्रेम रम्य हें पाहुनि झाला मोद अखिल जगतास !
सुधास्राविणी ज्योत्स्ना पसरुनि वन शोभे त्या काळीं;
बघुनि चारुता राजसुताची वृत्ती तन्मय झाली !
धन्य आपणा मानित होते तेव्हां लोचन त्याचे,
अकस्मात तों भाग्य उदेलें पुण्यबळें कर्णांचें !
स्वर्गमेदिनी द्रवुनी गेलीं एकरसीं मिसळोनी !
गान मधुर तें युवक ऐकुनी गेला वेडावोनी.
हंसला इंदु, ज्योत्स्ना हंसली, हंसल्या गगनीं तारा !
गमलें तेव्हां गेला विपिनप्रांत भारुनी सारा !
समीर वाहे मंद मंद बहु, निर्झर थबकुनि राहे,
प्रस्तरखंड द्रवुनी दुसरा जलौघ विपिनीं वाहे ! !
गिरिशिखरांवरि गानश्रवणा अंबर उतरुनि बैसे !
पतत्तारकामिषें देवगण येती खालीं भासे !
गानश्रवणा त्या विपिनांतिल पुष्पें झाले तारे
नभःप्रांगणीं तेजस्वी सुरवृंद मिळाले सारे !
स्वर्ग उतरला खालीं अथवा अवनि स्वर्गी गेली !
त्या गानानें तेव्हां असली स्थिती विचित्रा झाली !
शीत समीरण, रम्य चंद्रिका, मंजु मधुर तें गान,
असो युवक, परि वनही यांनीं स्तब्ध होय गतभान !
हळूहळू नृपकुमार चाले गायनानुरोधानें,
पुढें देखिला नयनाल्हादन निर्झर एक तयानें.

अंक ११ वा.

मोहिनी.

रजतशलाकांसम जललहरी होत्या उसळत त्यांत,
नाचत होता हांसत त्यांवरि कोमल चरणीं वात!
मुक्ता द्रवल्या, किंवा गेले चंद्रकिरण वितळोनी,
राजसुताला गमलें तें मधु सलिल विमल देखोनी!
परि नव्हतें हें तेव्हां त्याच्या दर्शनीय नयनांचें;
गान कोण करि हें जाणाया उत्सुक तन्मन नाचे!

[१३]

रजनिवल्लभावरी लावुनी अपुली दृष्टि विशाला
निर्झरतीरीं बसली होती शांत मोहिनी बाला.
रम्य रूप तें अवलोकाया इंदू उदया आला;
गगनीं चकिता स्तिमिता झाली दिव्या तारकमाला!
संसर्गें त्या शुचि देहाच्या वात प्रमुदित झाला,
उन्मत्तासम नाचुनि नाचवि साऱ्या विंध्यवनाला!
अखिल जगाला करी मोहिनी मोहित रूपगुणानें,
मनःसंयमन कसें करावें तदा वीरकांतानें!
उत्सुक हृदयें मंथर चरणीं जवळ तियेच्या गेला;
गेला कसला त्या रमणीनें ओढुनि त्याला नेला!
तीहि तयाला पाहुनि चकित भ्रांत स्तिमित जहाली,
होउनि गेली मुग्ध क्षणभरि वृत्ति तिची त्या काळीं!

भाव मनांतिल परस्परां तीं नेत्रें कळवित होतीं;
किंवा निरखिति अंत:करणा धरुनी प्रीतिज्योती!
वाहत गेलीं प्रेमाच्या त्या प्रबळ अशा ओघांत,
परवश झालीं!–चिरसुख लाभे किंवा हे ओ घात!
तो झाला ती, ती झाली तो, आत्मस्फुरण गळालें.
स्वातंत्र्याचा ध्वंस होउनी प्रेयोम्य मन झालें!
अश्रुवर्षणें अंत:करणें पाझरलीं दोघांचीं.
प्रेमोत्कर्षे अहा! अशीच स्थिती रम्य यायाची!
सजल लोचनीं परस्परां त्यां पाहुनी तृप्ती नाहीं.
प्रेमोत्कटता असली कुठुनी दिसे भाग्यहीना ही!
प्रेमसमुद्रा भरती येतां नयनपथें तो वाहे,
पवित्र अनुभव असला सांगा किती जणांना आहे!
आत्मत्वाचें भानच नाहीं, जिकडे तिकडे प्रेम!
अतर्बाह्य व्याप्त प्रेमें, सारें प्रेम प्रेम!
हृदयनिवेदन केलें त्यांनीं जलपूरित नयनांहीं.
दिव्यप्रेमा वर्णाया बल जड वाणीला नाहीं!

[१४]

कांहीं काळें करुनि शांतताभंग वदे युवराज:–
"या नयनांचें जन्माचेंही सार्थक झालें आज!
अहा! खरोखर शत्रुगणानें केला हा उपकार–
कीं मज दिसलें या स्थानीं हें सौंदर्याचें सार!
धन्य धन्य मी वनवासीही ववतों या बालेला!
मार्गाक्रमणश्रम मम सगळा अहा लयाला गेला!
स्निग्ध दृष्टि ही सुंदरि! फेकिसि मजवरतीं अनुरागें,
धैर्य धरोनी म्हणुनी विनयें आतां तुज हें मागें!

ऐस कुणी तूं, त्याची नाहीं परवा मजला खास,
सर्वस्वानें आज शोभने ! झाला हा तव दास !
तूं हो माझी हृदयदेवता--कारें मजवरि अधिकार.
तूं जीवित मम होसि, याहुनी काय वदावें फार ?
करिं मजवरि तूं अथवा न करीं प्रीति तुझी ती दिव्य,
परी करूं दे तुझ्यावरी मज चिंतित तव शुभ भव्य !
हें जीवन तव करीं ओपिलें वांछा धरुनि न कांहीं;
प्रेमदृष्टिनें शक्य न, तरि या करुण दृष्टिनें पाहीं !
होओ कांहीं आतां माझें, परवा नाहीं त्याची.
विश्रांतीची भूमि तूंच गे माझ्या हतहृदयाची !
निर्झर धावत धावत जातो भेटाया सरितेला,
निर्हेतुक हा उत्कंठेनें तसा तुजकडे आला.
घे मज जवळीं चारुहासिनी ! मत्रा आपुला मान.
बाहुलतेनें भूषवि--खड्गें छेदिं न आतां मान !
विकथ्थनें या तुला देवते त्रास न तरि कीं आला ?
क्षमा करीं गे हृदयलोभने, वेडा जन हा झाला !
नसेल माझी तशी योग्यता, परि मन झालें भ्रांत.
प्रेमालापावीण तुझ्या हें होइल केवीं शांत ?
वृक्षवल्लरी, विहग, कुरंगम, आप्त हेच गे ज्याला,
प्रेम काय तूं करिशिल त्यावरि ? वदुनि विफल वाग्जाला !
नक्षत्रें, ग्रहमाला, तारे कांहिंच नाहीं ज्यांत,
विहार करिशिल चंद्रकले तूं का या आकाशांत ?
शिलाशकलयुत पथावरुनि हा निर्झर संतत धावे,
श्वासाघातांक्षम मृदु अंबुज त्यांत कसें विकसावें ?

समजे मज हें, परि हत हृदय प्रविचल झालें आहे.
वर्षासरिता तुफान होतां काय बंधनीं राहे?
त्वत्प्रेमाला योग्य नसें मी, आहें वनचर एक,
काय करूं गे परंतु हा मज नाहीं होत विवेक!
असाध्य वस्तू पाहुनि मोहें तिची धरावी हाव,
इंद्रकार्मुकप्रभा धराया घ्यावी तिकडे धाव,
उडुरत्नांची माला हातीं यावी ह्मणुनि झटावें,--
हें दुःखाला कारण केवल, नाहीं कोणा ठावें?
परंतु झाला वेडा जो जन, होय काय हें त्यास?
प्रेयःप्राप्ती होओ किंवा मुकेल तो प्राणास!
मरुप्रदेशीं मृगजलसरिता सुंदरि! रम्य बघून
तृषा भागविल किंवा जाइल मुग्ध कुरंग मरून!
प्रदीपकलिका देखुनि सुभगे! वेडा होय पतंग,
तत्प्राप्तीस्तव झटे सारखा, जाओ जळुनी अंग!
समुद्रलक्ष्मी अवलोकाया तरल नद प्रेमानें
पर्वतशिखरावरुनी खालीं पडती उत्कंठेनें!
यश येओ वा नच येओ गे प्रेम न तिकडे पाहे,
प्रेयोलाभा सतत झटावें स्वभाव त्याचा आहे!
आकाशासम जरि न लागला अंत तुझ्या प्रेमाचा,
तरी सदा मम मनोविहंगम तयांत धावायाचा.
प्रेमवल्लरी! आलिंगीं तूं खुशाल पादप अन्य,
परंतु विसरूं नको कधींही दीन मित्र हा वन्य!
तुझ्या शीतल च्छायेखालीं बसुनि ताप वारीन;
मृदुलकिसलयस्पर्शें सुमनोगंधें सुख सेवीन!

अमरनिम्नगे! जा तूं प्रेमें भेटाया सिंधूला,
तृष्णा वारीं मजला कांहीं अर्पुनि जलबिंदूला!
शारदेंदुसह खुशाल अंबरिं करीं चंद्रिके क्रीडा
या दीनाच्या तापवारणीं वाटो तुज न व्रीडा!
उद्यद्रविला पाहुनि रागान्विता उषा उल्हासे,
दीन सृष्टिला प्रेमें निरखुनि काय न ती मधु हांसे?
आकाशश्री दिव्य शशांकें भारी शोभत आहे,
काय तरी गे लघु नक्षत्रा सांग वागवीना हे?
त्वदीय सकल प्रेमाचा निधि हवाच मजला आहे,
परंतु नसला उपाय तरि मज अल्पहि दे लवलाहें!
प्रेमयाचना पण ही माझी विफल न अगदीं व्हावी
आशालतिका सलिलाभावीं नच गे करपुनि जावी!
मनःप्रसून स्वयें तुजपुढें विनयें जन हा ठेवी,
करिं घे प्रेमें अथवा चरणीं चुरडीं याला देवी!"
वदुनि असें निज बाष्पाकुल तिजवरी दृष्टि तो लावी.
जगीं कशाशीं विमल प्रीती ही सांगा तोलावी?

(१५)

"अहा! जाहला खरेंच दयिता! आपण माझे काय?
समजा तरि हा निश्चित आतां आहे तुमचा काय!
वनदेवींनो! दिव्य चंद्रिके! निर्मल तारामाले!
साक्ष ठेवुनी तुह्मां आज मी प्रियप्रेमवश झालें!"
गद्गदकंठा साश्रुलोचना वदुनि मोहिनी बाला
प्रियहृदयावरि लोटी कंपित रोमांचित देहाला!
मृणालकोमल तनुलतिका ती वेढुनि दृढ भुजपाशीं
युवक हर्पला अमित, तदा तो तुच्छ गणी स्वर्गासी!

ठेवुनि त्याच्या वक्षावरि शिर मोदाश्रू वर्षोनी
मूर्तिमती ती प्रीति--मोहिनी टाकी त्या भिजवोनी!
पुनःपुन्हां तीं गाढालिंगन देती परस्परांला;
जणों इच्छिती भिन्न देह हे जावे एकत्वाला!
हृदय--मेलनीं अंत:करणें प्रणयी एकच होती,
या तत्त्वाची तेव्हां आली त्यांस मधुर अनुभूति!
अश्रुस्यंदन करुनी प्रबळ प्रेमा कारिती शांत.
प्रेम नभीं हें पाहत होता कुतुकें रजनीकांत!

(१६)

" प्रथम दर्शनीं वेडें होणें कामुकता ही सारी.
हितपारिणामी नसती सर्वच वस्तू चेतोहारी!"
व्यवहाराचा नियम असे हा; अनुभव सर्वा आहे,
परि या नियमीं बद्ध पवित्र प्रीति कदापि न राहे!
पडतां अग्निस्फुलिंगलवही कर्पूराचा राशी
सहसा पेटुनि दीर्घ ज्वाला चढती त्या आकाशीं!
फेकित किरणें उदयगिरीवर येतां चंडमरीचि
तिमिर एकदम नाशुनि सस्मित मुद्रा हो अवनीची!
दिव्यप्रेमोद्भव तैसाच प्रथमदर्शनें होतो,
स्वगुणें जोडी सहज स्वर्गा या अवनीस अहो तो!
प्रथमदर्शनीं ज्या प्रेमाचा उद्भव झाला नाहीं,
उत्पत्तीचा समय न येइल त्यास पुढें केव्हांही!
स्वर्गीयत्वा चुंबायाला लहरी ज्या प्रेमाची
धावुनि जाते, उद्भवकालीं स्थिति ऐशीच तयाची!
निसर्ग ह्मणजे पशुता ह्मणती, आधीं हवा विचार,
निरपवाद हें असें; सोडुनी विमळ प्रीतिविकार!

विचार करुनी चित्त संयमुनि सद्गुण मिळती सारे;
नाहीं हातीं कोणाच्या परि हें प्रेमाचें वारें!
ज्याच्यापुढतीं निरुपायानें विचार टेकी हात,
अशी एकली प्रीतिच केवळ आहे या लोकांत!
मनांत येइल तसें वागणें कारण हें हानीला,
लाभच होइल परंतु भजतां असल्या सत्प्रीतीला!

(१७)

विकत्थना ही हवी कशाला अथवा पांडित्याची?
कशास सांगड घालावी ही व्यवहार--प्रेमाची!
जेथें तेथें मी! मी! अपुल्यावांचुनि कांहीं नाहीं,
जाणावें हें प्रेम कसें त्या व्यवहारी हीनांहीं?
स्वार्थ! स्वार्थ! स्वार्थावांचुनि नाहीं ध्यान कशाचें,
मंदमतींना असल्या कुठुनी रूप कळे प्रेमाचें!
नाहीं हानि, त्रासहि नाहीं, आहे सुखी शरीर,
तेव्हां उठती प्रेम कराया व्यवहारी हे वीर!
प्रेम कशाचें? पशुता सारी, जाणा अधम स्वार्थ!
आत्मत्वाची विस्मृति पडली नसे जिथें प्रेमार्थ.
बुडो सागरीं जग हें अथवा जाओ अनलें जळोनी,
घेतिल तरि हे अधम नरपशू निज स्वार्थ साधोनी!
स्वार्थास्तव हे प्रियवस्तूला तुडवितील चरणांनीं,
पर्वतशिखरावरुनी देतिल खुशाल तालें लोटोनी!
नाहीं जीची ओळखही त्या व्यक्तीवर मोहून
प्रेम करावें स्वार्थरहित, हें पटेल त्यां कोठून?
हानि हानि ती अविचारें या सांगा काय घडेल?
लयास जाइल धनराशी वा देह गतासु पडेल.

परंतु घडतें समाधान जें निष्फलही प्रेमांत,
तें नाहीं हो लाभायाचें त्रिभुवनिंच्या राज्यांत !
द्यावा उलट स्वप्रेमाचा मोबदला प्रेयानें,
अशी वासना जिथें असे ती प्रीती हीनचि जाणें !
अपुली प्रीती सफला झाली अथवा विफला झाली,
सत्यप्रेमी तरि न गुंगती दुःखनिराशाजाळीं !
रसौघ अपुला गंगारूपें हिमगिरि सिंधूमाजी
अनंत वर्षें सोडित आहे, हेतु काय सांगा जी ?
मेघ वर्षती, नद्या वाहती, फलित होय तरुराजी,
कुसुमें फुलती, गंधें भरिती प्रमोद लोकसमाजीं.
जरी तोडिला तरीहि कटुफल तरुवर देतो काय ?
पदीं तुडविलें, चुरिलें करिं, तरि कठोर पुष्प न होय !
येओ कोणी नीच साधु वा, तृष्णा वारुनि त्याची
सुखित करावें, याविण अन्य स्पृहा नसे सरितेची !
प्रेमाला जें प्रिय झालें तें प्रियचि सर्वदा झालें.
अप्रिय होइल कदापि तें न व्यसन कसें जरि आलें.
व्यवहारामधिं लाभ हानि वा होओ कांहिं खुशाल,
प्रीती करणें हाच प्रेमी समजे लाभ विशाल !

(१८)

लोकोत्तर जे असती सद्गुण, सज्जन सेविति यातें,
लाभसुखाची इच्छा न शिवे कदापि तच्चित्तातें !
प्रसंग आला प्राणावरि तरि धर्म त्यजित न धीर,
अमित रिपुगणीं शस्त्र न ठेवी एकाकीही वीर,
असत्य वचन न साधु काढितो रसना तुटुनी जाओ,
त्यजिति न नयपथ, खुशाल नाशहि सर्वस्वाचा होओ,

तसेंच आहे प्रेमाचेंही. तें न स्वार्थ पहातें.
अशुभ न चिंती जरी प्रियानें कंठ चिरियला हातें!

(१९)

असो; कशाला रुक्ष विषय हा? श्रम केवल वाग्जालें.
मधुर--मोहिनी--दर्शन घ्याया उत्कंठित मन झालें.
प्रणयि-युग्मक प्रथमप्रेमावेग ओसरुनि शांत--
होतां, मानी आपणास तें जगांत धन्य नितांत!
वदे मोहिनी " चला कुमारा! सदनीं अमुच्या आतां.
होइल भारी तोष तुह्मांला पाहुनियां मम ताता."
धरुनी त्याचा हस्त हळुहळू पुढें सुंदरी चाले.
सुखप्रसंगें त्या युवकाच्या नयनीं अश्रू आले!
" अशी मिळाली मार्गदर्शिका दैवानें संसारीं,
एकवटोनी भाग्यें माझीं उदया आलीं सारीं!
सहज चालतां कंटकमार्गीं सुंदर रत्न मिळावें,
श्रमावांचुनी तृष्णाकुल--नर--मुखिं पीयूष पडावें!
झालें तैसें; जिच्या प्राप्तिची कल्पनाहि नच व्हावी,
ती ही ललिता स्वयें आज कीं मला मोहुनी जावी?
प्रेमाभावें सारें जग मज शून्यचि होतें झालें;
स्थिरचर आतां दिसतें नयनां प्रेमें व्यापुनि गेलें!
दवानलानें स्थिति दारुण ज्या आली दग्ध वनाला,
फुटुनि पालवी डुले तेंच कीं वळतां अंबुदमाला!
मदीय आयूंतील निराशारजनी तिमिराक्रांत
संपुनि आतां उषा--मोहिनी उगवे सुखकर शांत!"
विचारमाला अशी मानसीं राजसुताच्या चाले,
रमणीचें सुमलतिकावेष्टित उटज जवळ तों आलें.

(२०)

हा इतिहास स्वकांतवदनें ऐकत रमणी आहे,
तों उदयाचलमौलिवरी[1] ये सहस्रांशु[2] ल्वलाहें.
रागान्वित त्या अवलोकुनियां सराग सृष्टी झाली,
हिम बिंदूंचे--मुक्तामणींचे[3] अलंकारही ल्याली!
लतिकाव्याजें नाचे, कमळें मृदु मृदु हासे,
गुंजन्मधुकरमिषें मनोहर गान करी उल्हासें!
जिकडे तिकडे आनंदाचा प्रेमाचा वर्षाव;
स्वर्गा खालीं आणाया नभि विहंग घेती धांव!
अभिनवविकसितलताप्रसुमांचा परिमल मधुर भरोनी
समीर[4] वाहे मंद मंद हा टाकी मन मोहोनी.
ही सृष्टीची चारु[5] मनोरम शोभा प्रणयोत्कर्षें
पाहत होतें तेथें मुग्ध प्रणयियुग्म[6] तें हर्षें.
कुतुकें उपवनकुसुमें वेचुनि गुंफित माळ तयांची
सुहास्यवदना गेली उठुनी देवी राजसुताची.
क्षीण तारका आकाशांतिल, उषःप्रभा रमणीय
बघतां बघतां तिथेंच हळुहळु सुप्त[7] तिचा प्रिय होय.

प्रसंग दुसरा

समाप्त.

---

१ शिखरावर. २ सूर्य. ३ मोत्यांचे. ४ वारा. ५ सुंदर. ६ जोडपी. ७ निद्रित.

प्रसंग विसरा.

(१)

प्रवातचक्रीं होते जैशी स्थिती शुष्क पर्णाची,
तशी मोहिनी--दर्शन घडतां होय चंद्रचूडाची !
आपण येथें कशास आलों ?-- करितों आतां काय ?
हेंहि विसरला, कर्तव्याचें भान हरपुनी जाय !
काममूढ कीं उच्छृंखल तो तेव्हां होता झाला ?
असेल तैसें तरी खरोखर दूष्य गणावें त्याला.
परंतु होता साराही हा प्रेमाचा परिणाम.
काम न लव परि गमे मोहिनीनाम तया सुखधाम.
क्षुद्र विकार प्रथम उद्भवुनि कामलुब्ध तो झाला;
सत्प्रेमाची सुखानुभूती तेव्हां नव्हती त्याला !
कामविलासाविण होते न प्रेमाची परिपूर्ति--
लटिकें गमलें हें, त्या दिसतां मधुर मोहिनीमूर्ति !
विषम वाटलें प्रथम तयाला बंधुत्वाचें नातें,
परंतु दिसलें--तिथेंहि नाहीं प्रतिबंध प्रेमातें !
पण बंधुत्वचि काय ?-एकही ऐसें नातें नाहीं--
प्रीती उज्ज्वल जिथें वाढतां तशीच थबकुनि राही !
प्रेमाकरितां प्रेम करावें; फळ घ्यावें मग त्याचें--
प्रथमचि धरितां फलस्पृहा न प्रेमहि वाढायाचें !
प्रीतिकराला प्रीती करितां होतो जो आनंद--
तेंच तयाचें फल ! हें कैसें मेळवील कामांध ?
नंदनविपिनांतून पातली भूमिवरी जी प्रीती,
तिच्या फलाची जगांत सांगा व्याप्ति कशी व्हावी ती ?

निसर्गसुंदर तनुकांती वा यौवनसुषमा दिव्य
खुशाल पाहुनि कौतुक माना ईशकृतीचें नव्य !
परंतु कांहीं हेतू नसतां ध्यास मनाला लागे,
समजा तेव्हां अपुलें ठाणें दिधलें दृढ अनुरागें.
प्रेमोत्कटतेपाशीं न मिळे स्वार्थाचा लवलेश.
एकत्वावरि सृजिला आहे सत्प्रेमाचा देश !
प्रेममंदिरीं एकचि सगळीं नातीं अथवा जाती;
सरिता निर्झर सान थोरही मिळुनि सागरीं जाती !
धर्मबंधनें पति बंधू वा मित्र, प्रेमें एक !
प्रेम मानितें सर्वांस प्रिय भेद त्यजुनि विशंक !
प्रीति-देवता गुणहीनासहि बघुनि सुखें दाटेल;
वासवकार्मुकदण्ड विगुणही वृथा कुणा वाटेल ?
विषयवासना क्षुद्र किती मग ? तिजकारितां अविचारें
कसें मोहिनीप्रेम तयानें टाकावें धिक्कारें ?

(२)

परंतु खड्गें चमकुनि रुधिराविण जावीं कोशांत--
विचित्र पाहुनि हें, राहिल हो वीर कोणता शांत ?
तसेंच सारे निरुपायानें स्वार चालले मार्गे,
वक्र दृष्टिनें पाहत पाहत मोहिनीस बहु रागें !
श्रीपुरनाथा सविनय सस्मित उटजिं तयेनें नेलें.
समीपस्थ तरुवृंदतळीं ते स्वार सर्वही ठेले.
पक्व फळें, मधु सलिल अर्पुनी अतिथीचा सत्कार
करी मोहिनी; प्रमुदित झाला चंद्रचूड अनिवार !
सुप्ति तयातें येतां, हस्तीं धरुनि वीरकांताला
उटजोद्यानीं प्रमोदनिर्भर जाय मोहिनी बाला.

चारितनिवेदनिं गुंग होय तो, तदाकर्णनीं तीहि-
त्यांना नव्हती बाह्य जगाची त्या काली वार्ताहि !

(३)

वृद्ध सैन्यपति पहात होता स्वस्थ चंद्रचूडाचा
कसा तरी नियमुनी तदा तो आवेश क्रोधाचा;
शिरुनि उटजिं कारि जागृत सत्वरि सुप्त चंद्रचूडास.
स्फुरदधरदला शोणितनयना उठुनि बघे तो ज्यास.
" धीरसिंहजी ! काय जाहलें ? क्रुद्ध असे कां झाला ?"
उत्सुकतेनें चंद्रचूड तें तन्मुख पाहत ठेला !
धीर बोलला पादाघातें कंपित भूमि करोनी
" जयसिंहाच्या तनया ! पुससी तूंच काय उलटोनी ?
रणांगणावरि जीवित माझें सारें गेलें आहे,
शत्रुमर्दनीं केश पांढरे झाले मम हे पाहें !
परंतु मूढा ! तुजसम न दुजा कुठें पाहिला वीर !
काय शौर्य तव ! वीर्य अलौकिक ! निस्तुल संगरधीर !
अबला--लोचन--तेजें असि तव झाला तेजोहीन,
दीन हीनसा शत्रुपुढें शिर कारिसि निस्त्रपा ! लीन.
हाय ! हाय ! तो भैरवविक्रम वीरसेन कां जावा ?
संगरदर्पी ज्यास पाहुनी स्वमनीं कालहि भ्यावा !
शूर भ्राता तो नैष्ठुर्यें वधिला ज्या नीचानें--
सदनीं त्याच्या आदरसत्कृति सेवी हा प्रेमानें !
जेथें शोणितपातावांचुनि वार्ता अन्य नसावी,
तिथें मूढसम काय अहाहा ! नातीं नव जोडावीं !
रक्त वहावें तेथें होतो मंद कसा अनुरक्त ?
नक्तंदिन दृढ वैर तिथें हा होय प्रेमासक्त !

खड्गधराचें ब्रीद काय हें? कलंक हा शौर्यास !
वीरललामा ! आवेशानें वृथाचि कीं आलास?
काय दुर्बला ! स्वर्गवासि तव पित्यास वद वाटेल ?
कृती तुझी ही पाहुनि काय न तन्मानस फाटेल?
जयसिंहाचें ओजस्वी हें बीज न वाटे सत्य !
त्वज्जननीचें निंद्य खरोखर होइल पातिव्रत्य !
ऊठ ! खड्ग धे करीं, वाहुनी शत्रुशिरा भूमाते,
धन्य जगीं हो ! हृदयांतुनि दे हांकुनि या प्रेमातें !
प्रेमाकरितां झुरत असावें, अश्रु सदा ढाळावे,
उन्मत्तासम सोडुनि निद्रा निशासमयिं भटकावें,
याकरितां न क्षत्रवराचा जन्म जाहला लोकीं !
असिप्रभावें वरुनि जयश्री पाडावे रिपु शोकीं.
वीर्य सोडुनी स्वस्थ मनानें काय इथें बसलास ?
उपसुनि खड्गा चल ! वीर्यें हो वंदनीय वीरांस !
लावूं बघसी वीरत्वाला कलंक जीच्यासाठीं,
ती तर तुझिया अरिसह आहे करीत बसली गोष्टी.
लाभाकरितां तिच्या तरी घे खड्ग, वधीं शत्रूला,
शांत बैसुनी लावितोस कां कलंक निजवंशाला ?"
कठोर वचनें हीं ऐकोनी चंद्रचूड दुःखानें,
व्याकुळ होउनि पाहि त्याकडे बाष्पाकुल दृष्टीनें !

(४)

" धीरसिंहजी ! काय बोलतां ? वृथा निंद्य आरोप !
विव्हल करि मज भेदुनि तुमचें कठोर वच हा रोप !
विषयवासना धरुनी का मी तिजवरि मोहित झालों ?
काय वाटलें तुम्हांस सांगा समर कराया भ्यालों ?

देवीसम ती स्वर्गवासिनी निंद्य न हो मम माता,
शौर्यें दाविन पुत्र असें मी अनुरूपचि हा ताता.
परंतु वैरचि नसे तेथ या काय काज शस्त्राचें ?
शत्रुगणाचे प्राण हरावें शौर्यें, नचि आप्तांचे !
प्रिया मोहिनी भगिनी माझी, वीरकांत तत्कांत,
शस्त्र कुणावरि उपसूं ?-- व्हा हो विवेक करुनी शांत !
जिनें अह्मांला युद्धापासुनि फिरवीलें प्रेमानें,
दूर करील न काय तीच हो युद्धबीज यत्नानें ?
सुलभ उपायें द्वंद्व शमे जें, संगर त्याकरितां कां ?
धीरसिंहजी ! करा विचार, क्रोध सर्वही टाका."

(५)

"पवित्र वृत्ती बघुनि तुझी ही प्रीत जाहलों फार,
परंतु समजें क्षात्र धर्म हा समशेरीची धार !
रणांगणावरि नातें अथवा बंधाबंध न कांहीं.
समर करावें त्याशीं--संमुख कृपाणधर जो राही !
भीष्में जिंकुनि गुरुला वरिली विजयश्री संग्रामीं,
बभ्रुवाहनें निजजनकातें वधिलें बाणग्रामीं.
फार कशाला, युद्ध थोर जें होय कुरुक्षेत्रांत,
ठावें आहे तुजला--सारे आप्तचि होते त्यांत !
भूप असासि तूं, व्यक्ति क्षुद्र न, तोड शीघ्र हा पाश.
विकारवशता सत्य तुझा ही करील अंतीं नाश !
प्रजाजनांचें दैव सर्वही तुझ्याच आहे हातीं,
स्त्रैणपणें तव होइल त्यांच्या सर्व सुखाची माती !
राज्यहिताच्या समयीं असला नको व्यक्तिसंबंध,
अनुचित नृप तो समजें होतो जो आप्तप्रेमांध !

लोकरंजनाकरितां रामें कठोर करुनी चित्त,
प्राणाधिक निज रमणी त्यजिली बा ! निर्जन विपिनांत.
आहे श्रेष्ठ प्रेम परंतु श्रेष्ठ धर्म त्याहून,
वाग निरंतर सादर पूर्वजचारित्र्या पाहून ! ”

(६)

भेदक दृष्टी लावुनि त्याच्यावरी वदे मग धीरः–
“ अबलेच्छेपरि वागत नसती कदा मनस्वी वीर.
भगिनी झाली तुझी कशी ती ? भ्याड असा कां होसी ?
मुग्धच्छंदानुसार वीरा ! कैसा वागत जासी ?
चंडविक्रमें अरिविध्वंसन करितां संग्रामांत,
हीच बालिका घालिल माला सत्य तुझ्या कंठांत !
त्या मुग्धेचे विचार अथवा प्रेम काय बघतोस ?
तुझा पराक्रम पाहुनि तुजवरि करील ती नच रोष.
नवयुवतीचें प्रेम खरोखर आहे दुसरें तोय !
पात्र लाभतें तसाच सत्वर तदाकार ही होय.
तुफान सरितेऐसें आहे प्रेम जरी तुज वाटे--
तरी प्रयत्नें वळण काढुनी लागे दुसऱ्या वाटें !
या बालेच्या प्राप्तीकरितां हताश कां होतोस ?
तुझ्याच हातीं आहे सारें, दे न बिघोला दोष !
विभव अतुल तव, सौंदर्यहि हें, शौर्य, निरुपम प्रीति,
यांहीं मोहुनि काय सांग रे ! वरणार न तुजला ती ?
दिसतें मजला त्यावरि जडलें प्रेम तिचें सहवासें;
सुमसंसर्गे प्राया क्षुद्रहि मृत्कण भरिती वासें !
समीप तरु जो त्याला लतिका गाढालिंगन देती;
खरीच नसते हेतुपुरःसर या तरुणींची प्रीति.

स्वच्छंदानें वाहत जावें, कोठें तरी मिळावें,
सरितेचा हा स्वभाव; ह्मणती प्रेमास्तव ती धावे!
सांग कोणत्या भ्रमरास्तव या फुलति पद्मिनी सर्व?
स्वोद्देशें खोळीला कल्पुनि कारिति मंदधी गर्व!
सहज उषेचा बघुनि रक्तिमा तिची वर्णिती प्रीति;
मुग्ध मानिती निजरमणीला अनुरागाची मूर्ति!
कसलें प्रेम? प्राया सारा मूढांचा बाजार.
'योषित्प्रीती' उन्मत्तांचा आहे वाक्संभार!
वनचरसंगें घालवींत दिन वसते जी कांतारीं,
तदर्थ कारिसी दुःखाकुल कां जीवितयात्रा सारी?
मला न वाटे--केव्हांही तुज ही नाहीं वरणार.
मृदुल कमलदल सहन करील न समशेरीचा वार!
सुंदर पुष्पें असलीं फुलती विपिनीं वा उद्यानीं
स्वतांस्तव न, तीं भोगिजनांस्तव; सत्य वचन हें मानीं!
या पुष्पाला हुंगायाला जहालास तूं सिद्ध,
तरी हंसेलचि खचित तें; तुला कथितों मी हें वृद्ध.
त्यज मार्दव हें, भज शौर्याला, समररजोनिकरानें
वीरोत्तंसा, भरुनी टाकीं हीं विंध्याचीं रानें!
तुज जें जें प्रिय तें तें सारें तुझेंच आहे जाण;
सस्पृह पाहिल त्यास, तयाचा हरिन निश्चयें प्राण!
तुझ्या वस्तुवरि लोभ कराया माय कुणाची व्याली?
तदसुशोषणा तयार माझी आहे खड्गव्याली!
ऊठ अतुल बलवीर्यें, वीरा! तयार हो संग्रामा.
खड्ग विकोश न झाला, तों तव रिपु जाइल यमधामा!

शिरीषकुसुमासम कोमलता ही वीरास न शोभा.
वज्रमणीपार कठोरता कारि वर्धित भुवनीं यशोभा!
शिरीं कोमळो अचल, तरी मन अचलचि असतें आर्चे.
नवनीतासम अबलाचित्तचि सहसा वितळायाचें!
झंझानिल वा क्षुब्ध सलिलनिधि याहीं न ढळे सद्मा.
प्रेमाश्रूंचा प्रवाह केवल वीरजनाला सद्मा!
हीं वीराची कीर्ति अलौकिक मलिन न कारें केव्हांहि.
अविकृतहृदयें प्रोद्यतामि तूं संगरकामुक राहीं!
अर्का तें तव हा सांगत लोकांतरा विधु न जों गेला,
तों प्रिय कुमरा! ऊठ कसा, या सोड शीघ्र उटजाला!
वीर्यस्फुरणें खुलणारें तव सुंदर वदन बघून
अस्तगिरीवर उतरो तारासमूह हास्य करून!
अरुणमृदुलकररंजित होतिल हे उदयाचलसानु,
अयशोमलिना वदनच्छवि तव न बघो उदयद्भानु!"

(७)

तोंच मोहिनी हळुहळु तेथें हांसत हांसत आली.
अन्य असो, पण उषाहि तेव्हां कुतुकें सस्मित झाली!
सौरभयुत नव मधुकुसुमांची गुंफित सुंदर माला
प्रेमल नयनीं अमृततुषारचि उधळित चाले बाला!
सस्पृह पाहत कुतुकें तिजला चंद्रचूड तें बोले:-
"काननसंभव या कुसुमांचें जीवितसार्थक झालें.
धन्य धन्य हीं कुसुमें! माझें असलें भाग्यच नाहीं.
करस्पर्श सुखदायक मजसि न व्हायाचा केव्हांहि!
राजकुली मज हाय! दुर्विधे! दिधलें जनन कशाला?
कुसुमच असतों तर तुळनाही नसती मम भाग्याला!

काय असे मजजवळ ज्याकडे पाहुनि ही हर्षेल?
नीरस जगतीं सुधांद्वारिणी स्मितप्रभा फाकेल?
हिच्या सुखांतचि माझेंही सुख विलीन झालें आहे.
हिच्याचकरितां चंद्रचूड हा जिवंत अजुनि राहे!
धीरसिंहजी! पहा पहा तरि एकवार ही देवी,—
पापवासना निंदकवृत्ती पाहूं टिकते केवीं?
हिला दुखवुनी स्वर्गाचेंही नको राज्य मजला तें.
हिच्या अश्रुनें काय वाढवूं मदीय सुखवृक्षातें?
छे छे! न सहे कल्पनाहि ती, अंतांहे खुशाल होवो,
पण मम कृतिनें हिच्या नयानीं जलबिंदु एकहि न येओ!
नसेल तुमचें ह्मणणें लटकें, रुचत मला पण नाहीं.
खरेंच कथितों तसलें आतां एकवे न मज कांहीं.
चरणरजानें जिच्या पातकी व्हावा सहज पुनीत,
त्या देवीचें पुरे विनिंदन, गा गा तद्गुणगीत!
माझें शौर्य प्रकट कराया हिच्या प्रियावांचून
खरेंच सांगा--या जगतावर दुजें नसे का स्थान?
वीर ह्मणावें मजला लोकीं, केवळ या हेतूनें
अधमाचरणें भिजवूं हें मुख का उष्णाश्रुजलानें?
दुःखोच्छ्वासें हिच्या गगनिं मम सुखनग उडतिल तुंग;
औदास्यानें हिच्या खचित मम होइल हृदय दुभंग!
शोकें एकहि अश्रु गळाला हिच्या लोचनांतून,
तर मम जीवित जाइल सहसा शून्यांतरिं वाहून!
पहा पहा हें मधुर मृदु स्मित, मोहवि हृदया कैसें;
नंदनलतिकाकुसुमवर्षणें विलसत भूतल भासे!

स्मितावरुनि या विश्वें सारीं ओंवाळुनि टाकावीं.
निष्ठुरतेनें काय तिथें हो खड्गलता उपसावी ?
जळो वैर हें ! जळो राज्य हें ! हतजीवितहि कशातें ?
नको नको तें--विचारेंहि या कसेंसेंच मन होतें.
जा--जा तुह्मी--आतां क्षणभर मला स्वस्थ राहूं द्या
या देवीला अतृप्त नयनें स्वच्छंदें पाहूं द्या ! "

(८)

निराश होउनि धीर दीर्घतर सोडी तैं निश्वास.
ह्मणे "भेटली कुठुनि आज ही दुष्ट अवदसा यास ?"
निरुपायें मग विषण्णवदनें घालुनि खालीं मान
त्या वृद्धानें तेथुनि केलें जड हृदयें प्रस्थान.
सन्निध येतां रमणी उत्सुक चंद्रचूड होऊन
पुसे "गुंफिसी हार कुणास्तव इतके श्रम घेऊन ?"
हांसत हांसत बोले ललिता स्निग्ध पाउनी त्यास,
"चंद्रचूडजी ! खरेंच का हा आवडला अपत्यास ?
विपिनवासिनी मी, मज कुठलें गुंफनकौशल तैसें !
सांगा मज पुरवनिता करिती माळागुंफन कैसें."
हंसुनि बोलला चंद्रचूड "मी कथितों तुजसि खरेंच,
देखिला न मीं अजवरि असला सुंदर हार कुठेंच !"
लाजुनि तरुणी वदे "स्तुती ही करितां तुह्मी फार.
भाग्यवान हा, करो तर अतां तुमच्या कंठिं विहार !
माझी अठवण तुह्मांस होओ केव्हांतरि यायोगें,"
ह्मणत असें ती देई त्याच्या करीं हार अनुरागें.
सरळ प्रेमाचरण तिचें हें पाहुनि आनंदानें
वेडा होउनि युवक हार तो घेई उल्हासानें.

क्षणभरि थांबुनि विषण्णतेनें वदली मोहन बाला,
" चंद्रचूडजी आजच एथुनि इवेंच का जायाला ! "
तरुण बोलला तिच्या मुखावर दृष्टि स्थिर लावून,
" असेल इच्छा तुझी, तरी मी कांहीं दिन राहीन. "
प्रियवचनावर या मंदस्मित करून ती वनभूषा
स्निग्ध दृष्टिनें करी विवर्धन चंद्रचूड-संतोषा !

प्रसंग तिसरा समाप्त.

प्रसंग चौथा

(१)

किमपि कारणें असती दुसरीं प्रेमसमुद्भव व्हाया,
मृदुल हृदयिं तर अवधि न अल्पहि लागे तें विकसाया.
होतें बीजारोपण केव्हां, वर्धन केव्हां होतें,
न कळे, केव्हां प्रसूनफळभर येतो प्रेमतरूतें !
प्रेम उपजलें ह्मणतां ह्मणतां अवचित पक्वहि होय,
कारणकार्यीं अंतर बघतां बुद्धि गुंगुनी जाय !
भूतभविष्या या प्रेमानें वर्तमानतें नेलें.
शून्यीं पहिलें बुडुनी, त्रिभुवन शून्यांतुनि हें आलें !
दृक्पातांतचि अनंत विश्वें निर्मी तो जगदीश,
तसें कुतूहल वाटे बघतां मधुर प्रीतिविलास.
निर्झर खळखळ करिती, हो तें गायन सुर-वनितांचें !
शुष्क अंबरीं उठतें उपवन सुंदर कल्पलतांचें !

शून्यामधुनी उडती निर्मल अमृततुषारोच्छ्वास !
उज्ज्वल येतें रूप मनोहर, जें जें नाहीं त्यास !
वनप्रसूनें दीन बिचारीं, पण तींही डौलानें
व्योमविभूषण तारकपुंजा लाजविती हास्यानें !
त्या प्रेमानें—त्या भावानें--त्या पीयूषौघानें
वाहुनि नेलें, काय करावें तर दुर्बल मनुजानें ?
अर्धहि लोचन उघडुनि बघतां सहज ज्योत्स्नाराणी
तिमिर ध्वंसुनि जाय मेदिनी सहसा आनंदोनी !
स्निग्ध दृष्टिनें मग ललित स्मित करित मोहिनी पाहे,
वेडा झाल्यावांचुनि कैसा चंद्रचूड तर राहे ?

(२)

प्रस्तरखंडांतुनि मौजेनें निर्झर हलुहलु वाहे;
उंचावुनि निजलहरि कौतुकें मोहिनीस तो पाहे.
पतिसह कितिदां गुजगोष्टी ती करितां श्रविल्या त्यानें,
तिच्या गायना सूरहि दिधला निज मंजुळ नादानें !
शीतळ जलकण उधळुनि तिजवरि विनोद कितिदां केला,
तनुस्पर्श शुचि घडुनी कितिदां धन्य धन्य तो झाला !
तद्गुणकीर्तन करीत नाचत चाले तो आतांहि.
शांत होउनी विश्वहि सारें कुतुकें ऐकत राही.
क्षणांत लोपुनि हास्य मोहिनी विषण्ण भारी झाली.
उदश्रुधारा वाहुं लागल्या दोंय रम्य कपोलीं.
चंद्रचूडही दुःखित होउनि जवळ जाउनी बोले,
"अश्रु ढाळिसी कां, हें मजला सांगशील का बाले ?
सुखवाया तुज झटेन संतत विश्रांती सोडुन,
प्रचंड राज्य प्राणहि माझा तुजकरितां वेचीन.

काय हवें तुज सांग एकदां, क्षणांत वीर अनंत
कराल शस्त्रें उपसुनि कारितिल चंचल दशदिक्प्रांत!
सडा घालुनी रुधिराचा भूतल व्याप्त करीतों मी.
सांग एकदां जाउनि आणिन तारारत्नें व्योमीं!"

(३)

आवेशानें युवक बोलला खड्गा घालुनि हात.
तिच्या मुखीं स्मित मंद विलसलें तैशाही दुःखांत.
अश्रू पुसुनी वदे मोहिनी "चंद्रचूडजी, नाहीं—
अशांति माझी दूर व्हायची कदापि खड्गलताहीं.
एक शैशवस्मृती सांगतें तुह्मांला मी आतां:
उदार सुंदर होता मजला प्रेमळ एक भ्राता.
माझें त्यावर फारच होतें प्रेम, मजवरी त्याचें.
परंतु हा! हा! खेळ निराळे होते दुर्दैवाचे!
इथेंच बसुनी याच शिलेवर शुचिचंद्रालोकांत
गुजगोष्टी किति करीत होतों मंजुळ गाणीं गात.
एका देठावरच्या कलिका, आह्मी दोघें तैशीं.
हांसत खेळत होतों विहरत रिझवित परस्परांसीं.
नेलें त्याला अपुल्याजवळी निष्ठुर परमेशानें!
पूर आणिला तदा नंदना मीं उष्णाश्रुजलानें.
तुह्मांस पाहुनि त्याची आठवण माझी ताजी झाली.
बंधु मिळाला मला, वाटलें, पण नच हें मम भालीं!
अभागिनी मी, कुठुनी मजला सुखशांती मिळणार?
आशा माझी जळुनि निराशापावकांत जाणार!
चंद्रचूडजी! खरेंच का मी आवडतें तुह्मांतें?
हृदयमंदिरीं तुमच्या बंधो-स्थान घाल का मातें?"

"कां पण भागिनी! असें वाटतें तुजला हें विपरीत?"
गद्गद बोले युवक स्वकरीं तिचा घेउनी हात.
"प्रेमाची मम शंका भद्रे! कां ही तुजला यावी?
असशी प्राणाधिके! सत्य तूं या दासाची देवी.
माझ्या साऱ्या हृदयविलोभन आशा, उत्कट हेतु,
या सर्वांचें केलिनिकेतन एक एकली गे तूं!
तुजविषयीं मज काय वाटतें--वर्णितां न मज ये तें.
न ये सांगतां--तुला पाहुनी कसें काय जें होतें!
विमल प्रीती तूंच शिकविली हृदयबंध उघडून.
पावित्र्याची उषा दाविली तूंच मंद हांसून!
शून्य मनोनभिं तारावलिचा तूंच सडा गे केला!
चवदाचिनी गंगे! सारा ताप वारुनी नेला!
होत्या अजवरि हृदय--विणेच्या गंजुनि गेल्या तारा,
प्रथमचि अंगुलि फिरवुनि तूं भूगोल हलविला सारा!
या प्राणांची करुनि बासरी काढ भरभरा सूर,
मी--तूं शून्यीं बुडवुनि करिं गे स्वर्भू एकाकार!
नातें तरि तें कशास, तुडवुनि सारे लौकिक पाश,
आम्ही अमुचे उज्ज्वल तेजीं करोत नित्य विलास!
हृदयेश्वरि! हा तुझाच आहे, करिसी कां मग दूर?"
ह्मणतां ह्मणतां तदीय नयनीं सुटे अश्रुंचा पूर!
तिच्या करतलीं स्वमुख ठेवुनी, हृद्गत वचनातीत
अश्रुबिंदुंनीं जणूं प्रयत्नें लिही युवक तो तेथ!

दिसेंबर. १९१९ वर्ष ११ वें.

काव्यरत्नावली.

अंक १२ वा.

मोहिनी.

(४)

पुसुनि अंचलें अश्रू त्याचे गद्गद बोले बाला:—
" प्रियकर बंधो! पुरे पुरे हें, कां कारितां दुःखाला ?
तुम्ही माझे, तशीच समजा मीही तुमची आहे.
एकच आपण परस्परहि, कां अश्रुनदी मग वाहे ?
उठा गडे, या स्वसेस पाहा एकवार आनंदें;
मंगलकालीं अश्रुविसर्जन नकोच हें राहूं दे. "
मोदभराकुल तिच्या दृष्टिशीं दृष्टी भिडतां त्याची
कशी कशीशी झाली अवचित मनोवृत्ति दोघांची.
परस्परांतें अतृप्तनयनें निरखिति तीं उल्हासें.
बघुनी त्यांना कुतूहलानें मधुर ज्योत्स्ना हासे!

(५)

अवचित पडला हस्त कुणाचा तोंच मोहिनीस्कंधीं,
प्रियवचनांनीं तदा हळुहळू कुणी तिला संबोधी.
चमकुनि पाहे मागें वळुनी, दिसला जीवितनाथ;
सोत्सुक टाकी मृदुभुजलतिका रमणी तत्कंठांत!
प्रमोदाश्रुकण वर्षुनि भिजवी विशाल तद्वक्षाला,
सौख्यातिशयें शब्द एकही वदवेनाच तियेला!
वीरकांत तल्लोचन पुसुनी हांसत मृदु मृदु बोले:—
" सांग लाडके! आज एवढें असें काय गे झालें?

हा प्रेमाचा पूर विलक्षण आला कुठला आतां !
पुरे--पुरे कर, नेसी वाहुनि काय आपल्या नाथा ! "

(६)

वदला गद्गद चंद्रचूड तों " महाराज हा दास--
प्रणाम करितों विनयें अपणा, क्षमा करावी यास.
श्रीपुर झालें अपुलें आतां, आपण त्याचे स्वामी.
सेवक समजुनि खुशाल मजला विहरावें सुखधामीं.
या देवीनें आज झाडिला मम मानसमल सारा;
पवित्र केलें मला वर्षुनी विमल नयनजलधारा !
अधमाधम मी ! दिला आजवर बहुत आपणा त्रास;
क्षमायाचना करावयाची वाटे लाज मनास.
अनंत मंतू घडले, केला संचय पापाचा मीं,
सडा अग्निचा हाय घातला अपुल्या सौख्यारामीं !
या देवीच्या शुचिप्रभावें शुद्धीवरती आलों.
दिसली माझी अधोगामिता, पुरता सावध झालों.
परंतु अपणा दुखवुनि अजवर केल्या पातकराशी,
प्रभो ! नीच हा अनुचित आहे जिवंत राहायासी !
या तेजस्वी खड्गें अथवा योजुनि अन्य उपाय,
टाका--टाका शीघ्र ध्वंसुनि या पापाचा काय ! "

(७)

एक बाहु पतिकंठीं घालुनि पाहत त्या साकूत
वदे मोहिनी मधेंच नाथा स्मितप्रभा फेकीत:--
" असेहि पापी परंतु माझे बंधू हे आहेत,
चंद्रचूड मज माझ्या प्राणाहूनहि आवडतात !

माझे असती ते, हें जाणुनि जीवितेश मग बोला."
वीरकांत हें ऐकुनि वचन क्षणभर विस्मित झाला.
"वेडे! मग हें पूर्विंच मजला कां नाहीं कथिलेंस?
चंद्रचूडजी! तुलना नाहीं या तुमच्या भाग्यास!
सभाग्य तुह्मी, पुण्यचरित, कां करितां स्वाधिक्षेप?
शुद्धात्म्यावर कां हो घेतां भलभलते आरोप?
स्निग्ध दृष्टिला हिच्या जाहलां पात्र तुह्मी ज्या काळीं,
तेव्हां सारीं पापें तुमचीं नष्ट खरोखर झालीं!
मग आतां तर हिच्या प्रीतिचें स्थानच तुह्मी झालां,
तुमच्याकारितां पहा ढाळिते ही देवी अश्रूंला!
शिलाखंडही देवासम मज गमती या रानींचे;
तुच्छ वाटती उज्ज्वल सुंदर तारे आकाशींचे!
हा खडकांतिल झरा चिमुकला धन्य वाटतो मातें,
याच्यापुढतीं धिक्कार गणितों त्रिभुवनिंच्या क्षेत्रांतें!
वाटतात हे सभाग्य पशुही इथले मजला सर्व,
नंदनवनतरुतळिं बसलेले नकोत ते गंधर्व!
अशी मला जी देवी पूज्य प्रियकर आहे झाली,
प्रीतितरंगीं जिच्या अहर्निश मनोवृत्ति मम न्हाली,
त्या देवीला--हृदयेश्वरिला--विमलप्रीतिलतेला
प्राणाहुनि जो प्रिय झाला, मी वंद्यच गणितों त्याला!
विनीतवचनें तरी कशाला मग हीं आतां वीरा?
वाहे एकच उभयांकरितां दिव्य सुधारसधारा!
वैरवन्हि या धारेमध्यें विझुनि जाय केव्हांच;
स्फुलिंग हरपुनि, त्यांचीं हंसरीं फुलेंच झालीं साच!

तूं देवीचा, मी देवीचा, भेदभाव मग कोठें?
कोमलशय्या झाली, गपके जाउनि विल्या कांटे!
माझें जें जें तें देवीचें, तुझें तिचें आहे तें;
श्रीपुर राहो, परंतु मित्रा मानीं अपुका मातें!"

(८)

या शुभसमयीं चंद्रचूडही पूर्ण द्रवुनी गेला.
चंद्रोपलही पाझरती नभिं पाहुनि इंदुकलेला!
प्रिय पतिवचनें भ्रांतोन्मत्ता क्षणैक रमणी झाली,
कोऽपिभाववश मानसवृत्ती तिची उन्मनीं गेली!
त्या धुंदींतच अर्धोन्मीलित अचल शांत तद्दृष्टि
लागे बंभूवर, दिसलीही तिजला न बहिःसृष्टि!
हळुहळु चेतनशक्ति हरपुनी ज्ञानहीन ललिता ती
शिथिलभुजयुगा होय मूर्च्छिता प्रियकरवक्षःप्रांतीं.
सुखाश्रुपूरें व्यापुनि गेल्या तीर्थांच्याही डवि.
गमलें त्यांना, झाली मग्ना अनंतांत ही सृष्टि!
त्या अश्रूंच्या पूरें गेले फुटुनी दशदिक्प्रांत!
अश्रुलहरिवर पोहत डोलत जाय मही स्वर्गांत!
अश्रुनदीला बुद्बुद आले–विहरति नभिं ते तारे!
तेजोगोलक फिरती तिचिया आवर्तांतरिं सारे!
शुभ्रचंद्रिकारसांत होता नाचत नंदन हर्षे!
अनंतांतले अनंत तारक डुलती हास्योत्कर्षे!
निशीथसमयीं प्रेमोल्लसितस्वांत प्रणयी मोदें
मूकपणें गुजगोष्टी करिती, रमली भावामोदें!

* * *

झाले होते कांहीं मास प्रसंग हा होऊन,
बालारुण नवकिरणिं रंगवी श्रीपुरराजोद्यान.
प्रियवक्षःस्थलिं कुंतलभूषित शिरःपद्म ठेवून
निजली होती गाढ मोहिनी दयिता आलिंगून.
पुष्पराशिसम तन्मृदुतनुवर कर स्निग्ध फिरवीत
मंजुलवचनें होता तिजला चंद्रचूड उठवीत.
तिच्या मुखावर अविचल दृष्टी लावुनियां अनुरागें
मित्र, बंधु वा दास तिचा तो हळुहळु गाऊं लागे:--

पद.

"उघडिं नयन! रम्य उषा हंसत हंसत आली!
अरुणकिरणमय वसना अवनी ही न्याली! ध्रु०

मंजुमधुर गान करित,
आनंदें भुवन भरित,
विहगवृंद गगनिं उडत
या सुरम्य कालीं!

उघडिं नयन! रम्य उषा हंसत हंसत आली! ध्रु०

हंसति फुलें, तरु डुलती,
लतिकागण नृत्य करिति,
भावति या भ्रमरतती,
सुदिन तुला आली!

उघडिं नयन! रम्य उषा हंसत हंसत आली! ध्रु०

स्निग्ध दृष्टि तव पडतां
होय वृत्ति सुखभरिता,
रविकरिं घनपंक्ति तथा
स्वर्णमय जहाली!
उघडिं नयन! रम्य उषा हंसत हंसत आली! ध्रु०

सुप्रभात सुखकर हा
दारुणतिमिरोत्कर हा
रमवी सकलांस पहा,
दिव्यविभवशाली!
उघडिं नयन! रम्य उषा हंसत हंसत आली! ध्रु०

ऊठ! ऊठ! तुजविण परि
नीरस हें सुख सुंदरि!
विफल गमत तें, ज्यावरि
दृष्टि न तव गेली!
उघडिं नयन! रम्य उषा हंसत हंसत आली! ध्रु०

विकचकमलगंधि पवन
शीतल, करि तापशमन,
त्यांत परी श्वसन तव न,
विकल तनु जहाली!
उघडिं नयन! रम्य उषा हंसत हंसत आली! ध्रु०

खगकूजित, अलिगुंजित,
लतिकातरुगणसिंजित,
सुमुखि! विफल सकल गमत

तुजविण या कालीं !
उघडिं नयन ! रम्य उषा हंसत हंसत आली ! धृ०

गगन तरणिकररंजित,
चपल धवल घन विहरत,
क्षणहि पारि न दृष्टि वळत
तव मुखिं दृढ ठेली !
उघडिं नयन ! रम्य उषा हंसत हंसत आली ! धृ०

ऊठ ! ऊठ ! सखि ! झडकरिं,
नयनद्युति चपल पसरिं,
रम्य मधुर हास्य करीं,
स्वर्ग आण खालीं !
उघडिं नयन ! रम्य उषा हंसत हंसत आली ! धृ०

प्रेमाचा ओघ सरल
वाहो तव मुखिं अविरल,
अचरहि जग करुनि तरल
बुडवि सुखिं विशालीं !
उघडिं नयन ! रम्य उषा हंसत हंसत आली ! धृ० "

साक्या.

शांत स्निग्ध प्रणयविमोहक तिची उघडली दृष्टि;
सुधातुषारोच्छ्वासीं सारी नाचुं लागली सृष्टि !
नंदनवनींच्या माधुर्याचे अमित धावले ओघ !
उद्वेगाची कंटकशल्यें झालीं सगळीं मोघ !
हांसत हांसत कोमल हस्तें करुनी भूषित कंठ
गाढालिंगन देइ मोहिनी बंधूला सोत्कंठ !

लावुनि गाला गाल, भिडवुनी हृदया हृदय विमोहें--
असतां दोघें, गमलें हींच स्वर्गीत शुचिता आहे!
अनंत विश्वें एकाठायीं गोळा झालीं होतीं!
सर्व स्थानीं मृदु हास्याची भरली दिव्य ज्योती!
सभोंवार या बाह्यांतरिंही प्रियरूपें दिसतात;
सुखाश्रुमुक्तादाम तदर्थ प्रणयी जन रचितात!
वीरकांत वा चंद्रचूड वा प्रिया मोहिनी देवी--
कुणा विशेष स्तवन करावें? जड वाणीनें केवीं?
ज्यांनीं केला स्वर्ग भूमिचा पवित्र आचारानें,
पापिजनांची दृष्टि दिपविली उज्ज्वल एकत्वानें
स्त्रीपुरुषत्वस्मृतिहि न ज्यांनां, कामुकता ती दूर!
वृथाबंधना तोडी ज्यांच्या शुचि प्रीतिचा पूर!
त्यांच्या स्तवना हृदय खोलुनी स्वैर सोडुनी वाणी
वेडावुनि कवि उठला, तर का विस्मित होइल कोणी?
वीरकांत मी धन्य लेखितों, चंद्रचूड सुखशाली;
अहो! मोहिनीस्तवनीं कुंठित वाक्शक्ती पण झाली!
गूढ--गूढ हृत्प्रदेशिं वाटे तिजविषयीं जें काय--
तें दावाया स्पष्ट, न दिसतो कांहीं आज उपाय!
रोम थरारुनि हृदय द्रवुनी पवित्र अश्रू आले,
तेच वाहतों आतां विनयें दिव्यशील त्या बाले!

———— एकनाथ पांडुरंग रेंदाळकर.

मोहिनी काव्य समाप्त.

सुभद्राविवाहकाव्य.

सर्ग दहावा.

गीति.

उदयाचलशिखरावरि चढला दिनकर सहस्रकरशाली;
बिलसे विमल नभस्तल, जागृत ही सृष्टि सकलही झाली. १
कल्याणधाम रविचे दिगंतरालीं जवें शिरोनि कर,
सृष्टीस या सचेतन करिती; हरिती महातमोनिकर. २
शीत प्रभातमारुत आनंदासह चरे सभोंतालीं;
जीवास पुष्टि वितरुनि, सकला उत्साह देइ या कालीं. ३
हा मित्रराज आला तिमिरनिशाचर-विनाश करण्यातें;
मंगलमय गीतांनीं सन्मानी ही खगावली त्यातें. ४
उघडुनि कमलविलोचन, रविभूपा बघति दीर्घिकानारी;
क्षुभितजलतरंगांहीं हृदयावस्थाहि दाविती सारी. ५
येतां पति बहु दिवशीं, होय जशी कामिनी सुतनु रक्ता;
रविच्या आगमनानें झाली प्राची तशीच बहु रक्ता. ६
नील नभस्तल विलसे, प्रसन्न त्यापरि दिसे सरोजलही,
तेंवि मनहि सकलांचें, प्रसन्नतापूर्ण हें जग सकलही. ७
कामुकसम लंपट जे, वेगें धावून येति मधु-पाना;
हालवुनी शिर लतिका, धिःकारी त्या समस्त मधुपांना. ८
विविध लतातरु फुलले उद्यानीं दिव्य-परिमलोद्गारी;
ल्याली नेत्रोत्सवकर सृष्टिश्री सुभग वेष कान्तारीं. ९
जलबिंदु मौक्तिकभ्रम देती हे हरिततृणदलस्थ जनां,
गमतें मौक्तिकसर ही ल्याली वसुधा खरी प्रसन्नमना. १०

मंदानिल सुटुनीयां, गळती सुमभार वसुमतीवरती;
गमतें जणुं ही करिते भूलिंगार्चन सहर्ष वृक्षतती. ११
सुखकर समयास अशा, युवयुवती रैवतकनगावरती--
समुदित अभिनवलीला करिति परस्परनिबद्धभावरति. १२
आला यदुनायकही घेउनियां अष्टनायिका संगें;
पाहुनि अभिनव शोभा, त्यांसह तो प्रेमसुखरसीं रंगे; १३
अभिनवसुंदरवेषा, ललिताभरणा, विलासिनी, समदा,
प्रियदयितां घेउनियां, जमल्या क्रीडासमुत्सुका प्रमदा. १४
विलसे नंदनवन तें; रैवतकोपवन होय तें न खरें;
नच तो पुरांगनाजन, सत्यचि दिव्याप्सरासमूह फिरे. १५
मदनोद्दीपक शोभा रैवतकावरिल बघुनि ती सकला,
नव नव विलास करिती विलासिनी कामदेवशरविकला; १६
घेउनि रतीस संगें, साक्षात् मदनहि विलास तेथ करी
केलिविमुख मानिजनां ताडन करि बहु सकोप पंचशरीं १७
स्मरदूतिका चतुर ही पंचमरव करित कोकिला फिरत;
मानवतीदर्पातें हरुनि, तिला करि विलाससुख--निरत. १८
विविधलतातरु फुलले, तत्कुसुमाकृष्टमानसा बाला--
नव ललित भाव दावुनि, हरिती स्मरतप्त कान्तहृदयाला. १९
प्रियतमकंठीं घाली कोणी ही रक्तहार सानंद;
नच हार खरा विलसे तीचा तो प्रेमशृंखलाबंध. २०
बकुलाची नवमाला घालुनि, कोणी विभूषवी कबरी;
मुळुनी आमोदातें धावुनियां येइ भृंगपंक्ति बरी. २१
घाबरुनी शशिवदना, फेकी तो हार दूर सत्वर ते;
परि न फिरे ती, मानुनि वदना पंकज सभोंवतीं फिरते. २२
'हा पारिजात फुलला; तेथें जाऊं चल. प्रिया! कान्ता!'

यापरि पुष्पमिषानें ते अन्या प्रियपतीस एकान्ता. २३
"सखये! सहकाराश्रित दिसते किति रम्य ही लता प्रतनु!
दिसते मीहि तशी कां?" ह्मणुनी कवळी प्रिया कुणी सुतनु. २४
विश्रंभकथालापा विघ्न करी कूजितें परभृता ही;
ही दिव्य गायनानें लज्जित करि तीस, ह्मणुनियां पाहीं. २५
रक्ताशोकावरती एकाकी पुष्प बघुनि उंच दुरीं,
ताडुनि चरणें तरुतें, पाडी तें; परि अनन्त दिसति वरी. २६
नच येई हस्तातें उंच असें पुष्प, ह्मणुनियां ललना--
कान्तस्कंधावरती चढुनीयां तोडि तें प्रसन्नमना. २७
नीलोत्पल मम नयनासम, यापरि हा वदे प्रिय सदाही;
सखि! सांग सत्य कां तें? ह्मणुनी नयनान्तिके धरि तयाही. २८
हें रुचिर बिंब पिकलें गे! यापरि पद्मवाक्य बोलुनि हा,
दयिताधर चुंबितसे शंका सोडूनियां समस्त पहा. २९
नूपुररव हा येई, रुष्टा रमणी असेल ती एथें;
ह्मणुनी जाय पुढें हा, परि अवलोकी मरालगण तेथें. ३०
नानाविध चेष्टांनीं सुखवी दयिता पतीस, पति तीतें;
प्रेमसुखाचा अनुभव घेउनि यापरि समस्त रमती ते. ३१
जेव्हां शनैः शनैः रवि विखरी सर्वत्र तीव्र करजाल;
जलकेलि कराया मग निघती संतप्त युवति तत्काल. ३२
रैवतकावरि सुंदर, अविरतजलपूर्ण दीर्घिका विलसे;
अलिनिकरसहंसावलि तेथें सेवुनि मरंदनाल वसे. ३३
रमणीय दीर्घिका ती क्रीडाया योग्य योषितांस असे;
सोपान स्फटिकाचा विलसे नाभीस उदक पोंचतसे ३४
त्या दीर्घिकाजलीं त्या ललना शिरस्या कराबया केली;
वेलीसम दिसती त्या, त्यास तरंगित जलौघ वर झेली. ३५

वरि समता नालाची कर, अलिची तिलक बदन कमळाची;
कच तरल केसराची हरितांशुक तेंवि पंकजदलाची. ३६
मकरंदलोलुपा ही अलिमाला, समजुनी तया नलिनी,--
कुसुमित सहकारातें सोडुनियां, घेइ झेप तद्वदनीं ! ३७
ध्वनि होय मृदंगासम कासारीं उदक ताडितांच करीं;
ऐकुनि तो आनंदें, तीरावरती मयूर नृत्य करी; ३८
स्पर्शी नितंबबिंबा, चुंबी त्यापरि मनोहरा अधरा;
ओढी दूर दुकूलां, जलौघ दयितासमान होय खरा. ३९
निरलक्तक अधर दिसे, नयन निरंजन, निरंगराग तनु,
दिसती तरिहि मनोहर जलकेलिनिमग्न सर्व त्या सुतनु ! ४०
पाहुनि उदकीं मीना, भीतीचें मिष करूनियां प्रमदा,
आलिंगुनि कान्तातें, सुखवी त्याला नितान्त ही समदा ४१
झाली जलसंपर्कें विलासिनींची अपार घन कबरी;
उपजे भ्रम चित्ताला विहरे उदकांत नागिणीच खरी. ४२
चिकटुनि वस्त्र तनूतें, निम्नोन्नत भाग दिसति सुव्यक्त;
अवलोकुनि ते वेगें, कान्ताचें चित्त होतसे रक्त ! ४३
फेकी पति वेगानें, जलधारा प्रियसखीमुखावरती;
होउनियां चूर्णानें अरुणित त्या सर्व खाली पडती. ४४
प्रातःकालीं अंबर रविकिरणांहीं जसें अरुण दिसतें;
हो ! दीर्घिकाहि झाली त्यापरि वनितांगरागरंजित ते. ४५
जलकेलि करुनि यापरि, आल्या मग त्या विलासिनी वरती;
करिती उज्ज्वल वेषा गमती चपलाच भूत संचरती. ४६
प्रियतम सखीकपोलीं रेखी मग रुचिरपत्रवल्लि करीं.
घाली अंजन नेत्रीं; भालीं मृगनाभितिलक तेंवि करी. ४७
शुद्धांतःकरणा त्या प्रमदा मग नमुनि अंशुमालीतें,--

आलीतें घेउनियां, निघती पूजावयास कालीतें. ४८
देवीस समर्पाया, कोणी तरुणी रची कुसुमहार;
फार मनांत सुखावे, देवीपदपद्म बघुनि साचार. ४९
युवयुवतीजन यापरि दाखविती परम रम्य लीलातें;
परि नच दिसते नयनां तेथें कृष्णस्वसा सुभद्रा ते. ५०

सर्ग अकरावा.

गीति.

यतिराज सुभद्रेसह विचरतसे रैवतकनगावरती;
पाहुनि नव नव शोभा, आली त्याच्या सुखार्णवा भरती. १
एकान्तीं अवलोकुनि ललित सुभद्रामुखाब्ज साचार,
झाला तरलात्मा तो; करि हृदयीं कामदेव संचार. २
बोले तीतें, सुंदरि ! शोभा ही परम रम्य अवलोकीं.
अभिनव उपवन असलें नच विलसे सत्य सत्य या लोकीं. ३
दिसती सर्वहि एथें या समयीं नवविलाससुखनिरत;
कामुक जन हृदयाशा फुल वाया स्मर अधिज्यधनु फिरत. ४
बघ हा हंस समुत्सुक झाला रममाण निज सखीसंगें;
नव कमलतंतु देउनि तद्वदनीं प्रेमसुखरसीं रंगे. ५
पसरुनि रम्य पिसारा, विलासिनी कचकलापसम मोर,
रमवाया निजकान्ता, एथें नाचे पहा तिजसमोर. ६
बघ इकडे, ही प्रमदा रचुनीयां मालतीकुसुमदाम,
प्रियतमकंठीं घाली गंधोत्कट नयनसुभग अभिराम. ७
कासारीं ही कोणी वर्षुनियां जलतुषारसंभार,
प्रियनाथास भिनोदें भिरपावा करि नितान्त साचार. ८

याहे कासारांतुनि कामुकजनहृदयद्वारि फुळवाया।
कमलसुरभि मारुत, करि मानिनिचा मान तो सकळ वाया- ९
तव अधरचुंबनाची आशा धरुनी मनांत सत्य खरी,
कामुकसम हट्टानें वेगानिल तव कलाप हा विखरी; १०
बघ हीं सहकारालह एथें नवमाल्लिका लता रमते;
आलिंगी दृढ त्यातें; अनुपम हें प्रेम सर्वथा गमतें! ११
वृक्षलतेचा जोडा पाहुनि, कां वळविलेंस मुखकमल?
कां बाष्पांनीं भरले गुणसरिते! नेत्र हे तुझे विमल? १२
'होय लता भाग्याची! मिळवी पति ही अनन्य--भावरति;
चिन्तीं ज्यास सदा मी, दयित न तो रति धरीच मजवरती. १३
ऐसा विचार हृदयीं उठुनी, कां वदनपद्म सुकलें गे!
शंका नच किमपि धरीं, वद वद सुंदरि! समस्त तूं वेगें. १४
दयित तुझा तो निर्घृण या लोकीं होय एकाचि खरा गे!
झुरसी सुतनु! सदा तूं, परि जो नच तुज विलोकि अनुरागें. १५
या रत्नाला सोडुनि, अन्य सुखीं जो विमूढमति रमला,
शंका सोडुनि सर्वहि, नाम तयाचें सुगात्रि! सांग मला. १६
वदली त्यास सुभद्रा, " हा! हा! मज धीर अल्प धरवेना;
गेला टाकुनि मज तो! आतां हें दुःख सहन करवेना. १७
मन्नाथसद्यशोभा विलसे अभिनव, जगास धवल करी;
पाहुनि ती यतिवर्या! सुरजन हृदयीं अपार नवल करी! १८
सौंदर्यानें विलसे लोकीं कामासमान अभिराम;
पाहुनि शौर्य जयाचें, गमतें कीं, प्रगट जाहला राम. १९
ज्यानें निजशौर्यानें भरिली ही जलधिमेखला धरणी;
निज शत्रुजनां तापवि संतत ज्यापरि सहस्रकर तरणी. २०
वरिलें चित्तानें मी त्या विजया पांडुकुलललामातें;

परि हा! हा! तो गेला कोठें सोडून विव्हला मातें? २१
वदती गुरुजन मजला ' कुरुनाथाचीच होइं गे! नवरी.'
जावा प्राणहि सत्वर, परंतु त्याला कदापि मी न वरीं. २२
भूतभविष्यज्ञानी यतिराज तुह्मी खरेच या जगतीं.
द्यावें हो! अभय हिला; लीन पदीं दीन ही अनन्यगति. २३
हा! हा! कोठे वसतो माझा प्रियनाथ विजय या समयीं,
केंव्हां भेटुनि मजला दुरवस्था ही हरील तापमयी २४
दृढतर आलिंगुनि हा स्मरदावाग्निप्रदीप्त मम काय,
शीततनुस्पर्शानें आतां कधिं शांतवील तो काय. २५
करुणगिरा सुमतीची ऐकुनि, यतिराज आपणां विसरे!
त्वरित भुजा पसरुनियां, आलिंगाया तिला समीप सरे. २६
होउनि विस्मित चित्तीं, सरली मागें क्षणांत गुणसरिता;
वदली वेगें, " हा! हा! अतिनय यतिराज! काय हा करितां. २७
परि चुंबुनि मुखकमला, वदला सुदतीस पार्थ वीरमणी;
" शंका सर्वहि सोडीं; दास तुझा विजय सत्य हा रमणी. २८
बघ सुंदरि! निरखुनियां तुजला कां हा न ओळखे दास?
सरली दुःखावस्था; आतां सखि! सोड सकळ खेदास. २९
सकळ भुवन भूषाकर अनुपम हें युवतिरत्न लाधावें;
मानापमान टाकुनि यतिरूपें ह्मणुनि शीघ्र हा धावें. ३०
तव लाभास्तवचि सखे! केलि तपस्या वनांत आजवरी;
तूं लाभतां सुदैवें, हर्ष बहुत मी मनांत आज धरीं. ३१
कल्पलता अधनाला, त्यापरि तूं लाभलीस आज मला.
ईश दयाकर, ह्मणुनी भाग्याचा योग सत्य हा जमला ३२
कां मुख खालीं करिसी? वद गे! मम नयनचंद्रिके! वरती;
पुरले सर्व मनोरथ; कां ही आनंदसागरा भरती. ३३

केलें ध्यान सदा मीं, तुजवरि ठेवुनि सखे! अतीव रति;
नच अन्य देवता मज तुजवाचुनियां अहा! महीवरती. ३४
हो हो प्रसन्न आतां, या दासावरि दयाळु तूं देवी;
रात्रंदिन हृन्मंदिरिं सद्भावें मी पदाब्ज तव सेवीं. ३५
केला यत्न, तयाची साक्षात् तूं सिद्धी आज मज मिळसी;
अथवा प्रेमरसाची अभिनव कादंबिनीच कां वळशी. ३६
चंद्रकला मिळतां तूं आज मला, अमृतवार्षिणी! सरले!
भरलें विश्व सुखानें; हृदयांतिल निबिड दुःखतम सरलें! ३७
तृषित परम झालों मी, सत्वर तूं प्रेमवल्लरी ललिते!
अधरसुधामधुदानें शान्त करीं गे! सुदीन या अलितें. ३८
ठेवी प्रियवक्षस्थलिं शिर हरिची सुखनिमग्न अनुजा ती;
विलसे सहकाराश्रित ज्यापरि पुष्पित मनोज्ञतनु जाति. ३९
वदली मग, " झालें ही आज गडे! पूर्ण दुःखनिर्गत मी;
रवितुल्य लाभलां मज बुडतां मी सत्य सत्य विरहतमीं. ४०
होतें वाट बघत मी उत्कंठित आपली प्रिया कान्ता!
पुरवा सर्व मनोरथ, आतां पदरांत घ्या प्रिया कान्ता. ४१
अवमान सोशिला बहु मजसाठीं प्राणनाथ! अनुपम हा;
नृपवेष टाकुनीयां, धरिला यतिवेष सत्य निंद्य महा; ४२
प्रेम सुनिर्मल धरुनी, केलें प्रियनाथ! धन्य आज मला;
सोडुनि राजसुखातें, वनवासानें अहा! बहु श्रमलां. ४३
मदनमनोहररूपा पाहुनि, या दिव्य योषिता झुरती;
मी काय दीन दासी! परि मजवरि आपली दया पुरती. ४४
बंधुजनानें छळिलें आजवरी प्राणनाथ! बहु मजला;
त्या खल कुरुनाथाला मातें अर्पावया अहा! सजला! ४५
विश्वाधारकृपेनें दुःख परी आज सर्वही सरलें!

भरलें विश्व सुखानें, चोहिंकडे हर्षपर्वहि पसरलें! ! ४६
वदला तीस विजय मग, " ईश दयाघन कृपा अपार करी;
सांपडलें ह्मणुनी हें मज अनुपम युवतिरत्न आज करीं. ४७
चाल सुहासिनि! सत्वर, आतां एथें निवास नच उचित;
बघ येती यादव हे; करितिल कोपें अनर्थ ते खचित. ४८
ही निकट दरी जेथें दिसते वृक्षावल्ली निबिडतर ही;
मम वीरवेष तेथें आहे, गांडीव धनु, रहंवरही. ४९
इंद्रप्रस्था जाऊं बसुनीयां स्यंदनीं चल सुजाते!
भेटाया बंधुजनां वंदाया मातृपदसरोजातें." ५०

सर्ग बारावा.

गीति.

क्रमिती पथ बसुनि रथीं विजयसुभद्रा विहंगमगतीनें;
भ्याली प्रथम बहु; तरी गणिला शुभ तो प्रसंग मग तीनें. १
एकाएकीं झाली चहुंकडुनी हाक एक पळ वियतीं;
घालून रथामध्यें देवि सुभद्रेस शीघ्र पळवि यति. २
झंझावातें ज्यापरि होतें जलनिधिजलांत खळबळ ते;
यादव-चमूंत त्यापरि होउनियां, लोटलें सकळ बळ तें. ३
धांवति बसुनि हयावरि कितीक, बसुनी किती रथावरती;
धांवति कितीक चरणीं, उरलें तनुवरि न भान पाव रती. ४
धांवे इकडे तिकडे कोपानें सर्व अंध सेना ती;
कोपाकुल विजयाला बघुनि, परी अल्पही घसेना ती. ५
मदनादि वीरसत्तम कोपानें अंबरीं शैर भरिती;
गमले सिंहासम ते, मिरवी अर्जुन खरी शरभ-रीति. ६

" हरुनि सुभद्रारत्ना, कोठें तूं चोर सांग पळशील!
या अस्त्रज्वालांनीं आतां खळ तूं पळांत जळशील. " ७
यादवसेना ऐसें विजया वदुनी करी प्रकाम रण;
अंगीं इर्ष्या येतां, वीरवर रणीं गणीळ कां मरण? ८
करिती शरवृष्टि महा सर्वहि ते वीर अर्जुनावरती;
जर्जर करि तो त्यांना; त्याचे शर यादवांस नावरती. ९
यादव चमू मथी तो, नृपयश समरांगणांत हारविता;
खद्योतासम यादव गमती, मिरवी रणांत हा रविता. १०
कोट्यवधी जलधारा वर्षासमयास जेंवि घन विखरी;
त्यापरि शर विखरुनि तो, मंडपमाला नभांत बनवि खरी. ११
जर्जर झाली सेना; सोडुनि रण पळति वीरसत्तमही!
कांपवि मग नरनायक, वाजवुनी दिव्य देवदत्त मही! १२
वीरांची रणपटुता जिष्णुपुढें जाहली सकळ वाया!
मदन वदे, " वार्ता ही दूता! पळ जा हलीस कळवाया. १३
वाजवितां शंख विजय, पळे चमू भीरुसम रवार्ता ती!
दूत कथी बलरामा झालेली सर्व समरवार्ता ती. १४
वदला तो कोपानें, " समजे मम पार्थही न कां करणी?
सजला हंसासंगें झगडाया शक्तिहीन काक रणीं! १५
केंवि करील तरी तो मजसंगें पंडुसुत हताश रण?
कर जोडुनियां, येइल मजला समरांत पाहतां शरण. १६
न तरी त्या दुष्टाला वधुनि, करिन लाल समरभू मी ते! "
वचन असें वदुनि, निघे मग तो नरपाल समरभूमीतें. १७
तोंव रमाधव वदला, जोडुनियां हात लांगलीला, " भो!
समरांत आपणातें सतत यश:कीर्ति चांगली लाभो. १८
परि कोण समर्थ जगीं जिंकाया वीरहीर विजयातें?

समरीं मस्तक नमवी निस्तुळ तो वीरही रविज यातें। १९
अपमान करुनि घ्याया, जातां कां हो! निरर्थ समरातें!
तो वीर विक्रमानें हतवीर्य करी रणांत अमरातें." २०
वदला हलधर कोपें, " जाणें मी जिष्णुची विकट करणी;
मथितों सत्वर त्याला, कृष्णा! मी जाउनी सकटक रणीं. २१
विजयावरचा नच तव विदित प्रेमप्रवाह कां मातें?
हेतु तुझा फसवावें त्या कुरुनाथा बिवाह--कामातें. २२
तव हेतु, सुभद्रा ही अर्पावी सत्य पांडु--तनयाला;
केलें कपट म्हणुनि तूं सोडुनियां शिष्ट--संमत नयाला. २३
पाहुनि विक्रम ज्याचा, नवल करी सर्वकाल कामारी;
वद कोण उपवनीं त्या दुर्योधन भूमिपालका मारी? २४
कोण कथीं विजयाला? धरुनी यतिरूप, कार्य साधावें;
कोणाच्या उपदेशें हरुनि तिला, तो अनार्यसा धावे? २५
सर्व जनाला गमतें, पाहुनियां हा प्रकार नवल; हरी!
उठती माझ्या हृदयीं आश्चर्याच्या अपार नव लहरी! २६
केली तूंच खरोखर कृष्णा! ही कपटयोजना सांग;
फसवाया मजलागीं करिशी तूं यत्न नित्य ना! सांग." २७
वदला मग कृष्ण तया, " देतां हा दोष व्यर्थ कां मातें?
यत्न करीं संतत मी साधाया आपल्याच कामातें. २८
इंद्रियनियमक्षम हा यति न, खरा कुसुमचापदास असे;
दादा! प्रथम विनविलें नच कां मी तूमच्या पदास असें? २९
ठेवुं नका यतिसन्निध दादा! क्षणमात्रही सुभद्रा ते;
कां आपणावारि बळें ओढुनियां आणितां अभद्रातें! ३०
त्यासमयीं वदलों मी यापरि वाणी रुचिरतम गदीना!
कां हो! दूषण देतां हा! हा! या न्यायनिरत मग दीना? ३१

हट्टानें ठेवियली आपण यतिजवळ उपवरा कां ते?
अप्रिय होतां, आतां निंदितसां व्यर्थ मज वराकातें." ३२
माय वदे, "पार्थ मला प्रिय बहु, त्याच्या गुणाकरा न मिती;
युद्ध न करा तयाशीं, बाळ! तया नृपपरंपरा नमिती. ३३
ती युवतिरत्नभूषा, योग्य असे त्याच नरवराला भो!
इच्छा हीच सदा, ती सत्वर त्या वीरवर वरा लाभो. ३४
कृष्णा! सकल धनुर्धरनायक हा पुत्र पांडुराजाचा;
पाहुनि विक्रम त्याचा होतो मुखचंद्र पांडु राजांचा. ३५
रामास रुचो, न रुचो, देइन मी त्यास कन्यका माजी;
वरिल कशी इतरा ती हा! हा! पुत्रा! अनन्यकामा जी? ३६
माझीच तुला आतां कृष्णां! मन्नयनचंदिरा! आण;
समजावुनियां सत्वर, कन्येसह त्यास मंदिरा आण." ३७
मग कृष्ण वदे, "माते! आज्ञा तव ही प्रमाण मजला गे!
होय पवित्र तनु जरी लवही तव पादपद्मरज लागे." ३८
परिमित सेवक घेउनि, गेला मग कृष्ण अर्जुनानिकट;
वदला त्यास, "पुरे करिं आतां युद्धप्रसंग हा विकट. ३९
सोडीं निजरिपुवरती बाण तुझे प्राणधन विनाशक रे!
हा! हा! खरशर सोडुनि, कां करिशी आप्तजनविनाश करें. ४०
हरिती सर्पासम हे बाण तुझे प्राण; आवर तयांतें.
ये ये धांवुनि, सत्वर कवळीं तव मित्रभावरत यातें ४१
अभिनंदन मित्रा! तव; लाभे स्त्रीरत्न विमल हें तूतें!
होउनि सकृप दयाघन ईश, करो पूर्ण सकल हेतूंतें. ४२
बालजनासह होशी व्यर्थाचि रममाण कां विरस कलहीं?
चल वेगें सदनातें गुरुजन तव दर्शनोत्सुक सकलही." ४३
नरनारायण मग ते, धरित्री कवळुनि परस्परास करीं;

तेंवि सुभद्रादेवी, बद्धांजलि नमन सोदरास करी. ४४
बसुनी रथांत, आले मग जननीजनक–पद नमायातें;
हृदयीं परम सुखाचे बघुनि विकचपार्थ--वदन माया तें. ४५
वसुदेव--देवकीतें नमन करी पार्थ, मग सुभद्राही;
देती आशीर्वच ते, “ व्हा युक्त सदैव नव सुभद्रांहीं.” ४६
‘ विधि यांचा हा जोडा अति चातुर्यें खरा बनवि लोकीं; ’
यापरि वचन वदुनियां, स्तिमितविलोचन तया जन विलोकी. ४७
कृष्णानुजा वरी मग हर्षें त्या नरपतीस शिवकाळीं;
वितरिति परम सुमंगल तेव्हां त्या गुणवतीस शिव--काली. ४८
हरि करि परम महोत्सव; वितरी विजया अनन्त धन दासी;
वसुवसनराशि अर्पुनि सकलां, लाजवि अनन्त धनदांसी. ४९
गेला इंद्रप्रस्था मग तो सुरपतिसमान वीरमणी;
रमला बहु उद्यानीं, घेउनि ती रतिसमा नवी रमणी. ५०

बारावा सर्ग समाप्त.

सुभद्राविवाहकाव्य संपूर्ण.

———— कै. श्री. ना. मुजूमदार बी. ए.

प्रतिबिंब.

(Adopted from Miss Taru Dutt's poem “The lake's fair surface &c” given as a motto to the sheaf from the french field.)

पद (चाल चंद्रकांत राजाची कन्या०)

सरोवराचें सुंदर पाणी सदैव शांत नसे
तयांत कोणी दगड फेंकितां क्षोभुनि जाय जसें ॥ ध्रु० ॥

जलपृष्ठाचा फुटुनि आरसा उठती जरि लहरी
प्रशांतता ये हळूहळू त्या जलाशयास तरी
पूर्वीसम तो गभीर निर्मल पृष्ठभाग विलसे
नीलनभ प्रतिबिंबित पुनरपि होई त्यांत जसें
अहह! भवाच्या उपाधि तैशा पीडिति फार मना
सकळ शांतिचा भंग करुनिया झांकिति शशिवदना
मलिन तळीचा गाळ उसळुनी येतां तो वरती
विशीर्ण होई मद्‌हृदयांतिल मूर्ति मनोहर ती
परंतु जेव्हां जनसंमर्दध्वांत पळे सारें
शांतिरसायन अंतरिं माझ्या अमृतासम पसरे
गळुनि जवनिका त्वन्मुखपंकज पुनरपि हृदयिं दिसे
पाउस पडुनी जातां रविचें बिंब जसें विलसे ॥ सरो० ॥

— गो. वा. कानिटकर बी. ए. एल्. एल्. बी

प्रतिभा आणि कविता.

पद ('लाल शालजोडि')

प्रकाश असुनी, प्रभा जसि नसे, नभिं जातां रवि अस्तातें
प्रतिभा नसतां तेविं कवनही केवळ भाषासौष्ठव तें ॥ धृ० ॥
कार्यवशें जरि संधिप्रकाशा, अल्पकालजन सेवितसे
खरी निर्वृत्ती, मोद, परी त्या, रवीच्याच दर्शनीं असे
कुशल शिल्पयुत, रुचिर, मनोहर सुवर्णमयसिंहासन तें
मंगलाऽधिदेवतावियुतजरि सुधार्मिका नच तोषवितें
नक्षत्रांकित कृष्ण तिमिरमय मोहक शाल्ह जरि नेसे
विमलोज्ज्वल निजकान्तप्रभेविण निशा बराका अमीं दिसे

मदनाऽकृति नर, रतिसम नारी, अनंगशास्त्रीं निपुण जरी
रत्नदीपसम शिशु गृहिं नसतां, विलास, यौवन विफल तरी ४
वऱ्हाड, वाद्यें, विप्र, वधूवर, यांहीं मंडप गजबजला
नसे विवाहीं यथार्थ विधि तरि, विषाद वाटे सुजनांला
सु-वर्ण विविधालंकृतियुत वपु अचिरमृताचें जसें दिसे
भूषित—भीषण, ' अनार्य ' तैसें कवनहि सुजनां रडवितसें ५
प्रभा, देवता, शशिद्युति, शिशु, विधि, प्राण, काव्यीं प्रतिभा
भाषासौष्ठव, रचनालाघव, वरपांगी कृत्रिम शोभा ६

श्रीकृष्ण.

होळी.

(चाल भला जन्म हा०) :—

अद्वार्ते, पंधरा राहिले दिन, याया पूर्णिमा
फाल्गुनी, बोधिजनां, पूर्णिमा ॥ धृ ० ॥
अजुनि असे अवकाश, करा तों गतकृतिची होळिका;
सुखाचा पथ दाविल जी निका.
प्रज्ञेची ती पहार करुनी, तीव्रप्रहारें तिच्या-
खणावें आंगणिं हृद्भूमिच्याः
वैराग्याची गभीरगर्ता, मध्यभागीं खोदुनी-
संयमें दाबावी बाजुंनीं:
अहंभाव- एरंडाचा मग सोट उभा रोंवणें-
नराचें नाडितसें जो जिणें
(चा. ब.) सांचल्या असति ज्या संवत्सरिच्या पुऱ्या
दुःशील गोमयें स्थापियल्या ज्या खऱ्या
एकत्र कराव्या दुष्कृतिच्या गौंवऱ्या

(चा. ब.) साक्षेपें त्या दाट रचाव्या एरंडाभोंवतीं-
भया दे, राशि जयांची अती ॥

कुविचारांचीं कुटिल कृष्ण मग कठिण अशीं ओंडकीं-
आणुनी टाकावीं त्यांत कीं !
शुष्क कल्पना, वृथा वल्गना, परनिंदेचीं तृणें
पसरुनी, होळि पूर्ण झांकणें.
(चा. ब.) उगवला द्विजोत्तम, उन्नतवृत्ती असा–
हा कलापूर्ण शशि आमंत्रित विप्रसा–
पाडि जो जगावरिं निज कांतीचा ठसा.
(चा. ब.) साक्षि तयातें करोनि, तैसा तदनुग्रह याचुनी-
पेटवा होळि आत्मशोधिनी.

विवेक--वासित मनोवृत्तिची धूप--शलाका धरी--
अंतरीं ज्ञान सुदीपावरी.
आत्मप्रत्ययरूप पावतां उदयातें उज्ज्वला--
ज्योति ती लावावी होळिला.
(चा. ब.) अनुतापवन्हि तो, त्वरें पेट घेइल,
एरंड, गोंवऱ्या, तृण, काष्ठां भक्षिल,
संशुद्ध, सुतप्त, हृद्भूमी होइल;
(चा. ब.) चित्त--शुद्धिच्या प्रखर प्रबला जातिल ज्वाला नभीं
नरा मग राहिल कसली न भी--

अद्धातें, पंधरा राहिलें दिन० धृ० ॥

श्रीकृष्ण.

विषयाची अनुक्रमणिका.

प्रस्तावना.

श्रीमद्वाल्मीकिरामायणाच्या उत्तरकाण्डांत ७९ व ८० ह्या सर्गांत दण्ड राजाची कथा संक्षेपानें दिली आहे. इक्ष्वाकु राजास शंभर पुत्र होते, त्यांत दंड हा दुराचारी होता. आपल्या राज्यांत वास करावयास हा योग्य नाहीं, असें जाणून इक्ष्वाकूनें त्यास हाकून लाविलें, व सांगितलें कीं "विंध्याच्या पलीकडे जाऊन तेथें राज्य स्थापन करून नीतीनें वाग, ह्मणजे तूं कीर्तिमान् होशील." इक्ष्वाकूच्या सांगण्यावरून दंड निघाला, तो विंध्य ओलांडून दक्षिणेकडे आला. तेथें त्याणें मोठें राज्य स्थापिलें, व पित्याच्या उपदेशाप्रमाणें वागून कीर्ति मिळविली. त्याची सर्व प्रजा सुखी होती. परंतु पुढें दण्ड राजा एकदा मृगयेस गेला असतां त्याला भार्गवकन्या अरजा ही दिसली. मदनानें पीडित होऊन त्याणें बलात्कारें तिला भ्रंशिलें. हें वृत्त भार्गवमुनीस कळतांच त्यानें "दंडाचें राज्य रजोवृष्टीनें विध्वस्त होईल!" असा शाप दिला तेणें-करून रजोवृष्टीनें दंडाचें राज्य विध्वस्त झालें. पुढें शेकडो वर्षांनीं तेथें प्रचंड अरण्य वाढलें, त्यासच दंड राजाच्या कथेचें स्मरण करून देणारें "दंडकारण्य" असें नांव पडलें. नंतर हजारो वर्षांनीं पुन्हा ह्या प्रदेशांत जागोजाग मनुष्यवसति झाली. ही कथा आमच्या ह्या काव्यांत वर्णिली आहे.

ह्या काव्यांत दंड राजाला झालेल्या दण्डाची, ह्मणजे शिक्षेची, हकीगत वर्णिली आहे, ह्मणून ह्याला "दंडदंडना" असें अन्वर्थक नांव दिलें आहे.

ह्या काव्यांत १२० पद्यें आहेत, व प्रत्येक पद्यास एक एक भिन्न वृत्त योजिलें आहे. जीं वृत्तें अक्षरसंख्येनें नियंत्रित असतात, व ज्यांचे चारी चरण सारखे असतात, अशींच वृत्तें चढत्या अक्षरसंख्येच्या क्रमानें घेतलीं आहेत. अर्धसमवृत्तें व मात्रावृत्तें वर्ज केलीं आहेत.

दण्डदण्डना.

श्लोक.

कन्या.

वृत्तें ज्यांना । हावीं नाना
तृप्ती त्यां हो[1] । काव्यें या हो ! १

पंक्ति.

वृत्तविचित्रा । दण्डचरित्रा
शम्मुनिया हो[1] । या शम लाहो[2] २

नंदिनी.

हें रचायास दे । काव्य धी शारदे !
तूझिया कामदा[3] । वंदितों मी पदां ३

तनुमध्या.

इक्ष्वाकुसुतानें । कामार्त[4] मनानें
केला व्यभिचार[5], । झालें अघ[6] फार ४

विद्युल्लेखा.

ह्या योगानें त्याची । झाली हानी साची
मृत्यू त्या पापाला[7] । दुष्टाचारें आला ५

शशिवदना.

मदनविकारा । अनुचित थारा
वितरुनि होतें । दुरित अहो ! तें ६

---

१ होओ ! २ लाभ. ३ मनोरथ पुरविणाऱ्या चरणाप्रत. ४ मदनानें पीडित झालेल्या (मनानें.) ५ सन्मार्गाचा त्याग. ६ पाप. ७ पापी माणसाला.

सोमराजि.

नव्हे जी स्वभार्या । तिशीं संगकार्या
मनीं द्या न थारा, । अधेच्छा निवारा. ७

माधवी.

दुष्टदंडदंडनों । मी समर्पितों जना;
आवडो तयांप्रती । मामकीने ही कृती ८

धात्री.

दंडाख्या भूपालाची । सन्मार्गांच्या काळाची
ही ऐका गोष्टी; जोडा— । पुण्या, पापेच्छा सोडा ९

मदलेखा.

पूर्वी श्रीमनुनाम । राजा सद्गुणधामें—
होता; राज्य तयाचें । लोकां सौख्यद साचें १०

कुमारललिता.

नयें नृपति बागे, । सुरां सुखवि यागें
द्विजां द्रविणें देई, । बरें ह्मणुनि घेई ११

मधुमती.

दुखवि निज तनू । सुखवि जन मनू
समयिं जल सदा, वसुमति फलदा १२

विद्युन्माला.

या विख्यात क्ष्मापालाचा । सूनू इक्ष्वाकू नांवाचा—

---

१ ह्या नांवाचें काव्य. २ माझी. ३ सन्मार्ग सोडणाऱ्या (अशा भूपालाची) ४ चांगल्या गुणांचें वसतिस्थान. ५ यज्ञाच्या योगानें. ६ ब्राह्मणांप्रत्त. ७ द्रव्य. ८ आपला देह झिजवी. ९ योग्य कालीं पाऊस पडे. १० पृथ्वी धान्यें, फळें, वगैरेंनीं समृद्ध असे. ११ क्ष्मा=पृथ्वी. क्ष्मापाल = पृथ्वीपति कि० राजा १२ पुत्र, मुलगा.

होता, प्रेष्ठ[1] क्षोणीभर्ता[2], । मोठ्या यज्ञांचाही कर्ता १३

समानिका.

घेउनी शरप्रहार । संगरीं अनेकवार
शत्रूंनीं मही तयास । अर्पिली सरत्नदास १४

माणवक.

शंभर त्याचे तनय, । प्राज्य[3] तयांचा विनय,
पाहुनियां हर्ष तयां । होइ पित्याच्या हृदया १५

प्रमाणिका.

असे तयां सुतांमधीं । कुनीति[4] दंडे[5] पापधी[6]
दिसे मरालसंकरीं[7] । उलूक[8] तो खरोखरीं १६

गजगति.

सुख वैरी विटगणीं । फिरुनि[9][10] तो खलमणी[11]
बघतसों अवकरीं[12] । सुख बहू किरि[13] वैरी १७

अनुष्टुभ्.

कुलकीर्तितमी[14] दंडा । साहे इक्ष्वाकु नांतरी
मुखदंष्ट्राहरी[15] हस्ता । साहे जेंवि न केसरी[16] १८

मणिबंध.

टाळिति पुन्नामा नरक । पुत्र ह्मणे त्यांतें जनक,

---

१ आवडता. २ क्षोणी = पृथ्वी. क्षोणीभर्ता = राजा. ३ पुष्कळ. ४ वाईट आहे नीति ज्याची असा. ५ ' दण्ड ' ह्या नांवाचा एक मुलगा. ६ पापी आहे बुद्धि ज्याची असा. ७ हंसांच्या समुदायांत ८ घुबड. ९ मिळशी. १० हलकट लोकांच्या संगतींत संचार करून. ११ हलकट लोकांत अग्रगण्य असा तो दण्ड १२ उकिरड्यांत. १३ डुकर. १४ वंशाच्या यशाला काळोखी लावणाऱ्या अशा (दण्डाला). १५ जबड्यांतून दाढा उपटूं पाहणाऱ्या (हाताला). १६ सिंह.

जो नरकीं लोटी जनका । पुत्र तया बोले जन कां ? १९

भुजगशिशुभृता.

सुतकृति खवळी राया, । मनिं अणु नुरली माया,
जनकहि विसरे प्रेम । प्रशम कुसुतिं हा नेम २०

भुजंगसंगता.

उपदेश तात तो करी । न वळेचि पुत्र तो तरी,
नलिकागत श्वपुच्छ हे ! । ऋजु नैव नैव नैव हो २१

त्वरितगति.

बघुनि तया खल तनया । नृप विसरे सकल दया
न सुनृप तो त्यजुनि नया । निज जनिं जो करिल दया २२

मत्ता.

इक्ष्वाकूनें निज तनयाची । केली चिंता स्वकुलयशाची
तातें भूपा बल केळवीलें, । भूपें ताता परि वळवीलें २३

चंपकमाला.

शेंवटिं ऐसा त्या क्षितिपानें । निश्चय केला शांत मनानें
" सूनु न मद्देशांत बसावा, । तो जवळीं माझ्या न असावा २४

कामदा.

दुष्ट दण्ड हा नीचसंगेती । लावि काळिमा मत्कुलाप्रती
राहु हा गमे वंशभास्करा, । दण्डनाम हा, दण्ड हा खरा " २५

---

१ शांति. २ कुत्र्याचें शेपूट. ३ सरळ. ४ त्या राजाच्या मनांत पुत्राविषयींची माया बळावत चालली, परंतु शेवटीं आपले राजा ह्या नात्याचें कर्तव्य स्मरून त्याणें ती माया सोडून दिली, म्हणजे त्याणें त्या मायेला चित्तांत थारा दिला नाहीं. ५ हलकटांशीं आहे मैत्री ज्याची

हंसी.

इक्ष्वाकूनें मग निज सुता । दुष्टाचारा खलजनैर्युता

आज्ञा केली, "त्यजुनि नगरा- । जा, हा वाटे मज पथ बरा २६

मयूरी.

सोडोनी जा पुत्रा ! साकेतीतें, । ओलांडोनी जा रे ! विंध्यांगातें

स्थापोनीया तेथें मोठ्या राज्या । सन्मार्गानें लाहें सौख्या प्राज्या २७

रथोद्धता.

विंध्यशैवलमहीधरांतरीं । राज्य नीतिनियमें सदा करीं

नीति जो अनुसरे महीपती । तोचि होइ सुखद प्रजेप्रती २८

वातोर्मी.

न्यायें वागें, मुनिवृंदास सेवीं, । लोकक्षेमीं तनया ! दृष्टि ठेवीं

स्वत्कीर्तीनें सगळें विश्व गाजो, । श्रीदश्रीच्यां विभवें राज्य साजो २९

स्वागता.

राज्य वृक्ष, सुम त्यास जनाचें- । प्रेम, सौख्य फल मानिति साचें

मूळ संमति, अमर्ष समीर, । भूप मालिक, खरा नय नीर ३०

इंद्रवज्रा.

जो सज्जनांचा नर संग सोडी, । दुष्टासवें जो सहवास जोडी,

त्याला मिळे नारक घोर[13] अन्तीं, । व्हावें नरानें रेतें नित्य सन्तीं ३१

शुद्धकामदा.

कुल तुझें असे लोकविश्रुतें, । नृपति जाहले त्यांत अद्भुत,

---

१ हलकट लोकांसहित २ अयोध्येप्रत. ३ विंध्यपर्वताला. ४ मिळीव. ५ पुष्कळ. ६ विंध्य आणि शैवल ह्या नांवांच्या दोन पर्वतांच्या दरम्यानच्या प्रदेशांत. ७ कुबेराच्या संपत्तीच्या वैभवेंकरून. ८ लोकांची कबूली. ९ लोकांचा राग १० वारा. ११ माळी. १२ पाणी. १३ भयंकर. १४ निमग्न १५ लोकांत प्रख्यात.

सदृश त्या कुला, त्यांहि पूर्वजां- । तव असो कृती, तुष्ट हो प्रजा ३२

ललित.

आपुल्या कुलीं प्रथित पार्थिव । जाहले तयीं प्रणय दाखिव
डाग त्यांचिया धवल कीर्तितें । यो न, जा पथें सुजनकीर्तितें ३३

सौदामिनी.

अनागासि पीडा तनूजा ! न दे, । न कोणांस मर्मच्छिदा गीं वदें
पित्याचें सुतीं प्रेम जैसें असे । तुझेंही असो प्रेम लोकीं तसें ३४

उपजाति.

स्वस्त्यस्तु ते ! जा त्वरिता गतीनें । अभीष्ट तें येथुनि संगतीं नें
हस्त्यश्व ने, कांचन, दास, दासी, । शतांग,--जें इष्ट तुझ्या मनासीं ३५

चंद्रांकमाला.

माझें सुता ! हें मनीं ठेविं उक्त । पाळून तें हो भवांतून मुक्त "
इक्ष्वाकुनें ह्यापरी आत्मजाला । संबोधिलें कीं लहो तो सुखाला ३६

दोधक.

यापरि ऐकुनि तातवचातें, । वंदुनिया मग तच्चरणातें,
दण्ड निघे द्रुत विन्ध्यनगातें । संगतिं घेउनि सैन्य घनातें ३७

उपेंद्रवज्रा.

सुमार्ग सेवीन, सुलोकसंग- । करीन, कीं होइ न नीतिभंग
असा मनीं निश्चय तो करून । त्यजून साकेत निघे अदून ३८

शालिनी.

विंध्याद्रीतें पोचला दण्ड काळें । तो लंघोनी दक्षिणाशेस चाले

---

१ शोभणारी. २ आछा भक्ति. ३ कालिमा--कलंक. ४ साधुजनांनीं सांगितलेल्या (पथें = मार्गानें) ५ निरपराध्यास. ६ हे पुत्रा ! ७ मर्मभेदक. ८ वाणी, भाषण. ९ तुझें कल्याण होओ ! १० रथ. ११ माझा उपदेश. १२ दुःखी न होता.

देखे तेथें देश राज्यास योग्य । रम्यत्वें जो [1]निर्जरांही सुभोग्य ३९

भद्रिका.

रुचिरसलिल[2] हा अनामय[3]— । प्रद तल महिचा सुदुर्जय[4]
सुखद बघुनि राज्य या स्थलीं । ससचिव करुं लागला बली ४०

मौक्तिकमाला.

तो वसवी हो पुर मधुमंत[5], । शोभविती त्या बहुविध संत,
देवकुलांनीं[6] गजबजलें तें, । सुंदर तेथें धनिकनिकेतें[7] ४१

भ्रमरविलसित.

येथें दंडें नयपथ धरिला, । सौख्यामोद[8] प्रकृतिसहि[9] दिला
विद्या शुद्धा प्रतिगृहं[10] दिसली, । लक्ष्मीही त्या स्थलिं बहु रमली. ४२

तोटक.

मधुमंतपुरीं दश लक्ष जन । सुख सेवुनि राहति हृष्टमन
अतिवृष्टि अवृष्टि न तेथ कधीं, । वसती जन तेथिल शांतिमधीं ४३

प्रमिताक्षरा.

न अकालमृत्युहत[11] तेथ जन । कलहाग्निदग्धें[12] अथवा सदन
व्यभिचारमूढ न नरी न नर, । जनकास पुत्र नचि तापकर ४४

वैश्वदेवी.

त्या राज्यामध्यें नोव्हती स्तेनबाधा[13], । लोकाचाराचा मार्ग होताचि साधा
होती वेदांची सर्व लोकांस गोडी, । शास्त्रोक्तें कर्मे लोक पुण्यास जोडी ४५

---

१ देवांनाही. २ चांगलें आहे पाणी ज्यांत असा (तल=पृष्ठभाग). ३ आरोग्य वर्धक. ४ शत्रूंपासून सुरक्षित. ५ मधुमंत ह्या नांवाचें शहर. ६ देवळांनीं. ७ श्रीमंत लोकांचीं घरें (त्या राजधानींत होतीं). ८ सुखाचा आस्वाद. ९ प्रजा जनांप्रत देखील. १० घरोघर. ११ अकालीं मेलेले. १२ भांडण रूपी अग्नीनें दग्ध झालेलें. १३ चोरांचा उपद्रव.

चंद्रवर्त्म.

स्वकरी नृप पुरोहित उशना, । जो अगोचर निरंतर मदना
राज्य तो करि विचारुनि सचिवां । चिंति तो निज मनीं प्रकृतिशिवा ४६

जलधरमाला.

पूर्वींच्या तो विसरुनि निंद्याचारा । झाला राजा सुनयविलासा थारा
योगक्षेमीं प्रकृतिचिया तो ठेवी– । लक्ष्य, प्रेमें उचित पथातें सेवी ४७

सारंग.

राज्यांत दण्डाचिया लोक संतुष्ट, । भूदेव संहृष्ट, धेनूहि संपुष्ट,
केली यथाकाल इंद्रें सदा वृष्टि, । होती सदा शस्यसंपन्न सृष्टि ४८

यूथिका.

शांतिहेतुकचि शत्रुकुलक्षय, । दानहेतुकचि कांचनसंचय,
ज्ञानहेतुकचि वाद करी नृप । तो असे निशिचरांसचि निष्कृप ४९

इंद्रवंशा.

मंत्रिप्रवीरोक्त पथास तो धरी, । गोब्राह्मणांचा प्रतिपाल तो करी,
ज्ञानोपपन्नांस सदैव आदरी, । स्तुत्या तयाची सरणी खरोखरीं ५०

वंशस्थ.

अशापरी राज्य अनेक वत्सरें– । करी नृपाल, क्षिति संमदें भरे
यशें तदीयें भरल्या दिशा दहा, । प्रशंसियेला अमरीं नृपोर्द्ध हा ५१

भुजंगप्रयात.

असो; वार्षिक क्रांतिनें रम्य आला । वसंत प्रमोदाढ्य पृथ्वीतलाला

---

१ उशना ह्या नांवाचा कुलगुरु ह्या राजानें ठरविला. २ जो मदनाच्या तावडींत सांपडत नसे. ३ प्रजेच्या कल्याणास. ४ योगक्षेम = कल्याण. ५ धान्यांनीं समृद्ध. ६ राक्षसांनाच. ७ निर्दय. ८ उत्कृष्ट मंत्र्यांनीं उपदेशिलेल्या (वर्तनक्रमाप्रत). ९ आनंदानें. १० उत्तम राजा.

अतां नष्टसामर्थ्य हेमन्त झाला, । मुदा जाहली हो! जनांच्या मनाला ५२

द्रुतविलंबित.

ऋतु वसंत सदैव मनोहर, । प्रमद दाखवि सृष्टि चराचर
ऋतु तसा दुसरा न हरी मना, । ऋतु तसा न दुजा सुखवी जना ५३

जलोद्धतगति.

सुमें प्रकटि हा ऋतू तरुवरी । यदीय[1] गगना सुगंधहि भरी
सुमें विकचतेस[2] पावुनि महा । प्रमोद नयनास अर्पिति अहा! ५४

तामरस.

मलयगिरि त्यजिला मिहिरानें[3] । धनददिशागमनोत्क[4] मनानें
दिवसमुखें[5] तुहिनापगमानें[6] । बहु गणिलीं रमणीय जनानें ५५

प्रभा.

क्षितिरुहें[7] कुसुमोच्चयें[8] शोभले, । जन बघुनि तयां बहू लोभले
अलिकुल[9] मधुलुब्ध त्यांचेवरी— । बसुनि कलरवें[10] दिगंता भरी ५६

मालती.

कुरबक, किंशुक, नीप[11], केशर, । कुसुमभरें[12] दिसले मनोहर
बसुनि तयांवरती शिलीमुखें[13] । नव मधु सेवुनि पावती सुख ५७

प्रियंवदा.

हसनिकातिलनिषेवणीं[14] रती[15] । हरवि हा ऋतु बलें जनाप्रती

१ ज्यांचा सुवास आकाशांत भरून जातो. २ प्रफुल्लपणाच्या स्थितीस. ३ सूर्यानें. ४ कुबेराच्या दिशेस (म्ह० उत्तरेस) जावयाला उत्कंठित अशा मनानें. ५ दिवसांचे आरंभ = प्रातःकाळ. ६ दहिंवर पडेनासें झाल्यामुळें. ७ वृक्ष. ८ पुष्पांच्या समुदायानें. ९ भुंग्यांचा थवा. १० गोड गायनानें. ११ हीं झाडांचीं नांवें आहेत. १२ फुलांच्या घोसांमुळें. १३ भुंगे. १४ हसनिका (म्ह० शेगडी,) आणि तीळ, ह्यांचें सेवन करण्यांत. १५ आवड.

शिशिरवायु[1] शमल्यामुळें जन । उपवनीं भ्रमुनि तोषवी मन ५८

मणिमाला.

कंठीं जन घाली पंकेरुहमाला[2], । लावी निज देहा श्रीखंडजलाला[3]
आंदोलनजन्यीं[4] सौख्यीं जन घेई, । रम्यें वसनें तो अंगावरि लेई ५९

स्रग्विणी.

रम्य पुष्पांचिया काननीं आवली । देखतां तोषती पानलोभें अली[5]
श्रोत्रसंतर्पणें[6] त्यांचिया निस्वनें । ह्या ऋतूमाजिं तीं कोंदतीं काननें ६०

विभावरी.

नृपति दण्ड मृगयेस्तव तेधवा । विपिनिं जाय; मृगया सुमहोत्सवा
पशु मृगादिक तयें वधिले वनीं, । अतुल पाँटव[7] तदीय शरासनीं ६१

कलहंस.

मृगयासुखांत अनुरक्त[8] उदण्डें[9] । वनिं एकलाच फिरला नृप दण्ड
वनिं मागुतींच पडला परिवारं[10], । द्रुमखण्डजालपंथ[11] दुर्गम[12] फार ६२

क्षमा.

नृप विपिनिं फिरे दण्ड तो एकला, । फिरुनि फिरुनियां फार तो भागला
परत पुरिं तयें इच्छिलें जावया, । पारि पथ विपिनीं नाढळे हो! तया ६३

प्रहर्षिणी.

एकाकी मग उशनस्तपोवनाला[13] । [14]कांतारीं भ्रमण करीत दण्ड आला

---

१ गार वारा बंद झाल्यामुळें. २ कमळांच्या माळा. ३ चंदनाचें पाणी. ४ झोपाळ्यांवर बसून होणाऱ्या सुखाप्रत. ५. भुंगे. ६ कानांस सुखविणाऱ्या त्यांच्या गुंजारवानें. ७ कौशल्य. ८ शिकारीच्या आनंदांत निमग्न ९ अतिशय. १० बरोबरची मंडळी. ११ मोडून पडलेल्या झाडांच्या समुदायांतून असलेली वाट. १२ चालण्यास कठिण. १३ "उशना" ह्या नांवाचा जो दण्डाचा पुरोहित, त्याच्या आश्रमास. १४ अरण्यांत.

प्रच्छायद्रुमतल सेविला तयानें, । तो तेथें रमवियला शकुंतगानें ६४

मंजुभाषिणी.

नवयौवनप्रभवरम्यविग्रहा । उशनःसुता कलश घेउनी अहा !
दिसली इथें सलिल बालपादपां— । प्रति घालितां मृदु करें तया नृपा ६५

मत्तमयूरी.

बाला होती सिंहकटी, उच्छ्रितभाली, । तीच्या कंठीं रम्य सुमांची माला
सौंदर्याची पीनकुचा ती खैनि वाटे, । ती पाहोनी कां न रतीचा मद आटे ? ६६

प्रभावती.

बघून ती मधुरमुखी कृशोदरी । नृप स्मरें सुविकल होय अंतरीं
बिलोपला हृदयिं अयुक्त युक्त वा— । विवेक हा; वळवियला रतोत्सवा ६७

अपराजिता.

तरुण नृपति तो, सुचंचल तन्मन, । सुरुचिरतनु ती, तपोवन निर्जन
मधुर ऋतु वसंत, मन्मथ निर्दय, । अहह ! नृपमनीं टिकेल कसा नय ! ६८

कमलिनी.

स्मरशक्ति थोर न ह्मणेल कशी जन ? । नर कोण तो वळवि न स्मर यन्मन ?
विधि विष्णु शंकर जयें जिणिले तया । जय ह्या नृपीं कठिण काय मिळावया? ६९

पत्थ्या.

जारि सत्पथें नृपति चालला तो चिर, । जारि तत्सुनीति बहुकाल होती स्थिर
तरि तो उपद्रवियला पलांत स्मरें । सरला विवेक, सरला विचार त्वरें ७०

---

१ दाट छायेच्या एका झाडाचा तळ. २ पक्ष्यांच्या गायनानें. ३ नवयौवनाच्या उद्भवामुळें रमणीय आहे शरीर जीचें अशी. ४ उंच आहे कपाळ जीचें ५ खाण. ६ अत्यन्त जर्जर, पीडित.

असंबाधा.

जावोनीया तो मग तिजपुढती ठेला । बोले कामार्त प्रतिहतनयं बाळेला
"तूं कोणाचीं? वसति तव कुठें आहे? । या रम्य स्थानीं वद कवण सखे! राहे? ७१

प्रहरण कलिता.

तव कवण पिता सुरुचिरवदने? । तप कवण इथें करि वद ललने!
तव वदन सखे! परिसुनि जन हा । मधुरिमकलिके वरिल सुख महा ७२

प्रमदा.

पतिस दिलीस तनू अथवा जनकें? । श्रमसि तरूंस सिंचु नेहि कां घटकें?
श्रमद कशास काम तुजला कवणें । वद दिधलें? न शक्य तुज हें करणें!" ७३

वसंततिलका.

दण्डोक्त हें वचन ऐकुनि ती कुमारी । बोले असें सरल भाषण चित्तहारी
"माझा असे प्रथित भार्गवनाम तात, । तत्पाद नित्य मुनि येउनि वंदितात ७४

रुक्मिणी.

दुजें तयाप्रति 'उशना' असेंहि नाम । तया ह्मणं मुनिजन पुण्यवीर्यधाम
महीपती गुरु ह्मणतो तयास दण्ड, । इथें वसे करुनि पिता तपें उदण्ड ७५

वासंती.

त्याची कन्या मी, मम 'अरजा' ऐसें नाम, । येथें सिंची मी तरु, मम हें आहे काम.
झालें नाहीं हो! पतिकरगीं मी उद्वाहें, । ताताची सेवा करुनिच मी येथें राहें" ७६

मध्यक्षामा.

त्या बालेचें मधुर वचन तें ऐकून । झाला दण्ड स्मरशरहत भारी दूनें

---

१ नष्ट झाली आहे नीति ज्याची असा. २ माधुर्याची कळी. ३ बापानें तुझें लग्न करून दिलें आहे किंवा नाहीं? ४ लहान घागरीनें ५ पुण्य आणि सामर्थ्य ह्यांचे निवासस्थान. ६ पतीच्या हवालीं झालेली. ७ लग्नानें. ८ मदनाच्या बाणांनीं ताडित. ९ पीडित.

आलिंगाया वरतनु रमणी ती बाला। ऐसा मोह प्रसभ वळवि तच्चित्ताला ७७

तूणक किं० चामर.

भूपतीचिया मनांतला विवेक लोपला,
कामबाणताप वाढला, अणू न थोपला,
लुप्तसाधुरीतिनीतिभीति दण्ड जाहला,
भार्गवीसमागमीं उशीर त्या न साहला ७८

लीलाखेल.

त्या कन्येच्या सौंदर्यानें व्यामूढात्मा होओनी
बोले राया लोकाचारप्रोक्तां रीती सोडोनी
प्रद्युम्नाची शक्ती बाधे रुद्धस्वांता गाधेया,
भोगाकृष्टा कैशी ती न क्षमापा दण्डा बाधे या ? ७९

शशिकला.

"तव बघुनि मृदु तनु मन रमलें,
मदननिशित शर मम हृदयिं सले
त्यजुनि जनकभय मज सह रम ये,
द्रुत चल, अदय न अस मजसि सये!" ८०

---

१ सुंदर आहे देह जीचा अशी. २ जोरानें. ३ नष्ट झाली आहे चांगली रीति, नीति आणि भीति ज्याची असा. ४ विव्हल झाला आहे आत्मा ज्याचा असा. ५ लोकाच्या व्यवहारांत चांगली म्हणून म्हटलेली ६ मदनाची ७ निरोधिलें आहे अंतःकरण ज्याणे अशा. ८ विश्वामित्राला. ९ विलासांनीं आकर्षिलेल्या. १० राजाला क्ष्मा=पृथ्वी. ११ मदनानें तीक्ष्ण केलेला.

रमा.

परिसुनिया नृपतिगिरा अपत्रपा हे
तरुणरविद्युति अरजास्य सत्य वाहे
मग वदली वचन असें तया धरापा,
" अनुसरणें कुपथ तुला न योग्य बापा ! ८१

मालिनी.

तुजसि कुपित माझा शाप देईल तात
जर वरशिल मार्गा साधु ज्या निंदितात
कर मजसि न लावीं, दूर हो, दूर हो, गा !
मजसि जनकसा तूं, लुब्ध हो या न भोगा ८२

कुमुदिनी.

समज मी पितृवशा, मम पिता मम धनी,
म्हणुनि त्या विनति तूं, धरुं नको भय मनीं
वितरिल प्रिय पित मज तुला विनवितां,
पुरविल द्रुत मनोरथ तुझा मम पिता ८३

चित्र.

हो न मूढ, हो न भोगलालसेचिया अधीन,
निंद्य मार्ग निंद्य रीति साधु सेविती कधीं न,
जाहल्यावरी विवाह हें असे तुझेंच गात्र,
होउं दे अधीं विवाह, हो न निंद्यकर्मपात्रें " ८४

---

१ निर्लज्जपणाची. २ सकाळच्या सूर्याची शोभा, (म्ह० रागामुळें तांबडा वर्ण आलेला). ३ अरजेचें मुख. ४ पृथ्वीपतीला. ५ तूं त्याची विनंती केलीस तर. ६ लवकर. ७ वाईट कर्माचा कर्ता.

वाणिनी.

परिसुनि या वचास नृप तो अतीव कोपे,
जणुं अबळाकरें हृदयिं ताडिलाच रोपें
त्वरित तिच्यापुढें नृपति तो स्मरार्त जाई,
स्वकरिं तिचा करी कर धरावयास घाई ८५

सूरा.

कामार्त तो बालिस त्या बोले वचें मंजुस्वरीं
तीं तीचिया वक्षःस्थलीं झालीं जणों शल्यापरी
दण्डा तिणें संबोधिलें, संप्रार्थिलें नानापरी,
झालें परी हा! तोयसें तें पालथ्या कुंभावरी ८६

पंचचामर.

मग क्षितीन्द्र त्या निघून भार्गवाश्रमांतुनी
स्वकीय पावला पुरास दीर्घ मार्ग चालुनी
परंतु तेथल्यातिथेंच शोक भार्गवी[1] करी,
विटाळली तनू ह्मणोनि खिन्न होय अंतरीं ८७

अतिशायिनी.

अरजा अतिमात्रें[2] तेधवा हृदयिं खिन्न झाली,
घडलें अघ जें तयें मनीं बहुत तोहि भ्याली
न टळे मल लागला अघें तनुस तो प्रयत्नें,
कुशलाहि नरास भंगलीं जुळति काय रत्नें? ८८

नर्दटक.

चिर बसली तिथेंच अरजा उपॅलीं[3] अमुखें,
बहु रडली ह्मणून "शिव हा! शिव हाय!" मुखें

---

१ भार्गवाची ह्मणजे उशनाची मुलगी, अरजा. २ अतिशय. ३ दगडावर.

जनकहि शिष्यवृंदवृत[1] तो परते समयीं,
निज तनया बघोनि रडतां खचला ह्रदयीं ८९

पृथ्वी.

शिलेवरि तनूभवा रुदनदूषिता भार्गवी,
विदीर्णवसनों[2], गलत्कचविलुप्तवक्त्रच्छवी[3]
पित्यास दिसली तयासमयिं ती रजःसंवृता[4]
उषःसमयिं[5] चंद्रिका[6] विरलमेघमंदीकृता[7] ९०

मंदाक्रांता.

कोणें पापें प्रसभ[8] चुरिला शांतिवारांशिसेतु[9] ?
झाला कोण प्रतिहतनयं[10] स्वात्मजाक्रोशहेतु[11] ?
हें योगानें मुनिवर निकें जाणुनीही तियेला
ऐशी पृच्छा[12] करि, " तुज कुणी निर्भयें स्पर्श केला ! " ९१

हरिणी.

परिसुनि अशी ताताची गी[13] त्रपाविनतानना[14]
पुनरपि करी दुःखावेगें सुता परिदेवनों[15]
मग हळुं हळूं ताता सारें कथी निजवृत्त ती,
कथन सरतां त्याच्या पायीं क्षमार्थ करी नती ९२

---

१ शिष्यसमुदायासह. २ फाटलीं आहेत चिरगुटें जीचीं. ३ विस्कळित झालेल्या केसांनीं नष्ट झाली आहे मुखकांति जीची. ४ धुळीनें मळलेली. ५ पहाटेस. ६ चांदणें. ७ विरळ विरळ अशा ढगांनीं अंधक झालेली (चंद्रिका). ८ एकदम. ९ शांतिरूपी समुद्राचा बंधारा. १० लोपली आहे नीति ज्याची असा. ११ आपल्या मुलीच्या विलापाला कारण. १२ प्रश्न. १३ वाणी. १४ लज्जेनें नमलें आहे मुख जीचें अशी. १५ विलाप.

शिखरिणी.

पुन्हां सांगे ती त्या, " प्रखर न वचा बोल मजला,
न पापाचारा म्या परपुरुष तो आळवियला
क्षमावी क्षम्या मी सदयहृदयें त्वां तनुभवा,
करावा न्यायज्ञें समुचित तया दण्ड कितवा " ९३

वंशपत्रपतित.

योगबलें मुनीन्द्र उशना झटिति समजला,
कीं नृपदण्ड कृत्यचि, न संशय अणु उरला,
क्रोध तदीय लोचन करी रुधिरसमरुची,
तत्तनु कांति दावि पवनप्रचलित तरुची ९४

कुसुमलतावेल्लिता.

बोले शिष्यां तो मग मुनि असें, " दंडसा नीच दंड !
त्याला मी दंड त्वरित करितों निश्चयानें प्रचंड
त्याणें केलें हो ! अघ हतभयें माझिया कन्यकेशीं,
माझ्या शब्दें हो अविहितफलें ध्वंस त्याच्या प्रदेशीं ९५

चित्रलेखा.

पापी दुष्ट त्यजुनि नयभया जो अदारांस दारा—
मानायाला लवहि न कचरे त्या न विश्रांत थारा
हें सर्वांना त्वरित कळवितों दंड दंडीं करोनी,
त्याचें राज्य, प्रकृतिजन, महा मंदिरें संहरोनी ९६

---

१ तावडतोब. २ रक्ताप्रमाणें आहे कांति ज्याची. ३ वाऱ्यानें हलत असलेल्या. ४ नष्ट झाली आहे भीति ज्याची. ५ अकुंठित आहे परिणाम ज्याचा अशा (शद्बानें.) ६ पत्नी (समजावयाला इ०) ७ पारिपत्य. ८ प्रजाजन.

नंदन.

नरकानिवास लाहुनिच तो वसुंधरेचा पती
त्वकर पापवर्तन[१]फलास मेळवो दुर्मती
दुरितपथानुवर्तनें बळें करील जो भूपती,
मुनिजन सर्व विष्णु न कधीं तयाप्रति बोलती ६

नाराच.

वसुमतिवरि जो करि वृष्टि शस्यार्थ[२] वृद्धश्रवाँ[३],
विपुल जळ नद्यांस देवोनि जो रक्षितो मानवां
परिसुनि मम तो महोग्रा अशा शापवाक्या अहा!
अनवरॅत[४] रजा अहोरात्र वर्षील जीवापहो[५] ७

शार्दूलललित.

शस्यालंकृत[६] विंध्यशैवल[७]महाशैलोपनिहित
दण्डाचा विषय[८] प्रचण्डजनतोसंकीर्ण[९] महित[१०]
होओ तालतरूच्छ्रयावधि[११] रजोव्याकीर्ण[१२] सकल
पावो सप्तदिनावधींत लय तो राज्यासह खल ८

विबुधप्रिया.

मंदिरें ललितें[१३], विशाल शिरोगृहें[१४], मणिकुट्टिमें[१५],
विस्तृतायत[१६] घण्टिकापथ[१७], पल्वलें[१८] पृथु[१९] कृत्रिमें[२०],

१ पापाच्या मार्गाचें अवलंबन. २ शेतें पिकण्यासाठीं. ३ इंद्र. ४ सतत. ५ प्राहरण करणाऱ्या (रजा=धुळीस). ६ शेतानीं शोभायमान. ७ विंध्य आणि शैवल या दोन मोठ्या पर्वताजवळ असलेला. ८ देश. ९ पुष्कळ लोकांनीं गजबजलेला. १० पूज्य ११ ताडाच्या झाडाच्या उंचीच्या मर्यादे इतका १२ धुळीनें आच्छादित. १३ सुंदर १४ गच्चया. १५ मूल्यवान् दगडांच्या फरशा. १६ लांब आणि रुंद. १७ मोठे रस्ते १८ तळीवरें. १९ मोठालीं. २० मनुष्यकृतीचीं.

वसुमतिचे तळावरि पडों रज तें घनदाट लागलें,
खगपशुमर्त्यही भिवविलेच रँजोनिकरें[1] अमंगळें[2] ! १०७

स्रग्धरा.

सैरावैरा भयानें पळताचि सुटले लोक सोडोनि सँद्में[3],
जैसे जाती त्वरेनें इभकरदलितें[4] भृंग सोडूनि पँद्में[5];
रँथ्यामध्यें[6] मिळाले जन पुसिति जना, " काय हो ! हा अनर्थ ?
तो टाळावा कसा हें कवण नर कथायास आहे समर्थ ? " १०८

हंसी.

श्रोत्रीं[7], वक्त्रीं[8], घ्राणीं[9], नेत्रीं[10], गगनतलें[11]निपतित रजें[12] अनूनें[13]
लोकां ग्रासी, पीडी, गांजी, भिववि, विकलकरणें[14] करि शिरून
गुंजे ऐशी ताम्रा वृष्टी सलिलरहित अनिशं[15] पडत होती,
बोलों चालों देना कोणा, प्रतिहतकरणें[16] जन करि अहो ! ती १०९

अमृतध्वनि.

दण्डाचिया सकल देशामधें परमकोलाहलें[17]ध्वनि भरे,
आक्रोश त्या समयिं जो जाहला परम अत्युग्र तो नचि सरे
कोणीहि त्या समयिं ऐकोनिही करुण हाका मनावरि न घे,
त्या संकटीं पुरुष पत्नीकडे, जननि तोकीं[18]कडे, नचि बघे ११०

---

१ धुळीच्या लोटानें २ अशुभ, म्हणजे नाशकारक. ३ घरें. ४ हत्तीच्या सोंडेनें चिरडून टाकलेलीं. ५ कमळें. ६ रथ्या=रस्ता. ७ कानांत. ८ तोंडांत. ९ नाकांत. १० डोळ्यांत ११ आकाशाच्या पृष्ठभागापासून खालीं पडलेलें. १२ धूळ. १३ पुष्कळ. १४ विव्हळ किंवा पीडित झालीं आहेत इंद्रियें ज्यांचीं. १५ एकसारखीं; अस्खलित. १६ कुंठित झाले आहेत, किंवा बंद पडले आहेत, इंद्रियांचे व्यापार ज्यांच्या. १७ फार मोठा गलबला. १८ मुलाकडे.

अश्वधाटी.

धावे जन व्याकुलात्मा[1] तया संकटीं मूढसा ओरडे आरडे,
माता स्वसंरक्षणीं व्यग्र[2] त्या संकटीं देइना लक्ष्य तोकाकडे
आप्ताकडे आप्त पाहेचि ना, मित्र मित्राकडे कान देईच ना,
नैसर्गिक[3] प्रेम अत्याहितीं[4] कृत्रिमें[5] प्रेम वा कोण आणी मना ? ॥

उमा.

यापरि गोंधळ घोर भयंकर दण्डमहीपतिदेश भरी,
व्योमतला[6]हुनि दाट रजश्चयें[7] तो खळला न मुहूर्तभरी[8];
संतत तें रज भूतलिं सांठुनि होति थरावर थोर थर,
सर्व चराचर सृष्टिस लोपवि तो घनदाट रजोनिकर ॥

मदिरा.

ताल[9]तरूच्छ्रित धूलिसमुच्चय भूमितलावरि तो पडला हो !
मर्त्य तयीं[10] गढले पशुपक्षिहि, कोणिहि तो शकले नचि साहों;
सुंदर मंदिर, सौध, विहंगमकेलिगृहें[11] गढलीं सगळालीं,
वस्तु निसर्गज कृत्रिम वा [12]तेइं झांकुनि जाउनि सृष्टि बुझाली ! ॥

सवाई.

धूळि निरंतर[13] जीवितनाशक[14] वर्षली दिवस सात निशा हो !
घोर भयंकर काल जगाप्रति होय, कैंवि मग जीवित राहो ?
पौर जनांसह, मंत्रिगणासह पावला मरण दण्ड नृपाल,
धूलिनिगूहित[15], रूपतिरोहित[16] जाहलें अखिल राज्य विशाल ! ॥

---

१ पीडित झाला आहे आत्मा, म्हणजे जीव, ज्याचा. २ निमग्न. ३ स्वाभाविक ४ महा संकटांत. ५ मैत्री वगैरेसारखें. ६ आकाशाचा पृष्ठभाग. ७ धुळीचा समुदाय ८ क्षणभर देखील. ९ ताडाच्या झाडाइतका उंच. १० त्या धुळीच्या थराखालीं ११ पक्ष्यांचीं क्रीडा करावयाचीं खुराडीं. १२ त्या प्रसंगीं. १३ न खळणारी १४ प्राण हरण करणारी. १५ धुळीनें झांकून गेलेलें. १६ रूपाच्या संबंधानें लुप्त झालेलें.

दीर्घशील[1] विशाल नाटकवोट[2] चित्रविचित्रित,
पावतील लयास सात दिनीं रजक्षयगूहित[3] ! १००

सुमधुरा

दण्डाच्या सर्व राज्यांतिल विपणिका[4], प्रासादे[5], वलभी[6],
हर्म्यें[7], पानीयशाला[8], पृथु[9] उपवनें[10], पुष्पालि[11] सुरभी[12],
रथ्या[13], हस्ती प्रचण्ड, प्रथित[14] वृषभें[15], प्रेंखा[16], रथ, हयें[17],
शापानें माझिया ते सकलहि अहो ! पावोत विलय ! १०१

सुरसा.

दण्डाच्या सर्व देशांतिल सकल पुरें, घोषें[18], नगरें,
ग्रामें, आभीरपल्ली[19], निलय, उपवनें, गोपुरें[20], घरें,
उद्यानें, नाट्यशाला, खगनिर्वहगृहें[21], कुंजविवरें[22],
सर्वांचा नाश होओ अविरत[23] पडतां धूलिनिकर[24] ! १०२

शार्दुलविक्रीडित.

शिष्यांनो, सगळे तुह्मी त्यजुनि जा देशास दण्डाचिया,
येथें वास नका करूं, विषयें[25] हा जा दूर सोडोनिया;
बांधा आश्रम अन्य भूमितलिं जा, अन्यत्र जाईन मी,
मच्छापोक्ति भयंकरा द्रुत फला दावील भूपाधमीं[26] !" १०३

---

१ विस्तीर्ण आहेत पडव्या, किंवा सोपे, ज्यांचे. २ नाटकाचीं आवारें. ३ धुळीच्या समुदायानें आच्छादित. ४ बाजारांतील गल्ल्या. ५ मोठमोठे वाडे. ६ गच्च्या, किंवा छपरें. ७ सावकारांचीं घरें. ८ पाणपोया. ९ मोठमोठीं. १० बागा. ११ फुलांचे ताटवे. १२ सुगंधित. १३ रस्ते. १४ नामांकित. १५ बैल. १६ झोपाळ्यासारखीं वाहनें. १७ घोडे. १८ धनगरांचे वाडे. १९ गुराख्यांचे वाडे किंवा गांव. २० गांवाच्या वेशी. २१ पक्ष्यांचीं खुराडीं. २२ लतामंडप. २३ न खळतां. २४ धुळीचा लोट. २५ प्रदेश. २६ नीच राजावर.

मेघविस्फूर्जित.

अशी आज्ञा होतां नमुनि मुनिला शिष्य गेले निघून,
मनीं होओनीया चिरंपरिचयें आश्रमत्यागदूनें
वदे ऐसें कन्येप्रति मग मुनी, " तूं रहा याच ठायीं
स्वताच्या पापाचें निरसन करायास नाना उपायीं ! १०

गीतिका.

अरजे ! इथेंच समाहिता करिं वास, सोड न हें स्थल,
सर योजनावधि हें मनोहर सेविं तज्जल निर्मल,
क्षितिवारिखस्थें शरीरि या स्थलिं वर्षतां रज येतिल
सगळे वचें मम वांचतील, लयास ते नचि जातिल !" १०

सुवदना.

ऐशी आज्ञा पित्याची परिसुनि अरजा बोले, " बहु बरें ! "
तातत्यागोत्थशोकोद्भवें जल न तिच्या नेत्रांतिल सरे;
गेला अन्यत्र तोही मुनि निज तनयेलागीं पुसुनिया,
ती तेथें दुःखमूढा रडताचि बसली शांति त्यजुनिया ! १०

पंचकावली.

मुनिवर भार्गव त्यजुनिया मग तें स्थल गेलियावरी
भरि गगना अहो ! अविरतें द्रुत तें रज कुंकुमापरी

---

१ बहुत काळ ते तेथें राहिलेले असल्यामुळें. २ तो आश्रम सोडून जाण्याचा प्रसंग आल्या कारणानें. ३ शांतपणें. ४ एक योजन विस्तार ज्याचा असें (हें सर म्हणजे सरोवर). ५ पृथ्वीवर, किंवा पाण्यांत, किंवा आकाशांत, राहणारि. ६ प्राणी ७ बापाच्या त्यागानें होणाऱ्या दुःखामुळें उत्पन्न झालेलें (जळ म्हणजे बाष्प) ८ तिचा निरोप घेऊन. ९ न खळणारें. १० तात्काळ.

दुसरी सवाई.

अनर्थपथीं[1] रत[2] यास्तव हे स्थिति दण्डनृपावरि ओढवली,
ससचिवें[3], सप्रजें[4] मृत्युचिया मुखिं तो पडला क्षितिपाल बली !
धरुनि मनीं उपदेश असा परदारसुखीं न रमा नर हो !
जर रमला तर येइल निश्चितें[5] संकट घोर भयंकर हो ! ११५

आद्रितनया.

सुवितत[6] जेथ दण्डनृपतिप्रदेश वसुधातलीं पसरला
मरुनि पशू, विहंग, नर, तो शतावधि[7] समा[8] तसाच उरला,
मग पुढती अरण्य निबिड प्रचण्डतरु[9] त्या स्थलीं उगवलें,
संमुचित[10] "**दण्डकावन**" असें कथास्मरणकारि[11] नांव पडलें ! ११६

तन्वी.

या वनिं जेथें मुनिवरें[12] वसले बांधुनिया उटज[13] तपनकामें[14],
त्याप्रति देती समुचितचि " जनस्थान " असें विबुधजन सुनाम
या व्यतिरिक्त[15] प्रचुर[16] पसरला त्या वनिंचा अतिगहन विभाग,
तेथ सुखानें अगणित वसले लक्ष समा[17], हरि[18], करि[19], किरि[20], नाग[21] ११७

क्रौंचपदा.

लक्ष समा ह्या काननिं होती हरिकरिकिरिवृक[22]शश[23]खगवसती,
उच्छ्रित[24] तेथें पादप[25] होते अविरल ह्मणुनि मनुजगति[26] नव्हती,

---

१ अनीतिच्या मार्गांत. २ निमग्न, आसक्त ३ सचिवांसहित. ४ प्रजाजनांसहित. ५ निश्चयानें. ६ अति विस्तीर्ण. ७ शेकडो. ८ वर्षे. ९ मोठमोठे आहेत वृक्ष ज्यांत असें (अरण्य). १० योग्य. ११ दंड राजाच्या इतिहासाचें स्मरण करून देणारें. १२ श्रेष्ठ ऋषि. १३ झोपड्या. १४ तपश्चर्या करूं इच्छिणारे. १५ या स्थानाच्या आजूबाजूचा. १६ खूप मोठा. विशाल. १७ वर्षे. १८ सिंह. १९ हत्ती. २० डुकर. २१ मोठे साप. २२ लांडगे. २३ ससे. २४ उंच उंच. २५ वृक्ष. २६ माणसांचा प्रवेश.

दण्डदण्डना.

लक्ष समा ह्या संपुनि गेल्यावर मग तरुतति[1] अगणित तुटली[2],
येथ जनांनीं विस्तृत राज्यें अविरलमनु[3]जवसति वसवियलीं ११८

भुजंगविजृंभित.

पूर्वी होतें मोठें राज्य प्रचुरजननि[4]र्वहवसति प्रसिद्ध धरातलीं,
तेथें भव्यारण्या[5]ली ही प्रथम, मग जननिवसति अहो! स्थलींस्थलिं जाहली,
ही गोष्टी लोकांच्या चित्तीं विविधवि[6]षयरुचिरतमा सुनीति ठसाव्रया–
काव्याच्या रूपें केली, ती कळवुनि अनय नय करो सुमार्गधरा तया ११९

दंडक.

दिनकरकुलसंभ[7]वेक्ष्वाकुचा[8] पुत्र भारी दुराचारसंपन्न दण्डाख्य जो जाहला,
अविनयें[9] अतिमा[10]त्र केला तयें भार्गवीच्या सवें यासुळें द[11]ण्ड तो घोरसा लाहला;
कथनें[12] सुरस हें जनालागिं काव्यांतलीं मुख्य वृत्तें, सदाचारही दावुनी जो खरा,
उ[13]भयविध करोनिया वृत्तदि[14]ग्दर्शना प्राज्यें[15] देओ सुखा सज्जना, शांति विद्याधरा.

——विद्याधर वामन भिडे बी. ए.

समाप्त.

---

१ वृक्षांची जाळीं. २ तोडली गेली. ३ दाट आहे मनुष्यांची वसति ज्यांत अशीं (राज्यें) ४ खूप मोठी आहे माणसांची वसति ज्यांत असें (राज्य). ५ दाटच्या अरण्याची रांग. ६ अनेक बाबतींमुळें फार रमणीय. ७ सूर्याच्या कुळांत जन्मलेल्या इक्ष्वाकूचा. ८ वाईट आचरणाचा. ९ असभ्यपणा. १० फार. ११ पापिष्ठ. १२ निवेदन. १३ दोन्ही प्रकारच्या. १४ वृत्तांचे निरूपण, म्हणजे काव्यांतील श्लोकांची मांडणी, आणि वर्तनक्रम. १५ पुष्कळ.